न्मृगाञ्छरैः शुद्धैश्चचार स महाबलः ११ भीमसेनस्तु विख्यातो महान्तं दंष्ट्रिणं बलात् । निघ्नन्नागशतप्राणो वने तस्मिन्महाबलः १२ मृगाणां सवराहाणां महिषाणां महाभुजः । विनिघ्नंस्तत्र तत्रैव भीमो भीमपराक्रमः १३ स मातङ्गशतप्राणो मनुष्यशतवारणः । सिंहशार्दूलविक्रान्तो वने तस्मिन्महाबलः १४ वृक्षानुत्पाटयामास तरसा वै बभञ्ज च । पृथिव्याश्च प्रदेशान्वै नादयंस्तु वनानि च १५ पर्वताग्राणि वै मृद्गन्नादयानश्च विज्वरः । प्रक्षिपन्पादपांश्चापि नादेनापूरयन्महीम् १६ वेगेन न्यपतद्भीमो निर्भयश्च पुनः पुनः । आस्फोटयन्क्ष्वेडयंश्च तलतालांश्च वादयन् १७ चिरसंबद्धदर्पस्तु भीमसेनो वने तदा । गजेन्द्राश्च महासत्त्वा मृगेन्द्राश्च महाबलाः १८ भीमसेनस्य नादेन व्यमुञ्चन्त गुहा भयात् । क्वचित्प्रधावंस्तिष्ठंश्च क्वचिच्चोपविशंस्तथा १९ मृगप्रेप्सुर्महारौद्रे वने चरति निर्भयः । स तत्र मनुजव्याघ्रो वने वनचरोपमः २० पद्भ्यामभिसमापेदे भीमसेनो महाबलः । स प्रविष्टो महारण्ये नादान्नदति चाद्भुतान् २१ त्रासयन्सर्व-

---

मृगया करणारा तो महाबलाढ्य भीमसेन शुद्ध बाणांनीं मृगाचा वध करीत करीत संचार करूं लागला ११. शेंकडां गजांचें सामर्थ्य असलला तो महाबलाढ्य भीमसेन शारीरबलाच्याच जोरावर त्या वनामध्यें मोठमोठे रानडुक्कर मारूं लागला १२; मृग, वराह आणि महिष ह्यांचाही तो भयंकर पराक्रम करणारा महासामर्थ्यवान् भीमसेन ठिकठिकाणीं वध करूं लागला १३. इतकेंच नव्हे; परंतु, शेंकडों हत्तींचें सामर्थ्य अंगीं असल्यामुळें असंख्य मनुष्यांचें निवारण करणाऱ्या आणि सिंह व व्याघ्र ह्यांप्रमाणें पराक्रमी असलेल्या त्या महाबलाढ्य भीमसेनानें त्या वनामध्यें १४ वृक्ष उपटून व मोडून टाकिले. त्याचप्रमाणें तेथील भूप्रदेश व वनें तो नादित करूं लागला १५; निःशंकपणें गर्जना करीत करीत तो पर्वतशिखरांचा विध्वंस करूं लागला; वृक्ष फेकून देऊं लागला व आपल्या गर्जनेनें पृथ्वी व्याप्त करूं लागला १६ आणि पुनरपि तो निर्भय भीमसेन वेगावेगानें उड्या मारून दंड ठोकूं लागला, शीळ घालूं लागला व हातांनीं टाळ्याही वाजवूं लागला १७. ह्याप्रमाणें बहुत दिवसांपासून बलाविषयीं गर्व वहात असलेला तो भीमसेन वनामध्यें (जिकडे तिकडे दंगा करूं लागला) असतांना मोठे मोठे सामर्थ्यवान् श्रेष्ठ गज व महाबलाढ्य सिंहही १८ त्याच्या गर्जनेमुळें भीतीनें गुहा सोडून चालते झाले. तो कोठें धांवत असे, कोठें उभा रहात असे व कोठें बसत असे १९ आणि अशा रीतीनें मृगांची इच्छा करणारा तो निर्भय भीमसेन त्या अतिभयंकर वनामध्यें संचार करीत असे २०. वनचरांचीच उपमा ज्याला योग्य आहे

भूतानि महासत्त्वपराक्रमः । ततो भीमस्य शब्देन भीताः सर्पा गुहाशयाः २२ अतिक्रान्तास्तु वेगेन जगामानुसृतः शनैः । ततोमरवरप्रख्यो भीमसेनो महाबलः २३ स ददर्श महाकायं भुजङ्गं लोमहर्षणम् । गिरिदुर्गे समापन्नं कायेनावृत्य कन्दरम् २४ पर्वताभोगवर्ष्माणमतिकायं महाबलम् । चित्राङ्गमङ्गजैश्चित्रैर्हरिद्रासदृशच्छविम् २५ गुहाकारेण वक्त्रेण चतुर्दंष्ट्रेण राजता । दीप्ताक्षेणातिताम्रेण लिहानं सृक्किणी मुहुः २६ त्रासनं सर्वभूतानां कालान्तकयमोपमम् । निःश्वासक्ष्वेडनादेन भर्त्सयन्तमिव स्थितम् २७ स भीमं सहसाभ्येत्य पृदाकुः कुपितो भृशम् । जग्राहाजगरो ग्राहो भुजयोरुभयोर्बलात् २८ तेन संस्पृष्टगात्रस्य भीमसेनस्य वै तदा । संज्ञा मुमोह सहसा वरदानेन तस्य हि २९ दश नागसहस्राणि धारयन्ति हि यद्बलम् । तद्बलं भीमसेनस्य भुजयोरसमं परैः ३० स

असा तो पुरुषश्रेष्ठ महाबलाढ्य भीमसेन त्या वनामध्यें पायांनींच जाऊं लागला आणि महारण्यामध्यें प्रविष्ट झाला असतां अद्भुत गर्जना करूं लागून २१ त्यांच्या योगानें तो महासामर्थ्यवान् व महापराक्रमी भीमसेन सर्व प्राण्यांना त्रस्त करूं लागला. तेव्हां भीमाच्या शब्दानें भिऊन गेलेले गुहानिवासी सर्प २२ वेगावेगानें गुहा सोडून चालते झाले व तोही पाऊल न वाजवितां त्यांच्या मागोमाग जाऊं लागला. तदनंतर, श्रेष्ठ देवांप्रमाणें असलेल्या त्या महाबलाढ्य भीमसेनानें २३, दर्शन झालें असतां अंगावर रोमांच उठविणारा असा एक धिप्पाड भुजंग आपल्या शरीरानें एक गुहा व्याप्त करून पर्वतावरील गहनप्रदेशामध्यें असलेला अवलोकन केला २४. त्या धिप्पाड व महाबलाढ्य अजगराचें शरीर आश्चर्यकारक, अद्भुत अवयवांनीं युक्त आणि पर्वताप्रमाणें विशाल होतें व त्याची कांति हळदीप्रमाणें होती २५. चार दंष्ट्रा, लकलकीत व अतिशय ताम्रवर्ण नेत्र ह्यांनीं युक्त असलेलें त्याचें देदीप्यमान मुख पर्वताच्या गुहेप्रमाणें दिसत असून तो वारंवार जिभळ्या चाटीत होता २६; सर्व प्राण्यांना तो त्रस्त करून टाकीत होता. काल, मृत्यु व यम ह्यांप्रमाणें तो दिसत होता आणि सुस्कारे व फुस्कारे ह्यांच्या ध्वनीनें तो जसा कांहीं सर्व जगताला तुच्छ करीत राहिलेला होता २७. ह्याप्रमाणें असलेला तो सर्प अतिशय क्रुद्ध होऊन एकाएकीं भीमसेनासमीप आला आणि त्या गट्ट करून टाकणाऱ्या अजगरानें आपल्या सामर्थ्यानें त्याचे दोन्ही हात मुखामध्यें धरिले २८. अगस्त्यमुनींचें त्या अजगराला वरप्रदान असल्यामुळें त्यानें भीमसेनाच्या शरीराला स्पर्श करितांक्षणींच भीमसेनाला एकाएकीं मूर्च्छा आली २९. जें बल सहन करण्यास दहा हजार हत्तींची अवश्यकता असे तें भीमसेनाच्या बाहूंचें

तेजस्वी तथा तेन भुजगेन वशीकृतः । विस्फुरञ्छनकैर्भीमो न शशाक विचेष्टितुम् ३१ नागायुतसमप्राणः सिंहस्कन्धो महाभुजः । गृहीतो व्यजहात्सत्त्वं वरदानविमोहितः ३२ स हि प्रयत्नमकरोत्तीव्रमात्मविमोक्षणे । न चैनमशकद्वीरः कथंचित्प्रतिबाधितुम् ३३ [६८८४] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वण्याजगरपर्वण्यजगरग्रहणेऽष्टसप्तत्यधिकशततमोऽध्यायः ॥ १७८ ॥

वैशम्पायन उवाच ॥ स भीमसेनस्तेजस्वी तथा सर्पवशं गतः । चिन्तयामास सर्पस्य वीर्यमत्यद्भुतं महत् १ उवाच च महासर्पं कामया ब्रूहि पन्नग । कस्त्वं भो भुजगश्रेष्ठ किं मया च करिष्यसि २ पाण्डवो भीमसेनोऽहं धर्मराजादनन्तरः । नागायुतसमप्राणस्त्वया नीतः कथं वशम् ३ सिंहाः केसरिणो व्याघ्रा महिषा वारणास्तथा । समागताश्च शतशो निहताश्च मया युधि ४ राक्षसाश्च पिशाचाश्च पन्नगाश्च महाबलाः । भुजवेगमशक्ता मे सोढुं पन्नगसत्तम ५ किं नु विद्याबलं किं नु वरदान-

---

बल साधारण प्राण्याच्याही बलाशीं बरोबरी करीनासें झालें ३०. पुढे त्या सर्पानें सर्वस्वीं आपल्या अधीन करून टाकिलेला तो तेजस्वी भीमसेन हळूं हळूं हालचाल करण्याचा यत्न करूं लागला; परंतु, तो चलनवलन करण्यास समर्थ झाला नाहीं ३१. सारांश, दहा हजार हत्तींइतकें ज्याला सामर्थ्य आहे व ज्याचे स्कंध सिंहाच्या स्कंधासारिखे आहेत असा तो महापराक्रमी भीमसेन वरप्रदानामुळें मोहित झाला असतां त्याला भान राहिलें नाहीं ३२. तथापि, आपली सुटका करण्याकरितां तो वीर अत्यंत प्रयत्न करूं लागला; परंतु, तो त्या सर्पाला कोणत्याही प्रकारें पीडा देण्यास समर्थ झाला नाहीं ३३. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील आजगरपर्वांपैकीं अजगरानें भीमसेनाला ग्रस्त केल्याविषयीं एकशें अठ्याहत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ १७८ ॥

वैशंपायन सांगतातः—तो तेजस्वी भीमसेन त्या सर्पाच्या तडाख्यांत सांपडला असतां त्याच्या अत्यंत वीर्याविषयीं विचार करूं लागला १ आणि त्या महाभुजंगाला तो ह्मणाला " हे पन्नगा, हे भुजंगश्रेष्ठा, तूं कोण आहेस व माझ्याशीं तुला काय कर्तव्य आहे हें तूं आपल्या इच्छेप्रमाणें मला सांग २. अरे, धर्मराजानंतर झालेला मी पांडुपुत्र भीमसेन आहें आणि मला दहा हजार हत्तींचें सामर्थ्य आहे. तेव्हां तूं मला अगदीं आपले स्वाधीन कसें करून घेतलेंस ? ३. आयाळ असलेले सिंह, व्याघ्र, महिष आणि गज शेंकडों एकत्र जुळून आले असतांही युद्धामध्यें मीं त्यांचा वध करून टाकिला आहे ४ व, हे भुजंगश्रेष्ठा, माझ्या बाहूंचा वेग सहन करण्यास

मयो तव । उद्योगमपि कुर्वाणो वशगोस्मि कृतस्त्वया ६ असत्यो विक्रमो नृणामिति मे धीयते मतिः । यथेदं मे त्वया नाग बलं प्रतिहतं महत् ७ वैशम्पायन उवाच ॥ इत्येवं वादिनं वीरं भीममक्लिष्टकारणम् । भोगेन महता गृह्य समन्तात्पर्यवेष्टयत् ८ निगृह्यैनं महाबाहुं ततः स भुजगस्तदा । विमुच्यास्य भुजौ पीनाविदं वचनमब्रवीत् ९ दिष्टस्त्वं क्षुधितस्याद्य देवैर्भक्षो महाभुज । दिष्ट्या कालस्य महतः प्रियाः प्राणा हि देहिनाम् १० यथा त्विदं मया प्राप्तं सर्परूपमरिन्दम । तथावश्यं मयाख्याप्यं तवाद्य शृणु सत्तम ११ इमामवस्थां संप्राप्तो ह्यहं कोपान्महर्षिणाम् । शापस्यान्तं परिप्रेप्सुः सर्वं तत्कथयामि ते १२ नहुषो नाम राजर्षिर्व्यक्तं ते श्रोत्रमागतः । तवैव पूर्वः पूर्वेषामायोर्वंशधरः सुतः १३ तपोभिः क्रतुभिश्चैव विद्ययाभिजनेन च । त्रैलोक्यैश्वर्यमतुलं प्राप्तं मे विक्रमेण च १४ अथ

महाबलाढ्य राक्षस, पिशाच व भुजंगही समर्थ नाहींत ५. तेव्हां ज्याअर्थी तूं मला आपल्या कचाट्यात धरिलें आहेस आणि ज्याअर्थी मी सुटण्याचा यत्न करीत असूनही तुझ्यापासून माझी सुटका होत नाहीं त्याअर्थी हें कां तुझ्या कांहीं विद्येचें सामर्थ्य आहे ? किंवा वरदानाचा प्रभाव आहे?६. हे भुजंगा, माझें हें मोठें बलही ज्याअर्थी तूं कुंठित करून टाकिलेंस त्याअर्थी मनुष्यांचा पराक्रम शाश्वत नाहीं असें मला वाटतें "७. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें तो मनानें निर्मल असलेला वीर भीमसेन बोलूं लागला असतां अजगरानें आपल्या प्रचंड शरीरानें त्याला धरून सभोंवतीं वेढून टाकिलें ८. ह्याप्रमाणें त्या महापराक्रमी भीमसेनाला प्रथमतः ग्रस्त केल्यावरही त्या भुजंगानें पुनरपि त्याचे पुष्ट बाहु सोडून दिले आणि तो त्याला ह्मणाला ९ " हे महापराक्रमी भीमसेना, बराच काल लोटल्यानंतर सुदैवानें आज तुझी योजना—देवांनीं क्षुधित असलेल्या—माझ्या भक्ष्याचे स्थानीं केली आहे; परंतु, देहधारी प्राण्यांना प्राण हे प्रिय आहेत १०. ह्याकरितां, हे शत्रुदमना, मला हें सर्परूप कसें प्राप्त झालें हें तुला अवश्य कथन केलें पाहिजे. तस्मात्, हे सज्जनश्रेष्ठ, तूं हा वृत्तांत माझ्यापासून श्रवण कर ११. महर्षींच्या कोपामुळे मला ही अवस्था प्राप्त झाली आहे आणि त्यांनीं दिलेल्या शापाची परिसमाप्ति होण्याकरितां मी तें सर्व तुला कथन करीत आहें १२. मी नहुषनामक राजर्षि असून निःसंशय तुझ्या ऐकण्यांत आलेलों आहें. मी तुझ्याच पूर्वजांचा वंश धारण करणारा सभ्य पुत्र असून तुझा पूर्वजही आहें १३; नानाप्रकारच्या तपश्चर्या, यज्ञयागादि कर्मे, विद्या आणि कुल ह्यांच्या योगानें व पराक्रमाच्या योगानें मला अनुपम असें त्रैलोक्याचें ऐश्वर्य प्राप्त झालें होतें १४. ह्यामुळे

सर्वनृपोन्माथी मदो मां समुपाविशत् । सहस्रमृषिमुख्यानामुवाह शिबिकां
मम १५ ततो विभ्रंशितश्चाहमगस्त्येन महात्मना । इमामवस्थां संप्राप्तः
पश्य दैवमिदं मम १६ न दैवं प्रज्ञया तात न बलोत्साहशक्तिभिः । न सहा-
यबलैश्चापि कश्चिदप्यतिवर्तते १७ अथ प्रज्ञा च शौर्यं च संपदः कारणं
भवेत् । प्रज्ञावतां च शूराणां न कदाचिदसंपदः१८ यदा प्राज्ञाश्च शूराश्च
दृश्यन्ते दुःखजीविनः । भीरुमूर्खाश्च सुखिनस्तस्माद्दैवं हि कारणम् १९
सोहं शापादगस्त्यस्य ब्राह्मणानवमन्य च । इमामवस्थामापन्नः पश्य दैव-
मिदं मम २० त्वां चेदवध्यं दायादमतीव प्रियदर्शनम् । अहमद्योपयो-
क्ष्यामि विधानं पश्य यादृशम् २१ न हि मे मुच्यते कश्चित्कथंचित्प्रग्रहं
गतः । गजो वा महिषो वापि षष्ठे काले नरोत्तम २२ नासि केवलस-
र्पेण तिर्यग्योनिषु वर्तता । गृहीतः कौरवश्रेष्ठ वरदानमिदं मम २३ पतता
हि विमानाग्रान्मया शक्रासनाद्द्रुतम् । कुरु शापान्तमित्युक्तो भगवान्मुनि-

---

सर्व राजांचा नाश करून टाकणारा असा मद मला चढला आणि हजारों ऋषींना
माझी पालखी वाहून नेण्याचा प्रसंग आला १५. तेव्हां महात्म्या अगस्त्यमुनीनें
शाप देऊन माझा त्याग केल्यामुळें मला ही अवस्था प्राप्त झाली आहे. तस्मात्, हें
माझें दैव तूं अवलोकन कर १६. बा भीमसेना, स्वतःचें बल, उत्साह, शक्ति व बुद्धि
ह्यांच्या योगानें अथवा आपल्याला साहाय्य करणाऱ्यांच्याही शक्तींच्या योगानें
कोणीही दैवाचें अतिक्रमण करण्यांस समर्थ होत नाहीं १७. खरोखर बुद्धि आणि
शौर्य हींच संपत्तीचें कारण आहेत. ह्यावरून बुद्धिमान् आणि शूर पुरुषांना कधींही
विपत्ति प्राप्त होऊं नये १८; परंतु, जे बुद्धिमान् व शूर असतात ते मोठ्या कष्टानें दिवस
काढीत असून भित्रे आणि मूर्ख लोक ज्याअर्थी सुखी असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें
त्याअर्थी कोणतीही अवस्था प्राप्त होण्याला दैव हेंच कारण आहे १९. परंतु,
माझ्या हातून ब्राह्मणांचा अवमान झाल्याकारणानें अगस्त्यमुनींनीं दिलेल्या शापामुळें
मला ही अवस्था प्राप्त झाली आहे. तेव्हां हें माझें दैव तूं अवलोकन कर २०. अरे, तूं
माझा वंशज आहेस, तुझें दर्शनही मला प्रिय आहे व वास्तविक तूं मला अवध्यही आहेस.
तथापि, मी आज तुला भक्षण करून टाकण्याची इच्छा करीत आहें. तेव्हां हें दैव कशा
प्रकारचें आहे हें तूं अवलोकन कर २१. हे पुरुषश्रेष्ठा, अपराह्णकालीं माझ्या कचाट्यांत
सांपडलेला महिष अथवा गज कोणीही असला तरी तो सुटणार नाहीं मग तुझी कथा
काय? २२. हे कुरुवंशजश्रेष्ठा, तिर्यग्योनीमध्यें असलेल्या सामान्य सर्पानें तुला ग्रस्त
केलें नाहीं; मला हें वरप्रदान मिळालेलें आहे २३. कारण, इंद्राला बसण्यास योग्य

सत्तमः २४ स मामुवाच तेजस्वी कृपयाभिपरिप्लुतः । मोक्षस्ते भविता राजन्कस्माच्चित्कालपर्ययात् २५ ततोस्मि पतितो भूमौ न च मामजहात्स्मृतिः । स्मार्तमस्ति पुराणं मे यथैवाधिगतं तथा २६ यस्तु ते व्याहृतान्प्रश्नान्प्रतिब्रूयाद्विभागवित् । स त्वां मोक्षयिता शापादिति मामब्रवीदृषिः २७ गृहीतस्य त्वया राजन्प्राणिनोपि बलीयसः । सत्त्वभ्रंशोधिकस्यापि सर्वस्याशु भविष्यति २८ इति चाप्यहमश्रौषं वचस्तेषां दयावताम् । मयि संजातहार्दानामथ तेन्तर्हिता द्विजाः २९ सोहं परमदुष्कर्मा वसामि निरयेशुचौ । सर्पयोनिमिमां प्राप्य कालाकाङ्क्षी महाद्युते ३० तमुवाच महाबाहुर्भीमसेनो भुजङ्गमम् । न च कुप्ये महासर्प न चात्मानं विगर्हये ३१ यस्मादभावी भावी वा मनुष्यः सुखदुःखयोः । आगमे यदि वापाये न तत्र ग्लपयेन्मनः ३२ दैवं पुरुषकारेण को वञ्चयितुम-

---

अशा विमानापासून मी च्युत होऊं लागलों असतांना " शापाची परिसमाप्ति करा " अशी मुनिश्रेष्ठ अगस्त्यांची मीं प्रार्थना केली २४. तेव्हां त्या तेजस्वी मुनींचें अंतःकरण दयेनें परिप्लुत झालें आणि, " हे राजा, कांहीं काल लोटल्यावर शापापासून तुझी मुक्तता होईल " असें ते मला ह्मणाले २५. तदनंतर मी भूमीवर पडलों. मला कसलेंही विस्मरण झालेलें नाहीं. पुष्कळ दिवसांची ही गोष्ट जशी पूर्वी माझ्या समजण्यांत आली होती तशी हुबेहुब मला स्मरत आहे २६. असो. वर सांगितल्याप्रमाणें मीं प्रार्थना केली असतां ते अगस्त्यऋषि मला ह्मणाले " जो आत्मानात्मविचारी पुरुष तूं केलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देईल तो तुला शापापासून मुक्त करील २७ आणि, हे राजा, तुझ्यापेक्षां बलाढ्य असा कोणताही प्राणी जरी तूं धरिलास आणि तो सामर्थ्यानें तुझ्यापेक्षां कितीही अधिक असला तरी त्याचें सामर्थ्य सत्वर नाहींसें होईल " २८. ह्याप्रमाणें माझ्याविषयीं अंतःकरणामध्यें कृपा उत्पन्न झालेल्या त्या मुनींचें वचनही मीं (भूमीवर पडतां पडतां ऐकिलें आहे.) ह्याप्रमाणें अगस्त्यमुनींच्या द्वारानें मला कळविल्यानंतर ते ब्राह्मण गुप्त झाले २९. तेव्हां, हे महातेजस्वी भीमसेना, अत्यंत दुष्कर्म केलेला मी ह्या सर्पयोनीमध्यें येऊन अशुचि नरकामध्यें मुक्तिकालाची वाट पहात पहात वास्तव्य करीत आहे " ३०. ह्याप्रमाणें भुजंगानें त्याला सांगितलें असतां महापराक्रमी भीमसेन त्याला ह्मणाला, " हे भुजंगा, मी तुझ्यावर रागावतही नाहीं आणि स्वतःची निंदाही करीत नाहीं ३१. कारण, सुखदुःखांची प्राप्ति अथवा हानि झाली असतां मनुष्य कधीं कधीं सामर्थ्यहीन होत असतो व कधीं कधीं सामर्थ्यवान् होत असतो. तेव्हां सुखाची हानि होऊन दुःखाची प्राप्ति होण्याचाही

हंति । दैवमेव परं मन्ये पुरुषार्थो निरर्थकः ३३ पश्य दैवोपघाताद्धि
भुजवीर्यव्यपाश्रयम् । इमामवस्थां संप्राप्तमनिमित्तमिहाद्य माम् ३४
किं तु नाद्यानुशोचामि तथात्मानं विनाशितम् । यथा तु विपिने न्यस्ता-
न्भ्रातॄन्राज्यपरिच्युतान् ३५ हिमवांश्च सुदुर्गोयं यक्षराक्षससंकुलः ।
मांसमुद्वीक्षमाणास्ते प्रपतिष्यन्ति विह्वलाः ३६ प्रविष्टमथ मां श्रुत्वा
भविष्यन्ति निरुद्यमाः । धर्मशीला मया ते हि बाध्यन्ते राज्यगृद्धिना ३७
अथवा नार्जुनो धीमान्विषादमुपयास्यति । सर्वास्त्रविदनाधृष्यो देवगन्ध-
र्वराक्षसैः ३८ समर्थः स महाबाहुरेकोपि सुमहाबलः । देवराजमपि
स्थानात्प्रच्यावयितुमञ्जसा ३९ किं पुनर्धृतराष्ट्रस्य पुत्रं दुर्द्यूतदेविनम् ।
विद्विष्टं सर्वलोकस्य दम्भमोहपरायणम् ४० मातरं चैव शोचामि कृपणां
पुत्रगृद्धिनीम् । यास्माकं नित्यमाशास्ते महत्त्वमधिकं परैः ४१ तस्याः
कथं त्वनाथाया मद्विनाशाद्भुजङ्गम । अफलास्ते भविष्यन्ति मयि सर्वे

जरी प्रसंग आला तरी मनामध्यें खेद करूं नये ३२. प्रयत्नानें दैव हाणून पाड-
ण्यास कोण बरें समर्थ आहे ? मी तर दैवच श्रेष्ठ समजत असून मला प्रयत्न व्यर्थ
वाटत आहे ३३. कारण, नेहमीं स्वतःच्या बाहुबलावर अवलंबून असलेला मी आज
दैवाच्या तडाक्यांत सांपडल्यामुळें विनाकारण ह्या अवस्थेला प्राप्त झालों आहें हें तूं
अवलोकन कर ३४. असो. राज्यापासून भ्रष्ट झालेले जे भ्राते मी अरण्यांत टाकून
आलों आहें त्यांच्याकरितां जितकें मला वाईट वाटत आहे तितकें स्वतःचा घात
झाल्याबद्दल वाटत नाहीं ३५. हा हिमालयपर्वत जरी अत्यंत गहन यक्ष-
राक्षसांनीं गजबजलेला आहे तरी माझे भ्राते विह्वल होऊन माझा शोध लावण्या-
करितां येथें उड्या टाकीत येतील ३६ आणि माझा नाश झाला असें त्यांनीं ऐकिलें
ह्मणजे ते राज्य मिळविण्याचाही उद्योग सोडून देतील. खरोखर राज्याची
इच्छा धरून असलेल्या त्या धर्मशील भ्रात्यांना माझ्यामुळें पीडा होणार आहे ३७.
अथवा त्या भ्रात्यांमध्यें अर्जुन विचारी असल्यामुळे तो कधी खेद करणार नाहीं. तो सर्व
अस्त्रें जाणीत असून देव, गधर्व आणि राक्षस ह्यांना अजिंक्य आहे ३८. फार तर
काय, तो अत्यंत महाबलाढ्य व महापराक्रमी अर्जुन एकटाही देवराज इंद्राला सुद्धां
स्वस्थानापासून अनायासें भ्रष्ट करण्यास समर्थ आहे ३९. मग दंभ व मोह ह्यांचा
मुख्य आश्रय असून कपटानें द्यूतक्रीडा केल्यामुळें सर्व लोकांच्या द्वेषास पात्र झालेल्या
धृतराष्ट्रपुत्राची तर गोष्ट कशाला पाहिजे ? ४०. असो. शत्रूपेक्षां आमचें अधिक
महत्त्व असावें अशी जी नेहमीं इच्छा करीत आहे त्या पुत्रवत्सल मातेकरितां मात्र

मनोरथाः ४२ नकुलः सहदेवश्च यमौ च गुरुवर्तिनौ । मद्बाहुबलसं-
गुप्तौ नित्यं पुरुषमानिनौ ४३ भविष्यतो निरुत्साहौ नष्टवीर्यपराक्रमौ ।
मद्विनाशात्परिद्यूनाविति मे वर्तते मतिः ४४ एवंविधं बहु तदा विललाप
वृकोदरः । भुजङ्गभोगसंरुद्धो नाशकच्च विचेष्टितुम् ४५ युधिष्ठिरस्तु
कौन्तेयो बभूवास्वस्थचेतनः । अनिष्टदर्शनान्घोरानुत्पातान्परिचिन्त-
यन् ४६ दारुणं ह्यशिवं नादं शिवा दक्षिणतः स्थिता । दीप्तायां दिशि
वित्रस्ता रौति तस्याश्रमस्य ह ४७ एकपक्षाक्षिचरणा वर्तिका घोर-
दर्शना । रक्तं वमन्ती ददृशे प्रत्यादित्यमभासुरा ४८ प्रववौ चानिलो
रूक्षश्चण्डशर्करकर्षणः । अपसव्यानि सर्वाणि मृगपक्षिरुतानि च ४९
पृष्ठतो वायसः कृष्णो याहि याहीति शंसति । मुहुर्मुहुः स्फुरति च दक्षि-
णोस्य भुजस्तथा ५० हृदयं चरणश्चापि वामोस्य परितप्यति । सव्य-
स्याक्ष्णोर्विकारश्चाप्यनिष्टः समपद्यत ५१ धर्मराजोऽपि मेधावी मन्य-

---

मला वाईट वाटत आहे ४१. कारण, हे भुजंगा, कांहीं केलें तरी माझा नाश झाल्यामुळें माझ्या संबंधानें त्या अनाथ मातेचे सर्व कांहीं मनोरथ निष्फल होणारच ४२. माझ्या बाहुबलाच्या योगानेंच सुरक्षित असल्यामुळें स्वतःला पराक्रमी पुरुष समजत असलेले व गुरुजनांच्या शुश्रूषेविषयीं तत्पर असलेले आवळेजावळे नकुलसहदेव ४३ माझा नाश झाला असतां निरुत्साह व खिन्न होतील आणि त्यांचें वीर्य व पराक्रम हीं नष्ट होतील असें मला वाटतें " ४४. ह्याप्रमाणें नानाप्रकारांनीं भीमसेनानें विलाप केला आणि भुजंगाच्या शरीरानें ग्रस्त झाल्यामुळें तो हालचाल करण्यास मुळींच समर्थ झाला नाहीं ४५. इकडे ज्यांचें दर्शन अनिष्ट आहे असे घोर उत्पात अवलोकन करून चिंताक्रांत झालेल्या कुंतीपुत्र युधिष्ठिराला कांहीं सुचेनासें झालें ४६. कारण, त्याच्या आश्रमाच्या दक्षिणेस आणि प्रदीप्त दक्षिण दिशेस एक भालू भयभीत होऊन भयंकर व अशुभसूचक असा ध्वनि करीत उभी राहिली होती ४७. एक पक्ष, एक नेत्र व एक पाद ह्यांनीं युक्त व दिसण्यातही भयंकर असा वार्तिकासंज्ञक निस्तेज पक्षी सूर्यासमोर रक्त ओकीत असतांना धर्मराजाच्या दृष्टीं पडला ४८. रूक्ष व भूतला-वरील क्षुद्र पाषाणकण आपल्याबरोबर ओढीत नेणारा असा प्रचंड वायु वाहूं लागला आणि सर्वच पशुपक्ष्यांचे ध्वनि डाव्या बाजूला होऊं लागले ४९. मागल्या बाजूला काळा कावळा " ये, ये " असा ध्वनि करूं लागला आणि त्याच्या उलट त्या धर्मराजाचा दक्षिण बाहुही वारंवार स्फुरण पावूं लागला ५०. त्याचें हृदय व डावा पाय ह्यांची आग होऊं लागली आणि डाव्या डोळ्यालाही अशुभसूचक

मानो महद्भयम् । द्रौपदीं परिपप्रच्छ क्व भीम इति भारत ५२ शशंस तस्मै पाञ्चाली चिरयातं वृकोदरम् । स प्रतस्थे महाबाहुर्धौम्येन सहितो नृपः ५३ द्रौपद्या रक्षणं कार्यमित्युवाच धनञ्जयम् । नकुलं सहदेवं च व्यादिदेश द्विजान्प्रति ५४ स तस्य पदमुन्नीय तस्मादेवाश्रमात्प्रभुः । मृगयामास कौन्तेयो भीमसेनं महावने ५५ स प्राचीं दिशमास्थाय महतो गजयूथपान् । ददर्श पृथिवीं चिह्नैर्भीमस्य परिचिह्निताम् ५६ ततो मृगसहस्राणि मृगेन्द्राणां शतानि च । पतितानि वने दृष्ट्वा मार्गं तस्याविशन्नृपः ५७ धावतस्तस्य वीरस्य मृगार्थं वातरंहसः । ऊरुवातविनिर्भग्ना द्रुमा व्यावर्जिताः पथि ५८ स गत्वा तैस्तदा चिह्नैर्ददर्श गिरिगह्वरे । रूक्षमारुतभूयिष्ठे निष्पत्रद्रुमसंकुले ५९ ईरिणे निर्जले देशे कण्टकिद्रुमसंकुले । अश्मस्थाणुक्षुपाकीर्णे सुदुर्गे विषमोत्कटे ६० गृहीतं भुजगेन्द्रेण

(स्फुरणरूप) विकार उत्पन्न झाला ५१. तेव्हां कांहीं तरी मोठें भय प्राप्त होणार आहे असें समजून, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, बुद्धिमान् धर्मराजानें " भीम कोठें आहे " ह्मणून द्रौपदीला प्रश्न केला असतां ५२ त्या पांचालराजकन्येनें " भीमसेनाला जाऊन पुष्कळ वेळ झाला " असें त्याला सांगितलें. तेव्हां तो महापराक्रमी धर्मराज धौम्यमुनींना बरोबर घेऊन निघाला ५३ व जातांना " द्रौपदीचें रक्षण करा " ह्मणून अर्जुन, नकुल, सहदेव आणि तेथें असलेले द्विज ह्यांना त्यानें सांगितलें ५४. तदनंतर, त्या भीमसेनाचीं पावलें ओळखून तो प्रभु कुंतीपुत्र धर्मराज त्या आश्रमांतून निघून महावनामध्यें गेला आणि भीमसेनाला शोधूं लागला ५५. प्रथमतः धर्मराज पूर्वदिशेला गेला असतां आपआपल्या कळपांचें रक्षण करणारे मोठेमोठे गज मारून पाडिलेले त्यानें अवलोकन केले आणि भीमसेनाच्या चिन्हांनीं युक्त झालेला तो प्रदेशही त्याच्या दृष्टीं पडला ५६. तदनंतर, हजारों मृग व शेंकडों सिंह वनामध्यें मृत होऊन पडल्याचें अवलोकन केल्यावर त्या भीमसेनाच्या मार्गाला धर्मराज लागला ५७. वायूप्रमाणें वेगवान् असलेला तो वीर भीमसेन मृगयेकरितां धांवत असतांना त्याच्या मांड्यांपासून निघालेल्या वायूनें भग्न झालेले वृक्ष मार्गावर पालथे पडलेले होते ५८. त्या चिन्हांची खूण धरून तो युधिष्ठिर पुढें गेला असतां ज्या ठिकाणीं पर्वताच्या गुहा आहेत, जेथें रूक्ष वायु अतिशय वहात आहे, पर्णरहित वृक्षांची जेथें खेंचाखेंच झालेली आहे ५९, कंटकवृक्षांचीं जेथें गर्दी उडालेली आहे, पाषाण, वृक्षांचीं खोडें व लहान लहान टाहळ्या हीं जेथें ठिकठिकाणीं पसरलेलीं आहेत व जेथें जाणें फारच दुर्घट आहे अशा एका गहन, विशाल,

निश्चेष्टमनुजं तदा ६१ [६९४५] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वण्याजगरपर्वणि युधिष्ठिरभीमदर्शने ऊनाशीत्यधिकशततमोऽध्यायः ॥ १७९ ॥

वैशम्पायन उवाच ॥ युधिष्ठिरस्तमासाद्य सर्पभोगेन वेष्टितम् । दयितं भ्रातरं धीमानिदं वचनमब्रवीत् १ कुन्तीमातः कथमिमामापदं त्वमवाप्तवान् । कश्चायं पर्वताभोगप्रतिमः पन्नगोत्तमः २ स धर्मराजमालक्ष्य भ्राता भ्रातरमग्रजम् । कथयामास तत्सर्वं ग्रहणादिविचेष्टितम् ३ भीम उवाच ॥ अयमार्य महासत्त्वो भक्षार्थं मां गृहीतवान् । नहुषो नाम राजर्षिः प्राणवानिव संस्थितः ४ युधिष्ठिर उवाच ॥ मुच्यतामयमायुष्मन्भ्राता मेऽमितविक्रमः । वयमाहारमन्यं ते दास्यामः क्षुन्निवारणम् ५ सर्प उवाच ॥ आहारो राजपुत्रोऽयं मया प्राप्तो मुखागतः । गम्यतां नेह स्थातव्यं श्वो भवानपि मे भवेत् ६ व्रतमेतन्महाबाहो विषयं मम यो व्रजेत् । स मे भक्षो भवेत्तात त्वं चापि विषये मम ७ चिरेणाद्य मया-

---

निर्जन व निर्जल प्रदेशावर एका श्रेष्ठ सर्पानें ग्रस्त केलला आणि हालचालही बंद पडलेला आपला कनिष्ठ भ्राता भीम त्यानें अवलोकन केला ६०,६१. ह्याप्रमाणें० लक्षग्रथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील आजगरपर्वांपैकीं युधिष्ठिर आणि भीमसेन ह्यांचें परस्पर दर्शन झाल्याविषयीं एकशेएकुणऐशींवा अध्याय समाप्त झाला ॥ १७९ ॥

वैशंपायन सांगतातः—सर्पशरीरानें परिवेष्टित झालेल्या त्या प्रेमास्पद भ्रात्यासमीप गेल्यानंतर विचारी युधिष्ठिर त्याला ह्मणाला १ "हे कुंतीपुत्रा, तुला हें संकट कसें प्राप्त झालें ? आणि हा पर्वतप्राय शरीरानें युक्त असलेला सर्पश्रेष्ठ कोण आहे ? (हें मला सांग) " २. ह्याप्रमाणें धर्मराजानें विचारिलें असतां भ्रात्या भीमसेनानें स्वतः ज्येष्ठ भ्राता जो धर्मराज त्याच्याकडे पाहिलें आणि सर्पानें आपल्याला कसें धरिलें वगैरे तें सर्व वृत्त त्यानें त्याला कथन केलें ३. भीमसेन ह्मणतोः—हे सज्जना, ह्या महाबलाढ्य प्राण्यानें मला भक्षण करण्याकरितां धरिलें आहे. हा नहुषनामक राजर्षि आहे व हा सर्पवत् होऊन पडलेला आहे ४. युधिष्ठिर ह्मणताः—हे दीर्घायु, ह्या माझ्या अपरिमितपराक्रमी भ्रात्याला आपण सोडावें; आह्मी आपली क्षुधा शमन करणारें असें काहीं वनांतील भक्ष्य आपणाला आणून देऊं ५. सर्प ह्मणतोः—हा राजपुत्र मला आहार प्राप्त झालेला आहे आणि तो मुखामध्येंही आला आहे. ह्यास्तव, तूं आतां जा; येथें उभा राहूं नको. उद्यां तुझ्यावरही माझा आहार येण्याची पाळी येईल ६. कारण, हे महापराक्रमी युधिष्ठिरा, माझ्या प्रदेशामध्यें जो येईल तो माझें भक्ष्य होईल हें माझें व्रत आहे आणि, बा युधिष्ठिरा, तूंही माझ्या प्रदेशामध्यें आला आहेस ७.

हारः प्राप्तोयमनुजस्तव । नाहमेनं विमोक्ष्यामि न चान्यमभिकाङ्क्षये ८
युधिष्ठिर उवाच ॥ देवो वा यदि वा दैत्य उरगो वा भवान्यदि । सत्यं
सर्प वचो ब्रूहि पृच्छति त्वां युधिष्ठिरः ॥ किमर्थं च त्वया ग्रस्तो भीम-
सेनो भुजङ्गम ९ किमाहृत्य विदित्वा वा प्रीतिस्ते स्याद्भुजङ्गम ।
किमाहारं प्रयच्छामि कथं मुञ्चेद्भवानिमम् १० सर्प उवाच ॥ नहुषो
नाम राजाहमासं पूर्वस्तवानघ। प्रथितः पञ्चमः सोमादायोः पुत्रो नरा-
धिप ११ क्रतुभिस्तपसा चैव स्वाध्यायेन दमेन च । त्रैलोक्यैश्वर्यम-
व्यग्रं प्राप्तोहं विक्रमेण च १२ तदैश्वर्यं समासाद्य दर्पो मामगमत्तदा ।
सहस्रं हि द्विजातीनामुवाह शिबिकां मम १३ ऐश्वर्यमदमत्तोहमवमन्य
ततो द्विजान् । इमामगस्त्येन दशामानीतः पृथिवीपते १४ न तु मामज-
हात्प्रज्ञा यावदद्येति पाण्डव । तस्यैवानुग्रहाद्राजन्नगस्त्यस्य महात्मनः १५
षष्ठे काले मयाहारः प्राप्तोयमनुजस्तव । नाहमेनं विमोक्ष्यामि न चान्य-
दपि कामये १६ प्रश्नानुच्चारितानद्य व्याहरिष्यसि चेन्मम । अथ

आज हा तुझा कनिष्ठ भ्राता बऱ्याच दिवसांनीं मला आहार प्राप्त झालेला आहे; मी ह्याला सोडणार नाहीं व तुझ्या ह्मणण्याप्रमाणे दुसऱ्या आहाराची मला इच्छाही नाहीं ८. युधिष्ठिर ह्मणतोः—हे सर्पा, हे भुजंगमा, हा युधिष्ठिर तुला विचारीत आहे; तर तू खरें खरें सांग. तूं देव आस, दैत्य आस किंवा सर्प आस; भीमसेनाला तूं कशा करितां ग्रस्त केलें आहेस ? ९. हे भुजंगा, काय आणिलें ह्मणजे अथवा काय जाणिलें ह्मणजे तूं प्रसन्न होशील ? साराश, काय आहार मीं तुला द्यावा आणि तूं ह्याला कसें सोडशील (हें मला सांग) १०. सर्प ह्मणतोः— हे निष्पाप प्रजाधिपत, मी तुझा पूर्वज नहुषनामक राजा ह्मणून पूर्वी प्रसिद्ध होतों. मी सोमापासून पांचवा पुरुष असून आयूचा पुत्र आहे ११. यज्ञ, याग, तप वेदाध्ययन, इंद्रियदमन आणि पराक्रम ह्यांच्या योगानें संपूर्ण त्रैलोक्याचें ऐश्वर्य मला प्राप्त झालें होतें १२. परंतु, तें ऐश्वर्य प्राप्त झाल्यावर माझे ठिकाणीं गर्व उत्पन्न झाला व त्यामुळें हजारों ब्राह्मणांना माझ्या पालखीला लागणें भाग पडलें १३. तात्पर्य, ऐश्वर्यमदानें मत्त झालेल्या माझ्या हातून ब्राह्मणांचा अवमान झाला आणि त्यामुळें अगस्त्य मुनींनीं शाप देऊन मला ही दशा आणिली १४. हे पांडुपुत्रा धर्मराजा, त्या महात्म्या अगस्त्य मुनींच्या अनुग्रहामुळें मला अद्यापि विस्मृति पडली नाहीं १५. अपराह्ण कालीं हा तुझा कनिष्ठ भ्राता मला आहार प्राप्त झालेला आहे. तरि्हां मी ह्याला सोडणार नाहीं व मला दुसऱ्या कशाची इच्छाही नाहीं १६. आतां मीं विचारिलेल्या

पश्चाद्विमोक्ष्यामि भ्रातरं ते वृकोदरम् १७ युधिष्ठिर उवाच ॥ ब्रूहि सर्प यथाकामं प्रतिवक्ष्यामि ते वचः । अपि चेच्छक्नुयां प्रीतिमाहर्तुं ते भुजङ्गम १८ सर्प उवाच ॥ धर्मं सर्वे प्रशंसन्ति देवा ब्रह्मर्षयस्तथा । तस्मात्समासतो धर्मं कथयस्व ममानघ १९ युधिष्ठिर उवाच ॥ सत्यं दमस्तपः शौचं संतोषो ह्रीस्तथार्जवम् । ज्ञानं शमो दया ध्यानमेष धर्मः सनातनः २० नहुष उवाच ॥ किं सत्यं प्रोच्यते राजन्कः शमस्त्वप्रकीर्तितः । दया च का परा प्रोक्ता किं तद्ध्यानमुदाहृतम् २१ युधिष्ठिर उवाच ॥ सत्यं भूतहितं प्रोक्तं मनसो दमनं दमः । तपः स्वधर्मवर्तित्वं शौचं संकरवर्जनम् २२ संतोषो विषयत्यागो ह्रीरकार्यनिवर्तनम् । क्षमा द्वन्द्वसहिष्णुत्वमार्जवं समचित्तता २३ ज्ञानं तत्त्वार्थसंबोधः शमश्चित्तप्रशान्तता । दया भूतहितैषित्वं ध्यानं निर्विषयं मनः २४ नहुष उवाच ॥ कः शत्रुर्दुर्जयः पुंसां कश्च व्याधिरनन्तकः । कः साधुः प्रोच्यते राजन्नसाधुः कः परस्तथा २५ युधिष्ठिर उवाच ॥ कामश्च दुर्जयः शत्रु-

---

प्रश्नांचीं जर तूं उत्तर देशील तर तसें होतांक्षणीं तुझा भ्राता वृकोदर मी सोडून देईन १७. युधिष्ठिर ह्मणतो:—हे सर्पा, तुला काय पाहिजे तें विचार; हे भुजंगा, तुझी प्रीति संपादन करणें जर शक्य असेल तर मी तुझ्या भाषणाचें उत्तर देतों १८. सर्प ह्मणतो:—देव आणि ब्रह्मर्षि हे सर्व धर्माची प्रशंसा करीत असतात. तस्मात् हे निष्पापा युधिष्ठिरा, तूं मला संक्षेपतः धर्म कथन कर १९. युधिष्ठिर सांगतो:—सत्य, दम, तप, शौच, संतोष, ऱ्ही, आर्जव, ज्ञान, शम, दया आणि ध्यान हा सनातन धर्म होय २०. नहुष प्रश्न करितो:—हे राजा, सत्य ह्मणजे काय ? शम ह्मणून जो तूं सांगितलास तो काय ? उत्कृष्ट दया कशाला ह्मणतात ? आणि त्याचप्रमाणें ध्यान कशाला ह्मणतात ? २१. युधिष्ठिर सांगतो:— प्राण्यांचें हित ह्मणजे सत्य, मनोनिग्रह हा दम, स्वधर्मानें वागणें हें तप, संकरापासून अलिप्त रहाणें हें शौच २२, विषयांचा त्याग करणें हा संतोष, अकार्यापासून निवृत्ति ही ऱ्ही, शीतोष्णादि द्वंद्व सहन करणें ही क्षमा, चित्तसाम्य हें आर्जव २३, तत्त्वार्थबोध हें ज्ञान, चित्तशांति हा शम, प्राणिमात्रांच्या हिताची इच्छा धरणें ही दया आणि मन निर्विषय करणें हें ध्यान होय २४. नहुष प्रश्न करितो:—जिंकण्यास कठीण असा लोकांचा शत्रु कोणता ? अनंतकालपर्यंत राहणारा व्याधि कोणता ? हे राजा, साधु कोणाला ह्मणतात ? आणि त्याचप्रमाणें साधूंचे विरुद्ध असलेला असाधु कोणाला ह्मणाव ? २५. युधिष्ठिर सांगतो:—काम हा दुर्जय शत्रु, लोभ हा चिरकाल रहाणारा व्याधि, सर्व

लोभो व्याधिरनन्तकः । सर्वभूतदयः साधुरसाधुर्निर्दयः स्मृतः २६ को मोहः प्रोच्यते राजन्कश्च मानः प्रकीर्तितः । किमालस्यं च विज्ञेयं कश्च शोक इहोच्यते २७ युधिष्ठिर उवाच ॥ मोहो धर्मविमूढत्वं मानस्त्वात्माभिमानिता । धर्मनिष्क्रियतालस्यं शोकस्त्वज्ञानमुच्यते २८ नहुष उवाच ॥ किं स्थैर्यं मुनिभिः प्रोक्तं किं तद्धैर्यमुदाहृतम् । स्नानं च किं परं प्रोक्तं किं तद्दानमिहोच्यते २९ युधिष्ठिर उवाच ॥ स्वधर्मस्थिरता स्थैर्यं धैर्यमिन्द्रियनिग्रहः । स्नानं मनोमलत्यागो दानं त्वभयदक्षिणा ३० नहुष उवाच ॥ कः पण्डितः पुमाञ्ज्ञेयः कश्च मूर्खो जनेश्वर । संसारहेतुः कस्तस्य हृत्तापः कः परस्तथा ३१ युधिष्ठिर उवाच ॥ धर्मात्मा पण्डितो ज्ञेयो नास्तिको मूर्ख उच्यते । कामः संसारहेतुश्च हृत्तापो मत्सरः परः ३२ नहुष उवाच ॥ कोऽहंकार इति प्रोक्तः कश्च दम्भो जनेश्वर । अभ्यसूया च का प्रोक्ता किं तत्पैशून्यमुच्यते ३३ युधिष्ठिर उवाच ॥ मोहज्ञानमहंकारो दम्भो धर्मध्वजोच्छ्रयः । धर्मद्वेषो ह्यसूया च पैशून्यं परदूष-

---

प्राण्यावर दया करणारा हा साधु आणि त्याच्या विरहित म्हणजे निर्दय असलेला तो असाधु होय २६. नहुष प्रश्न करितोः— हे राजा, मोह कशाला म्हणतात ? मान कशाला म्हणतात ? आळस म्हणजे काय ? आणि ह्या जगतामध्ये शोक कशाला म्हणत असतात ? २७. युधिष्ठिर सांगतोः— धर्मसंबंधीं मूढपणा हा मोह, स्वतःविषयीं अभिमान हा मान, धर्मानुष्ठानाचा अभाव हा आळस आणि अज्ञान हा शोक होय २८. नहुष प्रश्न करितोः— मुनींनी स्थैर्य कशाला म्हटलें आहे ? धैर्य म्हणून त्यांनीं काय सांगितलें आहे ? मुख्य स्नान कशाला म्हणतात ? आणि दान ह्या ठिकाणीं कशाला म्हणत असतात ? २९. युधिष्ठिर सांगतोः—स्वधर्माविषयीं स्थिरता असणें हें स्थैर्य होय, इंद्रियनिग्रह हें धैर्य होय, मनाचा मल काढून टाकणें हें स्नान होय आणि अभयदक्षिणा हें दान होय ३०. नहुष प्रश्न करितोः—हे राजा, पंडित कोणाला म्हणावें ? मूर्ख कोणाला समजावें ? संसाराचें कारण काण ? आणि अंतःकरणाला होणारा मुख्य ताप कोणता ? ३१. युधिष्ठिर सांगतोः—धर्मात्मा हा पंडित जाणावा, नास्तिकाला मूर्ख असें म्हणत असतात, वासना हें संसाराचें कारण होय आणि मत्सर हाच अंतःकरणाला होणारा मुख्य ताप होय ३२. नहुष प्रश्न करितोः—हे प्रजाधिपते, अहंकार तो कोणता ? दंभ तो काय ? असूया कोणाला म्हणतात ? आणि पैशून्य कशाला म्हणत असतात ? ३३. युधिष्ठिर सांगतोः—मोहयुक्त ज्ञान हा अहंकार होय, धर्माचा ध्वज फडकाविणें हा दंभ होय, धर्मद्वेष ही

णम् ३४ नहुष उवाच ॥ धर्मश्चार्थश्च कामश्च परस्परविरोधिनः । तेषां नित्यविरोधित्वात्क नु स्यात्संगमो नृप ३५ युधिष्ठिर उवाच ॥ संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च । यस्मिन्नेतत्कुले नित्यं त्रिवर्गस्तत्र वर्धते ३६ यदा भर्ता च भार्या च परस्परवशानुगौ । तदा धर्मार्थकामानां त्रयाणामपि संगमः ३७ नहुष उवाच ॥ जात्या कुलेन वृत्तेन स्वाध्यायेन श्रुतेन च । ब्राह्मणः केन भवति तद्ब्रूह्येतद्विनिश्चयम् ३८ युधिष्ठिर उवाच ॥ न जातिर्न कुलं तात न स्वाध्यायः श्रुतं न च । कारणानि द्विजत्वस्य वृत्तमेतस्य कारणम् ३९ अनेके मुनयस्तात तिर्यग्योनिमुपाश्रिताः । स्वधर्माचारनिरता ब्रह्मलोकमितो गताः ४० बहुधा किमधीतेन नटस्येव दुरात्मनः । तेनाधीतं श्रुतं तेन यो वृत्तमनुतिष्ठति ४१ वृत्तं यत्नेन रक्ष्यं स्याद्वित्तमेति च याति च । अक्षीणो वित्ततः क्षीणो वृत्ततस्तु हतो हतः ४२ किं कुलेनोपदिष्टेन विपुलेन दुरात्मना । कृमयः किं

असूया होय आणि दुसऱ्याला दोष देणे हे पैशुन्य होय ३४. नहुष प्रश्न करितोः— धर्म, अर्थ आणि काम हे परस्परविरोधी आहेत आणि, हे राजा, ह्याप्रमाणें जर त्यांचा नेहमी परस्परांशीं विरोध असतो तर ह्या त्रिवर्गाचा संगम कसा होतो? ३५. युधिष्ठिर सांगतोः—भार्येच्या योगानें भर्ता व भर्त्याच्या योगानें भार्या संतुष्ट असणें हें ज्या कुलामध्यें नेहमी दृष्टोत्पत्तीस येतें त्या ठिकाणीं धर्म, अर्थ व काम ह्या त्रिवर्गाची वृद्धि होते ३६. साराश, जेव्हां भर्ता व भार्या ही उभयतां परस्परांना वश होऊन रहातात तेव्हां धर्म अर्थ व काम ह्या तिघांचाही संगम होतो (ह्मणजे ह्या तीन्हीही गोष्टी साधल्या जातात) ३७. नहुष प्रश्न करितोः—जाति, कुल, आचार, वेदाध्ययन आणि बहुश्रुतपणा ह्यांपैकीं कशानें ब्राह्मणत्व येतें हें मला निश्चयपूर्वक सांग ३८ युधिष्ठिर सांगतोः— बा सर्पा, जाति, कुल, स्वाध्याय आणि बहुश्रुतपणा हीं खऱ्या द्विजत्वाचीं कारणें नसून आचार हेंच त्याचें कारण होय ३९. कारण, बा सर्पा, तिर्यग्योनींमध्ये असलले अनेक मुनि स्वधर्माचरणाविषयीं तत्पर राहिल्यामुळें येथून ब्रह्मलोकीं गेलेले आहेत ४० दुष्ट नटाच्या पाठांतराप्रमाणें वेदाध्ययन जरी पुष्कळ केलेलें असलें तरी त्याचा उपयोग काय आहे ? जो धर्माचारानें वागतो त्याचेंच अध्ययन व बहुश्रुतपणा हीं सफल होतात ४१. धर्माचाराचें रक्षण यत्नानें केलें पाहिजे. द्रव्य हें येत असतें आणि जातही असतें (तेव्हां त्याच्या रक्षणाविषयीं यत्न करण्याचें कारण नाहीं.). द्रव्यसंबंधानें ज्याला क्षीणता येते तो वस्तुतः क्षीण होत नाहीं; परंतु, धर्माचारापासून जो भ्रष्ट झाला त्याचा मात्र घात झालाच असें समजावें ४२. एकाद्या दुष्टानें माझें कुल मोठें आहे

न जायन्ते कुसुमेषु सुगन्धिषु ४३ तस्माद्विद्धि महाराज वृत्तं ब्राह्मणलक्षणम् । चातुर्वेद्योपि दुर्वृत्तः शूद्रात्पापतरः स्मृतः ४४ योग्निहोत्रपरो दान्तः संतोषनियतः शुचिः । तपःस्वाध्यायशीलश्च तं देवा ब्राह्मणं विदुः ४५ सर्वद्वन्द्वसहो धीरः सर्वसङ्गविवर्जितः । सर्वभूतहितो मैत्रस्तं देवा ब्राह्मणं विदुः४६ परेषां तु गुणान्वेषी सततं पुरुषर्षभ । सतोपि दोषान्राजेन्द्र न गृह्णाति कदाचन ४७ दीनानुकम्पी सततं सततं साधुवत्सलः । यः स्वदाररतश्चैव तं देवा ब्राह्मणं विदुः ४८ नहुष उवाच ॥ यत्नेन ब्रूहि राजेन्द्र कः कालः श्राद्धदानयोः । प्रश्नं प्रश्नविदां श्रेष्ठ सर्ववित्त्वं मतोसि मे ४९ युधिष्ठिर उवाच ॥ यत्र वै ब्राह्मणं पश्येच्छ्रोत्रियं ध्यानतत्परम् । वरं मन्ये विशिष्टं तु तं कालं श्राद्धदानयोः ५० वेद्यं च ब्राह्मणेनेह तद्भवान्वेत्ति केवलम् । सर्पराज ततः श्रुत्वा प्रतिवक्ष्यामि ते वचः ५१ सर्प उवाच ॥ ब्राह्मणः को भवेद्राजन्वेद्यं किं च युधिष्ठिर । ब्रवीह्यतिमतिं त्वां हि वाक्यैरनुमिमीमहे ५२

ह्मणून जरी सांगितलें तरी त्याचा उपयोग काय ? सुगंधि पुष्पांच ठिकाणीं किडे उत्पन्न होत नसतात काय ? ४३. तस्मात्, हे महाराजा, आचारच ब्राह्मणाचें लक्षण आहे हें तूं समजून ठेव. (जातीनें ब्राह्मण असलेला) दुराचारी पुरुष जरी चारी वेद पढलेला असला तरी तो शूद्रापेक्षांही अधिक दोषी असें ह्मटल आहे ४४. अग्निहोत्राविषयीं तत्पर, जितेंद्रिय, नेहमी संतुष्ट, शुचि आणि वेदाध्ययनरूप तपाचें परिशीलन करणारा जो असेल त्याला देव ब्राह्मण असें ह्मणतात ४५. सर्व द्वंद्वं सहन करणारा, धैर्यवान्, सर्वसंगरहित, प्राणिमात्राच्या हिताविषयीं तत्पर आणि सर्वांशीं मैत्री ठेवणारा, जो असेल त्यालाच देव ब्राह्मण समजतात ४६. हे पुरुषश्रेष्ठ राजाधिराज नहुषा, नेहमीं लोकांचे गुणच शोधून काढणारा, दोष असले तरी ते कधीही न घेणारा ४७, दीनांविषयीं नेहमीं तळमळ बाळगणारा, सज्जनांचे ठिकाणीं नेहमीं प्रेम करणारा आणि स्वस्त्रीचेच ठिकाणीं रममाण होणारा जो असेल त्यालाच देव ब्राह्मण ह्मणून ओळखीत असतात ४८. नहुष प्रश्न करितो:—हे राजाधिराज, श्राद्ध व दान ह्यांचा काल कोणता ह्या प्रश्नाचें तू मला विचारानें उत्तर दे. हे प्रश्नवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ युधिष्ठिरा, मी तुला सर्वज्ञ समजत आहें ४९. युधिष्ठिर सांगतो:—जेव्हां श्रोत्रिय व ध्याननिष्ठ असा ब्राह्मण दृष्टीं पडेल तोच श्राद्ध व दान ह्यांचा विशेष उत्तम काल होय असें मला वाटतें ५०. ब्राह्मणानें जें ह्या ठिकाणीं जाणणें अवश्य आहे तें (ब्रह्म) केवळ तूंच जाणीत आहेस. तेव्हां, हे सर्पराजा, तुझें बोलणें ऐकून घेतल्यानंतर त्याचें उत्तर मी देईन ५१. सर्प ह्मणतो:—हे राजा युधिष्ठिरा, ब्राह्मण कोण आणि जाणण्यास योग्य असें काय

युधिष्ठिर उवाच ॥ सत्यं दानं क्षमा शीलमानृशंस्यं तपो घृणा। दृश्यन्ते यत्र नागेन्द्र स ब्राह्मण इति स्मृतः ५३ वेद्यं सर्प परं ब्रह्म निर्दुःखमसुखं च यत् । यत्र गत्वा न शोचन्ति भवतः किं विवक्षितम् ५४ सर्प उवाच ॥ चातुर्वर्ण्यं प्रमाणं च सत्यं च ब्रह्म चैव हि । शूद्रेष्वपि च सत्यं च दानमक्रोध एव च ५५ आनृशंस्यमहिंसा च घृणा चैव युधिष्ठिर ५६ वेद्यं यच्चात्र निर्दुःखमसुखं च नराधिप । ताभ्यां हीनं पदं चान्यन्न तदस्तीति लक्षये ५७ युधिष्ठिर उवाच ॥ शूद्रे तु यद्भवेल्लक्ष्म द्विजे तच्च न विद्यते । न वै शूद्रो भवेच्छूद्रो ब्राह्मणो न च ब्राह्मणः ५८ यत्रैतल्लक्ष्यते सर्प वृत्तं स ब्राह्मणः स्मृतः । यत्रैतन्न भवेत्सर्प तं शूद्रमिति निर्दिशेत् ५९ यत्पुनर्भवता प्रोक्तं न वेद्यं विद्यतीति च । ताभ्यां हीनमतोऽन्यत्र पदं नास्तीति चेदपि ६० एवमेतन्मतं सर्प ताभ्यां हीनं न विद्यते । यथा शीतोष्णयोर्मध्ये भवेन्नोष्णं न शीतता ६१ एवं वै सुखदुःखाभ्यां

आहे हें तूं सांग. तूं अतिशय बुद्धिमान् असावास असें ह्या वाक्यावरून माझें अनुमान होत आहे५२. युधिष्ठिर ह्मणतो:—हे नागराजा, सत्य, दान, क्षमा, सुशीलता, निष्ठुरतेचा अभाव, तप आणि दया हीं ज्याचें ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येतात तो ब्राह्मण असें ह्मटलें आहे ५३. हे सर्पा, जेथें गेलें असतां लोकांना शोकाचें कारण रहात नाहीं असें जें सुखदुःखरहित परब्रह्म तेंच जाणण्यास योग्य आहे. आतां आपली काय इच्छा आहे (ती समजूं द्या) ५४. सर्प ह्मणतो:—वेद हा सत्य असून धर्मसंबंधानें प्रमाणभूत आहे व चारी वर्णांना हितकारक आहे. तेव्हां, हे युधिष्ठिरा, सत्य, दान, क्रोधाभाव, सज्जनता, दुष्टपणाचा अभाव, अहिंसा आणि कृपा हे गुण शूद्रांचे ठिकाणीही दृष्टोत्पत्तीस येतात (तेव्हां शूद्रही ब्राह्मणच होतील) ५५,५६. हे प्रजाधिपते, सुख व दुःख ह्यांनीं जें रहित तें जाणण्यास योग्य ह्मणून तूं सांगितलेंस; परंतु, त्यांनीं रहित असें दुसरें कोणतेंही प्राप्त करण्यास योग्य असलेलें स्थान नाहीं असें मला वाटतें ५७. युधिष्ठिर सांगतो:—शूद्राचे ठिकाणीं जें लक्षण दृष्टीस पडतें तें ब्राह्मणाचे ठिकाणीं दृष्टीं पडत नाहीं; तेव्हां शूद्रजातीमध्यें उत्पन्न झाला एवढ्यावरून कोणी शूद्रही होत नाहीं आणि ब्राह्मणजातीमध्यें उत्पन्न झाला एवढ्यावरून कोणी ब्राह्मणही होत नाहीं ५८. हे सर्पा, ज्याचे ठिकाणीं हें वर्तन दृष्टोत्पत्तीस येतें तो ब्राह्मण असें ह्मटलें आहे; परंतु, ज्याचे ठिकाणीं हें नसेल तो शूद्र आहे असें ह्मणावें ५९. आतां वेद्य असें कांहीं नाहींच व सुखदुःखरहित असें कोणतेंही स्थान नाहीं असें आपण ह्मणाला त्याचें उत्तर सांगतों ६०. हे सर्पा, माझेंही मत हें असेंच आहे.

हीनं नास्ति परं क्वचित् । एषा मम मतिः सर्प यथा वा मन्यते भवान् ६२ सर्प उवाच ॥ यदि ते वृत्ततो राजन्ब्राह्मणः प्रसमीक्षितः । वृथा जातिस्तदायुष्मन्कृतिर्यावन्न विद्यते ६३ युधिष्ठिर उवाच ॥ जातिरत्र महासर्प मनुष्यत्वे महामते । संकरात्सर्ववर्णानां दुष्परीक्ष्येति मे मतिः ६४ सर्वे सर्वास्वपत्यानि जनयन्ति सदा नराः । वाङ्मैथुनमथो जन्म मरणं च समं नृणाम् ६५ इदमार्षं प्रमाणं च ये यजामह इत्यपि । तस्माच्छीलं प्रधानेष्टं विदुर्ये तत्त्वदर्शिनः ६६ प्राङ्नाभिवर्धनात्पुंसो जातकर्म विधीयते । तत्रास्य माता सावित्री पिता त्वाचार्य उच्यते ६७ तावच्छूद्रसमो ह्येष यावद्वेदे न जायते । तस्मिन्नेवं मतिद्वैधे मनुः स्वायं-

---

सत्कर्मानें प्राप्त होणारे जे स्थान तें सुखदुःखरहित नाहीं परंतु, ज्याप्रमाणे शीतल जलामध्यें अग्नि नसतो अथवा अग्नीमध्यें शीतलता नसते ६१ त्याचप्रमाणे सुखदुःखानीं युक्त असें ब्रह्म कोठेंही नाहीं, हा, हे सर्पा, माझा अभिप्राय आहे; याउपर आपलें काय मत असेल तें खरें ६२. सर्प ह्मणतोः—हे राजा, वर्तनावरून जर तू ब्राह्मण ठरविला आहेस तर, हे दीर्घायु युधिष्ठिरा, जोपर्यंत कृति नाहीं तोपर्यंत जाति व्यर्थ आहे असे ह्मणण्याचा प्रसंग येईल ६३. युधिष्ठिर ह्मणतोः—हे महाबुद्धिमान् महाभुजगा, सर्व वर्णांचा संकर झालेला असल्यामुळें मनुष्यत्वासंबधानें जाति ठरविणें दुर्घटच आहे असें मला वाटतें ६४. कारण, सर्व लोक सर्व स्त्रियांचे ठिकाणी अपत्योत्पादन करीत असतात. सारांश, वाणी, मैथुन, जन्म व मरण हीं सर्व मनुष्यांचे ठिकाणीं सारखींच आहेत; (तात्पर्य, ज्याप्रमाणें सर्वांचा सर्वांशी बोलण्याचा वगैरे प्रचार असतो त्याचप्रमाणे मैथुनधर्माचाही प्रचार दृष्टोत्पत्तीस येतो. तेव्हां जाति ठरविणें हे वस्तुतः दुर्घटच आहे) ६५ (आतां जातीचा जर निश्चय ठरवितां येत नाहीं तर मी ब्राह्मण आहें इत्यादि प्रकारचा अभिमान उत्पन्न होऊन पुरुषाची यज्ञयागादि कर्मांचे ठिकाणीं प्रवृत्ति कशी होईल ह्मणून शंका करावी तर, हे भुजगा, जाति ठरवितां येत नाहीं ह्याविषयीं) " ये यजामहे " ही श्रुतिही प्रमाण आहे. (कारण, उत्पत्तीवरून जर जाति निश्चित असती तर आह्मीं जे कोणी आहोत ते यजन करीत आहो अशा अर्थाचीं पदें श्रुतीमध्यें आलीं नसतीं). तस्मात्, तत्त्वज्ञानी पुरुषाच्या मताप्रमाणें आचार हाच जातिनिश्चयाचें मुख्य व इष्ट असें कारण आहे ६६. नालच्छेदनापूर्वीं पुरुषाचें जातकर्म विहित आहे आणि सावित्री ही उपनेय पुरुषाची माता असून आचार्य हाच पिता आहे ६७. तेव्हां जोपर्यंत वेदासंबधानें उत्पत्ति झाली नाहीं (ह्मणजे उपनयन झालें नाहीं) तोंपर्यंत हा शूद्रतुल्य आहे. अशी दोन प्रकारचीं मतें असल्याकारणानें संशय उत्पन्न

युवोऽब्रवीत् ६८ कृतकृत्याः पुनर्वर्णा यदि वृत्तं न विद्यते । संकरस्तत्र नागेन्द्र बलवान्प्रसमीक्षितः ६९ यत्रेदानीं महासर्प संस्कृतं वृत्तमिष्यते । तं ब्राह्मणमहं पूर्वमुक्तवान्भुजगोत्तम ७० सर्प उवाच ॥ श्रुतं विदितवेद्यस्य तव वाक्यं युधिष्ठिर । भक्षयेयमहं कस्माद्भ्रातरं ते वृकोदरम् ७१ [७०१६] इति श्रीमहाभारते० वैयासिक्यामारण्यके पर्वण्याजगरपर्वण्यजगरयुधिष्ठिरसंवादेऽशीत्यधिकशततमोऽध्यायः ॥ १८० ॥

युधिष्ठिर उवाच ॥ भवानेतादृशो लोके वेदवेदाङ्गपारगः । ब्रूहि किं कुर्वतः कर्म भवेद्गतिरनुत्तमा १ सर्प उवाच ॥ पात्रे दत्त्वा प्रियाण्युक्त्वा सत्यमुक्त्वा च भारत । अहिंसानिरतः स्वर्गं गच्छेदिति मतिर्मम २ युधिष्ठिर उवाच ॥ दानाद्वा सर्प सत्याद्वा किमतो गुरु दृश्यते । अहिंसाप्रिययोश्चैव गुरुलाघवमुच्यताम् ३ सर्प उवाच ॥ दानं च सत्यं तत्त्वं वा अहिंसा प्रियमेव च । एषां कार्यगरीयस्त्वाद्दृश्यते गुरुलाघवम् ४ कस्माच्चिद्दानयोगाद्धि सत्यमेव विशिष्यते । सत्यवाक्याच्च राजेन्द्र

होतो. एतदर्थ " वैदिक संस्कार जर नसेल तर सर्वही प्रजा शूद्रतुल्यच आहेत असें स्वायंभुवमनूनीं ह्मटलें आहे; तेव्हां, हे नागराज, आचारासंबंधानें पाहूं गेलें असतां अतिशय वर्णसंकर दृष्टोत्पत्तीस येतो ६८,६९. ह्यास्तव, हे महासर्पा, हे श्रेष्ठ भुजंगा, ज्याचे ठिकाणीं हा संस्कारसिद्ध आचार असेल तो ब्राह्मण ह्मणून मीं पूर्वी सांगितलें आहे ७०. सर्प ह्मणतो:—हे युधिष्ठिरा, तुज ब्रह्मवेत्त्याचें (तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें झालेलें) भाषण मीं श्रवण केलें. तेव्हां आतां मी तुझ्या भ्रात्या भीमसेनाला कसा बरें भक्षण करीन? ७१. ह्याप्रमाणें श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील आजगरपर्वांपैकीं अजगर आणि युधिष्ठिर ह्यांच्या संवादाविषयीं एकशें ऐंशीवा अध्याय समाप्त झाला ॥ १८० ॥

युधिष्ठिर ह्मणतो:—जगतामध्यें आपण अशा प्रकारचे वेदवेदांगपारंगत आहांत. तेव्हां पुरुषानें काय केलें असतां त्याला उत्कृष्ट गति (ह्मणजे स्वर्गप्राप्ति) होते हें आपण मला सांगा १. सर्प सांगतो:—हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, सत्पात्रीं दान दिल्यानें, प्रिय व सत्य भाषण केल्यानें आणि अहिंसेविषयीं सर्वदां तत्पर राहिल्यानें पुरुषाला स्वर्गप्राप्ति होते असें मला वाटतें २. युधिष्ठिर ह्मणतो:—हे सर्पा, दान आणि सत्य ह्यांमध्यें श्रेष्ठ कोणतें दृष्टीं पडतें हें तूं मला सांग आणि त्याचप्रमाणें अहिंसा व प्रिय भाषण ह्यांतीलही उत्कृष्टनिकृष्ट भाव तूं मला कथन कर ३. सर्प सांगतो:—दान, सत्य अथवा तत्त्व, अहिंसा आणि प्रिय भाषण ह्यांतील उच्चनीच भाव कार्याच्या महत्त्वावर अवलंबून असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें ४. हे राजाधिराज, कांहीं दानापेक्षा सत्य भाषणच

किंचिद्दानं विशिष्यते ५ एवमेव महेष्वास प्रियवाक्यान्महीपते । अहिंसा दृश्यते गुर्वी ततश्च प्रियमिष्यते ६ एवमेतद्भवेद्राजन्कार्यापेक्षमनन्तरम् । यदभिप्रेतमन्यत्ते ब्रूहि यावद्ब्रवीम्यहम् ७ युधिष्ठिर उवाच ॥ कथं स्वर्गे गतिः सर्प कर्मणां च फलं ध्रुवम् । अशरीरस्य दृश्येत प्रब्रूहि विषयांश्च मे ८ सर्प उवाच ॥ तिस्रो वै गतयो राजन्परिदृष्टाः स्वकर्मभिः । मानुषं स्वर्गवासश्च तिर्यग्योनिश्च तत्रिधा ९ तत्र वै मानुषाल्लोकाद्दानादिभिरतन्द्रितः । अहिंसार्थसमायुक्तैः कारणैः स्वर्गमश्नुते १० विपरीतैश्च राजेन्द्र कारणैर्मानुषो भवेत् । तिर्यग्योनिस्तथा तात विशेषश्चात्र वक्ष्यते ११ कामक्रोधसमायुक्तो हिंसालोभसमन्वितः । मनुष्यत्वात्परिभ्रष्टस्तिर्यग्योनौ प्रसूयते १२ तिर्यग्योन्याः पृथग्भावो मनुष्यार्थे विधीयते । गवादिभ्यस्तथाश्वेभ्यो देवत्वमपि दृश्यते १३ सोयमेता गती-

---

श्रेष्ठ असतें व सत्यभाषणापेक्षां कांहीं दान श्रेष्ठ असत ५. त्याचप्रमाणें, हे महाधनुर्धारी भूपते, कधीं कधीं प्रिय भाषणापेक्षां अहिंसाच श्रेष्ठ असल्याचें दृष्टोत्पत्तीस येते आणि कधीं कधीं अहिंसेपेक्षां प्रिय भाषणच श्रेष्ठ असणें योग्य असतें ६. हे राजा, ह्याप्रमाणें उत्कृष्टनिकृष्टपणा कार्यावर अवलंबून आहे. आतां ह्यानंतर, दुसरें काय तूं मनामध्यें योजिलें आहेस तें सांग ह्मणजे मी तुला तें कथन करितों ७. युधिष्ठिर प्रश्न करितोः—हे सर्पा, ज्याचा देह नष्ट झाला आहे त्या पुरुषाचें स्वर्गामध्यें गमन कसें होतें आणि तशा पुरुषाला कर्माचें निश्चित फल कसें प्राप्त होतें हें तूं मला सांग आणि शरीराचा नाश झाल्यावर विषयोपभोग कसा घडतो हेंही तू मला कथन कर ८. सर्प सांगतोः—हे राजा, आपआपल्या कर्मांमुळें पुरुषांना मनुष्ययोनि, स्वर्गवास आणि तिर्यग्योनि अशा तीन गति प्राप्त होत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. ह्या तिहींमध्येंही उत्तम, मध्यम, व कनिष्ठ असे तीन प्रकार आहेत ९. ह्यांपैकीं स्वर्गगति अहिंसेनें युक्त अशा दानादिकर्मांच्या योगानें मनुष्यलोकानंतर पुरुषाला प्राप्त होत असते १०. हे राजाधिराज, विपरीत कर्मांच्या योगानें (ह्मणजे पाप व पुण्य अशा परस्पर विरुद्ध असलेल्या दोन्ही प्रकारच्या कर्मांचें साम्य झाल्याच्या योगानें) मनुष्ययोनि प्राप्त होते. आतां, बा युधिष्ठिरा, तिर्यग्योनि कशी प्राप्त होते हें कथन करून त्यांतील विशेष प्रकारही मी तुला सांगतों ११. काम, क्रोध, हिंसा व लोभ ह्यांनीं युक्त असलेला पुरुष मनुष्ययोनीपासून भ्रष्ट होऊन तिर्यग्योनीमध्यें उत्पन्न होतो १२. मनुष्यजन्म प्राप्त होण्याकरितां तिर्यग्योनीपासून मुक्तताही होत असल्याचें श्रुतीमध्यें सांगितलें आहे. कारण, गवादि पशु आणि अश्व ह्यांना त्या त्या योनींनंतर देवत्वही

स्तात जन्तुश्चरति कार्यवान् । नित्यं महति चात्मानमवस्थापयते द्विजः १४
जातो जातश्च बलवान्भुङ्क्ते चात्मा स देहवान् । फलार्थस्तात निष्पृक्तः प्रजा-
लक्षणभावनः १५ युधिष्ठिर उवाच ॥ शब्दे स्पर्शे च रूपे च तथैव रसग-
न्धयोः । तस्याधिष्ठानमव्यग्रो ब्रूहि सर्प यथातथम् १६ किं न गृह्णासि विषया-
न्युगपत्त्वं महामते । एतावदुच्यतां चोक्तं सर्वं पन्नगसत्तम १७ सर्प उवाच ॥
यदात्मद्रव्यमायुष्मन्देहसंश्रयणान्वितम् । करणाधिष्ठितं भोगानुपभुङ्क्ते
यथाविधि १८ ज्ञानं चैवात्र बुद्धिश्च मनश्च भरतर्षभ । तस्य भोगाधिकरणे
करणानि निबोध मे १९ मनसा तात पर्येति क्रमशो विषयानिमान् ।
विषयायतनस्थेन भूतात्मा क्षेत्रनिःसृतः २० तत्र चापि नरव्याघ्र मनो
जन्तोर्विधीयते । तस्मायुगपदत्रास्य ग्रहणं नोपपद्यते २१ स आत्मा

प्राप्त होतें असें (श्रुतीचा विचार केला असतां) दृष्टोत्पत्तीस येतें १३. बा युधिष्ठिरा, कर्मयुक्त असलेल्या त्या प्राण्याला ह्या गति प्राप्त होत असतात व (ज्ञानी) द्विज नित्य व श्रेष्ठ अशा ब्रह्माचे ठिकाणीं आपलें ऐक्य करीत असतात १४. कारण, कर्माधीन असलेला हा देहाभिमानी जीव फिरून फिरून जन्माला येतो आणि सुखाची इच्छा धरून देहजन्य फलाचा उपभोग घेत असतो; परंतु, बा युधिष्ठिरा, फलाविषयीं निरिच्छ असलेला पुरुष लोकांचें लक्षण जाणीत असतो. (सारांश, निष्काम कर्म करणारा पुरुष चांगली चित्तशुद्धि झाली असतां जन्ममरणादि दोष अवलोकन करूं लागतो) १५. युधिष्ठिर ह्मणतोः— हे सर्पा, शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध ह्या विषयांचा उपभोग घ्यावयाचा असतांना प्राण्याचें अधिष्ठान काय असतें हें तूं स्वस्थपणानें मला जसें असेल तसें कथन कर १६. हे महाविचारी श्रेष्ठ सर्पा, एकदम सर्व विषयांचा उपभोग तुला कां घेतां येत नाहीं हें तूं मला सांग. मला काय सांगावयाचे होतें तें मीं तुला सांगितलें आहे १७. सर्प सांगतोः—हे दीर्घायु युधिष्ठिरा, आत्मद्रव्य ह्मणून जें प्रसिद्ध आहे तें देहरूप उपाधीचें अवलंबन केल्यामुळें बुद्धिप्रभृतींनीं युक्त होतें आणि तेंच इंद्रियाधीन झालें असतां भोगांचा कर्मानुरूप उपभोग घेतें १८. हे भरतवंशजश्रेष्ठा धर्मराजा, इंद्रियें, बुद्धि आणि अंतःकरण हीं त्याच्या देहांतील उपभोगाचीं साधनें होत; हें तूं माझ्यापासून श्रवण कर १९. इंद्रियांचे ठिकाणीं लय लागून राहिलेल्या मनाच्या योगानें हा जीवात्मा त्या त्या द्वारानें बाहेर पडून क्रमानें ह्या रूपादि विषयांचा उपभोग घेत असतो २०. हे पुरुषश्रेष्ठा धर्मराजा, विषयांचा स्वीकार करावयाचा असल्यास त्या त्या विषयाकडे बुद्धीमुळें मनाची प्रेरणा होत असते; ह्या कारणानें प्राण्याला एकदम

पुरुषव्याघ्र भ्रुवोरन्तरमाश्रितः । बुद्धिं द्रव्येषु सृजति विविधेषु परा-
वराम् २२ बुद्धेरुत्तरकाला च वेदना दृश्यते बुधैः । एष वै राजशार्दूल
विधिः क्षेत्रज्ञभावनः २३ युधिष्ठिर उवाच ॥ मनसश्चापि बुद्धेश्च ब्रूहि
मे लक्षणं परम् । एतदध्यात्मविदुषां परं कार्यं विधीयते २४ सर्प
उवाच ॥ बुद्धिरात्मानुगा तात उत्पातेन विधीयते । तदाश्रिता हि संज्ञया
विधिस्तस्यैषिणे भवेत् २५ बुद्धिरुत्पद्यते कार्यान्मनस्तूत्पन्नमेव हि । बुद्धे-
र्गुणविधानेन मनस्तद्गुणवद्भवेत् २६ एतद्विशेषणं तात मनोबुद्ध्योर्यदन्त-
रम् । त्वमप्यत्राभिसंबुद्धः कथं वा मन्यते भवान् २७ युधिष्ठिर उवाच ॥
अहो बुद्धिमतां श्रेष्ठ शुभा बुद्धिरियं तव । विदितं वेदितव्यं ते कस्मा-
त्समनुपृच्छसि २८ सर्वज्ञं त्वां कथं मोह आविशत्स्वर्गवासिनम् ।

विषयांचा उपभोग घेतां येत नाहीं. (कारण, बुद्धि ही एकदमच सर्व विषयांकडे मनाला नेत नाहीं)२१. असो. हे पुरुषश्रेष्ठा युधिष्ठिरा, (विषयांचे ठिकाणीं मनाची प्रवृत्ति करणारी बुद्धि स्वतंत्र नसून तिच्या प्रवृत्तीलाही दुसऱ्याचीच अपेक्षा असते. कारण, बुद्धि, मन आणि इंद्रियें ह्या साधनांनीं युक्त झाला असतांच जो विषयांचा भोक्ता असतो आणि वास्तविक पाहूं गेलें असतां ज्याचे ठिकाणीं भोक्तृत्वाचा संभवही नाहीं असा) तो भिवयांच्या मध्यभागाचा आश्रय करून राहिलेला आत्मा नानाप्रकारच्या पदार्थांकडे बुद्धीची बरी वाईट प्रवृत्ति करीत असतो २२. विषयांचे ठिकाणीं बुद्धीची प्रवृत्ति झाल्यानंतर प्राज्ञजनांना सुखदुःखाचा अनुभव येत असतो आणि ह्याच प्रकाराला, हे नृपश्रेष्ठा धर्मराजा, जीवाला होणारा सुखदुःखांचा साक्षात्कार असें म्हणत असतात २३. युधिष्ठिर ह्मणतो:— मन आणि बुद्धि ह्यांचें मुख्य लक्षण काय हें तूं मला कथन कर. कारण, (मन व बुद्धि ह्यांचा भेद जाणणें) हें अध्यात्मवेत्त्यांचें मुख्य कर्तव्य आहे २४. सर्प सांगतो:—बा युधिष्ठिरा, बुद्धि ही जन्मतःच आत्म्याशीं मिळून असल्याचें सिद्ध आहे. तस्मात्, ती आत्म्याच्याच आश्रयानें राहणारी असून आत्मज्ञानाला कारण होणारी आहे असें समजावें २५. (विषयेंद्रिय-संयोगरूप) कार्यापासून बुद्धि उत्पन्न होते, मन हें उत्पन्न झालेलेंच असतें व बुद्धि ही सुखादिरूप विकार धारण करूं लागली असतां मनही त्या विकारांनीं युक्त होतें २६. बा युधिष्ठिरा, मन आणि बुद्धि ह्यांतील हें अंतर परस्परापासून परस्पराचें भिन्नत्व दाखविणारें आहे आणि तूंही ह्यासबंधानें सुज्ञच आहेस; तेव्हां तुला काय वाटतें (हें कळूं दे) २७. युधिष्ठिर सांगतो:—हे बुद्धिमानांमध्यें श्रेष्ठ, हें तुझें ज्ञान उत्कृष्ट असून जाणावयाचें तें तूं जाणिलेंच आहेस. तेव्हां आतां मला कां ह्मणून विचारीत

एवमद्भुतकर्माणमिति मे संशयो महान् ॥ कथं च सर्पतां यातो भवा-
न्व्याख्यातुमर्हति २९ सर्प उवाच ॥ सुप्रज्ञमपि चेच्छूरमृद्धिर्मोहयते नरम् ।
वर्तमानः सुखे सर्वो मुह्यतीति मतिर्मम ३० सोहमैश्वर्यमोहेन मदाविष्टो
युधिष्ठिर । पतितः प्रतिसंबुद्धस्त्वां तु संबोधयाम्यहम् ३१ कृतं कार्यं
महाराज त्वया मम परन्तप । क्षीणः शापः सुकृच्छ्रो मे त्वया संभाष्य
साधुना ३२ अहं हि दिवि दिव्येन विमानेन चरन्पुरा । अभिमानेन
मत्तः सन्कंचिन्नान्यमचिन्तयम् ३३ ब्रह्मर्षिदेवगन्धर्वयक्षराक्षसपन्नगाः ।
करान्मम प्रयच्छन्ति सर्वे त्रैलोक्यवासिनः ३४ चक्षुषा यं प्रपश्यामि
प्राणिनं पृथिवीपते । तस्य तेजो हराम्याशु तद्धि दृष्टेर्बलं मम ३५ ब्रह्म-
र्षीणां सहस्रं हि उवाह शिबिकां मम । स मामपनयो राजन्भ्रंशयामास
वै श्रियः ३६ तत्र ह्यगस्त्यः पादेन वहन्स्पृष्टो मया मुनिः । अगस्त्येन
ततोस्म्युक्तो ध्वंस सर्पेति वै रुषा ३७ ततस्तस्माद्विमानाग्र्यात्प्रच्युतश्च्यु-

---

आहेस ? २८. आतां ह्याप्रमाणें अद्भुत कर्म करणारा तूं सर्वज्ञ असून स्वर्गामध्यें वास्तव्य करीत असतांना तुला मोह कसा उत्पन्न झाला ह्याविषयीं मला मोठाच संशय आहे तेव्हां तुला सर्पत्व कसें प्राप्त झालें हें तूं मला सांग २९. सर्प सांगतोः—पुरुष शूर व उत्कृष्ट ज्ञानवान् जरी असला तरी संपत्ति त्याला मोह पाडिते. सारांश, सुखामध्यें असणाऱ्या हरएक प्राण्याला मोह होतो असें मला वाटतें ३०. हे युधिष्ठिरा, ऐश्वर्यमोहानें मी मत्त झालों असतां स्वर्गापासून च्युत झालों आणि (च्युत होतांच) उमजलों; ह्मणून तुला आतां सांगत आहें ३१. हे शत्रुतापना महाराजा, तू माझें कार्य केलें आहेस. कारण, अतिशय कठीण असलेला तो माझा शाप तुज साधूशीं संभाषण केल्यानें नाहींसा झाला आहे ३२. मी पूर्वीं दिव्य विमानांत बसून स्वर्गामध्यें संचार करीत असें आणि अभिमानानें मत्त झाल्यामुळें दुसरें कांहीं एक मनामध्यें आणीत नसें ३३. ब्रह्मर्षि, देव, गंधर्व, यक्ष, राक्षस व पन्नग असे सर्व त्रैलोक्यवासी प्राणी मला कर देत असत ३४. हे पृथ्वीपते युधिष्ठिरा, ज्या प्राण्याकडे मी दृष्टि फेंकीत असें तो लगेंच निस्तेज होई; असें त्यावेळीं माझ्या दृष्टीचें सामर्थ्य होतें ३५. हे राजा, हजार ब्रह्मर्षि माझ्या पालखीला होते आणि ह्याच अपराधामुळें मी ऐश्वर्यापासून भ्रष्ट झालों ३६. (स्वर्गामध्यें पालखींत बसून चाललों असतां सर्प—ह्मणजे चाल—असें ह्मणून) मीं पालखीला असलेल्या अगस्त्य मुनींना पायानें स्पर्श केला असतां, " हे सर्पा, तूं स्वर्गापासून भ्रष्ट हो असा " त्यांनीं मला क्रोधानें शाप दिला ३७. तेव्हां तो शाप होतांक्षणींच माझ्या शरीरावरील सर्व सार्वभौमलक्षणें नाहींशीं झालीं आणि

तलक्षणः । प्रपतन्बुबुधेऽत्मानं व्यालीभूतमधोमुखम् ३८ अयाचं तमहं विप्रं शापस्यान्तो भवेदिति । सर्प उवाच ॥ प्रमादात्संप्रमूढस्य भगवन्क्षन्तुमर्हसि ३९ ततः स मामुवाचेदं प्रपतन्तं कृपान्वितः । युधिष्ठिरो धर्मराजः शापात्त्वां मोक्षयिष्यति ४० अभिमानस्य घोरस्य पापस्य च नराधिप । फले क्षीणे महाराज फलं पुण्यमवाप्स्यसि ४१ ततो मे विस्मयो जातस्तदृष्ट्वा तपसो बलम् । ब्रह्म च ब्राह्मणत्वं च येन त्वाहमचूचुदम् ४२ सत्यं दमस्तपो दानमहिंसा धर्मनित्यता । साधकानि सदा पुंसां न जातिर्न कुलं नृप ४३ अरिष्ट एष ते भ्राता भीमसेनो महाबलः । स्वस्ति तेऽस्तु महाराज गमिष्यामि दिवं पुनः ४४ वैशम्पायन उवाच ॥ इत्युक्त्वाजगरं देहं मुक्त्वा स नहुषो नृपः । दिव्यं वपुः समास्थाय गतस्त्रिदिवमेव ह ४५ युधिष्ठिरोऽपि धर्मात्मा भ्रात्रा भीमसेन संगतः । धौम्येन सहितः श्रीमानाश्रमं पुनरागमत् ४६ ततो द्विजेभ्यः सर्वेभ्यः समेतेभ्यो यथातथम् । कथयामास तत्सर्वं धर्मराजो युधिष्ठिरः ४७

लगेच मी त्या श्रेष्ठ विमानातून खालीं पडलों. तथापि, मी सर्प होऊन अधोमुख खालीं जात आहें असें पडतां पडतांच मला समजून आलें ३८ व तेव्हां शापाचा अंत व्हावा एतदर्थ "हे भगवन्, प्रमादामुळें अतिशय मूढ बनलेल्या मला आपण क्षमा करा" अशी त्या विप्राची मीं प्रार्थना केली ३९. तदनंतर, तो विप्र कृपाळू होऊन मी खालीं पडत असतांना मला ह्मणाला " धर्मराज युधिष्ठिर तुझी शापापासून मुक्तता करील ४०. सारांश, हे प्रजाधिपते महाराजा, गर्व आणि घोर पातक ह्यांचें फल क्षीण झाल्यावर तुला चांगलें फल प्राप्त होईल " ४१. ह्याप्रमाणें तें तपोबल, ब्रह्मतेज आणि ब्राह्मणत्व अवलोकन करितांक्षणीं मला विस्मय झाला आणि त्या मुनींनीं सांगितलें असल्यामुळेंच मीं तुला माझ्याशीं भाषण करण्याची प्रेरणा केली ४२. तात्पर्य, सत्य, दम, तप, दान, अहिंसा आणि सर्वदां धर्मावलंबन हींच पुरुषाला उत्तम गति प्राप्त होण्याला सर्वकाल साधनें आहेत; जाति अथवा कुल ह्यांपैकीं कांहीं एक नाहीं ४३. हा तुझा भ्राता महाबलाढ्य भीमसेन सुरक्षित आहे व तुझेंही कल्याण असो. हे महाराजा, मी आतां पुनरपि स्वर्गामध्यें गमन करितों ४४. वैशंपायन सांगतातः— ह्याप्रमाणें धर्मराजाला सांगितल्यावर नहुषराजानें आपला आजगर देह टाकून दिला आणि दिव्य देह धारण करून तो स्वर्गाला गेला ४५. तेव्हां धर्मात्मा वैभवशाली युधिष्ठिरही भ्रात्या भीमसेनाला भेटला आणि त्याला बरोबर घेऊन धौम्यमुनींसहवर्तमान पुनरपि आपल्या आश्रमाला परत आला ४६. तदनंतर तेथें जुळलेल्या सर्व ब्राह्मणांना धर्मराज

तच्छ्रुत्वा ते द्विजाः सर्वे भ्रातरश्चास्य ते त्रयः । आसन्सुव्रीडिता राजन्द्रौपदी च यशस्विनी ४८ ते तु सर्वे द्विजश्रेष्ठाः पाण्डवानां हितेप्सया । मैवमित्यब्रुवन्भीमं गर्हयन्तोऽस्य साहसम् ४९ पाण्डवास्तु भयान्मुक्तं प्रेक्ष्य भीमं महाबलम् । हर्षमाहारयांचक्रुर्विजह्रुश्च मुदा युताः ५० [७०६६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वण्याजगरपर्वणि भीममोचन एकाशीत्यधिकशततमोऽध्यायः ॥ १८१ ॥ समाप्तं चेदमाजगरं पर्व ।

अथ मार्कण्डेयसमास्यापर्व ॥ वैशम्पायन उवाच ॥ निदाघान्तकरः कालः सर्वभूतसुखावहः । तत्रैव वसतां तेषां प्रावृट्समभिपद्यत १ छादयन्तो महाघोषाः खं दिशश्च बलाहकाः । प्रववर्षुर्दिवारात्रमसिताः सततं तदा २ तपात्ययनिकेताश्च शतशोऽथ सहस्रशः । अपेतार्कप्रभाजालाः सविद्युद्विमलप्रभाः ३ विरूढशष्पा धरणी मत्तदंशसरीसृपा । बभूव पयसा सिक्ता शान्ता सर्वमनोरमा ४ न स्म प्रज्ञायते किंचिदम्भसा

युधिष्ठिरानें तें सर्व वर्तमान इत्थभूत कथन केलें असतां ४७ तें श्रवण केल्यावर ते सर्व द्विज, यशस्विनी द्रौपदी आणि त्याचे तिघेही भ्राते, हे जनमेजय राजा, अतिशय खिन्न झाले ४८ व तेथें जुळलेले ते सर्व द्विजश्रेष्ठ पांडवांचें हित व्हावें ह्या इच्छेनें भीमसेनाच्या साहसाची निंदा करून " असें फिरून करीत जाऊ नकोस " ह्मणून त्याला ह्मणाले ४९. असो. ह्याप्रमाणें भयापासून मुक्त झालेल्या महाबलाढ्य भीमाला अवलोकन करितांक्षणीं पांडवांना हर्ष झाला व ते आनंदित होऊन विहार करूं लागले ५०. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील आजगरपर्वापैकीं भीमाच्या मुक्ततेविषयीं एकशेंएक्यांयशीवा अध्याय समाप्त झाला ॥ १८१ ॥ ह्या ठिकाणीं हें आजगर पर्वही संपूर्ण झालें.

येथून पुढ मार्कंडेयसमास्यापर्व सुरू झालें. वैशंपायन सांगतातः—उष्णतेची परिसमाप्ति करणारा व सर्व भूतांना सुखावह असा वर्षाकाल ते पांडव तेथें (ह्मणजे त्या गंधमादन पर्वतासमीपच) वास्तव्य करीत असतांना प्राप्त झाला १. कृष्णवर्ण मेघ आकाश व दिशा आच्छादित करून प्रचंड गर्जना करूं लागले आणि अहोरात्र एकसारखी वृष्टि करूं लागले २. त्यावेळीं पर्जन्यकालांतील मंडपच कीं काय असे दिसणारे शेंकडों हजारों मेघ सूर्याचें प्रभामंडल आच्छादित करून विद्युल्लतेच्या निर्मल प्रभेनें युक्त झालेले चमकूं लागले ३. पृथ्वी उदकानें सिंचित झाल्यामुळें शांत व सर्व प्रकारें मनोहर दिसूं लागली; तिच्यावर वास्तव्य करणाऱ्या वनमक्षिका व सर्प ह्यांच्यामध्यें गोंधळ उडून गेला

समवस्तृते । समं वा विषमं वापि नद्यो वा स्थावराणि च ५ क्षुब्धतोया महावेगाः श्वसमाना इवाशुगाः । सिन्धवः शोभयाञ्चक्रुः काननानि तपात्यये ६ नदतां काननान्तेषु श्रूयन्ते विविधाः स्वनाः । वृष्टिभिश्छाद्यमानानां वराहमृगपक्षिणाम् ७ स्तोककाः शिखिनश्चैव पुंस्कोकिलगणैः सह । मत्ताः परिपतन्ति स्म दर्दुराश्चैव दर्पिताः ८ तथा बहुविधाकारा प्रावृण्मेघानुनादिता । अभ्यतीता शिवा तेषां चरतां मरुधन्वसु ९ क्रौञ्चहंससमाकीर्णा शरत्प्रमुदिताभवत् । रूढकक्षवनप्रस्था प्रसन्नजलनिम्नगा १० विमलाकाशनक्षत्रा शरत्तेषां शिवाभवत् । मृगद्विजसमाकीर्णा पाण्डवानां महात्मनाम् ११ दृश्यन्ते शान्तरजसः क्षपा जलदशीतलाः । ग्रहनक्षत्रसङ्घैश्च सोमेन च विराजिताः १२ कुमुदैः पुण्डरीकैश्च शीतवारिधराः शिवाः । नदीः पुष्करिणीश्चैव ददृशुः समलंकृताः १३

आणि ठिकठिकाणीं कोंवळें कोंवळें गवत उगवून आलें ४. सर्व कांहीं जलानें आच्छादित होऊन गेल्यामुळें सपाट प्रदेश कोणता, उंच सखल कोणता, नद्या कोणत्या आणि अचल स्थानें कोणतीं ह्याचा कांहींच उमज पडेनासा झाला ५. तो वर्षाकाल प्राप्त झाल्यामुळें नद्यांचीं उदकें क्षुब्ध होऊन त्या मोठ्या वेगानें युक्त झाल्या असतां बाणाप्रमाणें फों फों करूं लागल्या आणि त्यांनीं वनें सुशोभित करून टाकिलीं ६. वराह, मृग व पक्षी पर्जन्यवृष्टींनीं आच्छादित होऊं लागल्यामुळें अरण्यामध्यें गर्जना करूं लागले असतां त्यांचे नानाप्रकारचे ध्वनि कानांवर येऊं लागले ७. कोकिलपक्ष्यांच्या समुदायासहवर्तमान चातक व मयूर आणि गर्वानें फुगलेले बेडुक मत्त होऊन चोहोंकडे धांवाधांव करूं लागले ८. ह्याप्रमाणें नानाप्रकारच्या आकारांनीं प्रकट झालेला आणि मेघगर्जनेनें युक्त असलेला तो पर्जन्यकाल पर्वतावरील शुष्क प्रदेशामध्यें संचार करणाऱ्या त्या पांडवांना सुखाचा गेला ९. असो. कांहीं दिवसांनीं सर्वांना आनंदित करणारा शरदृतु प्राप्त झाला असतां जो तो प्रदेश क्रौंच व हंस पक्ष्यांनीं व्याप्त दिसूं लागला. पर्वतशिखरावरील वनांतून पुष्कळ गवत वाढून राहिलें; नद्यांचीं उदकें निर्मल झालीं १०, आकाश व त्यांतील नक्षत्रें निर्मल दिसूं लागलीं, मृग व पक्षी ठिकठिकाणी दृष्टीं पडूं लागले आणि अशा प्रकारचा तो शरदृतु महात्म्या पांडवांना सुखकर झाला ११. रात्रीं मेघामुळें शीतल दिसूं लागल्या, त्यांतील धुरळा जागच्या जागींच नाहींसा झाला आणि ग्रहगण, नक्षत्रसमुदाय व चंद्र ह्यांच्या योगानें त्यांना शोभा आली १२. शीतल उदक धारण करणाऱ्या नद्या व पुष्करिणी सुखावह होऊन चंद्रोदयानें विकसित होणाऱ्या कमलांच्या योगानें व श्वेत कमलांच्या योगानें भूषित झाल्यासारिख्या पांडवांनीं अवलोकन केल्या १३.

आकाशनीकाशतटां तीरवानीरसंकुलाम् । बभूव चरतां हर्षः पुण्य-
तीर्थां सरस्वतीम् १४ ते वै मुमुदिरे वीराः प्रसन्नसलिलां शिवाम् ।
पश्यन्तो दृढधन्वानः परिपूर्णां सरस्वतीम् १५ तेषां पुण्यतमा रात्रिः पर्व-
सन्धौ स्म शारदी । तत्रैव वसतामासीत्कार्तिकी जनमेजय १६ पुण्य-
कृद्भिर्महासत्त्वैस्तापसैः सह पाण्डवाः । तत्सर्वे भरतश्रेष्ठाः समूहुर्योगमु-
त्तमम् १७ तमिस्राभ्युदये तस्मिन्धौम्येन सह पाण्डवाः । सूतैः पौरोग-
वैश्चैव काम्यकं प्रययुर्वनम् १८ [७०८४] इति श्रीमहाभारते
शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमा-
स्यापर्वणि काम्यकवनप्रवेशे द्व्यशीत्यधिकशततमोऽध्यायः ॥ १८२ ॥

वैशम्पायन उवाच ॥ काम्यकं प्राप्य कौरव्य युधिष्ठिरपुरोगमाः ।
कृतातिथ्या मुनिगणैर्निषेदुः सह कृष्णया १ ततस्तान्परिविश्वस्तान्वसतः
पाण्डुनन्दनान् । ब्राह्मणा बहवस्तत्र समंतात्पर्यवारयन् २ अथाब्रवीद्द्विजः
कश्चिदर्जुनस्य प्रियः सखा । स एष्यति महाबाहुर्वशी शौरिरुदारधीः ३

आकाशसदृश तटांनीं युक्त, तीरावरील वनांनीं व्याप्त आणि पुण्यजलानें
परिपूर्ण अशा सरस्वती नदीचे तीरीं संचार करीत असतांना पांडवांना हर्ष झाला १४.
सारांश, ते महाधनुर्धर वीर पांडव निर्मल जलानें युक्त असलेली कल्याणकारक सर-
स्वती नदी दुथडी भरून चालली आहे असें अवलोकन करून आनंदित झाले १५ आणि,
हे जनमेजयराजा, अत्यंत पुण्यदायक अशी जी पर्वसंधीचे दिवशीं कृत्तिका नक्ष-
त्रांनीं युक्त असलेली शरदृतूंतील रात्र (ह्मणजे कार्तिकी पौर्णिमेची रात्र) ती ते
पांडव तेथें वास्तव्य करीत असतानांच गेली १६. तेव्हां महाशय व पुण्यवान् अशा
तपस्वी लोकांसहवर्तमान त्या सर्व भरतवंशजश्रेष्ठ पांडवांनीं ओझें वगैरे भरून ठेवण्याची
उत्कृष्ट तयारी केली १७ आणि कृष्णपक्ष सुरू झाल्यावर सारथि व वाकनीस बरोबर
घेऊन धौम्यमुनींसहवर्तमान ते पांडव काम्यकवनामध्यें चालते झाले १८. ह्याप्रमाणें
महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक ० वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं पांडवांनीं
काम्यकवनामध्यें प्रवेश केल्याविषयीं एकशें ब्यांयशींवा अध्याय समाप्त झाला ॥१८२॥

वैशंपायन सांगतात:– हे कुरुवंशजश्रेष्ठा जनमेजया, युधिष्ठिरप्रभृति पांडव काम्यक-
वनामध्यें प्राप्त झाले असतां ऋषिगणांनीं त्यांचें आदरातिथ्य केल्यावर ते द्रौपदीसह-
वर्तमान तेथें बसले १. तदनंतर निर्भयपणें ते पांडव तेथें वास्तव्य करूं लागले असतां
त्या ठिकाणीं पुष्कळ ब्राह्मण आले व ते पांडवांचे सभोंवतीं गराडा घेऊन बसले २.
नंतर अर्जुनाचा प्रिय मित्र असलेला कोणी एक ब्राह्मण त्यांना ह्मणाला " महापरा-

विदिता हि हरेर्यूयमिहायाताः कुरूद्वहाः । सदा हि दर्शनाकाङ्क्षी श्रेयो-
न्वेषी च वो हरिः ४ बहुवत्सरजीवी च मार्कण्डेयो महातपाः । स्वाध्या-
यतपसा युक्तः क्षिप्रं युष्मान्समेष्यति ५ तथैव ब्रुवतस्तस्य प्रत्यदृश्यत
केशवः । शैब्यसुग्रीवयुक्तेन रथेन रथिनां वरः ६ मघवानिव पौलोम्या
सहितः सत्यभामया । उपायाद्देवकीपुत्रो दिदृक्षुः कुरुसत्तमान् ७ अव-
तीर्य रथात्कृष्णो धर्मराजं यथाविधि । ववन्दे मुदितो धीमान्भीमं च
बलिनां वरम् ८ पूजयामास धौम्यं च यमाभ्यामभिवादितः । परिष्वज्य
गुडाकेशं द्रौपदीं पर्यसान्त्वयत् ९ स दृष्ट्वा फाल्गुनं वीरं चिरस्य प्रियमाग-
तम् । पर्यष्वजत दाशार्हः पुनः पुनररिन्दमः १० तथैव सत्यभामापि द्रौपदीं
परिषस्वजे । पाण्डवानां प्रियां भार्यां कृष्णस्य महिषी प्रिया ११ ततस्ते
पाण्डवाः सर्वे सभार्याः सपुरोहिताः । आनर्चुः पुण्डरीकाक्षं परिवव्रुश्च
सर्वशः १२ कृष्णस्तु पार्थेन समेत्य विद्वान्धनञ्जयेनासुरतर्जनेन । बभौ
यथा भूतपतिर्महात्मा समेत्य साक्षाद्भगवान्गुहेन १३ ततः समस्तानि

क्रमी, जितेंद्रिय व महाबुद्धिमान् असा तो कृष्ण इकडे येत आहे ३. कारण, हे कुरुवंशजश्रेष्ठहो, तुह्मी येथें आला आहांत हें त्या श्रीहरीला विदित आहे आणि तो नेहमीं तुमच्या दर्शनाची इच्छा करणारा असून सर्वदां तुमचें कल्याण चिंतणारा आहे ४. पुष्कळ वर्षें वांचलेला व वेदाध्ययनरूप तपानें युक्त असलेला महातपस्वी मार्कंडेय मुनीही लवकरच तुह्मांला येऊन भेटेल" ५. ह्याप्रमाणें तो ब्राह्मण बोलत आहे तोंच शैब्यसुग्रीव जोडिलेल्या रथामध्यें आरूढ होऊन येत असलेला श्रेष्ठ रथी केशव दृष्टीं पडूं लागला ६ आणि इंद्राणीसहवर्तमान येणाऱ्या इंद्राप्रमाणें सत्यभामे-सहवर्तमान आलेला तो देवकीनंदन कुरुवंशजश्रेष्ठ पांडवांना पहाण्याच्या इच्छेनें समीप आला ७. तदनंतर रथांतून उतरून त्या बुद्धिमान् कृष्णानें धर्मराजाला व बलवानां-मध्यें श्रेष्ठ असलेल्या भीमसेनाला आनंदानें वंदन केलें ८; धौम्यमुनींचें त्यानें पूजन केलें; आवळ्या-जावळ्या नकुलसहदेवांनीं त्याला अभिवंदन केलें; अर्जुनाला तो कडकडून भेटला व द्रौपदीचें त्यानें सांत्वन केलें ९. असो. फार दिवसांनीं भेटलेल्या वीर अर्जुनाला अवलोकन करून त्या शत्रुदमन करणाऱ्या श्रीहरीनें पुन्हां पुन्हां त्याला आलिंगन दिलें १० आणि त्याचप्रमाणें कृष्णाची प्रिया व पट्टराणी जी सत्यभामा तिनेंही पांडवांच्या प्रियभार्या द्रौपदीला कवटाळिलें ११. तदनंतर, भार्या व पुरोहित ह्यांसह-वर्तमान त्या सर्व पांडवांनीं कमलनयन श्रीकृष्णाचें पूजन करून त्याला सर्व बाजूंनीं घेरून टाकिलें १२. दैत्यनाशक कुंतीपुत्र अर्जुनाची भेट झाल्यामुळें ज्ञानवान् श्रीकृष्ण कार्ति-

किरीटमाली वनेषु वृत्तानि गदाग्रजाय । उक्त्वा यथावत्पुनरन्वपृच्छत्कथं
सुभद्रा च स चाभिमन्युः १४ स पूजयित्वा मधुहा यथावत्पार्थं च कृष्णां
च पुरोहितं च । उवाच राजानमभिप्रशंसन्युधिष्ठिरं तत्र सहोपविश्य १५
धर्मः परः पाण्डव राज्यलाभात्तस्यार्थमाहुस्तप एव राजन् । सत्यार्जवाभ्यां
चरता स्वधर्मं जितस्त्वयायं च परश्च लोकः १६ अधीतमग्रे चरता
व्रतानि सम्यग्धनुर्वेदमवाप्य कृत्स्नम् । क्षात्रेण धर्मेण वसूनि लब्ध्वा सर्वे
ह्यवाप्ताः क्रतवः पुराणाः १७ न ग्राम्यधर्मेषु रतिस्तवास्ति कामान्न
किंचित्कुरुषे नरेन्द्र । न चार्थलोभात्प्रजहासि धर्मं तस्मात्प्रभावादसि
धर्मराजः १८ दानं च सत्यं च तपश्च राजञ्छ्रद्धा च बुद्धिश्च क्षमा
धृतिश्च । अवाप्य राष्ट्राणि वसूनि भोगानेषा परा पार्थ सदा रतिस्ते १९
यदा जनौघः कुरुजाङ्गलानां कृष्णां सभायामवशामपश्यत् । अपेतध-
र्मव्यवहारवृत्तं सहेत तत्पाण्डव कस्त्वदन्यः २० असंशयं सर्वसमृद्धकामः

केयाची भेट झालेल्या प्रत्यक्ष महात्म्या भगवान् शंकराप्रमाणे दिसू लागला १३. असो. तदनंतर वनामध्यें घडलेले सर्व वृत्तांत श्रीकृष्णाला इत्थंभूत कथन केल्यावर 'सुभद्रा आणि तो अभिमन्यु हीं कशी आहेत' ह्मणून वारंवार अर्जुनानें श्रीकृष्णाला विचारिलें १४. पुढ अर्जुन, द्रौपदी, पुरोहित धौम्यमुनि ह्यांना योग्य रीतीनें मान दिल्यावर श्रीकृष्ण युधिष्ठिरासमीप बसला आणि त्या धर्मराजाची प्रशंसा करीत करीत त्याला ह्मणाला १५ "हे पांडुपुत्रा धर्मराजा, राज्यलाभापेक्षां धर्म श्रेष्ठ आहे आणि धर्मवृद्ध्यर्थच मुनींनीं तपश्चर्या सांगितलेली आहे. सत्यपणानें व निष्कपट रीतीनें स्वधर्माचरण करीत असल्यामुळें तूं इहलोक व परलोकही संपादन केला आहेस १६. (ब्रह्मचर्याश्रमाला उक्त असेलल्या) व्रतांचें अवलंबन करून तू पूर्वी वेदाध्ययन केलेंस आणि संपूर्ण धनुर्वेद प्राप्त झाल्यानंतर क्षात्रधर्मानें संपत्ति मिळवून सर्व सनातन यागही तू केलेस १७. हे प्रजाधिपते, ग्राम्यधर्मांचे ठिकाणीं तुझ्या मनाचा कल नसून विषयेच्छेनें तूं कांहींही करीत नाहींस आणि अर्थाचा लोभ धरून धर्माचा त्यागही करीत नाहींस; ह्यास्तव, असा तुझ्या आचरणाचा प्रभाव असल्यामुळें तूं धर्मराज ह्या अन्वर्थसंज्ञेला योग्य झाला आहेस १८. हे कुंतीपुत्रा धर्मराजा, राष्ट्रें जिंकून जरी तू संपत्ति व भोग प्राप्त करून घेतलेस तरी तिकडे तुझ्या मनाचा कल नसून दान, सत्य, तप, श्रद्धा, बुद्धि, क्षमा व धैर्य ह्यांचे ठिकाणींच सर्वदां तुझें मन रमत असतें १९. हे पांडवा, ज्या वेळीं कुरुजांगल देशांतील सर्व जनसमुदायाला सभेमध्यें आणिलेली द्रौपदी अनाथ झाली

क्षिप्रं प्रजाः पालयितासि सम्यक् । इमे वयं निग्रहणे कुरूणां यदि प्रतिज्ञा भवतः समाप्ता २१ धौम्यं च भीमं च युधिष्ठिरं च यमौ च कृष्णां च दशार्हसिंहः । उवाच दिष्ट्या भवतां शिवेन प्राप्तः किरीटी मुदितः कृतास्त्रः २२ प्रोवाच कृष्णामपि याज्ञसेनीं दशार्हभर्ता सहितः सुहृद्भिः । दिष्ट्या समग्रासि धनञ्जयेन समागतेत्येवमुवाच कृष्णः २३ कृष्णे धनुर्वेदरतिप्रधानास्तवात्मजास्ते शिशवः सुशीलाः । सद्भिः सदैवाचरितं सुहृद्भिश्चरन्ति पुत्रास्तव याज्ञसेनि २४ राज्येन राष्ट्रैश्च निमन्त्र्यमाणाः पित्रा च कृष्णे तव सोदरैश्च । न यज्ञसेनस्य न मातुलानां गृहेषु बाला रतिमाप्नुवन्ति २५ आनर्तमेवाभिमुखाः शिवेन गत्वा धनुर्वेदरतिप्रधानाः। तवात्मजा वृष्णिपुरं प्रविश्य न दैवतेभ्यः स्पृहयन्ति कृष्णे २६ यथा त्वमेवार्हसि तेषु वृत्तं प्रयोक्तुमार्या च यथैव कुन्ती। तेष्वप्रमादेन तथा करोति

आहे असें वाटलें त्या वेळीं धर्मव्यवहाराला सोडून असलेलें तें कौरवांचें वर्तन तुझ्यावांचून दुसरा कोण बरें सहन करणार होता ? २०. निःसंशय थोडक्याच दिवसांनीं तुझे सर्व मनोरथ परिपूर्ण होऊन तूं उत्कृष्ट रीतीनें प्रजांचें परिपालन करूं लागशील. ह्यास्तव, तुमची प्रतिज्ञा जर पुरी झाली असेल तर कौरवांच्या निग्रहाविषयीं हे आम्ही तयार झालों आहोंत " २१. (ह्याप्रमाणें धर्मराजाला सांगून पुनरपि) तो यादवश्रेष्ठ धौम्यमुनि, भीमसेन, युधिष्ठिर, नकुलसहदेव आणि द्रौपदी ह्यांना म्हणाला " तुमच्या सुदैवानें अर्जुन कृतास्त्र होऊन आनंदानें परत आला ही मोठी भाग्याचीच गोष्ट म्हणावयाची " २२. तदनंतर सुहृदांसहवर्तमान असलेला तो यादवपति श्रीकृष्ण " तुम्ही कांहीं एक हानि न होतां अर्जुनाशीं तुझा समागम झाला" असें याज्ञसेनी द्रौपदीलाही सांगून पुनरपि तो श्रीकृष्ण तिला म्हणाला २३ " हे द्रौपदि, तुझे पुत्र सुशील असून मुख्यतः धनुर्वेदाच्या अभ्यासाकडे त्यांच्या मनाचा कल आहे आणि त्याचप्रमाणें, हे याज्ञसेनि, सज्जनांनीं आचरिलेल्या मार्गाचेंच अवलंबन तुझे पुत्र सुहृदांसहवर्तमान करीत असतात २४. हे द्रौपदि, राज्याचा किंवा राष्ट्रांचा लोभ दाखवून जरी त्यांना तुझ्या पित्यानें व सहोदर भ्रात्यांनीं बोलावून नेलें तरी त्या बालकांना यज्ञसेनाच्या अथवा मातुलांच्या घरीं रहाणें बरें वाटत नाहीं २५ हे द्रौपदि, धनुर्वेदाच्या अभ्यासांतच गढून जाणारे तुझे पुत्र (मातुलगृहांतून बाहेर पडल्याबरोबर) द्वारकाप्रवेशाकडेच तोंड करून सुखरूपपणें चालते होतात आणि द्वारवतीनगरीमध्यें प्रविष्ट झाल्यावर ते देवत्वाचीही गरज बाळगीनासे होतात २६. तुला व साध्वी कुंतीला ज्याप्रमाणें त्यांच्याशीं वागणें योग्य आहे त्याप्रमाणें सुभद्रेलाही वागणें योग्य आहे आणि ती

तथैव भूयश्च तथा सुभद्रा २७ यथानिरुद्धस्य यथाभिमन्योर्यथा सुनीथस्य यथैव भानोः। तथा विनेता च गतिश्च कृष्णे तवात्मजानामपि रौक्मिणेयः२८ गदासिचर्मग्रहणेषु शूरानस्त्रेषु शिक्षासु रथाश्वयाने । सम्यग्विनेता विनयेदतन्द्रीस्तांश्चाभिमन्युः सततं कुमारः २९ स चापि सम्यक्प्रणिधाय शिक्षां शस्त्राणि चैषां विधिवत्प्रदाय। तवात्मजानां च तथाभिमन्योः पराक्रमैस्तुष्यति रौक्मिणेयः ३० यथा विहारं प्रसमीक्षमाणाः प्रयान्ति पुत्रास्तव याज्ञसेनि । एकैकमेषामनुयान्ति तत्र रथाश्च यानानि च दन्तिनश्च ३१ अथाब्रवीद्धर्मराजं तु कृष्णो दशार्हयोधाः कुकुरान्धकाश्च । एते निदेशं तव पालयन्तस्तिष्ठन्तु यत्रेच्छसि तत्र राजन् ३२ आवर्ततां कार्मुकवेगवाता हलायुधप्रग्रहणामधूनाम् । सेना तवार्थेषु नरेन्द्र यत्ता ससादिपत्त्यश्वरथा सनागा ३३ प्रस्थाप्यतां पाण्डव धार्तराष्ट्रः सुयोधनः पापकृतां वरिष्ठः । सानुबन्धः ससुहृद्गणश्च भौमस्य सौभाधिप-

---

तत्परतेने त्यांच्याशीं तशी वागतही असते २७. हे द्रौपदि, रुक्मिणीपुत्र प्रद्युम्न ज्याप्रमाणें अनिरुद्धाचा, अभिमन्यूचा, सुनीथाचा व भानूचा शिक्षक व आश्रय आहे त्याचप्रमाणें तुझ्या पुत्राचाही आहे २८. शिवाय, कधींही गाफिलपणानें न राहणारा कुमार अभिमन्यु गदा, खड्ग व ढाल हीं कशीं धरावींत, अस्त्रप्रयोग कसा करावा आणि रथारोहण, अश्वारोहण, कसें करावें ह्यांविषयीं तुझ्या शूर पुत्रांना शिक्षण देत आहे व तो चांगलें शिक्षण देणारा आहे २९. त्याचप्रमाणें तुझ्या पुत्रांना व अभिमन्यूला उत्कृष्ट रीतीनें शिक्षण दिल्यावर आणि शस्त्रप्रयोगांविषयींही योग्य रीतीनें ज्ञान करून देऊन रुक्मिणीपुत्र प्रद्युम्न तुझ्या पुत्रांचे व अभिमन्यूचे पराक्रम अवलोकन करून संतुष्ट होत असतो ३०. हे याज्ञसेनि, विहार करण्याचा उद्देश मनामध्यें धरून तुझे पुत्र जाऊं लागले असतां प्रत्येकाचे मागोमाग रथ, गज व वाहनें जाऊं लागतात " ३१. (ह्याप्रमाणें द्रौपदीला सांगितल्यानंतर) श्रीकृष्ण धर्मराजाला ह्मणाले " हे राजा, दशार्हसंज्ञक यादव योद्धे, कुकुर व अधंक हे तुझ्या हुकुमाचे ताबेदार असून तुझी इच्छा असेल तिकडे जाण्याला तयार आहेत ३२. हे पुरुषश्रेष्ठा, शत्रूवर तुटून पडणाऱ्या माथुर (ह्मणजे मथुरेकडील लोकांची) सेना स्वार, पदाति, अश्व, रथ आणि गज ह्यांसहवर्तमान तुझ्या कार्याकरितां सिद्ध झालेली आहे आणि चापवेगाच्या वायूनें ती युक्त असून हलधर बलराम तिचा नियंता आहे ३३. तस्मात्, हे पांडवा, पाप करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ असलेल्या धृतराष्ट्रपुत्र सुयोधनाचे अनुयायी व सुहृद्गण ह्यांसहवर्तमान (माझ्या

तेषां मार्गम् ३४ कामं तथा तिष्ठ नरेन्द्र तस्मिन्यथा कृतस्ते समयः
सभायाम् । दाशार्हयोधैस्तु हतारियोधं प्रतीक्षतां नागपुरं भवन्तम् ३५
व्यपेतमन्युर्व्यपनीतपाप्मा विहृत्य यत्रेच्छसि तत्र कामम् । ततः प्रसिद्धं
प्रथमं विशोकः प्रपत्स्यसे नागपुरं सराष्ट्रम् ३६ ततस्तदाज्ञाय मतं महात्मा
यथावदुक्तं पुरुषोत्तमेन । प्रशस्य विप्रेक्ष्य च धर्मराजः कृताञ्जलिः केश-
वमित्युवाच ३७ असंशयं केशव पाण्डवानां भवान्गतिस्त्वच्छरणा हि
पार्थाः । कालोदये तच्च ततश्च भूयः कर्ता भवान्कर्म न संशयोऽस्ति ३८
यथाप्रतिज्ञं विहृतश्च कालः सर्वाः समा द्वादश निर्जनेषु । अज्ञातचर्यां
विधिवत्समाप्य भवद्गताः केशव पाण्डवेयाः ३९ एषैव बुद्धिर्जुषतां सदा
त्वां सत्ये स्थिताः केशव पाण्डवेयाः । सदानधर्माः सजनाः सदाराः
सबान्धवास्त्वच्छरणा हि पार्थाः ४० वैशम्पायन उवाच ॥ तथा वदति
वार्ष्णेये धर्मराजे च भारत । अथ पश्चात्तपोवृद्धो बहुवर्षसहस्रधृक् ४१
प्रत्यदृश्यत धर्मात्मा मार्कण्डेयो महातपाः ४२ अजरश्चामरश्चैव रूपौदा-

---

हातून वध पावलेल्या) नरकासुराच्या अथवा सौभाधिपति शाल्वराजाच्या मार्गाकडे
रवानगी करावी ३४. हे राजा, सभेमध्यें तूं ज्याप्रमाणें ठराव केलास त्याचप्रमाणें तूं
आतां वाग आणि यादव योद्ध्यांच्या साहाय्यानें शत्रूकडील योद्ध्यांचा वध केलास असें
हास्तिनपुरच्या प्रत्ययास येऊं दे ३५. सारांश (सुयोधनाचा वध झाल्यावर) तुझा
क्रोध दूर होऊन पापक्षालन झालें असतां तूं इच्छेस येईल तिकडे यथेष्ट विहार कर
आणि नतर शोकरहित होऊन प्रसिद्ध व उत्कृष्ट अशा आपल्या हास्तिनपुरामध्यें व
राष्ट्रामध्यें प्रविष्ट हो " ३६. ह्याप्रमाणें पुरुषोत्तम श्रीकृष्णानें दर्शविलेलें स्वतःचें मत
पूर्ण रीतीनें समजून घेऊन धर्मराजानें त्याची प्रशंसा केली आणि त्या केशवाकडे
पाहून महात्मा धर्मराज हात जोडून ह्मणाला ३७ " हे केशवा, पांडवांचा आश्रय
निःसशय तूच असून तही तुझ्याच आश्रयानें वागणारे आहेत आणि वेळ आली
ह्मणजे तें व त्याहूनही जास्त कर्म करणारा तूं आहेस ह्याविषयीं सशय नाहीं ३८. हे
केशवा, प्रतिज्ञेप्रमाणें निर्जन वनामध्यें आह्मी संपूर्ण बारा वर्षें काल काढिला; आतां
उरलेला अज्ञातवास योग्य रीतीनें संपूर्ण झाल्यावर हे पांडुपुत्र तुझ्या अधीनच
आहेत ३९. हे केशवा, हीच तुझी बुद्धि सर्वदां कायम राहो. सत्यनिष्ठ कुंतीपुत्र
पांडव दान, धर्म, स्वजन, दारा आणि बांधव ह्यांसहवर्तमान तुझ्यावरच अवलंबून
आहेत " ४०. वैशंपायन सांगतातः—हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, ह्याप्रमाणें
श्रीकृष्ण व धर्मराज एकमेकांशीं संभाषण करीत असतांना वयाला अनेक हजार वर्षें

र्यगुणान्वितः । व्यदृश्यत तथायुक्तो यथा स्यात्पञ्चविंशकः ४३ तमागतमृषिं वृद्धं बहुवर्षसहस्रिणम् । आनर्चुर्ब्राह्मणाः सर्वे कृष्णश्च सह पाण्डवैः ४४ तमर्चितं सुविश्वस्तमासीनमृषिसत्तमम् । ब्राह्मणानां मतेनाह पाण्डवानां च केशवः ४५ कृष्ण उवाच ॥ शुश्रूषवः पाण्डवास्ते ब्राह्मणाश्च समागताः । द्रौपदी सत्यभामा च तथाहं परमं वचः ४६ परावृत्ताः कथाः पुण्याः सदाचारान्सनातनान् । राज्ञां स्त्रीणामृषीणां च मार्कण्डेय विचक्ष्व नः ४७ वैशम्पायन उवाच ॥ तेषु तत्रोपविष्टेषु देवर्षिरपि नारदः । आजगाम विशुद्धात्मा पाण्डवानवलोककः ४८ तमप्यथ महात्मानं सर्वे ते पुरुषर्षभाः । पाद्यार्घ्याभ्यां यथान्यायमुपतस्थुर्मनीषिणः ४९ नारदस्त्वथ देवर्षिर्ज्ञात्वा तांस्तु कृतक्षणान् । मार्कण्डेयस्य वदतस्तां कथामन्वमोदत ५० उवाच चैनं कालज्ञः स्मयन्निव सनातनः । ब्रह्मर्षे कथ्यतां यत्ते पाण्डवेषु विवक्षितम् ५१ एवमुक्तः प्रत्युवाच मार्कण्डेयो महातपाः । क्षणं कुरुध्वं विपुलमाख्यातव्यं भविष्यति ५२ एवमुक्ताः क्षणं चक्रुः पाण्डवाः

झालेले तपोवृद्ध व महातपस्वी धर्मात्मे मार्कंडेय मुनि दिसूं लागले ४१, ४२. ते अजरामर मुनि उदार व सौंदर्यसंपन्न असून पंचवीस वर्षांच्या पुरुषाप्रमाणें (तरुण) दिसत होते ४३. हजारों वर्षांचे ते वृद्ध मुनि आलेले अवलोकन करितांक्षणीं सर्व ब्राह्मणांनीं आणि पांडवांसहवर्तमान श्रीकृष्णांनींही त्यांचें पूजन केलें ४४ आणि पूजन होऊन ते ऋषिश्रेष्ठ स्वस्थपणें बसले असतांना ब्राह्मणांच्या व पांडवांच्या अनुमतीनें केशव त्यांना ह्मणाले ४५ " पांडवांना, येथें जुळलेल्या ब्राह्मणांना, द्रौपदीला, सत्यभामेला व त्याचप्रमाणें मला आपलें उत्कृष्ट भाषण श्रवण करण्याची इच्छा आहे ४६ तस्मात्, हे मार्कंडेय मुने, पुण्यप्रद अशा पुरातन कथा व त्याचप्रमाणें राजे, पतिव्रता व महर्षि ह्यांचे सनातन सदाचार आपण आह्मांला कथन करा ४७. वैशंपायन सांगतात:— ते तेथें बसले असतांना शुद्ध अंतःकरणानें युक्त असलेले देवर्षि नारदही पांडवांना अवलोकन करण्याकरितां तेथें आले ४८. तेव्हां त्या सर्व विचारी पुरुषश्रेष्ठांनीं त्याही महात्म्यांचें पाद्य व अर्घ्य ह्यांच्या योगानें यथाविधि स्वागत केलें ४९. नंतर मार्कंडेय मुनींचें भाषण श्रवण करण्याविषयीं ते पांडवप्रभृति उत्सुक झाले आहेत असें समजून देवर्षि नारदांनींही त्या कथेला अनुमोदन दिलें ५० आणि काळवेळ ओळखणारे ते सनातन मुनि " हे ब्रह्मर्षे, पांडवांना जें कांहीं तुह्माला सांगावयाचें असेल तें तुह्मी सांग" असेंहीं त्या मार्कंडेय मुनींना ह्मणाले ५१. ह्याप्रमाणें नारदानीं महातपस्वी मार्कंडेय मुनींना सांगितलें

सह तैर्द्विजैः। मध्यन्दिने यथादित्यं प्रेक्षन्तस्ते महामुनिम् ५३ वैशम्पायन उवाच ॥ तं विवक्षन्तमालक्ष्य कुरुराजो महामुनिम्। कथासंजननार्थाय चोदयामास पाण्डवः ५४ भवान्दैवतदैत्यानामृषीणां च महात्मनाम्। राजर्षीणां च सर्वेषां चरितज्ञः पुरातनः ५५ सेव्यश्चोपासितव्यश्च मतो नः काङ्क्षितश्चिरम्। अयं च देवकीपुत्रः प्राप्तोऽस्मानवलोककः ५६ भवत्येव हि मे बुद्धिर्दृष्ट्वात्मानं सुखाच्च्युतम्। धार्तराष्ट्रांश्च दुर्वृत्तानृध्यतः प्रेक्ष्य सर्वशः ५७ कर्मणः पुरुषः कर्ता शुभस्याप्यशुभस्य वा। स फलं तदुपाश्नाति कथं कर्ता स्विदीश्वरः ५८ कुतो वा सुखदुःखेषु नृणां ब्रह्मविदां वर। इह वा कृतमन्वेति परदेहेऽथवा पुनः ५९ देही च देहं संत्यज्य मृग्यमाणः शुभाशुभैः। कथं संयुज्यते प्रेत्य इह वा द्विजसत्तम ६० ऐहलौकिकमेवेह उताहो पारलौकिकम्। क्व च कर्माणि तिष्ठन्ति जन्तोः प्रेतस्य भार्गव ६१ मार्कण्डेय उवाच ॥ त्वद्युक्तोऽयमनुप्रश्नो यथावद्वदतां

असतां " लक्ष्य द्या, मी चांगलाच कथाभाग सांगणार आहें " ह्मणून ते त्यांना ह्मणाले ५२. ह्याप्रमाणें पांडवांना मार्कंडेय मुनींनीं सांगितल्यावर त्या द्विजांसहवर्तमान पांडव मध्यदिनसमयीं ब्राह्मण ज्याप्रमाणें सूर्याकडे दृष्टि देतात त्याप्रमाणें त्या महामुनींकडे दृष्टि देऊन लक्ष्य लावून बसले ५३. वैशंपायन सांगतातः—" काय सांगू " ह्मणून प्रश्न करण्याच्या बेतांत मार्कंडेय मुनि आहेत असें लक्ष्यांत आणून कुरुराज पांडुपुत्र युधिष्ठिरानें त्या महामुनींना कथेचा उपक्रम करण्यास सांगितलें ५४. (तो ह्मणाला) " देव, दैत्य, महर्षि व राजर्षि ह्या सर्वांचीं चरित्रें जाणणारे आपण पुरातन आहांत ५५. आपण आह्मांला सेव्य व पूज्य ह्मणून अभिमत असून आपल्या दर्शनाची आह्मी फार वेळ वाट पहात आहोंत व आह्माला अवलोकन करण्याकरितां येथें आलेला हा देवकीनंदनही आपली वाट पहात आहे ५६. स्वतः सुखापासून भ्रष्ट झाल्याचें आणि धृतराष्ट्रपुत्र दुराचारी असूनही त्यांचा सर्वप्रकारें भाग्योदय होत असल्याचें अवलोकन करून मला कांहीं जाणण्याची इच्छा झाली आहे ५७. तरी शुभाशुभ कर्में करणाऱ्या पुरुषाला कर्माचें फल कसें प्राप्त होतें ? ईश्वराकडे कर्तृत्व कसें येतें ? ५८, त्याचप्रमाणें, हे ब्रह्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ, बऱ्यावाईट कर्मामुळें संपादन केलेलें सुख अथवा दुःख इहलोकीं अथवा परलोकीं पुरुषाला कसें प्राप्त होतें ? ५९, हे द्विजश्रेष्ठ, प्राण्यानें देहत्याग केल्यावर शुभाशुभ कर्में त्याला कशीं हुडकून काढितात आणि इहलोकीं अथवा परलोकीं तीं त्याला कशीं प्राप्त होतात ? ६०, कर्माचें फल इहलोकीं अथवा परलोकीं भोगावें लागतें आणि मृत्यु पावलल्या प्राण्याचीं कर्में कोठें

वर । विदितं वेदितव्यं ते स्थित्यर्थं त्वं तु पृच्छसि ६२ अत्र ते कथयिष्यामि तदिहैकमनाः शृणु । यथेहामुत्र च नरः सुखदुःखमुपाश्नुते ६३ निर्मलानि शरीराणि विशुद्धानि शरीरिणाम् । ससर्ज धर्मतन्त्राणि पूर्वोत्पन्नः प्रजापतिः ६४ अमोघफलसंकल्पाः सुव्रताः सत्यवादिनः । ब्रह्मभूता नराः पुण्याः पुराणाः कुरुसत्तम ६५ सर्वे देवैः समायान्तिस्वच्छन्देन नभस्तलम् । ततश्च पुनरायान्ति सर्वे स्वच्छन्दचारिणः ६६ स्वच्छन्दमरणाश्चासन्नराः स्वच्छन्दचारिणः । अल्पबाधा निरातङ्काः सिद्धार्था निरुपद्रवाः ६७ द्रष्टारो देवसंघानामृषीणां च महात्मनाम् । प्रत्यक्षाः सर्वधर्माणां दान्ता विगतमत्सराः ६८ आसन्वर्षसहस्रीयास्तथा पुत्रसहस्रिणः । ततः कालान्तरेऽन्यस्मिन्पृथिवीतलचारिणः ६९ कामक्रोधाभिभूतास्ते मायाव्याजोपजीविनः । लोभमोहाभिभूताश्च त्यक्ता देहैस्ततो नराः ७० अशुभैः कर्मभिः पापास्तिर्यङ्निरयगामिनः । संसारेषु विचि-

---

रहात असतात हें, हे भृगुकुलोत्पन्न मार्कंडेय मुने, आपण मला कथन करा ६१. मार्कंडेय सांगतातः—हे वक्त्यांमध्यें श्रेष्ठ धर्मराजा, हा विचारिलेला प्रश्न तुला योग्य आहे आणि समजावयाचें जें कांहीं आहे तें तुला समजलेंही आहे; परंतु, तूं फक्त लोकरमणार्थ मला विचारीत आहेस ६२. इहलोकीं अथवा परलोकीं पुरुषाला सुखदुःख कसें प्राप्त होतें तें मी तुला येथें कथन करितों; तूं एकाग्र अंतःकरण करून श्रवण कर ६३. कर्मावर अवलंबून असलेलीं अशीं प्राण्यांचीं निर्मल व शुद्ध शरीरें त्यांचेपूर्वी उत्पन्न झालेल्या ब्रह्मदेवानें उत्पन्न केलीं ६४. हे कुरुवंशजश्रेष्ठा, पुरातन लोक पुण्यवान्, सदाचरणसंपन्न व सत्यनिष्ठ असून ब्रह्माकडे त्यांचें लय लागून राहिलेलें असे आणि त्यांच्या कर्मांचें फल व त्यांची इच्छा हीं कधींही व्यर्थ होत नसत ६५. ते सर्व स्वेच्छेनें देवांबरोबर आकाशामध्यें गमन करीत असत आणि तेथून ते सर्वही स्वच्छंदचारी परत येत असत ६६. सारांश, पुरातन लोक स्वेच्छामरणी, स्वेच्छाचारी, अल्प पीडेनें युक्त, आरोग्यसंपन्न, उपद्रवरहित आणि मनोरथ सिद्धीस गेलेले असे असत ६७. जितेंद्रिय व मत्सररहित असलेले ते लोक देवगण आणि महात्मे ऋषि ह्यांना नेहमीं पहात असून सर्व धर्मांचे ज्ञाते होते ६८. हजारों वर्षे ते वांचत असत व हजारों पुत्र त्यांना होत असत. तदनंतर तो काळ जाऊन दुसरा काल आला असतां (लोकांचें आकाशगमनसामर्थ्य कमी होऊन) ते केवल भूतलावरच संचार करणारे निघाले ६९, काम व क्रोध ह्यांच्या योगानें सर्वच पछाडले गेले, फसवेगिरी व दंभ ह्यांचें अवलंबन करूं लागले, लोभ व मोह ह्यांनीं घेरून गेले आणि नंतर देहांनीं

ऽेषु पच्यमानाः पुनःपुनः ७१ मोघेशा मोघसंकल्पा मोघज्ञाना विचे-
तसः। सर्वाभिशंकिनश्चैव संवृत्ताः क्लेशदायिनः ७२ अशुभैः कर्मभि-
श्चापि प्राशयः परिचिह्निताः। दौष्कुल्या व्याधिबहुला दुरात्मानो प्रता-
पिनः ७३ भवन्त्यल्पायुषः पापा रौद्रकर्मफलोदयाः। नाथन्तः सर्वकामानां
नास्तिका भिन्नचेतसः ७४ जन्तोः प्रेतस्य कौन्तेय गतिः स्वैरिव कर्मभिः।
प्राज्ञस्य हीनबुद्धेश्च कर्मकोशः क तिष्ठति ७५ कस्थस्तत्समुपाश्नाति सुकृतं
यदि वेतरत्। इति ते दर्शनं यच्च तत्राप्यनुनयं शृणु ७६ अयमादि शरी-
रेण देवसृष्टेन मानवः। शुभानामशुभानां च कुरुते संचयं महत् ७७
आयुषोन्ते प्रहायेदं क्षीणप्रायं कलेवरम्। संभवत्येव युगपद्योनौ नास्त्य-

---

सोडिल्यावर ७० अशुभ कर्मांच्या योगानें ते पापी तिर्यग्योनीमध्यें व नरकयोनीमध्यें उत्पन्न होऊं लागले. ह्या विचित्र संसारांत पुन्हां पुन्हां उत्पन्न होऊं लागले ७१. त्या अविचारी लोकांचीं यज्ञयागादि कर्में इच्छा व ज्ञान हीं सर्व निरर्थक असून कोणावरच विश्वास न ठेवणारे ते लोक दुसऱ्याला क्लेश देणारेच बनले ७२. प्रायशः अशुभ कर्मांच्या निशाण्या त्यांच्या शरीरावर दिसूं लागल्या व दुष्ट, पराक्रमरहित आणि अनेक व्याधींनीं ग्रस्त झालेले ते लोक नीच कुलामध्यें जन्मास येऊं लागले ७३. तात्पर्य, क्रूर कर्में करणारे व क्रूर फलेंच अनुभविणारे पापी अल्पायुषी निपजतात व सर्व विषयांची इच्छा करणारे ते नास्तिक मनाचेही चंचलच असत ७४. आतां, हे कुंतीपुत्रा धर्मराजा, " मृत झालेल्या प्राण्याला त्याचे हातून येथें घडलेल्या कर्मांमुळें कोणती गति प्राप्त होते ? ज्ञानी पुरुषांचीं व अज्ञानी पुरुषांचीं संचित कर्में कोठें फलद्रूप होतात ? ७५ आणि पुण्याचें अथवा पापाचें फल प्राण्याला कोठें भोगावें लागतें ? " असा जो तुझा प्रश्न आहे त्याविषयींही सिद्धांत माझ्यापासून श्रवण कर ७६. देवानें उत्पन्न केलेलें जें ह्याचें आदिशरीर (ह्मणजे मोक्षापर्यंत कायम रहाणारें लिंग शरीर) त्याच्या योगानें हा मनुष्य पुण्यांचा व पापांचा मोठा सांठा करून ठेवितो ७७ आणि आयुष्याचे शेंवटीं जवळ जवळ क्षीण झालेलें हें स्थूल शरीर टाकून देऊन पुनरपि दुसऱ्या योनीमध्यें उत्पन्न होतो व उत्पन्न होतांना एकदम दोन्ही देहांचें अवलंबन त्याला करावें लागत असल्यामुळें मध्यंतरीं एक क्षणभरही त्यांची संसारापासून मुक्तता होत नाहीं. (सारांश, तृणावरील किड्याला ज्याप्रमाणें दुसऱ्या तृणाचें अवलंबन केल्यावांचून पहिलें सोडितां येत नाहीं-ह्मणजे पहिलें तृण सोडितवेळीं ज्याप्रमाणें त्याला दोन्हीं तृणांचें कांहीं वेळ अवलंबन करावें लागतें-त्याचप्रमाणें पुढल्या देहाचें अवलंबन केल्यावांचून प्राण्याला पूर्व देह

न्तराभवः ७८ तत्रास्य स्वकृतं कर्म छायेवानुगतं सदा । फलत्यथ सुखार्हो वा दुःखार्हो वाथ जायते ७९ कृतान्तविधिसंयुक्तः स जन्तुर्लक्षणैः शुभैः । अशुभैर्वा निरादानो लक्ष्यते ज्ञानदृष्टिभिः ८० एषा तावदबुद्धीनां गतिरुक्ता युधिष्ठिर । अतः परं ज्ञानवतां निबोध गतिमुत्तमाम् ८१ मनुष्यास्तप्ततपसः सर्वागमपरायणाः । स्थिरव्रताः सत्यपरा गुरुशुश्रूषणे रताः ८२ सुशीलाः शुक्लजातीयाः क्षान्ता दान्ताः सुतेजसः । शुचियोन्यन्तरगताः प्रायशः शुभलक्षणाः ८३ जितेन्द्रियत्वाद्वशिनः शुक्लत्वान्मन्दरोगिणः । अल्पाबाधपरित्रासाद्भवन्ति निरुपद्रवाः ८४ च्यवन्तं जाय-

---

सोडितां येत नाहीं—ह्मणजे पूर्व देह सोडून दुसरा देह स्वीकारिते वेळीं त्याला कांहीं वेळपर्यंत एकदम दोन्ही देहांचें अवलंबन करावें लागतें—आणि ह्मणूनच मध्यंतरीं संसारापासून त्याची एक क्षणभरही सुटका होत नाहीं) ७८. असो. त्या नवीन प्राप्त झालेल्या स्थूल देहामध्यें ह्या प्राण्यानें स्वतः केलेलें कर्म येणेंप्रमाणें नेहमीं त्याच्या मागोमाग जाऊन त्याला फलद्रूप होतें आणि त्यामुळें तो सुखाला अथवा दुःखाला पात्र असा निपजतो ७९. नंतर कृतांताच्या ह्मणजे यमधर्माच्या आज्ञेप्रमाणें वागणारा तो प्राणी शुभ अथवा अशुभ लक्षणांनीं युक्त असून प्राप्त झालेलें सुख अथवा दुःख टाळण्यास समर्थ होत नाहीं असें ज्ञानदृष्टि पुरुषांच्या दृष्टोत्पत्तीस येतें ८०. हे युधिष्ठिरा, ही अज्ञानी प्राण्यांची गति मीं तुला कथन केली. आतां ज्ञानी लोकांना प्राप्त होणारी उत्कृष्ट गति तू श्रवण कर ८१. ज्यांनीं तप केलें आहे, सर्व शास्त्रांचें अवलंबन ज्यांनीं केलें आहे, ज्यांनीं आपलें स्वीकारिलेलें व्रत एकसारिखें चालविलें आहे, सत्यनिष्ठ असून गुरुशुश्रूषेविषयीं जे तत्पर आहेत, ज्यांची उत्पत्ति शुद्ध आहे आणि जे महातेजस्वी आहेत असे सुशील, क्षमाशील व जितेंद्रिय पुरुष देहपातानंतर दुसऱ्या पवित्र योनीमध्येंच जाऊन प्रायः शुभ लक्षणानीं युक्त होतात ८२, ८३. जितेंद्रिय असल्यामुळें ते स्वतंत्र असतात. उत्पत्तीनें शुद्ध असल्यामुळें रोगरहित असतात आणि पीडेचा त्रास कमी असल्या-

---

१ मरणानंतर आणि गर्भवास प्राप्त होण्याचे पूर्वी मध्यतरीं प्राण्याला आतिवाहिक शरीराचें अवलंबन करावें लागत असून स्वर्ग, अंतरिक्ष अथवा नरक ह्यांपैकी त्याला कोठें तरी कांहीं कालपर्यंत असावें लागतें ही गोष्ट खरी आहे; परतु, आतिवाहिक शरीर आणि स्थूल देह ह्या दोहोंमध्येंही प्राण्याला कर्मफलाचा उपयोग घ्यावाच लागत असल्यामुळें स्थूलदृष्ट्या हे दोन देह जरी वेगळे आहेत तरी वस्तुतः ते एकमेकापासून अत्यंत भिन्न नाहीत असें समजून एकदम दोन स्थूल देहांचें कांहीं वेळपर्यंत अवलंबन करावें लागतें असें ह्मटलें आहे.

मानं च गर्भस्थं चैव सर्वशः । स्वमात्मानं परं चैव बुध्यन्ते ज्ञानचक्षुषा ८५
ऋषयस्ते महात्मानः प्रत्यक्षागमबुद्धयः । कर्मभूमिमिमां प्राप्य पुनर्यान्ति
सुरालयम् ८६ किंचिद्दैवाद्धतात्किंचित्किंचिदेव स्वकर्मभिः । प्राप्नुवन्ति
नरा राजन्माते स्त्वन्या विचारणा ८७ इमामत्रोपमां चापि निबोध वदतां
वर । मनुष्यलोके यच्छ्रेयः परं मन्ये युधिष्ठिर ८८ इह वै कस्य नामुत्र
अमुत्रैकस्य नो इह । इह चामुत्र चैकस्य नामुत्रैकस्य नो इह ८९
धनानि येषां विपुलानि संति नित्यं रमन्ते सुविभूषिताङ्गाः । तेषामयं
शत्रुवरघ्न लोको नासौ सदा देहसुखे रतानाम् ९० ये योगयुक्तास्तपसि
प्रसक्ताः स्वाध्यायशीला जरयन्ति देहान् । जितेन्द्रियाः प्राणिवधे निवृ-
त्तास्तेषामसौ नायमरिघ्न लोकः ९१ ये धर्ममेव प्रथमं चरन्ति धर्मेण
लब्ध्वा च धनानि काले । दारानवाप्य क्रतुभिर्यजन्ते तेषामयं चैव परस्य

मुळें प्राय: त्यांचे ठिकाणीं कोणताही उपद्रव रहात नसून ८४ " प्राणी देहा-पासून वियुक्त कसा होतो, जन्माला कसा येतो व गर्भामध्यें कसा असतो " हें सर्व स्वत:संबंधानें आणि दुसऱ्यासबंधानें ज्ञानदृष्टीनें ते जाणीत असतात ८५ व आत्मज्ञानाचा साक्षात्कार ज्यांना आहे असे ते महात्मे ऋषि ह्या कर्मभूमीमध्यें जन्मास येऊन पुनरपि स्वर्गाचें अवलंबन करितात ८६. हे राजा, पुरुषांना कांहीं प्राक्तन कर्माच्या योगानें प्राप्त होत असतें, कांहीं हट्टामुळें मिळत असतें आणि कांहीं स्वकर्माच्या योगानें प्राप्त होत असतें, असें तूं समज; दुसरा कोणता विचार तूं मनामध्यें आणूं नकोस ८७. हे वक्त्यांमध्यें श्रेष्ठ युधिष्ठिरा, मनुष्यलोकामध्यें उत्कृष्ट श्रेय जें मी समजत आहें त्याचें उदाहरण मी तुला सांगतों; तू श्रवण कर ८८. कोणाला इहलोकींच उत्कृष्ट श्रेय प्राप्त होतें, परलोकीं होत नाहीं; कोणाला परलोकींच प्राप्त होतें, इहलोकीं होत नाहीं; कोणाला इहलोकीं व परलोकींही प्राप्त होत असतें आणि कोणाला इहलोकीं व परलोकींही प्राप्त होत नाहीं ८९. हे महाशत्रुनाशका, ज्यांच्यापाशीं संपत्ति पुष्कळ असते व जे नेहमीं आपलीं शरीरें उत्तम रीतीनें भूषित करून विषयांचे ठिकाणीं रममाण होत असतात त्यांना इहलोकच सुखावह होतो; सर्वदा देहसुखाविषयीं तत्पर रहाणाऱ्या त्यांना परलोक सुखावह होत नाहीं ९०. हे शत्रुनाशका, योगाचें अवलंबन करून, तपश्चर्येविषयीं आसक्ति ठेवून आणि नेहमीं वेदाध्ययन करून जे आपलें देह झिजवितात आणि जितेंद्रिय राहून जे प्राण्याच्या हिंसेपासून निवृत्त झालेले असतात त्यांना परलोकच सुखावह होतो; इहलोक सुखावह होत नाहीं ९१. जे प्रथमतः धर्मानेंच वागत असून धर्मानेंच

लोकः ९२ येषां न विद्या न तपो न दानं न चापि मूढाः प्रजने यतन्ति ।
न चानुगच्छन्ति सुखान्यभाग्यास्तेषामयं चैव परश्च लोकः ९३ सर्वे भव-
न्तस्त्वतिवीर्यसत्त्वा दिव्यौजसः संहननोपपन्नाः लोकादमुष्मादवनिं प्रपन्ना
स्वधीतविद्याः सुरकार्यहेतोः ९४ कृत्वैव कर्माणि महान्ति शूरास्तपोदमा-
चारविहारशीलाः । देवानृषीन्प्रेतगणांश्च सर्वान्संतर्पयित्वा विधिना परेण ९५
स्वर्गं परं पुण्यकृतां निवासं क्रमेण संप्राप्स्यथ कर्मभिः स्वैः । माभूद्वि-
शंका तव कौरवेन्द्र दृष्ट्वात्मनः क्लेशमिमं सुखार्हम् ९६ [७१८०] इति
श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्ड-
यसमास्यापर्वणि मार्कण्डेयसमागमे त्र्यशीत्यधिकशततमोऽध्यायः॥१८३॥
वैशंपायन उवाच ॥ मार्कण्डेयं महात्मानमूचुः पाण्डुसुतास्तदा ।
माहात्म्यं द्विजमुख्यानां श्रोतुमिच्छाम कथ्यताम् १ एवमुक्तः स भग-
वान्मार्कण्डेयो महातपाः । उवाच सुमहातेजाः सर्वशास्त्रविशारदः २

द्रव्य प्राप्त झालें असतानां योग्य कालीं स्त्री प्राप्त करून घेऊन यज्ञयाग करितात त्यांना इहलोक व परलोक सुखावह होतात ९२. ज्यांना विद्या नाहीं, ज्यांना तप नाहीं, जे कधीं दान करीत नाहींत, जे मूढ पुत्रोत्पादनाविषयींही प्रयत्न करीत नाहींत आणि जे भाग्यहीन ऐहिक सुखाचीही परवा बाळगीत नाहींत त्यांना इहलोकही सुखावह होत नाहीं व परलोकही सुखावह होत नाहीं ९३. तुम्ही सर्वही पराकाष्ठेचे सामर्थ्यवान् व उत्साही असून तुमचा प्रताप दिव्य आहे, तुमचें शरीर दृढ आहे, तुम्हीं उत्कृष्ट रीतीनें विद्या संपादन केली आहे आणि देवकार्य करण्याकरितां तुम्ही स्वर्गलोकाहून भूमीवर आलां आहांत ९४. तुम्ही शूर असून स्वभावतःच तपश्चर्या, इंद्रियदमन, सदाचार व सुख ह्यांचें अवलंबन करणार आहांत. तेव्हां मोठमोठीं कर्में करून व उत्कृष्ट प्रकारें सर्व देव, ऋषि आणि पितर ह्यांचें संतर्पण कराल ९५ आणि पुण्यवानांचें उत्कृष्ट निवासस्थान असलेल्या स्वर्गाची तुम्हाला क्रमाक्रमानें आपल्या कर्मांच्या योगानें प्राप्ति होईल. तस्मात्, हे कुरुवंशजश्रेष्ठा, परिणामीं सुखावह होणारें हें आपलें दुःख अवलोकन करून तूं मनामध्यें कांहीं शंका आणूं नकोस ९६. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक महाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं मार्कंडेयसमागमसंबंधी एकशें त्र्यांयशीवा अध्याय समाप्त झाला ॥ १८३ ॥

वैशंपायन सांगतातः—तदनंतर ते पांडव मार्कंडेय महर्षींना म्हणाले " द्विजश्रेष्ठांचें माहात्म्य श्रवण करण्याची आमची इच्छा आहे; आपण तें कथन करा " १. ह्याप्रमाणें त्यांनीं प्रार्थना केली असतां ते महातपस्वी, महातेजस्वी व सर्वशास्त्रपारंगत

मार्कण्डेय उवाच ॥ हैहयानां कुलकरो राजा परपुरंजयः । कुमारो रूपसंपन्नो मृगयां व्यचरद्बली ३ चरमाणस्तु सोऽरण्ये तृणवीरुत्समावृते । कृष्णाजिनोत्तरासंगं ददर्श मुनिमन्तिके ४ स तेन निहतोऽरण्ये मन्यमानेन वै मृगम् । व्यथितः कर्म तत्कृत्वा शोकोपहतचेतनः ५ जगाम हैहयानां वै सकाशं प्रथितात्मनाम् । राज्ञां राजीवनेत्रोऽसौ कुमारः पृथिवीपतिः । तेषां च तद्यथावृत्तं कथयामास वै तदा ६ तं चापि हिंसितं तात मुनिं मूलफलाशिनम् । श्रुत्वा दृष्ट्वा च ते तत्र बभूवुर्दीनमानसाः ७ कस्यायमिति ते सर्वे मार्गमाणास्ततस्ततः । जग्मुश्चारिष्टनेमेऽथ तार्क्ष्यस्याश्रममञ्जसा ८ तेऽभिवाद्य महात्मानं तं मुनिं नियतव्रतम् । तस्थुः सर्वे स तु मुनिस्तेषां पूजामथाहरत् ९ ते तमूचुर्महात्मानं न वयं सत्क्रियां मुने । त्वत्तोऽर्हाः कर्मदोषेण ब्राह्मणो हिंसितो हि नः १० तानब्रवीत्स विप्रर्षिः कथं वो ब्राह्मणो हतः । क चासौ ब्रूत सहिताः पश्यध्वं मे तपोबलम् ११ ते तु तत्सर्वमखिलमाख्यायास्मै यथातथम् । नापश्यंस्तमृषिं तत्र गतासुं ते

भगवान् मार्कंडेय मुनि ह्मणाले २ " हैहयांचा वंश चालविणारा एक परपुरंजय ह्मणून राजा होता. तो बलाढ्य व रूपवान् असे आणि अल्पवयी असतांना त्याला मृगयेचा नाद असे ३. एकदां तो मृगयेच्या उद्देशानें तृण व लता ह्यांनीं व्याप्त असलेल्या अरण्यामध्यें संचार करीत असतांना कृष्णाजिन पांघरून बसलेला एक मुनि समीपच त्याच्या दृष्टीं पडला ४ आणि हा मृग आहे असें समजून त्यानें त्याचा अरण्यामध्यें वध केला; परतु, तें कर्म केल्यानंतर पुढें (आपण ज्याला बाण मारिला तो मृग नसून ऋषि आहे असें आढळून आल्यावर) त्याचें अंतःकरण शोकाकुल होऊन तो दुःखित झाला ५. तदनंतर मनानें उदार असलेल्या हैहयवंशज राजाकडे जाऊन त्या कमलनयन पृथ्वीपति कुमारराजानें घडलेलें इत्थंभूत वर्तमान त्यांना कळविलें ६. तेव्हां, बा युधिष्ठिरा, फलमूलांवर उपजीविका करणाऱ्या त्या मुनींचा वध झालेला ऐकून व पाहून ते हैहयराजेही मनामध्यें खिन्न झाले. ७ नंतर " हा मुनि कोणाचा " ह्मणून ते सर्व राजे ठिकठिकाणीं शोध करूं लागले आणि शोध करितां करितां सहज कश्यपपुत्र अरिष्टनेमींच्या आश्रमाला ते आले ८. आश्रमामध्यें गेल्यानंतर नियमपूर्वक धर्माचरण करणाऱ्या त्या महात्म्या मुनींना अभिवंदन करून ते सर्व उभे राहिले असतां त्या मुनींनींही त्यांचा सत्कार करण्याकरितां पुजेचें साहित्य आणिलें ९. तेव्हां " हे मुने, दुर्दैवानें आमच्या हातून ब्राह्मणाचा वध झाला आहे; ह्मास्तव, आपल्या सत्काराला आह्मी पात्र नाहीं " असें त्यांनीं त्या महात्म्या अरिष्ट-

समागताः १२ अन्वेषमाणाः सव्रीडाः स्वप्नवद्गतचेतनाः । तानब्रवीत्तत्र मुनिस्ताक्ष्यः परपुरञ्जय १३ स्यादयं ब्राह्मणः सोथ युष्माभिर्यो विनाशितः । पुत्रो ह्ययं मम नृपास्तपोबलसमन्वितः १४ ते च दृष्ट्वैव तमृषिं विस्मयं परमं गताः । महदाश्चर्यमिति वै ते ब्रुवाणा महीपते १५ मृतो ह्ययमुपानीतः कथं जीवितमाप्तवान् । किमेतत्तपसो वीर्यं येनायं जीवितः पुनः १६ श्रोतुमिच्छामहे विप्र यदि श्रोतव्यमित्युत १७ स तानुवाच नास्माकं मृत्युः प्रभवते नृपाः । कारणं वः प्रवक्ष्यामि हेतुयोगसमासतः १८ सत्यमेवाभिजानीमो नानृते कुर्महे मनः । स्वधर्ममनुतिष्ठाम- स्तस्मान्मृत्युभयं न नः १९ यद्ब्राह्मणानां कुशलं तदेषां कथयामहे । नैषां

नेमी मुनींना सांगितलें असतां १० " तुमच्या हातून ब्राह्मणाचा वध कसा झाला व तो वध पावलेला ब्राह्मण कोठें आहे हें तुह्मी मला सांगा आणि सर्वजण माझ्या तपाचें सामर्थ्य अवलोकन करा " ह्मणून त्या ब्रह्मर्षीनींही त्यांना प्रश्न केल्यावर ११ तें सर्व वर्तमान जसें घडलें होतें तसें पूर्णपणे त्यांनीं त्या मुनींना कथन केलें आणि नंतर तो मृत झालेला ऋषि पाहण्याकरितां ते एकत्र जुळून त्या ठिकाणीं गेले असतांही तो त्यांच्या दृष्टीं पडला नाहीं १२. तेव्हां त्या मुनीचा शोध करणारे ते हैहय लज्जित होऊन निद्रावस्थेंतील पुरुषाप्रमाणें स्तब्ध झाले असतां, हे शत्रुसमूह जिंकणाऱ्या धर्मराजा, ते कश्यपपुत्र अरिष्टनेमि महर्षि (एका मुनीकडे बोट दाखवून) त्यांना ह्मणाले, " हे परपुरंजया, १३, तुह्मीं ज्यांचा वध केलात तो हा तर ब्राह्मण नसेल नां ? हे नृपहो, हा माझा पुत्र असून तपःसामर्थ्यानें युक्त आहे " १४. असें त्या मुनींनीं सांगितल्यावर त्या ऋषीला अवलोकन करिताक्षणीं त्या हैहयांना पराकाष्ठेचा विस्मय झाला आणि, हे जनमेजय राजा, " मोठेंच आश्चर्य ! मोठेंच आश्चर्य ! " असें ह्मणत ह्मणत त्यांनीं प्रश्न केला १५ कीं, " हे मुने, हा जवळ आणून बसविलेला मुनि मृत झाला असून ह्याला जीवित कसें प्राप्त झालें आणि ज्याच्या योगानें हा पुनरपि जिवंत झाला असें हें तपःसामर्थ्य तरी काय आहे ! १६ हें जर श्रवण करण्यासारिखें असेल तर, हे विप्रा, तें श्रवण करण्याची आमची इच्छा आहे " १७. ह्याप्रमाणें त्यांनीं विचारिलें असतां ते मुनि त्यांना ह्मणाले " हे नृपहो, मृत्यूचें आमच्यापुढें कांहीं चालत नाहीं, ह्याचें कारण काय हें मी तुह्माला थोडक्यांत सहेतुक व उपायसहित सांगतों १८. आह्मी एक सत्यच जाणीत असतों, अनृताकडे मनाची प्रवृत्ति कधींही करीत नसतों आणि स्वधर्माचें अनुष्ठान करीत असतों ह्मणून आह्माला मृत्यूचें भय नाहीं १९. ह्या ब्राह्मणांचें

दुश्चरितं ब्रूमस्तस्मान्मृत्युभयं न नः २० अतिथीनन्नपानेन भृत्यानन्वश-
नेन च । संभोज्य शेषमश्नीमस्तस्मान्मृत्युभयं न नः २१ क्षान्ता दान्ताः
क्षमाशीलास्तीर्थदानपरायणाः । पुण्यदेशनिवासाश्च तस्मान्मृत्युभयं न
नः ॥ तेजस्विदेशवासाच्च तस्मान्मृत्युभयं न नः २२ एतद्वै लेशमात्रं वः
समाख्यातं विमत्सराः । गच्छध्वं सहिताः सर्वे न पापाद्भयमस्ति वः २३
एवमस्त्विति ते सर्वे प्रतिपूज्य महामुनिम् । स्वदेशमगमन्हृष्टा राजानो
भरतर्षभ २४ [७२०४] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैया-
सिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि ब्राह्मणमाहात्म्यकथने
चतुरशीत्यधिकशततमोऽध्यायः ॥ १८४ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ भूय एव महाभाग्यं ब्राह्मणानां निबोध मे । वैन्यो
नामेह राजर्षिरश्वमेधाय दीक्षितः १ तमत्रिर्गन्तुमारेभे वित्तार्थमिति नः
श्रुतम् । भूयोऽर्थं नानुरुध्यत्स धर्मव्यक्तिनिदर्शनात् २ स विचिन्त्य महा-

---

जें चांगलें आचरण असेल तेंच आह्मी सांगत असतों व ह्यांच्या दुराचरणाचा आह्मी कधींही उच्चार करीत नाहीं; ह्मणून आह्माला मृत्यूचें भय नाहीं २०. अन्नपानानें अतिथींचें सतर्पण करून व अनुकूल अन्न पोष्यजनांना घालून शेष उरेल तें आह्मी भक्षण करीत असतों ह्मणून आह्माला मृत्यूचें भय नाहीं २१. आह्मी शांत, जितेंद्रिय, व क्षमाशील असून तीर्थाटनाविषयीं आणि दानाविषयीं तत्पर असतों व पुण्यप्रदेशामध्यें वास्तव्य करीत असतों ह्मणून आह्मांला मृत्यूचें भय नाहीं आणि आमचें वास्तव्य तेजस्वी प्रदेशामध्यें असल्यामुळें आह्माला मृत्यूचें भय नाहीं २२. हें मीं तुह्माला उगीच एक लेशमात्र सांगितलें आहे. तुह्मी आतां मत्सररहित होऊन व सर्व एकत्र जुळून परत जा; तुह्माला पापाचें भय नाहीं" २३. ह्यावर "ठीक आहे" असें ह्मणून त्या सर्वांनीं त्या महर्षींना मान दिला आणि, हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, ते राजे आनंदित होऊन स्वस्थानीं परत गेले २४. ह्याप्रमाणें महामुनि व्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक महाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं ब्राह्मणांचें माहात्म्य कथन करण्याविषयीं एकशें चौऱ्यांशीवा अध्याय समाप्त झाला॥ १८४ ॥

मार्कंडेय ह्मणतातः—(हे धर्मराजा,) तूं आणखीही माझ्यापासून ब्राह्मणांचें महाभाग्य श्रवण कर. वैन्य नांवाच्या एका राजर्षीनें अश्वमेधाची दीक्षा घेतली असतांना १ अत्रिमुनींनीं द्रव्याच्या उद्देशानें त्याच्याकडे जाण्याचें मनामध्यें आणिलें असें आमच्या ऐकण्यांत आहे. द्रव्याच्या योगानें धर्माचा ऱ्हास होतो असें दिसून आल्यामुळें प्रथमतः द्रव्याविषयीं विशेष आसक्त न होतां २ त्या महातेजस्वी मुनींनीं विचार

तेजा वनमेवाभ्यरोचयत् । धर्मपत्नीं समाहूय पुत्रांश्चेदमुवाच ह ३ प्राप्स्यामः फलमत्यन्तं बहुलं निरुपद्रवम् । अरण्यगमनं क्षिप्रं रोचतां वो गुणाधिकम् ४ तं भार्या प्रत्युवाचाथ धर्ममेवानुतन्वती । वैन्यं गत्वा महात्मानमर्थयस्व धनं बहु ५ स ते दास्यति राजर्षिर्यजमानोऽर्थितो धनम् । तत आदाय विप्रर्षे प्रतिगृह्य धनं बहु ६ भृत्यान्सुतान्संविभज्य ततो व्रज यथेप्सितम् । एष वै परमो धर्मो धर्मविद्भिरुदाहृतः ७ अत्रिरुवाच ॥ कथितो मे महाभागे गौतमेन महात्मना । वैन्यो धर्मार्थसंयुक्तः सत्यव्रतसमन्वितः ८ किं त्वस्ति तत्र द्वेष्टारो निवसन्ति हि मे द्विजाः । यथा मे गौतमः प्राह ततो न व्यवसाम्यहम् ९ तत्र स्म वाचं कल्याणीं धर्मकामार्थसंहिताम् । मयोक्तामन्यथा ब्रूयुस्ततस्ते वै निरर्थिकाम् १० गमिष्यामि महाप्राज्ञे रोचते मे वचस्तव । गाश्च मे दास्यते वैन्यः प्रभूतं चार्थसंचयम् ११ एवमुक्त्वा जगामाशु वैन्ययज्ञं महातपाः । गत्वा च यज्ञा-

---

करून वनाचाच आश्रय करणें बरें असें ठरविलें आणि आपल्या धर्मपत्नीला व पुत्रांना हाक मारून ते ह्मणाले ३ " आपण जर अरण्यामध्यें जाऊन राहिलों तर आपणाला अक्षय व अत्यंत मोठें फल (ह्मणजे मोक्ष) प्राप्त होईल. ह्यास्तव, इतर गोष्टींपेक्षां अधिक फायदेशीर जें अरण्यगमन त्याकडे तुमच्या मनाची सत्वर प्रवृत्ति होऊं द्या " ४. ह्यानंतर धर्मविस्तारच करण्याच्या उद्देशानें त्यांची भार्या त्यांना ह्मणाली "महात्म्या वेनपुत्र पृथुराजाकडे जाऊनतुह्मी त्याच्यापाशीं विपुल धन मागा ५. यज्ञयाग करणाऱ्या त्या राजर्षीपाशीं मागितलें असतां तो आपणाला द्रव्य देईल. तेव्हां, हे विप्रर्षे, त्याच्यापासून विपुल द्रव्य घेऊन ६ आपण पोष्यवर्ग व पुत्र ह्यांची व्यवस्था लावा आणि मग आपल्या इच्छेप्रमाणें वनामध्यें जा. हाच उत्कृष्ट धर्म ह्मणून धर्मवेत्त्यांनीं सांगितला आहे " ७. अत्रि ह्मणतातः—हे महाभाग्यवति स्त्रिये, वेनपुत्र पृथुराजा धर्म व अर्थ ह्यांनीं युक्त असून सत्यव्रतसंपन्न आहे असें मला महात्म्या गौतम मुनींनीं सांगितलें आहे ८; परंतु, माझा द्वेष करणारे द्विजही तेथें वास्तव्य करीत आहेत ह्मणून मला गौतममुनींनींच सांगितलें आहे. ह्याकरितां, मी तिकडे जाण्याचें मनामध्यें आणीत नाहीं ९. कारण, त्या ठिकाणीं धर्म, अर्थ आणि काम ह्यांना धरून असलेलें असें उत्कृष्ट भाषण जरी मीं केलें तरी त्याचा अर्थ ते कांहीं तरी विपरीत करतील आणि माझें बोलणें व्यर्थ करून टाकतील १०. परंतु, (असें जरी मला पक्कें ठाऊक आहे तरी ह्या वेळीं) हे महाज्ञानसंपन्न स्त्रिये, तुझेंच बोलणें मला बरें वाटत आहे. ह्यास्तव मी तिकडे जातों; वेनपुत्र मला गाई देईल आणि द्रव्यसंचयही पुष्कळ देईल ११. ह्याप्र-

यतनमत्रिस्तुष्टाव तं नृपम् १२ वाक्यैर्मङ्गलसंयुक्तैः पूजयानोऽब्रवीद्वचः।अत्रि-
रुवाच॥राजन्धन्यस्त्वमीशश्च भुवि त्वं प्रथमो नृपः १३ स्तुवन्ति त्वां मुनि-
गणास्त्वदन्यो नास्ति धर्मवित् १४ तमब्रवीदृषिः क्रुद्धो वचनं वै महातपाः॥
गौतम उवाच ॥ मैवमत्रे पुनर्ब्रूया न ते प्रज्ञा समाहिता १५ अत्र नः
प्रथमः स्थाता महेन्द्रो वै प्रजापतिः। अथात्रिरपि राजेन्द्र गौतमं प्रत्य-
भाषत १६ अयमेव विधाता हि यथैवेन्द्रः प्रजापतिः । त्वमेव मुह्यसे
मोहाच्च प्रज्ञानं तवास्ति ह १७ गौतम उवाच ॥ जानामि नाहं मुह्यामि
त्वमेवात्र विमुह्यसे । स्तोष्यसेऽभ्युदयप्रेप्सुस्तस्य दर्शनसंश्रयात् १८ नवेत्थ
परमं धर्मं न चावैषि प्रयोजनम् । बालस्त्वमसि मूढश्च वृद्धः केनासि
हेतुना १९ विवदन्तौ तथा तौ तु मुनीनां दर्शने स्थितौ । ये तस्य यज्ञे
संवृत्तास्तेऽपृच्छन्त कथं त्विमौ २० प्रवेशः केन दत्तोऽयमुभयोर्वैन्यसंसदि।

-माणें भार्येला सांगून ते महातपस्वी अत्रिमुनि सत्वर पृथुराजाच्या यज्ञामध्यें गेले आणि यज्ञमंडपांत गेल्यावर त्या राजाची स्तुति करूं लागले १२. आशीर्वादयुक्त शब्दांनीं प्रशंसा करीत ते ह्मणाले "हे राजा, तूं धन्य आहेस, तूं सत्ताधारी आहेस आणि ह्या भूतलावर प्रथम तूंच राजा झाला आहेस १३.फार तर काय पण ऋषिगणही तुझी स्तुति करीत आहेत. कारण, तुझ्यावांचून दुसरा धर्मवेत्ता कोणीही नाहीं." १४. ह्याप्रमाणें अत्रिमुनींनीं त्याची स्तुति केली असतां महातपस्वी गौतम ऋषि क्रुद्ध होऊन त्यांना ह्मणाले " हे अत्रे, फिरून असें भाषण करूं नको. तुझी बुद्धि परिपक्व झालेली नाहीं १५. ह्या जगतामध्यें प्रजाधिपति महेंद्रच आमचा मुख्य सत्ताधारी आहे " ह्यावर, हे राजाधिराज युधिष्ठिरा, अत्रिमुनीही गौतममुनीला फिरून ह्मणाले १६ "प्रजाधिपति इंद्राप्रमाणेंच हा राजा सर्व कांहीं करण्यास समर्थ आहे. तुलाच मोहामुळें कांहीं समजेनासें झालें आहे; तुला ज्ञान नाहीं १७. गौतम ह्मणतातः—मला मोह झालेला नाहीं, मी शुद्धीवर आहें. तुला मात्र मोह पडला असून आपला अभ्युदय होण्याच्या इच्छेनें राजाचा परिचय व्हावा एतदर्थ तूं त्याची स्तुति करीत आहेस १८. परम धर्म कोणता हें तुला माहीत नाहीं व त्याचें कारणही तूं जाणीत नाहींस. तूं वास्तविक मूर्ख असून बोलावें कोणतें व न बोलावें कोणतें ह्याचें ज्ञान तुला मुळींच नाहीं. मग कोणत्या कारणामुळें तूं वृद्ध झाला आहेस (हें एक तुलाच ठाऊक). " १९. ह्याप्रमाणें मुनींच्या समोर उभे राहून ते उभयतां वादविवाद करूं लागले असतां त्या राजाच्या यज्ञामध्यें जुळलेले ते मुनि विचारूं लागले " हे येथें कसे आले ? २०, पृथुराजाच्या सभेमध्यें प्रवेश करण्यास

उच्चैः समभिभाषन्तौ केन कार्येण धिष्ठितौ २१ ततः परमधर्मात्मा काश्यपः सर्वधर्मवित्। विवादिनावनुप्राप्तौ तावुभौ प्रत्यवेदयत् २२ यथाब्रवीत्सदस्यांस्तु गौतमो मुनिसत्तमान्। आवयोर्व्याहृतं प्रश्नं शृणुत द्विजसत्तमाः। वैन्यं विधातेत्याहात्रिरत्र नौ संशयो महान् २३ श्रुत्वैव तु महात्मानो मुनयोऽभ्यद्रवन्द्रुतम्। सनत्कुमारं धर्मज्ञं संशयच्छेदनाय वै २४ स च तेषां वचः श्रुत्वा यथातत्त्वं महातपाः। प्रत्युवाचाथ तानेवं धर्मार्थसहितं वचः २५ सनत्कुमार उवाच ॥ ब्रह्म क्षत्रेण सहितं क्षत्रं च ब्रह्मणा सह। संयुक्तौ दहतः शत्रून्वनानीवाग्निमारुतौ २६ राजा वै प्रथितो धर्मः प्रजानां पतिरेव च। स एव शक्रः शुक्रश्च स धाता च बृहस्पतिः २७ प्रजापतिर्विराट् सम्राट् क्षत्रियो भूपतिर्नृपः। य एभिः स्तूयते शब्दैः कस्तं नार्चितुमर्हति २८ पुरायोनिर्युधाजिच्च अभियाभ्युदितो भवः। स्वर्णेता

ह्यांना कोणी परवानगी दिली आणि कोणतें कार्य मनांत धरून हे मोठमोठ्यानें बोलत आहेत ?" २१. तदनंतर परम धर्मनिष्ठ व सर्व धर्मवेत्त्या काश्यपमुनींनीं तेथें येऊन वादविवाद करणारे ते उभयतां कोण आहेत हें सांगितलें २२. तेव्हां तेथील मुनिश्रेष्ठ सभासदांना गौतम ह्मणाला "हे द्विजश्रेष्ठहो, आमचा प्रश्न तुह्मी ऐकून घ्या. वेनपुत्र पृथुराजाला अत्रीनें विधाता ह्मटलें आहे; परंतु, ह्याविषयीं आह्माला मोठा संशय आहे" २३. हा प्रश्न ऐकतांक्षणीं महामति मुनि संशयनिवृत्ति होण्याकरितां धर्मवेत्त्या सनत्कुमारमुनींकडे सत्वर धावले २४. आणि सनत्कुमारमुनींनींही त्यांचें भाषण ऐकून घेऊन धर्मार्थसहित असें उत्तर त्यांना दिलें २५. सनत्कुमार ह्मणतातः— एकमेकाशीं संगत झालेले अग्नि व वायु ज्याप्रमाणे वनें दग्ध करून टाकितात त्याचप्रमाणें क्षत्रियाशीं संगत झालेला ब्राह्मण व ब्राह्मणाशीं संगत झालेला क्षत्रिय असे उभयतां परस्परांशीं संगत झालेले ब्राह्मण व क्षत्रिय शत्रूंना दग्ध करून टाकितात २६. राजाच प्रजांचा अधिपति व धर्मस्थापक ह्मणून प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें रक्षण करणारा इंद्र व नीतिवेत्ता शुक्र राजाच असल्यामुळें वस्तुतः उत्पादकही तोच आहे आणि हितोपदेष्टा बृहस्पतिही तोच आहे २७. क्षत्रियराजा प्रजापालन करीत असल्यामुळें प्रजाधिपति असून विशिष्ट तेजानें युक्त असल्यामुळें विराट् आहे व इतर राजांवरही ह्याचा हुकूम चालत असल्यामुळें हा सम्राट् आहे. ह्या शब्दांनीं ज्याची स्तुति होणें योग्य आहे त्याला कोण बरें मान देणार नाहीं ? २८. धर्माचा प्रवर्तक राजाच असल्यामुळें तोच पुरायोनि ह्मणजे मुख्य कारण आहे. संग्रामामध्यें जय मिळवून लोकांचा

सहजिद्वभ्रुरिति राजाभिधीयते २९ सत्ययोनिः पुराविच्च सत्यधर्मप्रवर्तकः। अधर्मादृषयो भीता बलं क्षत्रे समादधन् ३० आदित्यो दिवि देवेषु तमो नुदति तेजसा । तथैव नृपतिर्भूमावधर्मान्नुदते भृशम् ३१ ततो राज्ञः प्रधानत्वं शास्त्रप्रामाण्यदर्शनात् । उत्तरः सिद्ध्यते पक्षो येन राजेति भाषितम् ३२ मार्कण्डेय उवाच ॥ ततः स राजा संहृष्टः सिद्धे पक्षे महामनाः । तमत्रिमब्रवीत्प्रीतः पूर्वं येनाभिसंस्तुतः ३३ यस्मात्पूर्वं मनुष्येषु ज्यायांसं मामिहाब्रवीः । सर्वदेवैश्च विप्रर्षे संमितं श्रेष्ठमेव च ३४ तस्मात्तेऽहं प्रदास्यामि विविधं वसु भूरि च। दासीसहस्रं श्यामानां सुवस्त्राणामलंकृतम् ३५ दशकोटीर्हिरण्यस्य रुक्मभारांस्तथा दश । एतद्ददामि विप्रर्षे सर्वज्ञस्त्वं मतो हि मे ३६ तदत्रिर्न्यायतः सर्वं प्रतिगृह्याभिसत्कृतः । प्रत्युज्जगाम

उपद्रव नाहींसा करीत असल्यामुळें युधाजित् ही संज्ञा त्यालाच आहे. शत्रूंना सर्व बाजूंनीं घेरून टाकीत असल्यामुळें ह्याला अभिया असें ह्मणतात. उत्कर्षवान् असल्यामुळें ह्याला अभ्युदित असें ह्मणतात, सत्ताधारी असल्यामुळें ह्याला भव असें ह्मणतात, (स्वधर्मापासून प्रजाजनांना भ्रष्ट होऊं देत नसल्यामुळें) ह्यालाच स्वर्णेता ह्मणजे स्वर्गाला नेऊन पोंचविणारा असें ह्मणतात, एकत्र जुळलेल्या शत्रूंचा एकदम पराजय करीत असल्यामुळें ह्याला सहजित् ह्मणतात आणि (इतके गुण अंगीं असल्यामुळें) विष्णुही ह्यालाच ह्मणतात २९. सत्याचा आश्रय व भूतवेत्ता राजाच असून सत्यधर्मप्रवर्तकही राजाच आहे आणि ह्मणूनच अधर्माची भीति बाळगणाऱ्या ऋषींनी क्षत्रियांचें ठिकाणीं आपलें ब्राह्म बल ठेविलें आहे ३०. देवांतील आदित्य ज्याप्रमाणें स्वर्गामध्यें उदय पावून आपल्या तेजानें अंधकार नाहींसा करितो त्याचप्रमाणें भूमीवरील अधर्म राजा अगदीं नाहींसे करून टाकितो ३१. ह्मणूनच शास्त्रप्रमाण असल्यामुळें राजाचें श्रेष्ठत्व सिद्ध होत असून राजाच सर्वोत्कृष्ट असें ज्यानें ह्मटलें आहे त्याचाही पक्ष सिद्ध होतो ३२. मार्कंडेय सांगतात:— तदनंतर (राजाच सर्वोत्कृष्ट हा) पक्ष सिद्ध झाला असतां तो महाशय पृथुराजा आनंदित झाला आणि प्रथमतः ज्यांनीं त्याची स्तुति केली होती त्या अत्रिमुनींवर प्रसन्न होऊन तो त्यांना ह्मणाला ३३ “ हे ब्रह्मर्षे, प्रथमतः ज्याअर्थीं तूं मला मनुष्यांमध्यें येथें उत्कृष्ट ठरवून सर्व देवांशीं तुल्य व श्रेष्ठ ठरविलेंस त्याअर्थीं ३४ मी आपल्याला नानाप्रकारचें विपुल द्रव्य देतों. वयानें तरुण, उत्कृष्ट वस्त्रें परिधान केलेल्या व अलंकार घातलेल्या अशा हजार दासी ३५, दहा कोट मोहोरा आणि दहा ओझीं सुवर्णभूषणें हें द्रव्य मी आपणांला अर्पण करितों; हे विप्रर्षे, आपण मला

तेजस्वी गृहानेव महातपाः ३७ प्रदाय च धनं प्रीतः पुत्रेभ्यः प्रयतात्मवान् । तपः समभिसंधाय वनमेवान्वपद्यत ३८ [७२४२]इति श्रीमहाभारते शत॰ साहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि ब्राह्मणमाहात्म्ये पञ्चाशीत्यधिकशततमोऽध्यायः॥ १८५ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ अत्रैव च सरस्वत्या गीतं परपुरंजय । पृष्टया मुनिना वीर शृणु तार्क्ष्येण धीमता १ तार्क्ष्य उवाच ॥ किं नु श्रेयः पुरुषस्येह भद्रे कथं कुर्वन्न च्यवते स्वधर्मात् । आचक्ष्व मे चारुसर्वाङ्गि कुर्यां त्वया शिष्टो न च्यवेयं स्वधर्मात् २ कथं वाग्निं जुहुयां पूजये वा कस्मिन्काले केन धर्मो न नश्येत् । एतत्सर्वं सुभगे प्रब्रवीहि यथा लोकान्विरजाः संचरेयम् ३ मार्कण्डेय उवाच ॥ एवं पृष्टा प्रीतियुक्तेन तेन शुश्रूषुमीक्ष्योत्तमबुद्धियुक्तम् । तार्क्ष्यं विप्रं धर्मयुक्तं हितं च सरस्वती वाक्यमिदं बभाषे ४ सरस्वत्युवाच ॥ यो ब्रह्म जानाति यथाप्रदेशं स्वाध्या-

---

सर्वज्ञ ह्मणून संमत आहां " ३६. ह्याप्रमाणें राजानें दिलेल्या त्या सर्व द्रव्याचा अत्रिमुनींनीं न्यायानें स्वीकार केला आणि राजाकडून सत्कार झाल्यावर ते महातपस्वी तेजस्वी मुनि आपल्या घराकडेच चालते झाले ३७. घरीं गेल्यावर संतुष्ट झालेल्या त्या अत्रिमुनींनीं तें धन पुत्रांच्या हवालीं केलें आणि त्या जितेंद्रिय मुनींनीं तपश्चर्या करण्याचें मनांत आणून वनाचेंच अवलंबन केलें. ३८. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं ब्राह्मणांच्या माहात्म्याविषयीं एकशें पंच्यांशीवा अध्याय समाप्त झाला ॥ १८५ ॥

मार्कंडेय ह्मणतात:—हे शत्रुसंघविजयी वीरा धर्मराजा, ह्याच ठिकाणीं बुद्धिमान् तार्क्ष्य मुनींनीं प्रश्न केला असतां सरस्वतीनें जें त्यांना सांगितलें तें तूं श्रवण कर १. तार्क्ष्य विचारतात:—हे कल्याणि सरस्वति, इहलोकीं पुरुषाला कल्याणकारक काय आहे आणि काय केलें असतां तो स्वर्गापासून भ्रष्ट होत नाहीं हें तूं मला सांग; ह्मणजे, हे सर्वांगसुंदरि, मी तुझ्या उपदेशाप्रमाणें वागेन आणि स्वधर्मापासून च्युत होणार नाहीं २. अग्नीमध्यें हवन कसें करावें ? पूजन केव्हां करावें ? आणि काय केलें ह्मणजे धर्मभ्रष्ट होत नाहीं तें सर्व मला सांग; ह्मणजे, हे सौभाग्यवति, मी निर्मळ होऊन, उत्कृष्ट लोकामध्यें संचार करीन ३. मार्कंडेय सांगतात:—ह्याप्रमाणें श्रद्धायुक्त असलेल्या त्या तार्क्ष्यमुनींनीं सरस्वतीला प्रश्न केला असतां ते उत्कृष्ट बुद्धिमान् असून ऐकण्याविषयीं उत्सुक आहेत असें आढळून आल्यावर त्या तार्क्ष्य ब्रह्मर्षींशीं सरस्वतीनें धर्मयुक्त व हितकारक असें भाषण केलें ४. सरस्वती सांगते:—विभागांसहवर्तमान जो

शनित्यः शुचिरप्रमत्तः । स वै पारं देवलोकस्य गन्ता सहामरैः प्राप्नुया-
त्प्रीतियोगम् ५ तत्र स्म रम्या विपुला विशोकाः सुपुष्पिताः पुष्करिण्यः
सुपुण्याः। अकर्दमा मीनवत्यः सुतीर्था हिरण्मयैरावृताः पुण्डरीकैः ६
तासां तीरेष्वासते पुण्यभाजो महीयमानाः पृथगप्सरोभिः । सुपु-
ण्यगन्धाभिरलंकृताभिर्हिरण्यवर्णाभिरतीव हृष्टाः ७ परं लोकं गोप्र-
दास्त्वाप्नुवन्ति दत्वानडुहं सूर्यलोकं व्रजन्ति । वासो दत्वा चान्द्रमसं
तु लोकं दत्वा हिरण्यममरत्वमेति ८ धेनुं दत्वा सुप्रभां सुप्र-
दोहां कल्याणवत्सामपलायिनीं च । यावन्ति रोमाणि भवन्ति तस्यास्ता-
वद्वर्षाण्यासते देवलोके ९ अनड्वाहं सुव्रतं यो ददाति हलस्य वोढारमन-
न्तवीर्यम् । धुरन्धरं बलवन्तं युवानं प्राप्नोति लोकान्दशधेनुदस्य १०
ददाति यो वै कपिलां सचैलां कांस्योपदोहां द्रविणैरुत्तरीयैः । तैस्तैर्गुणैः
कामदुहाथ भूत्वा नरं प्रदातारमुपैति सा गौः ११ यावन्ति रोमाणि भवन्ति

वेद जाणितो आणि शुचि व तत्पर राहून जो नित्य वेदाध्ययन करितो तो देवलोकामध्यें जात असून देवांबरोबर त्याची प्रीति जडते ५. त्या ठिकाणीं विस्तीर्ण, दुःखरहित, प्रफुल्लित, फारच पुण्यदायक, उत्कृष्ट जलानें युक्त, मत्स्यांनीं भरलेल्या, कर्दमरहित आणि सुवर्णकमलांनीं आच्छादित अशा रम्य पुष्करिणी आहेत ६. त्यांच्या तीरांवर पुण्यवान् लोक बसलेले असतात व उत्कृष्ट दिव्यगंध, अलंकार आणि सुवर्णासारखी कांति ह्यांनीं युक्त असलेल्या अप्सरा त्यांची वेगवेगळी स्तुति करीत असल्यामुळें ते आनंदित झालेले असतात ७. गोप्रदान करणाऱ्यांना उत्तम लोक प्राप्त होतो, गाडा ओढण्यास समर्थ असलेला बैल दान करून लोक सूर्यलोकीं जातात, वस्त्रदान केल्यानें पुरुषाला चंद्रलोकाची प्राप्ति होते आणि सुवर्णदानानें देवत्व मिळतें ८. निर्मल, विपुल दूध देणारी, वासरूं चांगलें असलेली आणि पळून न जाणारी अशी दुभती गाय दिली असतां तिच्या शरीरावर जितके केंस असतात तितकीं वर्षेपर्यंत ते दान देणारे देवलोकीं वास्तव्य करितात ९. गरीब, बलाढ्य, नांगर ओढणारा, महाधैर्यवान्, धुरीला लागणारा आणि तरुण असा बैल जो देतो त्याला दहा दुभत्या गाई देणाऱ्याचे लोक प्राप्त होतात १०. वस्त्र व कांस्य-धातूचें धार काढण्याचें भांडें ह्यांसहवर्तमान एकवर्णी गाय देऊन वर आणखी द्रव्य देतो त्या दात्या पुरुषाकडे ती गाय त्या अनेक गुणांमुळें कामधेनु बनून येते (सारांश, कांस्यधातूचें दोहनपात्र व वस्त्र ह्यांसहवर्तमान एकवर्णी गाय देऊन नंतर दानसांगतासिद्ध्यर्थ द्रव्य दिलें असतां त्या पुण्याच्या योगानें पुरुषाचे सर्व मनोरथ परिपूर्ण होतात) ११.

धेन्वास्तावत्फलं भवति गोप्रदाने। पुत्रांश्च पौत्रांश्च कुलं च सर्वमासप्तमं तारयते परत्र १२ सदक्षिणां काञ्चनचारुशृङ्गीं कांस्योपदोहां द्रविणैरुत्तरीयैः। धेनुं तिलानां ददतो द्विजाय लोका वसूनां सुलभा भवन्ति १३ स्वकर्मभिर्दानवसंनिरुद्धे तीव्रान्धकारे नरके संपतन्तम्। महार्णवे नौरिव वातयुक्ता दानं गवां तारयते परत्र १४ यो ब्राह्मदेया तु ददाति कन्या भूमिप्रदानं च करोति विप्रे। ददाति दानं विधिना च यश्च स लोकमाप्नोति पुरन्दरस्य १५ यः सप्त वर्षाणि जुहोति तार्क्ष्य हव्यं त्वग्नौ नियतः साधुशीलः। सप्तावरान्सप्तपूर्वान्पुनाति पितामहानात्मना कर्मभिः स्वैः १६ तार्क्ष्य उवाच॥ किमग्निहोत्रस्य व्रतं पुराणमाचक्ष्व मे पृच्छतश्चानुरूपं। त्वयानुशिष्टोहमिहाद्य विद्यां यदग्निहोत्रस्य व्रतं पुराणम् १७ सरस्वत्युवाच॥ न वाशुचिर्नाप्यनिर्णिक्तपाणिर्नाब्रह्मविज्जुहुयान्नाविपश्चित्। बुभुक्षवः शुचिकामा हि देवा नाश्रद्दधानाद्धि हविर्जुषन्ति १८

गाईच्या शरीरावर जितके रोम असतात तितकें फल गोप्रदान केलें असतां प्राप्त होतें (अर्थात् तितकीं वर्षे गोप्रदान करणाऱ्याचें स्वर्गामध्यें वास्तव्य होतें) आणि पुत्रपौत्र ह्यांचाच नव्हे; परंतु, सात पिढ्यांपर्यंत ती गाय परलोकीं कुलाचा उद्धार करिते १२. दक्षिणा, सुवर्णाचीं सुंदर शृंगें, काशाचें दोहनपात्र आणि उत्तम द्रव्य ह्यांसहवर्तमान जे तिलधेनु ब्राह्मणाला देतात त्यांना अष्टवसूंचे लोक सहज मिळतात १३. कामक्रोधरूप राक्षसांनीं व्याप्त व प्रचंड अंधकारानें युक्त अशा नरकामध्यें आपल्या पापकर्मांच्या योगानें पडत असलेल्या पुरुषाला महासागरामध्यें बुडून जाणाऱ्याला ज्याप्रमाणें अनुकूल वातयुक्त नौका तारिते त्याप्रमाणें इहलोकानंतर गोप्रदान त्याला तारितें १४. ब्राह्मविवाहविधीनें जो ब्राह्मणाला कन्यादान करितो, जो भूमिदान देतो आणि इतरही दान जो विधिपूर्वक करितो त्याला इंद्रलोक प्राप्त होतो १५. हे तार्क्ष्य मुने, जो सुशील व पवित्र राहून सात वर्षे अग्नीमध्यें होम देतो तो आपल्या पुण्यकर्मांच्या योगानें आपल्याबरोबर पुढल्या व मागल्या सात सात पुरुषांचा उद्धार करितो १६. तार्क्ष्यमुनि प्रश्न करितातः—हे योग्य सरस्वति, अग्निहोत्रसंबंधीं वेदोक्त नियम मी विचारीत आहे तरी तें तूं मला कथन कर. तूं मला उपदेश केलास म्हणजे अग्निहोत्रसंबंधीं वेदोक्त नियम काय आहेत हें मला आज समजूं लागेल १७. सरस्वती म्हणतेः— अशुचि, हात न धुतलेल्या, वेद न जाणणाऱ्या आणि शास्त्रानभिज्ञ पुरुषानें होम देऊं नये. बुभुक्षु आणि पवित्रेच्छु देव श्रद्धारहित पुरुषापासून हविर्द्रव्याचा स्वीकार करीत नाहींत (ह्याकरितां श्रद्धारहित पुरुषही होमाला उपयोगी नाहीं) १८.

चाश्रोत्रियं देवहव्ये नियुंज्यान्मोघं पुरा सिञ्चति तादृशो हि । अपूर्वमश्रोत्रियमाह तार्क्ष्य न वै तादृग्जुहुयादग्निहोत्रम् १९ कृशाश्च ये जुह्वति श्रद्दधानाः सत्यव्रता हुतशिष्टाशिनश्च । गवां लोकं प्राप्य ते पुण्यगन्धं पश्यन्ति देवं परमं चापि सत्यम् २० तार्क्ष्य उवाच ॥ क्षेत्रज्ञभूतां परलोकभावे कर्मोदये बुद्धिमति प्रविष्टाम् । प्रज्ञां च देवीं सुभगे विमृश्य पृच्छामि त्वां का ह्यसि चारुरूपे २१ सरस्वत्युवाच ॥ अग्निहोत्रादहमभ्यागतास्मि विप्रर्षभाणां संशयच्छेदनाय । त्वत्संयोगादहमेतमब्रुवं भावे स्थिता तथ्यमर्थं यथावत् २२ तार्क्ष्य उवाच ॥ न हि त्वया सदृशी कांचिदस्ति विभ्राजसे ह्यतिमात्रं यथा श्रीः । रूपं च ते दिव्यमनंतकान्ति प्रज्ञां च देवीं सुभगे बिभर्षि २३ सरस्वत्युवाच ॥ श्रेष्ठानि यानि द्विपदां वरिष्ठ यज्ञेषु विद्वन्नुपपादयन्ति । तैरेव चाहं संप्रवृद्धा

देवांच्या उद्देशानें अग्नीमध्यें हवन करावयाचें असल्यास अश्रोत्रियं[1] ब्राह्मणाची योजना ऋत्विजांमध्यें करूं नये. कारण, तशा प्रकारच्या ब्राह्मणानें केलेलें हवन व्यर्थ होतें. हे तार्क्ष्यमुने, उत्पत्ति, संस्कार व विद्या हीं ज्याचीं विदित नाहींत त्याला श्रुतीनें अश्रोत्रिय असें ठरविलें आहे. तस्मात्, तशा ब्राह्मणानें अग्नीमध्यें हवन करूं नये १९. गर्वरहित, श्रद्धावान्, सत्यनिष्ठ व हुतशेष भक्षण करणारे असे जे हवन करितात त्यांना उत्कृष्ट कीर्तीनें युक्त असा गोलोक प्राप्त होतो आणि (परंपरेनें) त्यांना सत्यस्वरूप परमदेवाचाही (ह्मणजे ब्रह्माचाही) साक्षात्कार होतो २०. तार्क्ष्यमुनि ह्मणतातः—हे भाग्यवति, तूं ज्ञानकांड व कर्मकांड ह्याविषयीं अभिज्ञ, बुद्धिस्वरूप, मूर्तिमंत प्रज्ञा, स्वयंप्रकाश आणि परमात्मरूप आहेस असें मला वाटत असून मी तुला प्रश्न करीत आहें. तर हे मनोहर रूपसंपन्न देवि, तूं कोण आहेस हें मला सांग २१. सरस्वति सांगतेः—अग्निहोत्रादिरूप सत्कर्मांपासून मी आविर्भूत झालें आहें आपण तुझ्यासमीप येऊन विप्रश्रेष्ठांच्या संशयनिवृत्तीकरितां मीं हें योग्य रीतीनें तथ्य भाषण केलें आहे व श्रद्धेचें अवलंबन करणारी आहें (तस्मात्, श्रद्धावान् पुरुषाला अग्निहोत्रादि कर्मांच्या योगानें देवतांची प्रीति संपादन होऊन कर्म, उपासना व ज्ञान ह्यांचीं फलें प्राप्त होतात असें तूं समज) २२. तार्क्ष्य मुनि ह्मणतातः—हे कल्याणि, तुझ्यासारिखी कोणीही नाहीं लक्ष्मीप्रमाणें अतिशयच झळकत आहेस, तुझें स्वरूप दिव्य असून अपरिमित कांतीनें युक्त आहेस आणि उज्वल बुद्धीचें तूं अवलंबन केलें आहेस २३. सरस्वति ह्मणतेः—

---

[1] जन्मना जायते शूद्रः संस्कारैर्द्विज उच्यते । विद्यया याति विप्रत्वं त्रिभिः श्रोत्रिय उच्यते ॥

भवामि चाप्यायिता रूपवती च विप्र २४ यच्चापि द्रव्यमुपयुज्यते ह वानस्पत्यमायसं पार्थिवं वा । दिव्येन रूपेण च प्रज्ञया च तेनैव सिद्धिरिति विद्धि विद्वन् २५ तार्क्ष्य उवाच ॥ इदं श्रेयः परमं मन्यमाना व्यायच्छन्ते मुनयः संप्रतीताः । आचक्ष्व मे तं परमं विशोकं मोक्षं परं यं प्रविशन्ति धीराः २६ साङ्ख्या योगाः परमं यं विदन्ति परं पुराणं तमहं न वेद्मि २७ सरस्वत्युवाच ॥ तं वै परं वेदविदः प्रपन्नाः परं परेभ्यः प्रथितं पुराणम् । स्वाध्यायवन्तो व्रतपुण्ययोगैस्तपोधना वीतशोका विमुक्ताः २८ तस्याथ मध्ये वेतसः पुण्यगन्धः सहस्रशाखो विपुलो विभाति । तस्य मूलात्सरितः प्रस्रवन्ति मधूदकप्रस्रवणाः सुपुण्याः २९ शाखां शाखां महानद्यः संयान्ति सिकताशयाः । धानापूपा मांसशाकाः

हे ज्ञानसंपन्न पुरुषश्रेष्ठा, यज्ञामध्यें जीं उत्कृष्ट अनुष्ठानें ऋत्विज करीत असतात त्यांच्याच योगानें मी वृद्धिंगत होत असतें आणि हे विप्र, त्यांच्याच योगानें मी परिपूर्ण व रूपवती होत असतें २४. हे ज्ञानसंपन्न, (समिधा वगैरे) वृक्षसंबंधीं, (सुवर्णशकलें वगैरे) धातुसंबंधीं आणि (व्रीही वगैरे) पृथ्वीसंबंधीं जें द्रव्य यज्ञामध्यें खर्च होतें त्याच्याही योगानें मी वृद्धिंगत, परिपूर्ण व रूपवती होत असून माझ्या दिव्य रूपाच्या योगानें व बुद्धीच्या योगानें तुझीच सिद्धि होत असते हें तूं समजून ठेव २५. तार्क्ष्यमुनि ह्मणतातः— हेंच उत्कृष्ट श्रेय असें समजून विश्वासयुक्त मुनि इंद्रियादिकांचा निग्रह करीत असतात. तर शोकरहित आणि सर्वोत्कृष्ट असा जो परम मोक्ष ज्ञानवानांना प्राप्त होत असतो तो तूं मला कथन कर २६. कारण, ज्ञानी आणि कर्मयोगसंपन्न पुरुषांना ज्या परमात्म्याचें ज्ञान होतें त्या पुरातन व श्रेष्ठ परमात्म्याचें मला ज्ञान नाहीं २७. सरस्वति सांगतेः— विराट्प्रभृति सोपाधिक ब्रह्माहून श्रेष्ठ, पुरातन आणि सच्चिदानंदरूपानें सर्वत्र प्रसिद्ध असा जो परमात्मा त्याला अहिंसादि व्रतें, जपादि पुण्यें आणि चित्तवृत्तिनिरोधरूप योग ह्यांच्या योगानें संसारांतून मुक्त होऊन जे शोकरहित झालेले आहेत, स्वधर्माचरण हेंच ज्यांचें धन आहे आणि वेदाध्ययन करीत असून जे वेदवेत्ते आहेत, तेच पुरातन, सच्चिदानंदरूपानें सर्वत्र प्रसिद्ध व विराट्प्रभृति सोपाधिकब्रह्माहून श्रेष्ठ अशा त्या परमात्म्याशीं मिळून जातात २८. त्या चिदात्म्याचे ठिकाणीं ब्रह्मांडरूप वेतस वृक्ष आहे. गंधादि विषय हाच त्याचा सुगंध आहे, असंख्य भोगस्थानें ह्याच त्याच्या हजारों शाखा आहेत, तो अमर्यादित भासत आहे, त्याच्या अविद्यारूप मूळापासून भोगवासनारूप नद्या वहात आहेत, भोगजन्य सुखरूप मधुर जलानें त्या युक्त आहेत

सदा पायसकर्दमाः ३० यस्मिन्नग्निमुखा देवाः सेन्द्राः सहमरुद्गणाः ।
ईजिरे क्रतुभिः श्रेष्ठैस्तत्पदं परमं मम ३१ [७२७३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्या मारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि सरस्वतीतार्क्ष्यसंवादे षडशीत्यधिकशततमोऽध्यायः॥ १८६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततः स पाण्डवो विप्रं मार्कण्डेयमुवाच ह । कथयस्वेति चरितं मनोर्वैवस्वतस्य च १ मार्कण्डेय उवाच ॥ विवस्वतः सुतो राजन्महर्षिः सुप्रतापवान् । बभूव नरशार्दूल प्रजापतिसमद्युतिः २ ओजसा तेजसा लक्ष्म्या तपसा च विशेषतः । अतिचक्राम पितरं मनुः स्वं च पितामहम् ३ ऊर्ध्वबाहुर्विशालायां बदर्यां स नराधिप । एकपाद-

---

आणि अतिशय स्पृहणीय आहेत २९. ह्या वासनारूप महानद्या वाळूच्या कणांप्रमाण एकमेकांपासून विलग असलेल्या पुत्रादिकांच्या आश्रयानें रहात असतात; आपल्या प्रवाहामध्यें पडलेल्या पुरुषाला त्या, त्या त्या भोगस्थानाकडे नेऊन पोंचवीत असतात; ह्यांतील विषयसुखरूप जल विजातीय कार्य उत्पन्न करीत असल्यामुळें आणि अनारशाप्रमाणें अनेक छिद्ररूप दोषांनीं तें युक्त असल्यामुळें ह्या धाना व अपूप ह्याप्रमाणें असून ह्यांतील विषयसुखरूप जल मांसासारिखें हिंसेनेंच लभ्य होणारें असल्यामुळें व भाजीपाल्यामुळें त्यांत सार कमी असल्यामुळें ह्यांना मांसशकलांची उपमा योग्य आहे आणि त्याचप्रमाणें ह्यांत असलेलें तें विषयसुखरूप जल दुधाप्रमाणें सकृद्दर्शनीं मधुर असून पचनसमयीं ह्मणजे परिणामीं फारच जड असल्यामुळें व कर्दमाप्रमाणें चित्तरूप वस्त्राला तें मलिन करणारें असल्यामुळें ह्यांना सर्वदा पायस व कर्दम ह्यांचीच उपमा योग्य आहे ३०. (अंतःकरणशुद्धिद्वारा परंपरेनें) ज्याची प्राप्ति होण्याकरितां मरुद्गण व इंद्र ह्यांसहवर्तमान अग्निप्रभृति देवांनीं श्रेष्ठ क्रतु केले तेंच मन विद्यारूप सरस्वतीचें मुख्य स्थान होय ३१. ह्याप्रमाणें महामुनि व्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं सरस्वति आणि तार्क्ष्यमुनि ह्यांच्या संवादाविषयीं एकशें श्यायशींवा अध्याय समाप्त झाला ॥ १८६ ॥

वैशंपायन सांगतातः—तदनंतर "वैवस्वतमनूचें चरित्र कथन करा" ह्मणून विप्र मार्कंडेय मुनींना पंडुपुत्र युधिष्ठिरानें सांगितलें असतां १ मार्कंडेयमुनि ह्मणालेः—हे पुरुषश्रेष्ठा राजा, विवस्वानाला महाप्रतापी व ब्रह्मदेवासारिखा तेजस्वी असा एक महर्षि पुत्र झाला २. तो मनुसंज्ञक पुत्र बल, तेज, वैभव आणि तप ह्या सर्व गोष्टींनीं आपल्या पित्यापेक्षां व पितामहापेक्षां अधिक झाला ३. हे प्रजाधिपते युधिष्ठिरा, विशाल बदरिकाश्रमामध्यें हात वर करून व एका पायावर तिष्ठत राहून त्यानें फार

स्थितस्तीव्रं चकार सुमहत्तपः ४ अवाक्शिरास्तथा चापि नेत्रैरनिमि-
षैर्दृढम् । सोतप्यत तपो घोरं वर्षाणामयुतं तदा ५ तं कदाचित्तपस्यन्त-
मार्द्रचीरजटाधरम् । चीरिणीतीरमागम्य मत्स्यो वचनमब्रवीत् ६ भगव-
न्क्षुद्रमत्स्योस्मि बलवद्भ्यो भयं मम । मत्स्येभ्यो हि ततो मां त्वं त्रातु-
मर्हसि सुव्रत ७ दुर्बलं बलवन्तो हि मत्स्या मत्स्यं विशेषतः । आस्व-
दन्ति सदा वृत्तिर्विहिता नः सनातनी ८ तस्माद्भयौघान्महतो मज्जन्तं
मां विशेषतः । त्रातुमर्हसि कर्तास्मि कृते प्रतिकृतं तव ९ स मत्स्यवचनं
श्रुत्वा कृपयाभिपरिप्लुतः । मनुर्वैवस्वतो गृह्णात्तं मत्स्यं पाणिना स्वयम् १०
उदकान्तमुपानीय मत्स्यं वैवस्वतो मनुः । अलिञ्जरे प्राक्षिपत्तं चन्द्रांशु-
सदृशप्रभे ११ स तत्र ववृधे राजन्मत्स्यः परमसत्कृतः । पुत्रवत्स्वीकरो-
त्तस्मै मनुर्भावं विशेषतः १२ अथ कालेन महता स मत्स्यः सुमहानभूत् ।
अलिञ्जरे यथा चैव नासौ समभवत्किल १३ अथ मत्स्यो मनुं दृष्ट्वा पुन-
रेवाभ्यभाषत । भगवन्साधु मेद्यान्यत्स्थानं संप्रतिपादय १४ उद्धृत्या-

---

माठें तीव्र तप केलें ४ आणि त्याचप्रमाणें नेत्रांचें पातें न लववितां मस्तक अधोभागीं करूनही त्यानें दहा हजार वर्षें अचल व घोर तपश्चर्या केली ५. एकदां चीरिणी नदीचे तीरीं तो मनु आर्द्र वल्कलें व जटा धारण करून तपश्चर्या करीत असला असतांना एक मत्स्य त्याला ह्मणाला ६ "हे भगवन्, मी क्षुद्र मत्स्य आहें व बलाढ्य मत्स्यांपासून मला भय आहे. तेव्हा, हे सदाचरणसंपन्न मुने, इतर मत्स्यांपासून आपण माझें रक्षण करा ७. कारण, बलाढ्य मत्स्य विशेषतः दुर्बल मत्स्याला खात असतात आणि हीच आमची उपजीविका पुरातन कालापासून सर्वदां चालत आलेली आहे ८. तस्मात्, प्रचंड भयप्रवाहामध्यें विशेषतः बुडून जात असलेल्या माझें आपण रक्षण करा; आपण माझ्यावर उपकार केला असता मी प्रत्युपकार करीन" ९. ह्याप्रमाणें मत्स्याचें भाषण श्रवण केल्यावर वैवस्वतमुनींचें अंतःकरण कृपेनें सद्गदित झालें आणि त्यांनीं स्वतः आपल्या हातानें त्या मत्स्याला घेतलें १०. नंतर लगेच उदकासमीप आणून चंद्रकिरणांप्रमाणें स्वच्छ असलेल्या एका डेऱ्यामध्यें मनूंनीं त्या मत्स्याला टाकिलें ११. हे राजा, मोठ्या सत्कारानें राहिलेला तो मत्स्य त्या डेऱ्यामध्यें वृद्धिंगत होऊं लागला व मनूंनींही पुत्राप्रमाणें त्याचे ठिकाणीं प्रेम केलें १२. नंतर बराच मोठा काल लोटल्यावर तो मत्स्य त्या डेऱ्यामध्यें न मावण्याइतका मोठा झाला १३. तेव्हां मनूंना अवलोकन करून तो मत्स्य ह्मणाला "हे भगवन्, आपण आज मला दुसऱ्या स्थलीं नेऊन ठेवाल तर फार चांगलें होईल" १४. ह्याप्रमाणें मत्स्यानें सांगितलें

लिञ्जरात्तस्मात्ततः स भगवान्मनुः । तं मत्स्यमनयद्वापीं महतीं स मनु-
स्तदा १५ तत्र तं प्राक्षिपच्चापि मनुः परपुरंजय । अथावर्धत मत्स्यः स
पुनर्वर्षगणान्बहून् १६ द्वियोजनायता वापी विस्तृता चापि योजनम् ।
तस्यां नासौ समभवन्मत्स्यो राजीवलोचनः १७ विचेष्टितुं च कौन्तेय
मत्स्यो वाप्यां विशाम्पते । मनुं मत्स्यस्ततो दृष्ट्वा पुनरेवाभ्यभाषत १८ नय
मां भगवन्साधो समुद्रमहिषीं प्रियाम् । गङ्गां तत्र निवत्स्यामि यथा
वा तात मन्यसे १९ निदेशे हि मया तुभ्यं स्थातव्यमनसूयता ।
वृद्धिर्हि परमा प्राप्ता त्वत्कृते हि मयानघ २० एवमुक्तो मनु-
र्मत्स्यमनयद्भगवान्वशी । नदीं गङ्गां तत्र चैनं स्वयं प्राक्षिपदच्युतः २१
स तत्र ववृधे मत्स्यः किंचित्कालमरिन्दम । ततः पुनर्मनुं दृष्ट्वा मत्स्यो
वचनमब्रवीत् २२ गङ्गायां हि न शक्नोमि बृहत्त्वाच्चेष्टितुं प्रभो । समुद्रं
नय मामाशु प्रसीद भगवन्निति २३ उद्धृत्य गङ्गासलिलात्ततो मत्स्यं
मनुः स्वयम् । समुद्रमनयत्पार्थ तत्र चैनमवासृजत् २४ सुमहानपि

असतां त्या भगवान् मनूंनीं त्या मत्स्याला काढून एका प्रचंड वापीपाशीं आणिलें १५ आणि, हे शत्रुसेनाविजयी युधिष्ठिरा, त्या ठिकाणीं मनूंनीं त्याला टाकि-ल्यावर तो मत्स्यही पुष्कळ संवत्सरसमूहपर्यंत तेथें वाढत राहिला १६ व शेवटीं ती वापी दोन योजनें लांब व एक योजन रुंद असूनही तो कमलनयन मत्स्य तिच्यामध्यें मावेनासा झाला १७ आणि, हे प्रजाधिपते कुंतीपुत्रा, त्या वापीमध्यें त्याला हाल-चालही करितां येईनाशीं झाली. तेव्हां मनूंना अवलोकन करून मत्स्य पुनरपि ह्मणाला १८ " हे भगवन्, समुद्राची प्रिय पत्नी जी गंगा तिच्याकडे आपण मला न्या; हे सज्जन, मी तेथें वास्तव्य करीन. वा मुने, मग आपला काय विचार असेल तो खरा १९. हे निष्पाप मुने, मत्सरबुद्धि मनामध्यें न आणितां आपल्या आज्ञेमध्यें मला राहावयाचें आहे व आपल्याचमुळें मला पराकाष्ठेची वाढ प्राप्त झाली आहे " २०. ह्याप्रमाणें मत्स्यानें सांगितलें असतां जितेंद्रिय भगवान् मनूंनीं गंगेपाशीं त्या मत्स्याला आणिलें आणि धर्मापासून कधींही च्युत न होण्याऱ्या त्या मनूंनीं त्याला तेथें टाकिलें २१. थोडक्याच वेळामध्यें तेथेंही तो मत्स्य वृद्धि पावला आणि पुनरपि मनूंना अवलोकन करून ह्मणाला २२ "हे प्रभो, मोठेपणामुळें गंगेमध्यें मला हालचाल करितां येईनाशी झाली आहे. ह्याकरितां, हे भगवन्, आपण कृपा करा आणि मला सत्वर समुद्रामध्यें न्या" २३. ह्यानंतर मनूंनीं स्वतः त्या मत्स्याला गंगाजलांतून बाहेर काढून समुद्रासमीप नेलें आणि, हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, त्या ठिकाणीं त्याला टाकिलें २४. तो मत्स्य जरी

मत्स्यस्तु स मनोर्नयतस्तदा । आसीद्यथेष्टहार्यश्च स्पर्शगन्धसुखस्य वै २५
यदा समुद्रे प्रक्षिप्तः स मत्स्यो मनुना तदा । तत एनमिदं वाक्यं स्मय-
मान इवाब्रवीत् २६ भगवन्हि कृता रक्षा त्वया सर्वा विशेषतः । प्राप्त-
कालं तु यत्कार्यं त्वया तच्छ्रूयतां मम २७ अचिराद्भगवन्भौममिदं
स्थावरजङ्गमम् । सर्वमेव महाभाग प्रलयं वै गमिष्यति २८ संप्रक्षालन-
कालोयं लोकानां समुपस्थितः । तस्मात्त्वां बोधयाम्यद्य यत्ते हितमनु-
त्तमम् २९ त्रसानां स्थावराणां च यच्चेङ्गं यच्च नेङ्गति । तस्य सर्वस्य
संप्राप्तः कालः परमदारुणः ३० नौश्च कारयितव्या ते दृढा युक्तवटा-
रका । तत्र सप्तर्षिभिः सार्धमारुहेथा महामुने ३१ बीजानि चैव सर्वाणि
यथोक्तानि द्विजैः पुरा । तस्यामारोहयेर्नावि सुसंगुप्तानि भागशः ३२
नौस्थश्च मां प्रतीक्षेथास्ततो मुनिजनप्रिय । आगमिष्याम्यहं शृङ्गी विज्ञे-
यस्तेन तापस ३३ एवमेतत्त्वया कार्यमापृष्टोसि व्रजाम्यहम् । ता न
शक्या महत्यो वै आपस्तर्तुं मया विना । नाभिशङ्क्यमिदं चापि वचनं

फारच मोठा होता तरी मनु नेऊं लागला असतां तो पाहिजे तिकडे नेण्यासारिखा होत असे आणि त्याच्या स्पर्शजन्य सुवासापासून मनूंना सुख होत असे २५. असो. ज्या वेळीं मनूंनीं तो मत्स्य समुद्रांत टाकिला तेव्हां हंसत हंसतच कीं काय तो मत्स्य त्यांना असें ह्मणाला २६ " हे भगवन्, विशेषतः आपण माझें सर्व प्रकारचें रक्षण केलें; आतां ह्या वेळेस आपण काय केलें पाहिजे तें मजपासून श्रवण करा २७. हे भगवन्, हे महाभाग्यवान्, हें सर्वही चराचर जगत् थोडक्याच वेळांत नाश पावेल २८. हा लोकांचा प्रलयकाल प्राप्त झाला आहे. तस्मात्, आपल्या उत्कृष्ट हिताची गोष्ट मी आपणाला आज सांगत आहें २९. जंगम व स्थावर ह्यांमध्यें हें जें कांहीं चल आहे आणि जें कांहीं अचल आहे त्या सर्वांचा भयंकर नाश होण्याचीच वेळ आलेली आहे ३०. ह्यास्तव, दोर लाविलेली अशी एक बळकट नौका आपण तयार करा आणि, हे महामुने, आपण सप्तर्षींसहवर्तमान त्या नौकेवर आरोहण करा ३१. पूर्वी द्विजांनीं सांगितल्याप्रमाणें सर्व बीजें त्या नावेवर आपण वेगवेगळीं सुरक्षित ठेवा ३२ आणि, हे मुनिजनप्रिय, नौकेवर आरूढ होऊन आपण माझी वाट पहात बसा, मी शृंग धारण करून येईन आणि, हे तपस्वी मुने, त्या शृंगामुळेंच मी आपल्या समजण्यांत येईन " ३३. ह्याप्रमाणें हें कृत्य आपण करावें. मीं आपला निरोप घेतला आहे; आतां मी जातों. तें प्रचंड उदक माझ्या वांचून आपणांला तरून जातां येणें अशक्य आहे. हे प्रभो, आपण ह्या माझ्या सांगण्याबद्दल कसलाही संशय मना-

मे त्वया विभो ३४ एवं करिष्य इति तं स मत्स्यं प्रत्यभाषत । जग्म-
तुश्च यथाकाममनुज्ञाप्य परस्परम् ३५ ततो मनुर्महाराज यथोक्तं मत्स्य-
केन ह । बीजान्यादाय सर्वाणि सागरं पुप्लुवे तदा ३६ नौकया शुभया
वीर महोर्मिणमरिंदम । चिन्तयामास च मनुस्तं मत्स्यं पृथिवीपते ३७
स च तच्चिन्तितं ज्ञात्वा मत्स्यः परपुरञ्जय । शृङ्गी तत्राजगामाशु तदा
भरतसत्तम ३८ तं दृष्ट्वा मनुजव्याघ्रमनुर्मत्स्यं जलार्णवे । शृङ्गिणं तं यथो-
क्तेन रूपेणाद्रिमिवोच्छ्रितम् ३९ वटारकमयं पाशमथ मत्स्यस्य मूर्धनि।
मनुर्मनुजशार्दूल तस्मिञ्छृंगे न्यवेशयत् ४० संयतस्तेन पाशेन मत्स्यः पर-
पुरंजय । वेगेन महता नावं प्राकर्षल्लवणाम्भसि ४१ स च तांस्तारयन्नावा
समुद्रं मनुजेश्वर । नृत्यमानमिवोर्मीभिर्गर्जमानमिवाम्भसा ४२ क्षोभ्य-
माणा महावातैः सा नौस्तस्मिन्महोदधौ । घूर्णते चपलेव स्त्री मत्ता पर-
पुरञ्जय ४३ नैव भूमिर्न च दिशः प्रदिशो वा चकाशिरे । सर्वमाम्भस-

---

मध्यें आणूं नका" ३४. ह्याप्रमाणें मत्स्यानें सांगितलें असतां "असें करीन" ह्मणून त्या मनूंनींही त्या मत्स्याला पुनरपि सांगितलें व एकमेकाला अनुज्ञा देऊन ते उभयतां इच्छेप्रमाणें चालते झाले ३५. तदनंतर, हे महाराजा, मत्स्यानें सांगितल्याप्रमाणें सर्व बीजें घेऊन शुभ नौकेच्या योगानें मोठमोठ्या लाटांनीं युक्त असलेल्या सागरावर त मनु तरून राहिले आणि, हे शत्रुदमना वीरभूपते, त्या मत्स्यासंबधानें ते मनु मनामध्यें विचार करूं लागले ३६,३७. हे शत्रुसमूहविजयी भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, त्यांचें तें मनोगत जाणून तो मत्स्य शृंगी बनून सत्वर तेथें आला ३८. तेव्हां हे पुरुषश्रेष्ठा, सांगितल्याप्रमाणें रूप धारण केल्यामुळें पर्वताप्रमाणें उंच असलेल्या त्या शृंगयुक्त मत्स्याला मनूंनीं सागरामध्यें अवलोकन केलें ३९ आणि नंतर, हे पुरुषश्रेष्ठा युधिष्ठिरा, मत्स्याच्या मस्तकीं असलेल्या त्या शृंगाला रज्जुमय पाश त्या मनूंनीं अडकवून दिला ४०. हे शत्रुसमूहविजयी युधिष्ठिरा, त्या पाशानें बद्ध होतांक्षणीं त्या मत्स्यानें मोठ्या वेगानें ती नाव समुद्रामध्यें ओढून नेली ४१ आणि, हे प्रजाधिपते, उदकाच्या योगानें जशी कांहीं गर्जनाच करीत असलेल्या आणि लाटांच्या योगानें जसें कांहीं नृत्यच करीत असलेल्या त्या समुद्रांतून तो मत्स्य नावेच्या योगानें त्यांना तारूं लागला ४२. हे शत्रुसमूहविजयी युधिष्ठिरा, प्रचंड वातांच्या योगानें त्या महासागरामध्यें ती नाव क्षुब्ध होऊं लागली असतां मत्त झालेल्या चंचल स्त्रीप्रमाणें गरगर फिरूं लागली ४३. भूमि, दिशा अथवा विदिशा ह्यापैकीं कशांचाच उमज पडेनासा झाला आणि, हे पुरुषश्रेष्ठा धर्मराजा, अंतरिक्ष व स्वर्ग हेंही सर्व जलमयच

मेवासीत्सर्वं यौध्य नरपुङ्गव ४४ एवंभूते तदा लोके संकुले भरतर्षभ ।
अदृश्यन्त सप्तर्षयो मनुर्मत्स्यस्तथैव च ४५ एवं बहून्वर्षगणांस्तां नावं
सोथ मत्स्यकः । चकर्षातन्द्रितो राजंस्तस्मिन्सलिलसंचये ४६ ततो
हिमवतः शृंङ्गं यत्परं भरतर्षभ । तत्राकर्षत्ततो नावं स मत्स्यः कुरुन-
न्दन ४७ अथाब्रवीत्तदा मत्स्यस्तानृषीन्प्रहसञ्छनैः । अस्मिन्हिमवतः
शृंङ्गे नावं बध्नीत मा चिरम् ४८ मा बद्धा तत्र तैस्तूर्णमृषिभिर्भरतर्षभ ।
नौर्मत्स्यस्य वचः श्रुत्वा शृंङ्गे हिमवतस्तदा ४९ तच्च नौबन्धनं नाम शृंङ्गं
हिमवतः परम् । ख्यातमद्यापि कौन्तेय तद्विद्धि भरतर्षभ ५० अथाब्र-
वीदनिमिषस्तानृषीन्सहितांस्तदा । अहं प्रजापतिर्ब्रह्मा मत्परं नाभिग-
म्यते ५१ मत्स्यरूपेण यूयं च मयास्मान्मोक्षिता भयात् । मनुना च प्रजाः
सर्वाः सदेवासुरमानुषाः ५२ स्रष्टव्याः सर्वलोकाश्च यच्चेङ्गं यच्च नेङ्गति ।
तपसा चापि तीव्रेण प्रतिभास्य भविष्यति ५३ मत्प्रसादात्प्रजासर्गे न च
मोहं गमिष्यति । इत्युक्त्वा वचनं मत्स्यः क्षणेनादर्शनं गतः ५४ स्रष्टु-
कामः प्रजाश्चापि मनुर्वैवस्वतः स्वयम् । प्रमूढोभूत्प्रजासर्गे तपस्तेपे मह-

---

होऊन गेलें ४४. ह्याप्रमाणें जगत् बुडून गेलें असतां, हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, सप्तर्षि, मनु व मत्स्य हे मात्र तसेच राहिले ४५. हे राजा, उदकानें भरलेल्या त्या महासागरामध्यें त्या मत्स्यानें ह्याप्रमाणें पुष्कळ वर्षसमुदाय लोटेपर्यंत गैरसावध न रहातां ती नाव ओढिली ४६ आणि नंतर, हे भरतवंशज श्रेष्ठा कुरुनंदना, हिमालय पर्वताचें जें श्रेष्ठ शिखर त्याचेसमीप ती नाव आणिली ४७ व तो मत्स्य हंसत हंसत आणि हलकें हलकें त्या ऋषींना ह्मणाला " ह्या हिमालयपर्वताच्या शिखराला ही नाव बांधा; आतां विलंब करूं नका " ४८. हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, तें मत्स्याचें भाषण श्रवण केल्यावर त्या ऋषींनीं सत्वरच ती नाव त्या हिमालय पर्वताच्या शिखराला बांधून टाकिली ४९. हे भरतवंशजश्रेष्ठा कुंतीपुत्रा, हिमालयपर्वताचें जें नौबंधनसंज्ञक श्रेष्ठ शिखर अद्यापि प्रसिद्ध आहे तें तेंच शिखर होय, हें तूं लक्ष्यांत ठेव ५०. असो. तदनंतर तो मत्स्य त्या एकत्र असलेल्या ऋषींना ह्मणाला " मीच प्रजाधिपति ब्रह्मा; माझ्यावांचून दुसरें कांहींही ह्या ब्रह्मांडांत नाहीं ५१. मीं ह्या भयापासून मत्स्यरूपानें तुमची सुटका केली आहे. देव, दैत्य व मनुष्यें ह्यांसहवर्तमान सर्व प्रजा, सर्व लोक आणि सर्व चराचर ह्यांची उत्पत्ति मनूनें केली पाहिजे. तीव्र तपश्चर्येच्या योगानें ह्याला (पूर्व सृष्टीची) स्फूर्ति होईल ५२,५३ आणि माझ्या प्रसादामुळें प्रजेच्या सृष्टीविषयीं ह्याला मोह पडणार नाहीं." असें भाषण करून तो मत्स्य

मतः ५५ तपसा महता युक्तः सोथ स्रष्टुं प्रचक्रमे । सर्वाः प्रजा मनुः साक्षाद्यथावद्भरतर्षभ ५६ इत्येतन्मात्स्यकं नाम पुराणं परिकीर्तितम् । आख्यानमिदमाख्यातं सर्वपापहरं मया ५७ य इदं शृणुयान्नित्यं मनोश्चरितमादितः । स सुखी सर्वपूर्णार्थः स्वर्गलोकमियान्नरः ५८ [७३३]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां० मारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि मत्स्योपाख्याने सप्ताशीत्यधिकशततमोध्यायः ॥ १८७ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततः स पुनरेवाथ मार्कण्डेयं यशस्विनम् । पप्रच्छ विनयोपेतो धर्मराजो युधिष्ठिरः १ नैकं युगसहस्रान्तास्त्वया दृष्टा महामुने । न चापीह समः कश्चिदायुष्मान्दृश्यते तव २ वर्जयित्वा महात्मानं ब्रह्माणं परमेष्ठिनम् । न तेस्ति सदृशः कश्चिदायुषा ब्रह्मवित्तम ३ अनन्तरिक्षे लोकेस्मिन्देवदानववर्जिते । त्वमेव प्रलये विप्र ब्रह्माणमुपतिष्ठसे ४ प्रलये चापि निर्वृत्ते प्रबुद्धे च पितामहे । त्वमेकः सृज्यमानानि भूतानीह प्रपश्यसि ५ चतुर्विधानि विप्रर्षे यथावत्परमेष्ठिना

एका क्षणामध्यें गुप्त झाला ५४ व इकडे प्रजोत्पादनेच्छु वैवस्वतमनुही प्रजोत्पादनाविषयीं स्वतः गोंधळून गेल्यामुळें मोठी तपश्चर्या करूं लागला ५५ व मोठ्या तपश्चर्येनें तो मुनि युक्त झाला असतां, हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, साक्षात् सर्व प्रजा तो उत्पन्न करूं लागला ५६. हें मात्स्यक नामक सर्व पापनाशक पुरातन आख्यान मीं कथन केलें आहे ५७. हें (वैवस्वत) मनूचें चरित्र प्रथमपासून जो नित्य श्रवण करितो तो सुखी राहून त्याचे सर्व मनोरथ परिपूर्ण होतात आणि शेवटीं त्याला स्वर्ग लोक प्राप्त होतो ५८. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेय समास्यापर्वांपैकीं मत्स्योपाख्यानाविषयीं एकशें सत्यांयशीवा अध्याय समाप्त झाला ॥ १८७ ॥

वैशंपायन सांगतात:—तदनंतर तो विनयसंपन्न धर्मराज युधिष्ठिर पुनरपि यशस्वी मार्कंडेय मुनींना ह्मणाला १ " हे महामुने, आपण अनेक कल्पांत अवलोकन केले असून ह्या जगतामध्यें आपणासारिखा चिरंजीवी कोणीही दृष्टीं पडत नाहीं २. हे ब्रह्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ मार्कंडेयमुने, महात्म्या परमेष्ठी ब्रह्मदेवावांचून आयुष्यामध्यें आपली बरोबरी करणारा दुसरा कोणीही नाहीं ३. हे विप्र, आकाशादिरहित व देवदानवशून्य अशा ह्या लोकामध्यें प्रलयकालीं आपणच ब्रह्मदेवाची उपासना करीत असतां ४ आणि प्रलय संपूर्ण होऊन ब्रह्मदेव जागे झाले असतां दिशा वायूनें व्याप्त करून आणि जल इकडे तिकडे वांटून देऊन ते चार प्रकारचे प्राणी उत्पन्न करूं लागले ह्मणजे एक

वायुभूता दिशः कृत्वा विक्षिप्यापस्ततस्ततः ६ त्वया लोकगुरुः साक्षात्सर्वलोकपितामहः । आराधितो द्विजश्रेष्ठ तत्परेण समाधिना ७ स्वप्रमाणमथो विप्र त्वया कृतमनेकशः । घोरेणाविश्य तपसा वेधसो निर्जितास्त्वया ८ नारायणाङ्कप्रख्यस्त्वं सांपरायेतिपठ्यसे । भगवाननेकशः कृत्वा त्वया विष्णोश्च विश्वकृत् ९ कर्णिकोद्धरणं दिव्यं ब्रह्मणः कामरूपिणः । रत्नालङ्कारयोगाभ्यां दृग्भ्यां दृष्टस्त्वया पुरा १० तस्मात्तवान्तको मृत्युर्जरा वा देहनाशिनी । न त्वां विशति विप्रर्षे प्रसादात्परमेष्ठिनः ११ यदा नैव रविर्नाग्निर्न वायुर्न च चन्द्रमाः । नैवान्तरिक्षं नैवोर्वी शेषं भवति किञ्चन १२ तस्मिन्नेकार्णवे लोके नष्टे स्थावरजङ्गमे । नष्टे देवासुरगणे समुत्सन्नमहोरगे १३ शयानममितात्मानं पद्मोत्पलनिकेतनम् । त्वमेकः सर्वभूतेशं ब्रह्माणमुपतिष्ठसि १४ एतत्प्रत्यक्षतः सर्वं पूर्वं वृत्तं द्विजोत्तम । तस्मादिच्छाम्यहं श्रोतुं सर्वहेत्वात्मिकां कथाम् १५ अनुभूतं हि बहुशस्त्वयैकेन द्विजोत्तम । न तेऽस्त्यविदितं किंचित्सर्वलो-

आपणच अवलोकन करीत असतां ५,६. हे द्विजश्रेष्ठ, सर्व लोकांचे पूर्वज असे जे साक्षात् जगद्गुरु त्यांचे आराधन समाधीच्या योगानें आपणच तत्पर राहून केलें आहे ७. हे विप्र, अनेक वेळां आपण हें जगत् (उत्पन्न होत असलेलें) अवलोकन केलें व तीव्र तपाचें अवलंबन करून आपण ज्ञानवानांना जिंकिलें आहे ८. नारायणाच्या हृदयाप्रमाणें असलेले आपण भगवान् असून रहस्यामध्यें आपली अतिशय स्तुति केलेली आहे. विष्णूच्या प्रसादामुळें आपण अनेक वेळां जगन्निर्माण अवलोकन केलेलें आहे ९. यथेच्छरूप धारण करणाऱ्या ब्रह्मदेवाचें अद्भुत कर्णिकोद्धरण (ह्मणजे कमलकर्णिकपासून निर्गमन) आपण अनेक वेळां पाहिलें आहे आणि उत्कृष्ट वैराग्य व योगाभ्यास ह्या दृष्टीनीं आपण पूर्वी परमेश्वराला अवलोकन केलें आहे १०. तस्मात्, हे ब्रह्मर्षे, ब्रह्मदेवाच्या प्रसादामुळें आपणाला नाश करणारा मृत्यु अथवा देहनाशक जरा प्राप्त होत नाहीं ११. सूर्य, अग्नि, वायु, चंद्र, अंतरिक्ष व पृथ्वी ह्यांपैकीं जेव्हां कांहींही शेष उरत नाहीं १२ ह्मणजे महोरगांचा उच्छेद होऊन देवदैत्यसमुदायांचा नाश झाला असतां आणि सर्व स्थावरजंगमात्मक जगत् त्या महासागरामध्यें नाश पावलें असतां १३ कमलपुष्पें हें ज्याचें स्थान आहे अशा अतर्क्यस्वरूप भूताधिपति ब्रह्मदेवाची उपासना त्या ठिकाणीं आपणच करीत असतां १४. सारांश, हे द्विजश्रेष्ठ, पूर्वी घडून गेलेलें हें सर्व वृत्त आपण प्रत्यक्ष अवलोकन केलें आहे. तस्मात्, सर्वांना हेतुभूत जी ब्रह्मसृष्टि तद्विषयक कथा श्रवण करण्याची माझी इच्छा आहे १५.

केषु नित्यदा १६ मार्कण्डेय उवाच ॥ हन्त ते वर्तयिष्यामि नमस्कृत्वा स्वयंभुवं । पुरुषाय पुराणाय शाश्वतायाव्ययाय च १७ अव्यक्ताय सुसूक्ष्माय निर्गुणाय गुणात्मने । स एष पुरुषव्याघ्र पीतवासा जनार्दनः १८ एष कर्ता विकर्ता च भूतात्मा भूतकृत्प्रभुः । अचिन्त्यं महदाश्चर्यं पवित्रमिति चोच्यते १९ अनादिनिधनं भूतं विश्वमव्ययमक्षयम् । एष कर्ता न क्रियते कारणं चापि पौरुषे २० यद्येष पुरुषो वेद वेदा अपि न तं विदुः २१ सर्वमाश्चर्यमेवैतन्निर्वृत्तं राजसत्तम । आदितो मनुजव्याघ्र कृत्स्नस्य जगतः क्षये २२ चत्वार्याहुः सहस्राणि वर्षाणां तत्कृतं युगम् । तस्य तावच्छती सन्ध्या सन्ध्यांशश्च तथाविधः २३ त्रीणि वर्षसहस्राणि त्रेतायुगमिहोच्यते । तस्य तावच्छती सन्ध्या सन्ध्यांशश्च ततः परम् २४ तथा वर्षसहस्रे द्वे द्वापरं परिमाणतः । तस्यापि द्विशती सन्ध्या सन्ध्यांशश्च तथाविधः २५ सहस्रमेकं वर्षाणां ततः कलियुगं स्मृतम् । तस्य वर्षशतं सन्धिः सन्ध्यांशश्च ततः परम् २६ सन्धिसन्ध्यांशयोस्तुल्यं प्रमाण-

---

हे द्विजश्रेष्ठ, आपणा एकट्याला ह्या जगन्निर्माणाचा पुष्कळ वेळां प्रत्यक्ष अनुभव आलेला आहे व या त्रैलोक्यामध्यें आपणाला कोणतीही गोष्ट कधींही अज्ञात नाहीं १६. मार्कंडेय सांगतातः—स्वयंभू, पूर्ण, एकरूप नित्य, शाश्वत, नित्य, रूपादिरहित, दुर्लक्ष्य, निर्गुण आणि मायोपाधिक अशा परमात्म्याला नमस्कार करून मी तुला तूं विचारिलेलें कथन करितों. हे पुरुषश्रेष्ठा, हा पीतांबरधारी जनार्दन १७, १८ जगत्स्रष्टा, नानाप्रकारचीं रूपें धारण करणारा, भूतात्मा, भूतांचा उत्पादक व प्रभु असून अचिंत्य, महदाश्चर्य व पवित्र असेंही ह्याला ह्मणत असतात १९. जन्ममरणरहित, सनातन, सर्वस्वरूप, निर्विकार आणि अविनाशी असा हा केवल कर्ताच असून ह्याला कोणीही कर्ता नाहीं आणि पौरुषाचें कारणही हाच आहे २० ह्या पुराणपुरुषाला जें ठाऊक आहे तें वेदांतालाही ठाऊक नाहीं २१. हे नृपश्रेष्ठा पुरुषोत्तमा, संपूर्ण जगताचा क्षय झाला असतां परमात्म्यापासून उत्पन्न झालेलें हें सर्व जगतांतील आश्चर्यच आहे २२. चार हजार (दिव्य) वर्षे हें कृतयुग होय, चारशें वर्षे हा त्या कृतयुगाचा संधिकाल होय आणि संध्यांशही तितकाच होय २३. तीन हजार (दिव्य) वर्षांना त्रेतायुग असें ह्मणतात. त्या त्रेतायुगाचा संधिकाल तीनशें वर्षे असून संध्यांशही तीनशें वर्षे आहे २४. दोन हजार (दिव्य) वर्षे हें द्वापारयुगाचें परिमाण होय. त्या द्वापारयुगाचाही दोनशें वर्षे संधिकाल असून संध्यांशही तशाच प्रकारचा आहे २५. एक हजार (दिव्य) वर्षे हें कलियुग होय. शंभर वर्षे त्या कलियुगाचा संधिकाल असून संध्यांशही तदनंतर तितकाच

मुपधारय । क्षीणे कलियुगे चैव प्रवर्तति कृतं युगम् २७ एषा द्वादश-
साहस्री युगाख्या परिकीर्तिता । एतत्सहस्रपर्यंतमहो ब्राह्ममुदाहृतम् २८
विश्वं हि ब्रह्मभवने सर्वतः परिवर्तते । लोकानां मनुजव्याघ्र प्रलयं तं
विदुर्बुधाः २९ अल्पावशिष्टे तु तदा युगान्ते भरतर्षभ । सहस्रान्ते नराः सर्वे
प्रायशोनृतवादिनः ३० यज्ञप्रतिनिधिः पार्थ दानप्रतिनिधिस्तथा । व्रत-
प्रतिनिधिश्चैव तस्मिन्काले प्रवर्तते ३१ ब्राह्मणाः शूद्रकर्माणस्तथा शूद्रा
धनार्जकाः । क्षत्रधर्मेण वाप्यत्र वर्तयन्ति गते युगे ३२ निवृत्तयज्ञस्वा-
ध्याया दण्डाजिनविवर्जिताः । ब्राह्मणाः सर्वभक्षाश्च भविष्यन्ति कलौ
युगे ३३ अजपा ब्राह्मणास्तात शूद्रा जपपरायणः । विपरीते तदा लोके
पूर्वरूपं क्षयस्य तत् ३४ बहवो म्लेच्छराजानः पृथिव्यां मनुजाधिप ।
मृषानुशासिनः पापा मृषावादपरायणाः ३५ आन्ध्राः शकाः पुलिन्दाश्च
यवनाश्च नराधिपाः । काम्बोजा बाह्लिकाः शूरास्तथाभीरा नरोत्तम ३६
न तदा ब्राह्मणः कश्चित्स्वधर्ममुपजीवति । क्षत्रियाश्चापि वैश्याश्च विक-

---

आहे २६. संधि आणि संध्यांश ह्यांचें प्रमाण सारखेच आहे हें तू लक्ष्यांत ठेव आणि कलियुग संपूर्ण झाल्यावर कृतयुग सुरू होतें (हेंही समजून ठेव)२७. ह्याला युगसंज्ञक बाराहजारी असें ह्मणतात आणि ह्या बाराहजारीच्या एक हजार फेऱ्यांना ब्रह्मदेवाचा दिवस असें ह्मटलें आहे २८. ब्रह्मदेवाचा दिवस संपूर्ण झाला असतां सर्व विश्वाचें पूर्णपणें पर्यावर्तन होतें आणि त्यालाच, हे पुरुषश्रेष्ठा, प्रलय असें ज्ञानी जन ह्मणतात २९. हे भरतवंशजश्रेष्ठा, युगसमाप्तीला अवधि थोडका राहिला असतां-ह्मणजे एक हजार दिव्य वर्षें अर्थात् कलियुग शेंवटीं अवशिष्ट राहिलें असतां-सर्व लोक प्रायः असत्यवादी होतात ३०. हे कुंतीपुत्रा, त्या वेळीं यज्ञ, दानें व व्रतें ह्यांचे प्रतिनिधि निघतात ३१; ब्राह्मण शूद्रकर्मांचें अवलंबन करितात आणि शूद्र द्रव्य मिळवूं लागतात अथवा कलियुग अवशिष्ट राहिलें असतां ते क्षत्रधर्मानेंही वागूं लागतात ३२. कलियुगामध्यें ब्राह्मण सर्वभक्ष बनून यज्ञ व वेदाध्ययन करीनासे होतात आणि दंड व कृष्णाजिन ह्यांची जरूर बाळगीत नाहींत ३३. युधिष्ठिरा, ब्राह्मण जपरहित आणि शूद्र जपाविषयीं तत्पर होतात ह्याप्रमाणें जगतामध्यें विपरीत प्रकार झाला असतां प्रलयाचें तें पूर्वरूपच आहे ह्मणून समजावें ३४. हे प्रजाधिपते पुरुष-श्रेष्ठा धर्मराजा, पृथ्वीवर (कलियुगामध्यें) आंध्र, शक, पुलिंद, यवन, कांबोज, बाल्हिक, शूर, आभीर इत्यादि पुष्कळच प्रजाधिपति म्लेच्छ राजे होत असतात आणि ते स्वभावतःच दुष्ट, असत्याचें अवलंबन करूनच राज्य चालविणारे व असत्य भाष-

र्मस्था नराधिप ३७ अल्पायुषः स्वल्पबलाः स्वल्पवीर्यपराक्रमाः। अल्पसाराल्पदेहाश्च तथा सत्याल्पभाषिणः ३८ बहुशून्या जनपदा मृगव्यालावृता दिशः। युगान्ते समनुप्राप्ते वृथा च ब्रह्मवादिनः ३९ भोवादिनस्तथा शूद्रा ब्राह्मणाश्चार्यवादिनः। युगान्ते मनुजव्याघ्र भवन्ति बहुजन्तवः ४० न तथा घ्राणयुक्ताश्च सर्वगन्धा विशाम्पते। रसाश्च मनुजव्याघ्र न तथा स्वादुयोगिनः ४१ बहुप्रजा ह्रस्वदेहाः शीलाचारविवर्जिताः। मुखेभगाः स्त्रियो राजन्भविष्यन्ति युगक्षये ४२ अट्टशूला जनपदाः शिवशूलाश्चतुष्पथाः। केशशूलाः स्त्रियो राजन्भविष्यन्ति युगक्षये ४३ अल्पक्षीरास्तथा गावो भविष्यन्ति जनाधिप। अल्पपुष्पफलाश्चापि पादपा बहुवायसाः ४४ ब्रह्मवध्यानुलिप्तानां तथा मिथ्याभिशंसिनाम्। नृपाणां

णाचाच मुख्यतः आश्रय करणारे होत असतात ३५, ३६. हे प्रजाधिपते, त्या वेळीं स्वधर्मावर उपजीविका करणारा ब्राह्मण (प्रायः) कोणीही नसून क्षत्रिय व वैश्य हेही भलतींच कर्में करूं लागतात ३७. लोकांचे ठिकाणीं सत्य भाषणाचा अंश अल्पच रहात असून आयुष्य, बल, वीर्य, पराक्रम, धैर्य आणि देह ह्यांचेही प्रमाण मनुष्याचे ठिकाणीं अल्पच दृष्टीं पडत असतें ३८. देश प्रायः शून्य होऊन जातात, दिशा मृगांनीं व श्वापदांनीं व्याप्त होतात आणि त्याचप्रमाणें युगाचा शेवट प्राप्त झाला असतां (ह्मणजे कलियुग अवशिष्ट राहिलें असतां) अनुभवावांचूनच ब्रह्मानी वाटाघाट करणारे लोक दृष्टीं पडत असतात ३९. शूद्रांच्या भाषणांत गर्वोक्ति दिसून येईल, ब्राह्मणांच्या भाषणांत नम्रपणा दिसून येईल आणि, हे पुरुषश्रेष्ठा, युगांतसमयीं पुष्कळच प्राणी असे विपरीत स्वभावाचे दिसून येतील ४०. हे प्रजाधिपते, त्याचप्रमाणें सर्व प्रकारचीं परिमलद्रव्यें पूर्वीप्रमाणें (परिमलरहित झाल्यामुळें) घ्राणेंद्रियाला तृप्त करीत नाहीत व, हे पुरुषश्रेष्ठा, रसांमध्येंही तसा स्वादिष्टपणा राहणार नाहीं ४१. हे राजा, ज्यांना संतति विपुल आहे, ज्यांचें शरीर लहान आहे, सुशीलपणा ज्यांचे अंगीं मुळींच नाहीं, सदाचरणाचा ज्यांचे ठिकाणीं अभाव आहे आणि मुखाच्याच योगानें ज्या इंद्रियकृत्य करणाऱ्या आहेत अशा स्त्रिया युगांतसमयीं उत्पन्न होतील ४२. लोक भिकेबगाल होतील, ब्राह्मण वेदविक्रय करणारे निघतील आणि, हे राजा, त्याचप्रमाणें युगांतसमयीं स्त्रियाही निर्लज्ज बनतील ४३. त्याचप्रमाणें, हे प्रजाधिपते, गाई थोडकें दूध देणाऱ्या निघतील आणि वृक्षांनाही पुष्पें व फळें थोडीं येऊन त्यांच्यावर कावळे मात्र पुष्कळ होतील ४४. हे भूपते, ब्रह्महत्येचें पातक केलेल्या आणि दुसऱ्यावर खोटा दोषारोप करणाऱ्या राजापासून लोभ व मोह

पृथिवीपाल प्रतिगृह्णन्ति वै द्विजाः ४५ लोभमोहपरीताश्च मिथ्याधर्मध्वजावृताः । भिक्षार्थं पृथिवीपाल चञ्चूर्यन्ते द्विजैर्दिशः ४६ करभारभयाद्भीता गृहस्थाः परिमोषकाः । मुनिच्छद्माकृतिच्छन्ना वाणिज्यमुपजीविनः ४७ मिथ्या च नखरोमाणि धारयन्ति तदा द्विजाः । अर्थलोभान्नरव्याघ्र तथा च ब्रह्मचारिणः ४८ आश्रमेषु वृथाचाराः पानपा गुरुतल्पगाः । इह लौकिकमीहन्ते मांसशोणितवर्धनम् ४९ बहुपाषण्डसंकीर्णाः परान्नगुणवादिनः । आश्रमा मनुजव्याघ्र भविष्यन्ति युगक्षये ५० यथर्तुवर्षी भगवान्न तथा पाकशासनः । न चापि सर्वबीजानि सम्यग्रोहन्ति भारत ५१ हिंसाभिरामश्च जनस्तथा संपद्यते शुचिः । अधर्मफलमत्यर्थं तदा भवति चानघ ५२ तदा च पृथिवीपाल यो भवेद्धर्मसंयुतः । अल्पायुः स हि मन्तव्यो न हि धर्मोस्ति कश्चन ५३ भूयिष्ठं कूटमानैश्च पण्यं विक्रीयते जनैः । वणिजश्च नरव्याघ्र बहुमाया भवन्त्युत ५४ धर्मिष्ठाः परिहीयन्ते पापी-

---

ह्यांनीं ग्रस्त झालेले व निरर्थक धर्मचिन्हानें युक्त असलेले ब्राह्मण प्रतिग्रह करितील आणि, हे भूपाला, भिक्षेकरितां ते चोहोंकडे हिंडूं लागतील ४५. ४६. गृहस्थाश्रमी लोक परद्रव्याचा अपहार करणारे, कपटानें मुनिवेष धारण करून आपलें स्वरूप गुप्त ठेवणारे आणि दुकानदारीवर निर्वाह करणारे होतील व कराच्या ओझ्यानें ते अगदीं भयभीत होऊन जातील ४७. हे पुरुषश्रेष्ठा, त्या वेळीं द्रव्यलोभामुळें ब्राह्मण विनाकारण केंस व नखें वाढवितील आणि ब्रह्मचारीही तसेंच (ढोंगी) बनतील ४८. वर्णाश्रमी लोक आपआपल्या आश्रमांप्रमाणे आचरण न करिता निषिद्धाचरण करणार, मद्यपी व गुरुपत्नीशीं रत होणारे निघतील आणि रक्तमांसाच्या वृद्धीलाच उपयोगीं पडणारे असें ऐहिक कृत्य मात्र करण्याची इच्छा धरतील ४९. युगांतसमयीं वर्णाश्रमी पुरुषांतही पाखंडी लोकांची गर्दी होऊन जाईल आणि ते वर्णाश्रमी पुरुष नेहमीं परान्नाचीच प्रशंसा करूं लागतील ५०. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, भगवान् इंद्रही ऋतुमानाला अनुसरून पर्जन्यवृष्टि करणार नाहीं व सर्व प्रकारचीं धान्येंही चांगलीं येणार नाहींत ५१ ब्राह्मण, सन्यासी वगैरे शुद्ध लोकही हिंसेमध्यें आनंद मानणारे निघतील आणि, हे निष्पापा, अधर्माचे परिणाम अतिशय दिसूं लागतील ५२. हे भूपाला, त्या वेळीं जो कोणी धर्मानें वागेल तो अल्पायु समजला जाईल आणि कोणताही धर्म रहाणार नाहीं ५३. लोक प्रायः खोट्या मोजमापांनीं विक्रेय पदार्थ विकूं लागतील आणि, हे पुरुषश्रेष्ठा, दुकानदारी चालविणारे लोक फारच कपटी होतील ५४. धर्मनिष्ठ लोकांचा ऱ्हास होऊं लागेल, पापी लोकांना

शाम्यर्धते जनः । धर्मस्य बलहानिः स्यादधर्मश्च बली तथा ५५अल्पायुषो दरिद्राश्च धर्मिष्ठा मानवास्तथा । दीर्घायुषः समृद्धाश्च विधर्माणो युगक्षये ५६ नगराणां विहारेषु विधर्माणो युगक्षये । अधर्मिष्ठैरुपायैश्च प्रजा व्यवहरन्त्युत ५७ सञ्चयेन तथाल्पेन भवन्त्याढ्यमदान्विताः । धनं विश्वासतो न्यस्तं मिथोभूयिष्ठशो नराः ५८ हर्तुं व्यवसिता राजन्पापाचारसमन्विताः । नैतदस्तीति मनुजा वर्तन्ते निरपत्रपाः ५९ पुरुषादानि सत्त्वानि पक्षिणोऽथ मृगास्तथा । नगराणां विहारेषु चैत्येष्वपि च शेरते ६० सप्तवर्षाष्टवर्षाश्च स्त्रियो गर्भधरा नृप । दशद्वादशवर्षाणां पुंसां पुत्रः प्रजायते ६१ भवन्ति षोडशे वर्षे नराः पलितिनस्तथा । आयुःक्षयो मनुष्याणां क्षिप्रमेव प्रपद्यते ६२ क्षीणायुषो महाराज तरुणा वृद्धशीलिनः । तरुणानां च यच्छीलं तद्वृद्धेषु प्रजायते ६३ विपरीतास्तदा नार्यो वञ्चयित्वाऽहतः पतीन् । व्युच्चरन्त्यपि दुःशीला दासैः पशुभिरेव च ६४ वीरपत्न्यस्तथा नार्यः संश्रयन्ति नरान्नृप । भर्तारमपि जीवन्तम-

---

बरकत येऊं लागेल, धर्माचें सामर्थ्य नाहींसें होईल व अधर्मच प्रबल होईल ५५. त्याचप्रमाणें युगांतसमयीं (ह्मणजे कलियुगीं) धर्मनिष्ठ पुरुष अल्पायु व दरिद्री होतील आणि धर्मत्याग केलेले लोक संपन्न व दीर्घायु होतील५६. युगांतसमयीं नगरांतील उपवनांतून व्यभिचारी लोकच दृष्टीं पडूं लागतील आणि सर्व प्रजा धर्मविरुद्ध उपायांनीं इतरांशीं व्यवहार करूं लागतील ५७. अल्पसंचयानें लोक ' मी श्रीमान् आहें ' असा गर्व वाहूं लागतील, बहुतक दुराचरणानें वागूं लागतील, विश्वासानें गुप्तपणें ठेविलेल्या द्रव्याचा अपहार करूं लागतील आणि (धर्मवगैरे) हे व्यर्थ आहे असें समजून लोक निर्लज्जपणानें वागूं लागतील ५८,५९. श्वापदें, हिंस्रक पक्षी आणि मृग नगरांतील उपवनांतून आणि देवालयांतूनही पडले रहातील ६०. सात सात, आठ आठ वर्षांच्याही स्त्रिया अतिशय कामातुर होतील व दहा दहा बारा बारा वर्षांचेही पुरुष प्रजोत्पादन करूं लागतील ६१. सोळाव्या वर्षीं लोकांचे केश पांढरे होतील आणि मनुष्यांच्या आयुष्याचा लवकरच ऱ्हास होईल ६२. हे महाराजा, क्षीणायु, तरुण पुरुष वृद्धाप्रमाणें वागूं लागतील आणि तरुण पुरुषांस योग्य असलेलें वर्तन वृद्धांचे ठिकाणीं दृष्टीं पडूं लागेल ६३. स्त्रिया विपरीत ह्मणजे दुराचारिणी बनून आपल्या योग्य पतींना फसवितील आणि दासांशीं व पशूंशींही व्यभिचार करूं लागतील ६४. ज्यांचे पति महावीर्यवान् आहेत अशाही स्त्रिया, हे राजा, इतर पुरुषांचें अवलंबन करतील आणि भर्ता जिवंत अस-

न्याव्ययमिचरन्युत ६५ तस्मिन्युगसहस्रान्ते संप्राप्ते चायुषः क्षये । अनावृष्टि-
र्महाराज जायते बहुवार्षिकी ६६ ततस्तान्यल्पसाराणि सत्त्वानि क्षुधि-
तानि वै । प्रलयं यान्ति भूयिष्ठं पृथिव्यां पृथिवीपते ६७ ततो दिनक-
रैर्दीप्तैः सप्तभिर्मनुजाधिप । पीयते सलिलं सर्वं समुद्रेषु सरित्सु च ६८
यच्च काष्ठं तृणं चापि शुष्कं चार्द्रं च भारत । सर्वं तद्भस्मसाद्भूतं दृश्यते
भरतर्षभ ६९ ततः संवर्तको वह्निर्वायुना सह भारत । लोकमाविशते
पूर्वमादित्यैरुपशोषितम् ७० ततः स पृथिवीं भित्त्वा प्रविश्य च रसा-
तलम् । देवदानवयक्षाणां भयं जनयते महत् ७१ निर्दहन्नागलोकं च यच्च
किंचित्क्षिताविह । अधस्तात्पृथिवीपाल सर्वं नाशयते क्षणात् ७२ ततो
योजनकोटीनां सहस्राणि शतानि च । निर्दहत्यशिवो वायुः स च
संवर्तकोनलः ७३ सदेवासुरगन्धर्वं सयक्षोरगराक्षसम् । ततो दहति दीप्तः
स सर्वमेव जगद्विभुः ७४ ततो गजकुलप्रख्यास्तडिन्मालाविभूषिताः ।
उत्तिष्ठन्ति महामेघा नभस्यद्भुतदर्शनाः ७५ केचिन्नीलोत्पलश्यामाः

त्यांनाही त्याची पर्वा न करितां इतरांशीं व्यभिचार करूं लागतील ६५. तो युगांतस-
मय प्राप्त होऊन सर्वांच्या आयुष्याचा ऱ्हास झाला असतां, हे महाराजा, पुष्कळ
वर्षांचें अवर्षण पडेल ६६ आणि, हे भूपते, दुर्बल झालेल्या क्षुधित प्राण्यांचा पृथ्वीवर
अतिशयच संहार होईल ६७. तदनतर, हे प्रजाधिपते, देदीप्यमान अशा सात
सूर्यांच्या योगानें समुद्रांतील व नद्यांतील सर्व उदक आटून जाईल ६८ आणि ओलें
अथवा वाळलेलें असें जें कांहीं तृण अथवा काष्ठ असेल तेंही सर्व, हे भरतकुलो-
त्पन्ना भरतवंशजश्रेष्ठा धर्मराजा, खाक होऊन गेलेलें दृष्टोत्पत्तीस येईल ६९. तदनंतर,
हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा , सवर्तक अग्नि वायूसहवर्तमान पूर्वी सूर्यांनीं शुष्क करून
टाकिलेल्या प्रदेशामध्यें प्रविष्ट होईल ७० आणि नतर पृथ्वीचा भेद करून व रसात-
लामध्यें प्रवेश करून देव, दानव आणि यक्ष ह्यांना मोठें भय उत्पन्न करील ७१. हे
भूपाला, नागलोक दग्ध करून टाकणारा ता संवर्तक अग्नि येथें पृथ्वीवर जें कांहीं
आहे आणि अधोभागीं जें कांहीं आहे त्या सर्वांचा एका क्षणांत नाश करून टाकील ७२.
तदनंतर शेंकडों हजारों कोट योजनें रूक्ष वायु आणि तो संवर्तक अग्नि जाळीत
राहतील ७३ आणि ह्याप्रमाणें प्रदीप्त झालेला तो समर्थ अग्नि देव, असुर, गंधर्व,
यक्ष, उरग व राक्षस ह्यांसहवर्तमान सर्व जगत् दग्ध करून टाकील ७४. तदनंतर
दिसण्यांतही अद्भुत, गजसमुदायाप्रमाणें कृष्णवर्ण व विद्युल्लतारूप माळांनीं
विभूषित असे मोठे मोठे मेघ आकाशामध्यें प्रकट होतील ७५, कांहीं

केचित्कुमुदसन्निभाः । केचित्किंजल्कसंकाशाः केचित्पीताः पयोधराः ७६ केचिद्धारिद्रसंकाशाः काकाण्डकनिभास्तथा । केचित्कमलपत्राभाः केचिद्धिंगुलसप्रभाः ७७ केचित्पुरवराकाराः केचिद्गजकुलोपमाः । केचिदञ्जनसंकाशाः केचिन्मकरसन्निभाः ७८ विद्युन्मालापिनद्धाङ्गाः समुत्तिष्ठन्ति वै घनाः । घोररूपा महाराज घोरस्वननिनादिताः ॥ ततो जलधराः सर्वे व्याप्नुवन्ति नभस्तलम् ७९ नैरियं पृथिवी सर्वा सपर्वतवनाकरा । आपूर्यते महाराज सलिलौघपरिप्लुता ८० ततस्ते जलदा घोरा राविणः पुरुषर्षभ । सर्वतः प्लावयन्त्याशु चोदिताः परमेष्ठिना ८१ वर्षमाणा महत्तोयं पूरयन्तो वसुन्धराम् । सुघोरमशिवं रौद्रं नाशयन्ति च पावकम् ८२ ततो द्वादश वर्षाणि पयोदास्त उपप्लवे । धाराभिः पूरयन्तो वै चोद्यमाना महात्मना ८३ ततः समुद्राः स्वां वेलामतिक्रामन्ति भारत । पर्वताश्च विदीर्यन्ते मही चाप्सु निमज्जति ८४ सर्वतः सहसा भ्रान्तास्ते पयोदा नभस्तलम् । संवेष्टयित्वा नश्यन्ति वायुवेगपराहताः ८५

कांहीं मेघ नील कमलाप्रमाणे श्यामवर्ण असतात, कांहीं आरक्तवर्ण कमलाप्रमाणें असतात, कांहीं कमलकेसराप्रमाणे असतात आणि कांहीं पीतवर्ण असतात ७६. कांहीं गौरवर्ण असतात, कांहीं काकपक्ष्याच्या अंड्यांप्रमाणें असतात, कांहीं कमलपत्रांप्रमाणें असतात आणि कांहीं हिंगुलवर्ण दिसत असतात ७७. कांहीं मेघ आकृतीनें उत्कृष्ट नगरांसारिखे दिसत असतात, कांहीं वर्णानें काजळासारिखे असतात व रूपानें कांहीं मेघ मकराप्रमाणे भासत असतात ७८. हे महाराजा, घोर स्वरानें गर्जना करणारे, आकृतीनेंही भयंकर असलेले व विद्युल्लतांच्या समुदायांनीं परिवेष्टित असलेले असे मेघ उत्पन्न होत असतात व ते सर्वही आकाश व्यापून टाकितात ७९ इतकेंच नव्हे; परंतु, त्या मेघांच्या योगानें पर्वत, वन व खाणी ह्यांसहवर्तमान ही सर्व पृथ्वी, हे महाराजा, जलप्रवाहांनी परिप्लुत होऊन भरून जाते ८०. सारांश, हे पुरुषश्रेष्ठा, ते गर्जना करणारे घोर मेघ ईश्वराची प्रेरणा झाली असतां हें जगत् सर्व बाजूनें बुडवून टाकितात ८१ आणि ह्याप्रमाणें ते मेघ प्रचंड जलवृष्टि करून पृथ्वी भरून टाकूं लागले असतां अत्यंत घोर, अमंगल व भयंकर अशा अग्नीचा नाश करितात ८२. महात्मा ईश्वर मेघांना प्रेरणा करण्यास असल्यामुळें ते एकसारिखे त्या प्रलयकालीं बारा वर्षेपर्यंत जलधारांच्या योगानें पृथ्वी भरून काढीत असतात ८३. तेव्हां, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, समुद्र आपल्या मर्यादेचें अतिक्रमण करितो, पर्वत विदीर्ण होऊन जातात आणि पृथ्वीही उदकामध्यें बुडून जाते ८४. तदनंतर सर्व

ततस्तं मारुतं घोरं स्वयम्भूर्मनुजाधिप । आदिः पद्मालयो देवः पीत्वा स्वपिति भारत ८६ तस्मिन्नेकार्णवे घोरे नष्टे स्थावरजङ्गमे । नष्टे देवासुरगणे यक्षराक्षसवर्जिते ८७ निर्मनुष्ये महीपाल निःश्वापदमहीरुहे । अनन्तरिक्षे लोकेऽस्मिन्भ्रमाम्येकोऽहमाहतः ८८ एकार्णवे जले घोरे विचरन्पार्थिवोत्तम । अपश्यन्सर्वभूतानि वैक्लव्यमगमं ततः ८९ ततः सुदीर्घं गत्वाहं प्लवमानो नराधिप । श्रान्तः क्वचिन्न शरणं लभाम्यहमतन्द्रितः ९० ततः कदाचित्पश्यामि तस्मिन्सलिलसंचये । न्यग्रोधं सुमहान्तं वै विशालं पृथिवीपते ९१ शाखायां तस्य वृक्षस्य विस्तीर्णायां नराधिप । पर्यङ्के पृथिवीपाल दिव्यास्तरणसंस्तृते ९२ उपविष्टं महाराज पद्मेन्दुसदृशाननम् । फुल्लपद्मविशालाक्षं बालं पश्यामि भारत ९३ ततो मे पृथिवीपाल विस्मयः सुमहानभूत् । कथं त्वयं शिशुः शेते लोके नाशमुपागते ९४ तपसा चिन्तयंश्चापि तं शिशुं नोपलक्षये । भूतं भव्यं भविष्यं च जानन्नपि नरा-

---

बाजूनीं एकदम गर्दी उडून गेलेले ते मेघ आकाश व्याप्त करून टाकितात आणि वायुवेगानें ताडित झाले असतां नाश पावतात ८५ व नंतर, हे प्रजाधिपते भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, कमलनिवासी आदिदेव ब्रह्मा त्या घोर वायूलाही गट्ट करून टाकून परमात्म्याचे ठिकाणीं लीन होऊन जातो ८६. ह्याप्रमाणें त्या घोर महासागरामध्यें स्थावरजंगमात्मक प्राण्यांचा नाश होऊन देवदैत्यांचा समुदाय, यक्ष राक्षस ८७, मनुष्यें, श्वापदें, वृक्ष आणि अंतरिक्ष ह्यांचा अभाव झालेल्या ह्या जगतामध्यें, हे भूपाला, मी मात्र एकटा जर्जर होऊन भ्रमण करीत असतों ८८ आणि, हे नृपश्रेष्ठा, महासागरमय बनलेल्या त्या घोर उदकामध्यें मी संचार करीत असतांना कोणतेंही प्राणी माझ्या दृष्टोत्पत्तीस येत नसल्यामुळें मला मूर्च्छा येते ८९. नंतर हे प्रजाधिपते, फारच वेळपर्यंत मूर्छा येऊन मी सावधपणानें तरंगूं लागलों असतां थकून जातों आणि मला कशाचाही आश्रय मिळत नाहीं ९० तदनतर, हे भूपते, त्या जलसमुदायामध्यें अतिप्रचंड असा एक विशाल वटवृक्ष मला दिसूं लागतो ९१ आणि, हे प्रजाधिपते भरतकुलोत्पन्ना महाराजा भूपाला, त्या वृक्षाच्या विस्तीर्ण शाखेवर दिव्य अस्तरणानें युक्त अशा एका मंचकाचे ठिकाणीं एक बालक मला दिसूं लागतें. त्याचें मुख कमलाप्रमाणें आणि चंद्राप्रमाणें आल्हादकारक असून नेत्र प्रफुल्लित कमलाप्रमाणें विशाल असतात ९२, ९३. तदनंतर, हे भूपाला, सर्व जगताचा नाश झाला असतां हा बालक कसा शयन करीत आहे ह्याविषयीं मला मोठा विस्मय होतो ९४ आणि मी चिंतन करूं लागलों असतां भूत, भविष्य व वर्तमान जाणणाऱ्याही मला, हे प्रजाधिपते,

धिप ९५ अतसीपुष्पवर्णाभः श्रीवत्सकृतभूषणः । साक्षाल्लक्ष्म्या इवावासः
स तदा प्रतिभाति मे ९६ ततो मामब्रवीद्बालः स पद्मनिभलोचनः ।
श्रीवत्सधारी द्युतिमान्वाक्यं श्रुतिसुखावहम् ९७ जानामि त्वां परिश्रान्तं
ततो विश्रामकाङ्क्षिणम् । मार्कण्डेय इहास्स्व त्वं यावदिच्छसि भार्गव ९८
अभ्यन्तरं शरीरं मे प्रविश्य मुनिसत्तम । आस्व भो विहितो वासः प्रसा-
दस्ते कृतो मया ९९ ततो बालेन तेनैव मुक्तस्यासीत्तदा मम । निर्वेदो
जीविते दीर्घे मनुष्यत्वे च भारत १०० ततो बालेन तेनास्यं सहसा
विवृतं कृतम् । तस्याहमवशो वक्त्रे दैवयोगात्प्रवेशितः १ ततः प्रवि-
ष्टस्तत्कुक्षिं सहसा मनुजाधिप । सराष्ट्रनगराकीर्णां कृत्स्नां पश्यामि
मेदिनीम् २ गङ्गां शतद्रुं सीतां च यमुनामथ कौशिकीम् । चर्मण्वतीं
वेत्रवतीं चन्द्रभागां सरस्वतीम् ३ सिन्धुं चैव विपाशां च नदीं

त्या बालकाविषयीं तपःसामर्थ्याच्याही योगानें कांहीं समजत नाहीं ९५. जवसाच्या पुष्पाप्रमाणें त्या बालकाचा वर्ण होता, श्रीवत्सलांछनानें तो भूषित झालेला होता आणि साक्षात् लक्ष्मीचें निवासस्थानच कीं काय असा तो मला भासत होता ९६. तदनंतर श्रीवत्सलांछन धारण करणारा तो कमलनयन तेजस्वी बालक कर्णेंद्रियाला सुखावह अशा शब्दांनीं मला ह्मणाला ९७ "तूं श्रमला असून विश्रांतिस्थानाची इच्छा करीत आहेस हें मी जाणून आहें. तस्मात्, हे भृगुकुलोत्पन्ना मार्कंडेया, तूं हवा तितका वेळ येथें बैस ९८. सारांश, हे मुनिश्रेष्ठा, माझ्या शरीरामध्यें प्रवेश करून तूं रहा; मीं तुजवर प्रसन्न होऊन हें निवासस्थान तुला योजिलें आहे ९९. ह्याप्रमाणें त्या बालकानें मला सांगितलें असतां, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, माझ्या दीर्घ जीविताविषयीं आणि मनुष्यत्वाविषयीं मला फार वाईट वाटतें. (सारांश, तुजवर प्रसन्न झालों आहे. असें हा बालक मला ह्मणत असून मला आश्रय देण्यास उद्युक्त झाला आहे व मी भूत, वर्तमान व भविष्य जाणणारा असूनही ह्या बालकाविषयीं मला कांहींच थांग लागत नाहीं असा विचार मनांत येऊन अतिशय दीर्घ कालपर्यंत मी व्यर्थ वाचलों आणि माझ्या मानुषत्वांतही कांहीं अर्थ नाहीं असें मला वाटलें) १००. तदनंतर त्या बालकानें एकदम आपलें तोंड उघडिलें आणि निरुपाय झालेला मी दैवयोगा-मुळें त्याच्या मुखामध्यें प्रविष्ट झालों १ व, हे प्रजाधिपत, त्याच्या उदरामध्यें मी एकदम प्रविष्ट झालों असतां राष्ट्रें व नगरें ह्यांनीं व्याप्त झालेली संपूर्ण पृथ्वी मीं अव-लोकन केली २. गंगा, शतद्रु, सीता, यमुना, कौशिकी, चर्मण्वती, वेत्रवती, चंद्र-भागा, सरस्वती ३, सिंधु, विपाशा, गोदावरी व स्वोकसारा, नलिनी त्याचप्रमाणें, हे

गोदावरीमपि । वस्त्वोकसारां नलिनीं नर्मदां चैव भारत ४ नदीं ताम्रां च
वेणां च पुण्यतोयां शुभावहाम् । सुवेणां कृष्णवेणां च इरामां च महा-
नदीम् ५ वितस्तां च महाराज कावेरीं च महानदीम् । शोणं च पुरुषव्याघ्र
विशल्यां किंपुनामपि ६ एताश्चान्याश्च नद्योऽहं पृथिव्यां या नरोत्तम ।
परिक्रामन्प्रपश्यामि तस्य कुक्षौ महात्मनः ७ ततः समुद्रं पश्यामि यादो-
गणनिषेवितम् । रत्नाकरममित्रघ्न पयसो निधिमुत्तमम् ८ तत्र पश्यामि
गगनं चन्द्रसूर्यविराजितम् । जाज्वल्यमानं तेजोभिः पावकार्कसमप्रभम् ९
पश्यामि च महीं राजन्काननैरुपशोभिताम् । यजन्ते हि तदा राज-
न्ब्राह्मणा बहुभिर्मखैः १ १० क्षत्रियाश्च प्रवर्तन्ते सर्ववर्णानुरञ्जनैः । वैश्याः
कृषिं यथान्यायं कारयन्ति नराधिप ११ शुश्रूषायां च निरता द्विजानां
वृषलास्तदा । ततः परिपतन्राजंस्तस्य कुक्षौ महात्मनः १२ हिमवन्तं
च पश्यामि हेमकूटं च पर्वतम् । निषधं चापि पश्यामि श्वेतं च रज-
तान्वितम् १३ पश्यामि च महीपाल पर्वतं गन्धमादनम् । मन्दरं मनु-
जव्याघ्र नीलं चापि महागिरिम् १४ पश्यामि च महाराज मेरुं कन-
कपर्वतम् । महेन्द्रं चैव पश्यामि विन्ध्यं च गिरिमुत्तमम् १५ मलयं

भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, नर्मदा, ४. ताम्रानदी, शुद्ध जलानें युक्त असलली मंगल-
कारक वेणा, सुवेणा, कृष्णवेणी, महानदी, इरामा ५, वितस्ता, हे महाराजा, महा-
नदी कावेरी, हे पुरुषश्रेष्ठा, शोणनद, विशल्या, किंपुना ६ ह्या व इतरही ज्या कांहीं
पृथ्वीवर नद्या आहेत त्या, हे पुरुषश्रेष्ठा धर्मराजा, त्या महात्म्याच्या उदरामध्यें
हिंडतां हिंडतां मी अवलोकन केल्या ७ तदनंतर जलचर प्राण्यांच्या समुदायांनीं
आश्रय केलेला, रत्नांची खाण आणि उदकाचें उत्कृष्ट भांडार असा समुद्र मीं तेथें
अवलोकन केला ८. तदनंतर चंद्रसूर्यांच्या योगानें झळकत असलेलें आणि तेजोमय,
तारकापुंजांच्या योगानें उज्ज्वल असून प्रभेनें अग्नि व सूर्य ह्यांप्रमाणें असलेलें गगनमंडल
मीं अवलोकन केलें ९. हे राजा, वनांनीं सुशोभित अशी पृथ्वी मीं अवलोकन केली.
तेथें, हे राजा, ब्राह्मण अनेक यज्ञयाग करीत होते ११०. क्षत्रिय सर्व वर्णांच्या
लोकांना सुख होईल अशा रीतीनें वागत होते. हे प्रजाधिपते, वैश्यही न्यायाला
अनुसरून कृषिकर्म करीत होते ११आणि शूद्रही द्विजशुश्रूषेविषयीं तत्पर होते. तदनंतर
त्या महात्म्याच्या उदरामध्यें हिंडतां हिंडतां, हे राजा १२, हिमालय, हेमकूट, निषध,
रजतानें युक्त असा श्वेतपर्वत १३, हें भूपाला. गंधमादन पर्वत, हे पुरुषश्रेष्ठा, मंदर,
महापर्वत, नीलगिरी १४, हे महाराजा, सुवर्णमय मेरुपर्वत, महेंद्र, सर्वोत्कृष्ट पर्वत

चापि पश्यामि पारियात्रं च पर्वतम्। एते चान्ये च बहवो यावन्तः
पृथिवीधराः १६ तस्योदरे मया दृष्टाः सर्वे रत्नविभूषिताः। सिंहान्व्यघ्-
ग्रान्वराहांश्च पश्यामि मनुजाधिप १७ पृथिव्यां यानि चान्यानि सत्वानि
जगतीपते। तानि सर्वाण्यहं तत्र पश्यन्पर्यचरं तदा १८ कुक्षौ तस्य नर-
व्याघ्र प्रविष्टः सचरन्दिशः। शक्रादींश्चापि पश्यामि कृत्स्नान्देवगणा-
नहम् १९ साध्यान्रुद्रांस्तथादित्यान्गुह्यकान्पितरस्तथा। मर्पान्नागान्सु-
पर्णांश्च वसूनप्याश्विनावपि १२० गन्धर्वाप्सरसो यक्षानृषींश्चैव महीपते।
दैत्यदानवसङ्घांश्च नागांश्च मनुजाधिप २१ सिंहिकातनयांश्चापि ये
चान्ये सुरशत्रवः। यच्च किंचिन्मया लोके दृष्टं स्थावरजङ्गमम् २२ सर्वं
पश्याम्यहं राजंस्तस्य कुक्षौ महात्मनः। त्वरमाणः फलाहारः कृत्स्नं
जगदिदं विभो २३ अन्तःशरीरे तस्याहं वर्षाणामधिकं शतम्। न च
पश्यामि तस्याहं देहस्यान्तं कदाचन २४ सततं धावमानश्च चिन्तयानो
विशाम्पते। आसादयामि नैवान्तं तस्य राजन्महात्मनः २५ ततस्तमेव
शरणं गतोस्मि विधिवत्तदा। वरेण्यं वरदं देवं मनसा कर्मणैव च २६

विंध्य १५, मलय व पारियत्र हे व इतरही जे कांहीं असंख्य पर्वत आहेत ते १६
सर्व रत्नांनीं विभूषित असे त्याच्या उदरामध्यें माझ्या दृष्टीं पडले. हे प्रजाधिपते, सिंह,
व्याघ्र व वराह मीं तेथें अवलोकन केले १७. इतकेंच नव्हे; परंतु, हे भूपते, पृथ्वीवर
इतरही जे कांहीं प्राणी आहेत ते सर्व मी तेथें हिंडत असतांना माझ्या दृष्टीं
पडले १८. हे पुरुषश्रेष्ठा धर्मराजा, त्याच्या उदरामध्यें मी चोहोंकडे हिंडू लागलों
असतां इंद्रादि सर्व देवगणही माझ्या दृष्टीं पडले १९. त्याचप्रमाणें साध्य, रुद्र, आदित्य,
गुह्यक, पितर, सर्प, नाग, पक्षी, वसु, अश्विनीकुमार, १२०, गंधर्व, अप्सरा, यक्ष, ऋषि, दैत्य-
दानवसमुदाय आणि हे पृथ्वीपते राजा, नाग हेही मीं अवलोकन केले २१. तसेंच
सिंहिकेचे पुत्र आणि इतरही दैत्य मीं तेथें अवलोकन केले. सारांश, जें कांहीं चराचर
ह्या जगतामध्यें मीं अवलोकन केलें होतें तें सर्व, हे राजा, त्या महात्म्याच्या उदरामध्य
माझ्या दृष्टीं पडलें २२. हे प्रभो, मीं फलाहार करून व मोठी त्वरा करून तेथें हिंडत
असतांना हें संपूर्ण जगत् तेथें अवलोकन केलें २३. त्याच्या शरीरामध्यें मी शंभरांपे-
क्षांही अधिक वर्षें हिंडत होतों; तथापि, त्याच्या देहाचा थांग मला लागला नाहीं २४.
हे प्रजाधिपते राजा, त्या महात्म्याच्या देहाचा थांग लावावा असें मनांत आणून मी
सतत धांवत होतों; परंतु, मला त्याचा अंत जेव्हां लागलाच नाहीं २५ तेव्हां मी
योग्य रीतीनें कायावाचामनेंकरून त्याच श्रेष्ठ व वरप्रद देवाला शरण गेलों असतां २६

ततोहं सहसा राजन्वायुवेगेन निःसृतः । महात्मनो मुखात्तस्य
निवृतात्पुरुषोत्तम २७ ततस्तस्यैव शाखायां न्यग्रोधस्य विशाम्पते । आस्ते
मनुजशार्दूल कृत्स्नमादाय वै जगत् २८ तेनैव बालवेषेण श्रीवत्स कृतल-
क्षणम् । आसीनं तं नरव्याघ्र पश्याम्यमिततेजसम् २९ ततो मामब्रवीद्बालः
स प्रीतः प्रहसन्निव । श्रीवत्सधारी द्युतिमान्पीतवासा महाद्युतिः १३०
अपीदानीं शरीरेस्मिन्मामके मुनिसत्तम । उषितस्त्वं परिश्रान्तो मार्क-
ण्डेय ब्रवीहि मे ३१ मुहूर्तादथ मे दृष्टिः प्रादुर्भूता पुनर्नवा । यया निर्मु-
क्तमात्मानमपश्यं लब्धचेतसम् ३२ तस्य ताम्रतलौ तात चरणौ सुप्रति-
ष्ठितौ । सुजातौ मृदुरक्ताभिरङ्गुलीभिर्विराजितौ ३३ प्रयत्नेन मया
मूर्ध्ना गृहीत्वा ह्यभिवन्दितौ । दृष्ट्वापरिमितं तस्य प्रभावममितौजसः ३४
विनयेनाञ्जलिं कृत्वा प्रयत्नेनोपगम्य ह । दृष्टो मया स भूतात्मा देवः
कमललोचनः ३५ तमहं प्राञ्जलिर्भूत्वा नमस्कृत्येदमब्रुवम् । ज्ञातुमि-
च्छामि देव त्वां मायां चैतां तवोत्तमाम् ३६ आस्येनानुप्रविष्टोहं शरीरे

हे पुरुषश्रेष्ठा राजा, त्या महात्म्याच्या उघडलेल्या मुखापासून वायुवेगानें मी एकदम बाहेर पडलों २७ आणि पहातां तों, हे पुरुषश्रेष्ठा प्रजाधिपते, संपूर्ण जगत् आपल्या उदरामध्यें घेऊन त्याच वटवृक्षाच्या फांदीवर तो बालक बसला आहे २८. तात्पर्य, हे पुरुषश्रेष्ठा, श्रीवत्सलांछनानें युक्त असलेला तो अत्यंत तेजस्वी ईश्वर त्याच बाल-रूपानें तेथें बसलेला मीं अवलोकन केला २९ तदनंतर श्रीवत्सलांछन धारण करणारा कांतिमान् आणि महातेजस्वी असा तो पितांबरधारी बालक प्रसन्न होऊन हंसत हंसत मला ह्मणाला १३० "हे मुनिश्रेष्ठा मार्कंडेया, तूं श्रांत झाला होतास तेव्हां ह्या माझ्या शरीरामध्यें राहून तुला विश्रांति मिळाली आहे काय हें मला सांग" ३१. माझ्याशीं त्यानें असें भाषण केल्यावर एका क्षणांतच मला पुनरपि नवीन दृष्टि प्राप्त झाली आणि मी स्वतः मोहांतून निघून शुद्धीवर आलों आहें असें मला त्या दिव्य दृष्टीच्या योगानें समजूं लागलें ३२. तेव्हा, बा धर्मराजा, अतिशयच बांधेसूत, मनोहर, ताम्रवर्ण तळव्यांनीं युक्त आणि कोमल व रक्तवर्ण अंगुलींनीं झळकत असलेले त्याचे चरण ३३ मी प्रयत्नानें मस्तकीं धारण करून त्याला अभिवंदन केलें. नंतर त्या अपरिमित सामर्थ्यवान् ईश्वराचा अतर्क्य प्रभाव माझ्या दृष्टीं पडल्यावर ३४ मी हात जोडून नम्रपणानें व प्रयत्नानें त्याचे समीप गेलों असतां त्या भूतात्म्या कमलनयन देवाचें मला दर्शन झालें ३५. तेव्हां हात जोडून व नमस्कार करून मी त्याला ह्मणालों " हे देवा, ही तुझी उत्कृष्ट माया जाणण्याची माझी इच्छा आहे ३६. हे भगवन्, मुखाच्या द्वारानें मी तुझ्या

भगवंस्तव । दृष्टवानखिलान्सर्वान्समस्ताञ्जठरे हि ते ३७ तव देव शरीरस्था देवदानवराक्षसाः । यक्षगन्धर्वनागाश्च जगत्स्थावरजङ्गमम् ३८ त्वत्प्रसादाच्च मे देव स्मृतिर्न परिहीयते । द्रुतमन्तः शरीरे ते सततं परिवर्तिनः ३९ निर्गतोहमकामस्तु इच्छया ते महाप्रभो । इच्छामि पुण्डरीकाक्ष ज्ञातुं त्वाहमनिन्दितम् १४० इह भूत्वा शिशुः साक्षात्किं भवानवतिष्ठते । पीत्वा जगदिदं सर्वमेतदाख्यातुमर्हसि ४१ किमर्थं च जगत्सर्वं शरीरस्थं तवानघ । कियन्तं च त्वया कालमिह स्थेयमरिन्दम ४२ एतदिच्छामि देवेश श्रोतुं ब्राह्मणकाम्यया । त्वत्तः कमलपत्राक्ष विस्तरेण यथातथम् ४३ महद्ध्येतदचिन्त्यं च यदयं दृष्टवान्प्रभो ४४ इत्युक्तः स मया श्रीमान्देवदेवो महाद्युतिः । सान्त्वयन्मामिदं वाक्यमुवाच वदतां वरः १४५ [७४७६] इति श्रीमहाभारते० मारण्यकेपर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वण्यष्टाशीत्यधिकशततमोध्यायः ॥१८८॥

देव उवाच ॥ कामं देवापि मां विप्र न हि जानन्ति तत्त्वतः ।

शरीरामध्यें प्रविष्ट झालों आणि तुझ्या उदरामध्ये सर्वांना अवलोकन केलें ३७. हे देवा, देव, दानव, राक्षस, यक्ष, गंधर्व व नाग हेच तुझ्या उदरामध्यें आहेत इतकेंच नव्हे; परंतु, संपूर्ण चराचर जगत् आहे ३८. हे देवा, आपल्या कृपेनें मला विस्मृति पडलेली नाहीं. मी आपल्या शरीरामध्यें एकसारिखा सत्वर हिंडत होतों ३९ आणि, हे महाप्रभो, माझी इच्छा नसतांना मी तुझ्या इच्छेनें बाहेर निघालों. हे कमलनयना, तू दोषरहित असा कोण आहेस हें जाणण्याची माझी इच्छा आहे १४०. बालकाचें रूप धारण करून व हें सर्व जगत् गट्ट करून तूं कशाकरितां येथें राहिला आहेस हें सर्व मला सांग ४१. हे निष्पापा, हें संपूर्ण जगत् तुझ्या शरीरामध्यें कशाकरितां राहिलें आहे आणि, हे शत्रुदमना, तूं किती वेळपर्यंत येथें रहाणार आहेस ? ४२. हे देवाधिदेवा, कमलनयना, ब्राह्मणांकरितां तुझ्यापासून इत्थंभूत सविस्तर श्रवण करण्याची माझी इच्छा आहे ४३. कारण, हे प्रभो, मीं जें हें अवलोकन केलें तें मोठें अचिंत्य आहे " ४४. ह्याप्रमाणें त्या वैभवशाली देवाधिदेवांशीं मीं भाषण केलें असतां वक्त्यांमध्यें श्रेष्ठ असा तो महातेजस्वी देवाधिदेव सांत्वन करीत करीत माझ्याशीं बोलूं लागला १४५. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कण्डेयसमास्यापर्वापैकीं एकशें अठ्यांयशीवा अध्याय समाप्त झाला ॥ १८८ ॥

देव ह्मणतोः—हे विप्रा, मी कोण आहें हें देवांनाही वास्तविक समजलें नाहीं

त्वत्प्रीत्या तु प्रवक्ष्यामि यथेदं विसृजाम्यहम् १ पितृभक्तोसि विप्रर्षे मां चैव शरणं गतः । ततो दृष्टोस्मि ते साक्षाद्ब्रह्मचर्यं च ते महत् २ अपां नारा इति पुरा संज्ञाकर्म कृतं मया । तेन नारायणोप्युक्तो मम तत्त्वयनं सदा ३ अहं नारायणो नाम प्रभवः शाश्वतोऽव्ययः । विधाता सर्वभूतानां संहर्ता च द्विजोत्तम ४ अहं विष्णुरहं ब्रह्मा शक्रश्चाहं सुराधिपः । अहं वैश्रवणो राजा यमः प्रेताधिपस्तथा ५ अहं शिवश्च सोमश्च कश्यपोथ प्रजापतिः । अहं धाता विधाता च यज्ञश्चाहं द्विजोत्तम ६ अग्निरास्यं क्षितिः पादौ चन्द्रादित्यौ च लोचने । द्यौर्मूर्धा खं दिशः श्रोत्रे तथापः स्वेदसंभवाः ७ सदिशं च नभः कायो वायुर्मनसि मे स्थितः । मया क्रतुशतैरिष्टं बहुभिः स्वाप्तदक्षिणैः ८ यजन्ते वेदविदुषो मां देवयजने स्थितम् । पृथिव्यां क्षत्रियेन्द्राश्च पार्थिवाः स्वर्गकाङ्क्षिणः ॥ यजन्ते मां तथा वैश्याः स्वर्गलोकजिगीषया ९ चतुःसमुद्रपर्यन्तां मेरुमन्दरभूषणाम् । शेषो भूत्वाहमेवैतां धारयामि वसुन्धराम् १० वाराहं रूपमास्थाय मयेयं जगती पुरा । मज्जमाना जले विप्र

तथापि, तुझ्यावर माझें प्रेम असल्यामुळें मी तुला हें जगत् कसें उत्पन्न करीत असतों तें सांगतों १. हे ब्रह्मर्षे, तूं पितृभक्त असून मला शरण आला आहेस आणि तुझें ब्रह्मचर्य मोठें आहे ह्मणून तुला साक्षात् माझें दर्शन झालें २. उदकाला मीं पूर्वी नारा ही संज्ञा दिलेली आहे आणि तेंच माझें अयन ह्मणजे निवासस्थान आहे ह्मणून मला नारायण असें ह्मणतात ३. हे द्विजश्रेष्ठा, सनातन व अक्षय असा मी नारायणनामक सर्व भूतांचें उत्पत्तिस्थान असून सर्वांचा उत्पादक व संहारकही मीच आहें ४. विष्णु, ब्रह्मा, देवराज इंद्र, कुबेरराजा, प्रेताधिपति यम ५, शिव, सोम, कश्यप, प्रजाधिपति, धाता, विधाता आणि यज्ञ हें सर्व, हे द्विजश्रेष्ठा, मीच आहें ६. अग्नि हें माझें मुख, पृथ्वी हे माझे पाय, सूर्यचंद्र हे नेत्र, स्वर्ग हें मस्तक, आकाश व दिशा हे कान, उदक हा घाम ७, दिशांसहवर्तमान नभस्तल हें माझें शरीर आणि वायू हें माझें मन आहे. मीं विपुल दक्षिणांनीं युक्त असे शेंकडों क्रतु केलेले आहेत ८. वेदवेत्ते ब्राह्मण देवयजनामध्यें स्थित असलेल्या माझेंच यजन करीत असतात, पृथ्वींतील श्रेष्ठ क्षत्रिय राजे स्वर्गाची इच्छा धरून माझेंच पूजन करीत असतात आणि स्वर्गलोकप्राप्तीच्या इच्छेनें वैश्यही माझेंच आराधन करीत असतात ९. मेरु व मंदर ह्या पर्वतांनीं भूषित व चार समुद्रांनीं मर्यादित असलेली ही पृथ्वी शेष होऊन मीच धारण करीत असतों १०. हे विप्रा, पूर्वी ही पृथ्वी उदकामध्यें मग्न असतांना मींच वराहरूप धारण

वीर्येणासीत्समुद्धृता ११ अग्निश्च वडवावक्त्रो भूत्वाहं द्विजसत्तम ।
पिबाम्यपः सदा विद्वंस्ताश्चैव विसृजाम्यहम् १२ ब्रह्म वक्त्रं भुजौ क्षत्रमूरू
मे संस्थिता विशः । पादौ शूद्रा भवन्तीमे विक्रमेण क्रमेण च १३
ऋग्वेदः सामवेदश्च यजुर्वेदोऽप्यथर्वणः । मत्तः प्रादुर्भवन्त्येते मामेव प्रवि-
शन्ति च १४ यतयः शान्तिपरमा यतात्मानो बुभुत्सवः । कामक्रोध-
द्वेषमुक्ता निःसंङ्गा वीतकल्मषाः १५ सत्त्वस्था निरहंकारा नित्यमध्या-
त्मकोविदाः । मामेव सततं विप्राश्चिन्तयन्त उपासते १६ अहं
संवर्तको वह्निरहं संवर्तकोनलः । अहं संवर्तकः सूर्यस्त्वहं संवर्त-
कोनिलः १७ तारारूपाणि दृश्यन्ते यान्येतानि नभस्तले । मम वै रोम-
कूपाणि विद्धि त्वं द्विजसत्तम १८ रत्नाकराः समुद्राश्च सर्व एव
चतुर्दिशम् । वसनं शयनं चैव विलयं चैव विद्धि मे १९ मयैव सुवि-
भक्तास्ते देवकार्यार्थसिद्धये २० कामं क्रोधं च हर्षं च भयं मोहं तथैव
च । ममैव विद्धि रोमाणि सर्वाण्येतानि सत्तम २१ प्राप्नुवन्ति नरा

करून स्वसामर्थ्यानें बाहेर काढिली ११. हे द्विजश्रेष्ठा, हे विद्वन्, मीच वडवानल होऊन सर्वदां जलपान करीत असतों आणि पुनरपि जल बाहेर टाकीत असतों १२. ब्राह्मण हें माझें मुख असून क्षत्रिय हे बाहू आहेत आणि त्याचप्रमाणें वैश्य माझ्या मांड्या असून हे शूद्र माझे पाय आहेत. तसेंच ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्वणवेद हे कधीं कधीं व्युत्क्रमानें व कधीं कधीं क्रमानें माझ्यापासूनच प्रकट होत असून माझेच ठिकाणीं लीन होत असतात १३,१४. मुख्यतः शांतीचेंच अवलंबन करणारे, जितेंद्रिय, उत्कर्षाची इच्छा धरणारे, काम, क्रोध व द्वेष ह्यांपासून अलिप्त, पापरहित, शरीराला दुःख झालें असतां तिकडे लक्ष्य न देणारे १५, सत्त्वशील, निरभिमानी आणि नेहमीं अध्यात्म विषयाची चर्चा करणारे व सतत आत्मचिंतन करणारे विप्र माझीच उपासना करीत असतात १६. संवर्तक अग्नि मीच असून प्रलयकालचा अग्निही मीच आहें आणि त्याचप्रमाणें प्रलयकालचा सूर्यही मीच असून प्रलयकालचा वायुही मीच आहें १७. हे द्विजश्रेष्ठा, आकाशामध्यें दृष्टीं पडणाऱ्या ह्या तारा माझीं रोमरंध्रें आहेत असें तूं समज १८. चारी दिशेस असलेले सर्वही रत्नाकर समुद्र माझें वास्तव्य करण्याचें, निद्रा घेण्याचें आणि अंतर्धान पावण्याचें स्थान होत असें तूं समज १९. देवकार्य सिद्धीस नेण्याकरितां मींच ते समुद्र चांगल्या रीतीनें विभागिलेले आहेत २०. हे सज्जनश्रेष्ठा, काम, क्रोध, हर्ष, भय व मोह हे सर्व माझे रोम आहेत असें तूं समज २१. हे विप्रा, चांगलें कर्म करून पुरुषांना प्राप्त होणारें जें

विप्र यत्कृत्वा कर्म शोभनम् । सत्यं दानं तपश्चोग्रमहिंसा चैव जन्तुषु २२
मद्विधानेन विहिता मम देहविहारिणः । मयाभिभूतविज्ञाना विचेष्टन्ते
न कामतः २३ सम्यग्वेदमधीयाना यजन्ते विविधैर्मखैः । शान्तात्मानो
जितक्रोधाः प्राप्नुवन्ति द्विजातयः २४ प्राप्तं न शक्यो यो विद्वन्नरैर्दु-
ष्कृतकर्मभिः । लोभाभिभूतैः कृपणैरनार्यैरकृतात्मभिः २५ तस्मान्महा-
फलं विद्धि नराणां भावितात्मनाम् । सुदुष्प्रापं विमूढानां मार्गं योगैर्नि-
षेवितम् २६ यदा यदा च धर्मस्य ग्लानिर्भवति सत्तम । अभ्युत्थानम-
धर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् २७ दैत्या हिंसानुरक्ताश्च अवध्याः सुर-
सत्तमैः । राक्षसाश्चापि लोकेस्मिन्यदोत्पत्स्यन्ति दारुणाः २८ तदाहं संप्र-
सूयामि गृहेषु शुभकर्मणाम् । प्रविष्टो मानुषं देहं सर्वं प्रशमयाम्यहम् २९
सृष्ट्वा देवमनुष्यांस्तु गन्धर्वोरगराक्षसान् । स्थावराणि च भूतानि संहरा-
म्यात्ममायया ३० कर्मकाले पुनर्देहमविचिन्त्यं सृजाम्यहम् । आविश्य
मानुषं देहं मर्यादाबन्धकारणात् ३१ श्वेतः कृतयुगे वर्णः पीतस्त्रेतायुगे

फल तें मीच असून सत्य, प्राण्यांविषयीं अहिंसा, दान व उग्र तप हें माझेंच स्वरूप आहे २२. लोक माझ्याच कृतीनें निर्माण झालेले असून माझ्याच देहामध्यें संचार करणारे आहेत आणि ते स्वेच्छेनें कांहीं एक करीत नसून मी त्यांचें ज्ञान आच्छादित केलें असल्यामुळें ते प्रपंचामध्यें तडफड करीत असतात २३. उत्कृष्ट रीतीनें वेदाध्ययन करणारे, शांत व क्रोध जिंकलेले द्विज नानाप्रकारच्या क्रतूंनीं माझें यजन करीत असून माझी प्राप्ति करून घेत असतात २४. हे ज्ञानवान् मार्कंडेयमुने, दुष्कर्मी, लोभी, कृपण, दुष्ट आणि अजितेंद्रिय पुरुषांना माझी प्राप्ति होणें कधींही शक्य नाहीं २५. तस्मात्, योगयुक्त मार्ग जितेंद्रिय पुरुषांना महाफलदायक होत असून मूढांना प्राप्त होण्यास अत्यं अशक्य आहे असें तूं समज २६. हे सज्जनश्रेष्ठा, जेव्हां जेव्हां धर्माला उतरती कळा लागून अधर्माची सरशी होऊं लागते तेव्हां तेव्हां मी अवतार धारण करीत असतों २७. सारांश, हिंसातत्पर आणि सुरश्रेष्ठांना अवध्य असे दैत्य व राक्षस जेव्हां ह्या जगतामध्यें क्रूर कर्म करणारे उत्पन्न होत असतात २८ तेव्हां सत्कर्मनिष्ठ लोकांच्या कुलांमध्यें मी अवतार घेत असतों आणि मनुष्यदेह धारण करून सर्व नाहींसें करीत असतों २९. तात्पर्य, देव, मनुष्यें, गंधर्व, उरग, राक्षस आणि स्थावर प्राणी मीच आपल्या मायेनें उत्पन्न करून पुनरपि लयाला नेत असतों ३०. कर्म करण्याचा प्रसंग आला असतां मी मर्यादा घालून देण्याकरितां मनुष्यदेहामध्यें प्रविष्ट होऊन पुनरपि अचिंत्य अवतार धारण करीत असतों ३१. कृतयुगीं माझा वर्ण श्वेत असतो, त्रेता-

मम । रक्तो द्वापरमासाद्य कृष्णः कलियुगे तथा । त्रयो भागा ह्यधर्मस्य तस्मिन्काले भवन्ति च ३२ अन्तकाले च संप्राप्ते कालो भूत्वातिदारुणः । त्रैलोक्यं नाशयाम्येकः कृत्स्नं स्थावरजङ्गमम् ३३ अहं त्रिवर्त्मा विश्वात्मा सर्वलोकसुखावहः । आविर्भूः सर्वगोनन्तो हृषीकेश उरुक्रमः ३४ कालचक्रं नयाम्येको ब्रह्मन्नहमरूपकम् । शमनं सर्वभूतानां सर्वलोककृतोद्यमम् ३५ एवं प्रणिहितः सम्यङ्ममात्मा मुनिसत्तम । सर्वभूतेषु विप्रेन्द्र न च मां वेत्ति कश्चन ३६ सर्वलोके च मां भक्ताः पूजयन्ति च सर्वशः ३७ यच्च किंचित्त्वया प्राप्तं मयि क्लेशात्मकं द्विज । सुखोदयाय तत्सर्वं श्रेयसे च तवानघ ३८ यच्च किंचित्त्वया लोके दृष्टं स्थावरजङ्गमम् । विहितः सर्वथैवासौ ममात्मा भूतभावनः ३९ अर्धं मम शरीरस्य सर्वलोकपितामहः । अहं नारायणो नाम शङ्खचक्रगदाधरः ४० यावद्युगानां विप्रर्षे सहस्रपरिवर्तनात् । तावत्स्वपिमि विश्वात्मा सर्वभूतानि मोहयन् ४१ एवं सर्वमहं कालमिहास्से मुनिसत्तम । अशिशुः शिशुरूपेण यावद्ब्रह्मा न

युगीं पीत असतो, द्वापरयुग प्राप्त झालें असतां आरक्त होतो आणि कलियुग आलें असतां कृष्ण बनतो. कारण, त्या कलिकालामध्यें (धर्माची प्रवृत्ति काय ती एकचतुर्थांशच होत असून) तीन–चतुर्थांश अधर्माची प्रवृत्ति होत असते ३२. तस्मात्, अंतकाल प्राप्त झाला असतां मी अतिभयंकर कालरूप धारण करून ह्या सर्व चराचर त्रैलोक्याचा एकटाच नाश करीत असतों ३३. मी तीन मार्गांनीं युक्त जगदात्मा, सर्व लोकांना सुखावह, सर्वत्र प्रकट होणारा, सर्वव्यापी, अनंत, इंद्रियांचा अधिपति आणि महापराक्रमी असून ३४, हे ब्रह्मनिष्ठा, रूपरहित, सर्व भूतांचें नाशक आणि सर्व लोकांकरितां हालचाल करणारें असें हें कालचक्र मी एकटाच नेत असतों ३५. ह्याप्रमाणें, हे मुनिश्रेष्ठा, सर्व प्राण्यांचे ठिकाणीं माझा आत्मा उत्कृष्ट रीतीनें राहिलेला आहे; परंतु, हे विप्रश्रेष्ठा, माझें ज्ञान कोणाला होत नाहीं ३६. सर्व लोकांचे ठिकाणीं भक्त सर्वप्रकारें माझें पूजन करीत असतात ३७. हे द्विज, क्लेशरूप असें जें कांहीं तुला माझे ठिकाणीं प्राप्त झालें तें सर्व, हे निष्पापा, तुझ्या सुखप्राप्तीला आणि कल्याणाला कारण होणारें आहे ३८. ब्रह्मांडामध्यें जे कांहीं चराचर प्राणी तूं अवलोकन केले आहेस तो सर्वप्रकारें माझाच प्राणिभाव धारण करणारा आत्मा आहे ३९. सर्व लोकांचा गुरु महादेव माझें अर्धें शरीर असून मी शंखचक्रगदाधारी नारायण आहें ४०. हे ब्रह्मर्षे, सर्व प्राण्यांना मोह पाडणारा मी जगदात्मा चार युगांच्या हजार फेऱ्या होईपर्यंत शयन करीत असतो ४१. सारांश, हे मुनिश्रेष्ठा, मी वास्तविक बाल

बुध्यते ४२ मया च दत्तो विप्राग्र्य वरस्ते ब्रह्मरूपिणा । असकृत्परितु-
ष्टेन विप्रर्षिगणपूजित ४३ सर्वमेकार्णवं दृष्ट्वा नष्टं स्थावरजङ्गमम् । विक्ल-
वोसि मया ज्ञातस्ततस्ते दर्शितं जगत् ४४ अभ्यन्तरं शरीरस्य प्रवि-
ष्टोसि यदा मम । दृष्ट्वा लोकं समस्तं च विस्मितो नावबुध्यसे ४५
ततोसि वक्त्राद्विप्रर्षे द्रुतं निःसारितो मया । आख्यातस्ते मया चात्मा
दुर्ज्ञेयो हि सुरासुरैः ४६ यावत्स भगवान्ब्रह्मा न बुध्येत महातपाः । ताव-
त्त्वमिह विप्रर्षे विश्रब्धश्चर वै सुखम् ४७ ततो विबुद्धे तस्मिंस्तु सर्वलो-
कपितामहे । एकीभूतो हि स्रक्ष्यामि शरीराणि द्विजोत्तम ४८ आकाशं
पृथिवीं ज्योतिर्वायुं सलिलमेव च । लोके यच्च भवच्छेषमिह स्थावरज-
ङ्गमम् ४९ मार्कण्डेय उवाच ॥ इत्युक्त्वान्तर्हितस्तात स देवः परमाद्भुतः ।
प्रजाश्चेमाः प्रपश्यामि विचित्रा विविधाः कृताः ५० एवं दृष्टं मया राजं-
स्तस्मिन्प्राप्ते युगक्षये । आश्चर्यं भरतश्रेष्ठ सर्वधर्मभृतां वर ५१ यः स
देवो मया दृष्टः पुरा पद्मायतेक्षणः । स एष पुरुषव्याघ्र संबन्धी ते जना-

नसून बालकाच्या रूपानें, ब्रह्मदेव उठेपर्यंत, सर्व काल येथें रहात असतों ४२ हे विप्रश्रेष्ठा, हे ब्रह्मर्षिसमुदायाला पूज्य, मीच ब्रह्मदेवाचें रूप धारण करणारा आहें आणि वारंवार संतुष्ट होऊन मींच तुला वर दिलेला आहे ४३. सर्व चराचर एक समुद्र बनून नाहींसें झाल्याचें अवलोकन केल्यावर तूं दुःखित झालास असें मीं जाणिलें आणि ह्मणून तुला जगत् दर्शविलें ४४. माझ्या शरीरामध्यें प्रविष्ट झाल्यावर जेव्हां तूं सर्व जगत् अवलोकन केलेंस तेव्हां तुला विस्मय होऊन कांहीं सुचेनासें झालें असतां ४५, हे ब्रह्मर्षे, मीं सत्वर आपल्या मुखांतून तुला बाहेर काढिलें आणि माझें स्वरूप देवदैत्यांनाही समजणें कठीण आहे असें मीं तुला सांगितलें ४६. हे महातपस्वी ब्रह्मर्षे, जोंपर्यंत भगवान् ब्रह्मदेव उठला नाहीं तोंपर्यंत तूं येथें निर्भयपणें यथेष्ट संचार कर ४७. तो सर्व लोकाधिपति ब्रह्मदेव जागा झाल्यावर मी त्याच्याशीं एकवटून जाऊन, हे द्विजश्रेष्ठा, सूक्ष्मशरीरें उत्पन्न करीन ४८. आकाश, पृथ्वी, अग्नि, वायु, उदक, आणि इतरही जें कांहीं ह्या जगतामध्यें चराचर आहे तें सर्व मी उत्पन्न करीन" ४९. मार्कंडेय सांगतातः—बा युधिष्ठिरा, असें सांगून तो अत्यंत आश्चर्यकारक देव अंतर्धान पावला आणि नानाप्रकारच्या विचित्र प्रजा निर्माण केलेल्या मीं पाहिल्या ५०. हे राजा, हे भरतवंशजोत्तमा, हे सर्व धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ, तो युगांतसमय प्राप्त झाला असतां ह्याप्रमाणें मीं आश्चर्य अवलोकन केलें ५१. सारांश, हे पुरुषश्रेष्ठा, पद्मपत्रासारिख्या विस्तृत नेत्रांनीं युक्त असा जो देव पूर्वी माझ्या दृष्टीं पडला होता तोच

र्दनः ५२ अस्यैव वरदानाद्धि स्मृतिर्न प्रजहाति माम् । दीर्घमायुश्च कौन्तेय स्वच्छन्दमरणं मम ५३ स एष कृष्णो वार्ष्णेयः पुराणपुरुषो विभुः । आस्ते हरिरचिन्त्यात्मा क्रीडन्निव महाभुजः ५४ एष धाता विधाता च संहर्ता चैव शाश्वतः । श्रीवत्सवक्षा गोविन्दः प्रजापतिपतिः प्रभुः ५५ दृष्ट्वेमं वृष्णिप्रवरं स्मृतिर्मामियमागता । आदिदेवमयं जिष्णुं पुरुषं पीतवाससम् ५६ सर्वेषामेव भूतानां पिता माता च माधवः । गच्छध्वमेनं शरणं शरण्यं कौरवर्षभाः ५७ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्तास्ते पार्था यमौ च पुरुषर्षभौ । द्रौपद्या सहिताः सर्वे नमश्चक्रुर्जनार्दनम् ५८ स चैतान्पुरुषव्याघ्र साम्ना परमवल्गुना । सान्त्वयामास मानार्हो मन्यमानो यथाविधि ५९ [७५३५] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि भविष्यकथन एकोननवत्यधिकशततमोऽध्यायः ॥ १८९ ॥

वैशम्पायन उवाच ॥ युधिष्ठिरस्तु कौन्तेयो मार्कण्डेयं महामुनिम् । पुनः पप्रच्छ साम्राज्ये भविष्यां जगतो गतिम् १ युधिष्ठिर उवाच ॥

हा तुझा सबंधी जनार्दन होय ५२. हे कुंतीपुत्रा, ह्याच्याच वरप्रदानामुळें माझी स्मृति नाहींशी होत नसून दीर्घ आयुष्य आणि स्वच्छंद मरण हींही ह्याच्याच वरप्रदानामुळें मला प्राप्त झालीं आहेत ५३. तात्पर्य, तो हा वृष्णिकुलोत्पन्न कृष्ण पुराणपुरुष, सर्वव्यापी, भक्तजनांचें दुःख हरण करणारा, अतर्क्यस्वरूप आणि महापराक्रमी असून जगतामध्यें जशी कांहीं क्रीडा करीत आहे ५४. धाता, विधाता आणि संहारक असा हाच अविनाशी असून हाच श्रीवत्सलांछन प्रभु गोविंद व प्रजाधिपतींचा अधिपति आहे ५५. आदिदेवमय, विजयशील आणि अंतःकरणामध्यें वास्तव्य करणाऱ्या अशा ह्याच पीतांबरधारी वृष्णिवंशजश्रेष्ठ कृष्णाचें दर्शन झाल्यामुळें मला हें स्मरण झालें आहे ५६ आणि हा माधवच सर्व प्राण्यांचा पिता व माता आहे. तस्मात्, हे कुरुवंशजश्रेष्ठहो, शरण जाण्यास योग्य असून ह्या श्रीकृष्णालाच तुह्मी शरण जा ५७. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें मार्कंडेय मुनींनीं सांगितलें असतां द्रौपदीसहवर्तमान सर्वही कुंतीपुत्रांनीं आणि पुरुषश्रेष्ठ नकुलसहदेवांनीं त्या जनार्दनाला नमस्कार केला ५८ आणि नंतर, हे पुरुषश्रेष्ठा जनमेजया, अत्यंत मनोहर अशा सौम्य शब्दांनीं त्या संमानास पात्र असलेल्या व योग्य विचार करणाऱ्या श्रीकृष्णानें त्यांचें सांत्वन केलें ५९. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं भविष्यकथनासंबंधीं एकशें एकुणनव्वदावा अध्याय समाप्त झाला ॥ १८९ ॥

वैशंपायन सांगतातः—कुंतीपुत्र युधिष्ठिरानें मार्कण्डेय महर्षींना पुनरपि साम्राज्या-

आश्चर्यभूतं भवतः श्रुतं नो वदतां वर । मुने भार्गव यद्वृत्तं युगादौ
प्रभवाप्ययम् २ अस्मिन्कलियुगे त्वस्ति पुनः कौतूहलं मम ।
समाकुलेषु धर्मेषु किं तु शेषं भविष्यति ३ किंवीर्या मानवास्तत्र
किमाहारविहारिणः । किमायुषः किंवसना भविष्यन्ति युगक्षये ४
कां च काष्ठां समासाद्य पुनः संपत्स्यते कृतम् । विस्तरेण मुने
ब्रूहि विचित्राणीह भाषसे ५ इत्युक्तः स मुनिश्रेष्ठः पुनरेवाभ्यभा-
षत । रमयन्वृष्णिशार्दूलं पाण्डवांश्च महानृषिः ६ मार्कण्डेय उवाच ॥
शृणु राजन्मया दृष्टं यत्पुरा श्रुतमेव च । अनुभूतं च राजेन्द्र देवदेवप्र-
सादजम् ७ भविष्यं सर्वलोकस्य वृत्तान्तं भरतर्षभ । कलुषं कालमा-
साद्य कथ्यमानं निबोध मे ८ कृते चतुष्पात्सकलो निर्व्याजोपाधिव-
र्जितः । वृषः प्रतिष्ठितो धर्मो मनुष्ये भरतर्षभ ९ अधर्मपादविद्धस्तु
त्रिभिरंशैः प्रतिष्ठितः । त्रेतायां द्वापरेऽर्धेन व्यामिश्रो धर्म उच्यते १०
त्रिभिरंशैरधर्मस्तु लोकानाक्रम्य तिष्ठति । तामसं युगमासाद्य तदा

नंतर होणारी जगताची स्थिति विचारिली १. युधिष्ठिर ह्मणतोः—हे वक्त्यांमध्यें श्रेष्ठ भार्गवमुने, युगारंभसमयीं सृष्टिप्रलयरूप असें जें आश्चर्यमय वृत्त घडून आलें तें आपणांपासून आह्मीं श्रवण केलें २. आतां कलियुगामध्यें धर्म व्याकुल झाले असतां काय अवशिष्ट राहील हें जाणण्याविषयीं मला पुनरपि उत्सुकता प्राप्त झाली आहे ३. तो युगांतसमय प्राप्त झाला असतां मनुष्यांचें वीर्य, आहार व विहार, आयुर्मान आणि वस्त्र काय होईल ? ४ आणि कोणता समय प्राप्त झाला असतां पुनरपि कृतयुग होईल हें आपण सविस्तर मला कथन करा. आपण अद्भुत प्रकार कथन करणारे आहांत ५. ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें प्रार्थना केली असतां ते मुनिश्रेष्ठ मार्कण्डेय महर्षि वृष्णिवंशजश्रेष्ठ श्रीकृष्ण आणि पांडव ह्यांचें चित्तरंजन करण्याच्या उद्देशानें पुनरपि ह्मणाले ६ " हे राजाधिराज, पूर्वीं जें देवाधिदेवाच्या प्रसादानें माझ्या दृष्टोत्पत्तीस, ऐकण्यांत व अनुभवाला आलेलें आहे ते तूं श्रवण कर ७. सारांश, हे भरतवंशजश्रेष्ठा, पातकमय काल प्राप्त झाला असतां सर्व लोकांची स्थिति काय होईल हें मी कथन करीत आहें, तूं श्रवण कर ८. हे भरतवंशजश्रेष्ठा, कृतयुगीं कपट व लोभादि उपाधि ह्यांनीं रहित असा वृषभाप्रमाणें चतुष्पाद संपूर्ण धर्म मनुष्याचे ठिकाणीं असतो ९. त्रेतायुग प्राप्त झालें असतां धर्माचा एक अंश अधर्मानें विद्ध होऊन त्याचे तीन अंश कायम रहात असतात आणि द्वापर युग लागलें असतां धर्म हा अर्ध्या अधर्मानें मिश्र होत असतो १० आणि, हे भरतकुलोत्पन्ना सज्जनश्रेष्ठा, तामस कलि-

भरतसत्तम ११ चातुर्थांशेन धर्मस्तु मनुष्यानुपतिष्ठति । आयुर्वीर्यमथो बुद्धिर्बलं तेजश्च पाण्डव १२ मनुष्याणामनुयुगं ह्रसतीति निबोध मे । राजानो ब्राह्मणा वैश्याः शूद्राश्चैव युधिष्ठिर १३ व्याजैर्धर्मं चरिष्यन्ति धर्मवैतंसिका नराः । सत्यं संक्षेप्स्यते लोके नरैः पण्डितमानिभिः १४ सत्यहान्या ततस्तेषामायुरल्पं भविष्यति । आयुषः प्रक्षयाद्विद्या न शक्ष्यन्त्युपजीवितुम् १५ विद्याहीनानविज्ञानाल्लोभोऽप्यभिभविष्यति । लोभक्रोधपरा मूढाः कामासक्ताश्च मानवाः १६ वैरबद्धा भविष्यन्ति परस्परवधैषिणः । ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः संकीर्यन्तः परस्परम् १७ शूद्रतुल्या भविष्यन्ति तपःसत्यविवर्जिताः । अन्त्या मध्या भविष्यन्ति मध्याश्चान्त्या न संशयः १८ ईदृशो भविता लोको युगान्ते पर्युपस्थिते । वस्त्राणां प्रवरा शाणी धान्यानां कोरदूषकाः १९ भार्यामित्राश्च पुरुषा भविष्यन्ति युगक्षये । मत्स्यामिषेण जीवन्तो दुहन्तश्चाप्यजैड-

---

युग प्राप्त झालें असतां अधर्म तीन अंशांनीं लोकांना व्याप्त करून राहिलेला असतो ११ आणि धर्म चतुर्थांशानेंच मनुष्याचे ठिकाणीं रहात असतो. हे पांडवा, आयुष्य, वीर्य, बुद्धि, बल आणि तेज १२ हीं प्रत्येक युगामध्यें मनुष्यांचीं कमी कमी होत असतात हें तूं माझ्यापासून ऐकून ठेव. हे युधिष्ठिरा, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र (कलियुगीं) १३ कपटाचें अवलंबन करून धर्माचरण करितील. तात्पर्य, लोक धर्माचें जाळें पसरून इतरांना फसवूं लागतील; पंडितंमन्य पुरुष जगतामध्यें सत्याला फाटा देऊं लागतील १४ आणि सत्यहानि झाल्यामुळें त्यांचें आयुष्यही अल्प होईल. आयुष्याचा ऱ्हास झाल्यामुळें विद्येचें अवलंबन करण्यास ते समर्थ होणार नाहींत १५ आणि ह्याप्रमाणें लोक विद्याहीन बनले असतां अज्ञानामुळें लोभग्रस्तही होऊन जातील. लोभ आणि क्रोध ह्यांविषयीं तत्पर झालेले मूढ मानव विषयासक्त होऊन १६ एकमेकांशीं वैर बांधितील आणि परस्परांच्या वधाची इच्छा करीत रहातील. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य परस्परांमध्यें वर्णसंकर करूं लागल्यामुळें १७ शूद्रतुल्य होतील आणि तप व सत्य ह्यांचीही त्यांना पर्वा रहाणार नाहीं. चांडाल क्षत्रियादिकांचें कर्म करूं लागतील आणि क्षत्रियादिक चांडालांचें कर्म करूं लागतील ह्यांत संशय नाहीं १८. सारांश, युगांतसमय प्राप्त झाला असतां लोकांची अवस्था अशा प्रकारची होऊन जाईल. तागाचें वस्त्र हेंच वस्त्रांमध्यें आणि कुद्रु हेंच धान्यांमध्यें श्रेष्ठ होईल १९; युगांतसमय प्राप्त झाला असतां भार्या हेच पुरुषांचे मित्र होतील आणि मत्स्यमांसावर लोक

कम् २० गोषु नष्टासु पुरुषा येपि नित्यं धृतव्रताः। तेपि लोभसमायुक्ता भविष्यन्ति युगक्षये २१ अन्योन्यं परिमुष्णन्तो हिंसयन्तश्च मानवाः। अजपा नास्तिकाः स्तेना भविष्यन्ति युगक्षये २२ सरित्तीरेषु कुद्दालैर्वापयिष्यन्ति चौषधीः। ताश्चाप्यल्पफलास्तेषां भविष्यन्ति युगक्षये २३ श्राद्धे दैवे च पुरुषा येपि नित्यं धृतव्रताः। तेपि लोभसमायुक्ता भोक्ष्यन्तीह परस्परम् २४ पिता पुत्रस्य भोक्ता च पितुः पुत्रस्तथैव च। अतिक्रान्तानि भोज्यानि भविष्यन्ति युगक्षये २५ न व्रतानि चरिष्यन्ति ब्राह्मणा वेदनिन्दकाः। न यक्ष्यन्ति न होष्यन्ति हेतुवादविमोहिताः। निम्नेष्वीहां करिष्यन्ति हेतुवादविमोहिताः २६ निम्ने कृषिं करिष्यन्ति योक्ष्यन्ति धुरि धेनुकाः। एकहायनवत्सांश्च योजयिष्यन्ति मानवाः २७ पुत्रः पितृवधं कृत्वा पिता पुत्रवधं तथा। निरुद्वेगो बृहद्वादी न निन्दामुपलप्स्यते २८ म्लेच्छभूतं जगत्सर्वं निष्क्रियं यज्ञवर्जितम्। भविष्यति निरानन्दमनुत्सवमथो तथा २९ प्रायशः कृपणानां

निर्वाह करूं लागून गाई नाहींशा झाल्या असतां ते शेळ्यामेंढ्यांचेंही दुभतें करूं लागतील आणि जे नेहमीं धर्मानें चालणारे आहेत तेही युगांतसमय प्राप्त झाला असतां लोभाविष्ट होऊन जातील २०,२१. प्रलयकालीं मानव जपजाप्यरहित, नास्तिक व चोर बनतील आणि एकमेकांचे घात व चोऱ्या करूं लागतील २२. युगांतकाल प्राप्त झाला असतां लोक नदीतीरावर कुदळींनीं खणून धान्य पेरूं लागतील; परंतु, तेथेंही पीक थोडेंच येईल २३. हव्यकव्यसंबंधीं प्रतिग्रहापासून जे धर्मनिष्ठ पुरुष नेहमीं अलिप्त रहात असतात तेही लोभाविष्ट होऊन परस्परांवर उपजीविका करूं लागतील २४. युगांतसमय प्राप्त झाला असतां पिता पुत्राचा अतिथि बनून पुत्र तित्याचा अतिथि बनेल आणि भक्ष्य पदार्थांचीही मर्यादा रहाणार नाहीं २५. ब्राह्मण स्वकर्में न करितां वेदनिंदक बनतील आणि हेतुवादानें मोहित होऊन होमहवन करीनासे होतील व त्याचप्रमाणें हेतुवादानें मोहित होऊन निंद्य कर्म करण्याची इच्छा धरतील २६. (डोंगरावरील) निमुळत्या प्रदेशावरही लोक शेतकी करूं लागतील; धुरीला गाई लावितील; इतकेंच नव्हे; परंतु, लोक एक वर्षाचीं वासरेंही नांगराला लावितील २७. पित्याचा वध करून पुत्र आणि त्याचप्रमाणें पुत्राचा वध करून पिता हे मुळींच मनामध्यें उद्विग्न न होतां ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगूं लागतील आणि (दुष्कर्म केल्याबद्दल) कोणाच्याही निंदेस पात्र होणार नाहींत २८. सर्व जगत् उपनयनादि संस्काररहित, यज्ञयागरहित, आनंदशून्य आणि उत्सवरहित असें म्लेच्छमय होऊन जाईल २९ येथील

हि तथा बन्धुमतामपि । विधवानां च वित्तानि हरिष्यन्तीह मानवाः ३०
स्वल्पवीर्यबलाः स्तब्धा लोभमोहपरायणाः । तत्कथादानसंतुष्टा
दुष्टानामपि मानवाः ३१ परिग्रहं करिष्यन्ति मायाचारपरिग्रहाः ।
समाह्वयन्तः कौन्तेय राजानः पापबुद्धयः ३२ परस्परवधोद्युक्ता मूर्खाः
पण्डितमानिनः । भविष्यन्ति युगस्यान्ते क्षत्रिया लोककण्टकाः ३३
अरक्षितारो लुब्धाश्च मानाहंकारदर्पिताः । केवलं दण्डरुचयो भवि-
ष्यन्ति युगक्षये ३४ आक्रम्याक्रम्य साधूनां दारांश्चापि धनानि च ।
भोक्ष्यन्ते निरनुक्रोशा रुदतामपि भारत ३५ न कन्यां याचते कश्चि-
न्नापि कन्या प्रदीयते । स्वयंग्राहा भविष्यन्ति युगान्ते समुपस्थिते ३६
राजानश्चाप्यसंतुष्टाः परार्थान्मूढचेतसः । सर्वोपायैर्हरिष्यन्ति युगान्ते
पर्युपस्थिते ३७ म्लेच्छीभूतं जगत्सर्वं भविष्यति न संशयः । हस्तो
हस्तं परिमुषेद्युगान्ते समुपस्थिते ३८ सत्यं संक्षिप्यते लोके नरैः पण्डि-
तमानिभिः । स्थविरा बालमतयो बालाः स्थविरबुद्धयः ३९ भीरुस्तथा

लोक प्रायः विधवांचें, अनाथांचें आणि त्याचप्रमाणें सनाथांचेंही वित्त हरण करूं लागतील ३०. मानव राजे वीर्यानें व बलानें कमी होऊन गर्विष्ठ, अत्यंत लोभाविष्ट व मोहग्रस्त होतील; तशाच प्रकारच्या लोकांच्या कथा ऐकण्याला मिळाल्या असतां संतुष्ट होतील; मायावी आचरणाचें अवलंबन करून दुष्टांनाच हातीं धरूं लागतील आणि मनामध्यें पापबुद्धि धरून एकमेकांना आह्वान करूं लागतील ३१,३२. सारांश, युगांतसमयीं राजे परस्परांच्या वधाविषयीं उद्युक्त, मूर्ख, पंडितंमन्य आणि लोककंटक निपजतील आणि अभिमानाचा व अहंकाराचा अंगीं ताठा असून प्रजेला दंड करण्याचीच रुचि लागलेले परंतु, प्रजारक्षण न करणारे असे द्रव्यलुब्ध राजे युगांतसमयीं उत्पन्न होतील ३३,३४. इतकेंच नव्हे; परंतु, सज्जनांच्या द्रव्यावर आणि स्त्रियांवर वारंवार हल्ले करून ते आक्रोश करूं लागले असतांही मनामध्यें कांहीं एक दया न आणितां त्यांच्या द्रव्य वगैरेंचा खुशाल उपभोग घेऊं लागतील ३५. युगांतसमय प्राप्त झाला असतां कन्यावरण आणि कन्यादान कोणीही करणार नसून कन्या आपण होऊनच पुरुषांचा परिग्रह करूं लागतील ३६. युगांतकाल प्राप्त झाला असतां राजांचें अंतःकरण मोहित होऊन ते असंतुष्ट होतील आणि हरउपाय योजून दुसऱ्याचें द्रव्य हरण करूं लागतील ३७. युगांतसमय प्राप्त झाला असतां सर्व जगत् म्लेच्छमय बनून जाईल आणि एका हाताला फसवूं पहाणाऱ्या दुसऱ्या हाताप्रमाणेंच कीं काय सहोदर भ्रातेही एकमेकांना फसवूं लागतील ह्यांत संशय नाहीं ३८. पंडितंमन्य लोक

शूरमानी शूरा भीरुविषादिनः । न विश्वसन्ति चान्योन्यं युगान्ते पर्युपस्थिते ४० एकाहार्यं युगं सर्वं लोभमोहव्यवस्थितम् । अधर्मो वर्धते तत्र न तु धर्मः प्रवर्तते ४१ ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्या न शिष्यन्ति जनाधिप । एकवर्णस्तदा लोको भविष्यति युगक्षये ४२ न क्षंस्यति पिता पुत्रं पुत्रश्च पितरं तथा । भार्याश्च पतिशुश्रूषा न करिष्यन्ति संक्षये ४३ ये यवान्ना जनपदा गोधूमान्नास्तथैव च । तान्देशान्संश्रयिष्यन्ति युगान्ते पर्युपस्थिते ४४ स्वैराचाराश्च पुरुषा योषितश्च विशाम्पते । अन्योन्यं न सहिष्यन्ति युगान्ते पर्युपस्थिते ४५ म्लेच्छभूतं जगत्सर्वं भविष्यति युधिष्ठिर । न श्राद्धैस्तर्पयिष्यन्ति दैवतानीह मानवाः ४६ न कश्चित्कस्यचिच्छ्रोता न कश्चित्कस्यचिद्गुरुः । तमोग्रस्तस्तदा लोको भविष्यति जनाधिप ४७ परमायुश्च भविता तदा वर्षाणि षोडश । ततः प्राणान्विमोक्ष्यन्ति युगान्ते समुपस्थिते ४८ पञ्चमे वाथ षष्ठे वा वर्षे कन्या

जगतामध्यें सत्याला अगदींच फाटा देतील, वृद्धांचे विचार पोरांप्रमाणें होतील; बालकांच्या बुद्धि वृद्धांप्रमाणें दिसूं लागतील ३९; भित्राच स्वतःला शूर समजूं लागेल; शूर लोक भित्र्या पुरुषांप्रमाणें खेद करूं लागतील आणि युगांतसमय प्राप्त झाला असतां लोक एकमेकांचा विश्वास धरीनासे होतील ४०. कलियुगामध्यें भक्ष्याभक्ष्याचा भेद मुळींच रहाणार नसून लोभ व मोह ह्यांनीं ग्रस्त झालेले लोक एकच आहार करूं लागतील; अधर्माची वृद्धि होत जाईल आणि धर्माची प्रवृत्ति होणार नाहीं ४१. हे प्रजाधिपते युधिष्ठिरा, ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे भेद रहाणार नसून युगांतसमयीं लोकांची एकच जाति बनून जाईल ४२. प्रलयकाल जवळ आला असतां पिता पुत्राची अथवा पुत्र पित्याची मुळींच अपेक्षा करणार नाहीं आणि भार्याही पतीची शुश्रूषा करणार नाहीं ४३. लोक युगांतसमय प्राप्त झाला असतां जव आणि गहूं पिकणाऱ्या देशाचा आश्रय करतील ४४. हे प्रजाधिपते, पुरुष व स्त्रिया यथेष्टवर्तनी होऊन युगांतसमय प्राप्त झाला असतां एकमेकांची अपेक्षा करणार नाहींत ४५. हे युधिष्ठिरा, सर्व जगत् म्लेच्छमय बनून जाईल आणि श्राद्धांच्या योगानें लोक ह्या पृथ्वीवर देवतांचे संतर्पण करीनासे होतील ४६. हे प्रजाधिपते, कोणी कोणाचा शिष्य व कोणी कोणाचा गुरु रहाणार नसून सर्व जगत् अज्ञानरूप अंधकारानें व्याप्त होऊन जाईल ४७. त्याचप्रमाणें प्रलयकाल समीप आला असतां सोळा वर्षें हें आयुष्याचें मोठें प्रमाण होईल आणि ह्यानंतर लोक मृत्यु पावूं लागतील ४८. पांचव्या सहाव्या वर्षी कन्या प्रसूत होऊं लागतील आणि सात आठ वर्षांचे पुरुष

प्रसूयते । सप्तवर्षाष्टवर्षाश्च प्रजास्यन्ति नरास्तदा ४९ पत्यौ स्त्री तु तदा राजन्पुरुषो वा स्त्रियं प्रति । युगान्ते राजशार्दूल न तोषमुपयास्यति ५० अल्पद्रव्या वृथालिङ्गा हिंसा च प्रभविष्यति । न कश्चित्कस्यचिद्दाता भविष्यति युगक्षये ५१ अट्टशूला जनपदाः शिवशूलाश्चतुष्पथाः । केशशूलाः स्त्रियश्चापि भविष्यन्ति युगक्षये ५२ म्लेच्छाचाराः सर्वभक्षा दारुणाः सर्वकर्मसु । भाविनः पश्चिमे काले मनुष्या नात्र संशयः ५३ क्रयविक्रयकाले च सर्वः सर्वस्य वञ्चनम् । युगान्ते भरतश्रेष्ठ वित्तलोभात्करिष्यति ५४ ज्ञानानि चाप्यविज्ञाय करिष्यन्ति क्रियास्तथा । आत्मच्छन्देन वर्तन्ते युगान्ते समुपस्थिते ५५ स्वभावात्क्रूरकर्माणश्चान्योन्यमभिशंसिनः । भवितारो जनाः सर्वे संप्राप्ते तु युगक्षये ५६ आरामांश्चैव वृक्षांश्च नाशयिष्यन्ति निर्व्यथाः । भविता संशयो लोके जीवितस्य हि देहिनाम् ५७ तथा लोभाभिभूताश्च भविष्यन्ति नरा नृप । ब्राह्मणांश्च हनिष्यन्ति ब्राह्मणस्वोपभोगिनः ५८ हाहाकृता द्विजाश्चैव भयार्ता वृषलार्दिताः । त्रातारमलभन्तो वै भविष्यन्ति महीमिमाम् ५९

प्रजोत्पादन करूं लागतील ४९. हे राजा, हे नृपश्रेष्ठा, युगांतसमय प्राप्त झाला असतां स्त्री पतीवर अथवा पति स्त्रीवर संतुष्ट रहाणार नाहीं ५०. थोडक्याशा द्रव्याच्या लोभानें विनाकारण एकमेकाची हिंसा होऊं लागेल आणि युगक्षयसमयीं कोणी कोणाचा दाता होणार नाहीं ५१. लोक अन्नविक्रय करणार निपजून ब्राह्मण वेदविक्रय करणारे निपजतील आणि युगांतसमय प्राप्त झाला असतां स्त्रियाही भगविक्रय करणाऱ्या बनतील ५२. कलियुगाचा अंतकाल प्राप्त झाला असतां लोक म्लेच्छांप्रमाणें वागणार, सर्वभक्षक, आणि कोणत्याही कर्मासंबंधानें क्रूर होतील ह्यांत संशय नाहीं ५३. हे भरतवंशजश्रेष्ठा, युगांतसमय प्राप्त झाला असतां खरेदीविक्रीच्या वेळीं द्रव्यलोभानें जो तो ज्याला त्याला फसवूं लागेल ५४. युगांतकाल प्राप्त झाला असतां लोक जाणण्यास अवश्य असलेलें स्वरूप न जाणतां नुसतीं कर्में करूं लागतील आणि स्वच्छंदानें वागूं लागतील ५५. युगक्षयसमय प्राप्त झाला असतां सर्व लोक स्वाभाविकच क्रूरकर्मी निपजून एकमेकांची निंदा करूं लागतील ५६. लोक निःशंकपणें उपवनांत जाऊन वृक्षांचा नाश करतील आणि जगतामध्यें लोकांचें जीवितही संशयित होऊं लागेल ५७. त्याचप्रमाणें, हे राजा, लोक लोभाविष्ट होतील आणि ब्राह्मणांच्या वित्ताचा उपभोग करणारे बनून ब्राह्मणांचा वध करूं लागतील ५८. शूद्रांनीं पीडा दिल्यामुळें भयभीत झालेल्या द्विजांमध्यें हाहाकार उडून जाईल आणि कोणीही त्राता त्यांना

जीवितान्तकराः क्रूरा रौद्राः प्राणिविहिंसकाः । यदा भविष्यन्ति नरास्तदा संक्षेप्स्यते युगम् ६० आश्रयिष्यन्ति च नदीः पर्वतान्विषमाणि च। प्रधावमाना वित्रस्ता द्विजाः कुरुकुलोद्वह ६१ दस्युभिः पीडिता राजन्काका इव द्विजोत्तमाः । कुराजभिश्च सततं करभारप्रपीडिताः ६२ धैर्यं त्यक्त्वा महीपाल दारुणे युगसंक्षये । विकर्माणि करिष्यन्ति शूद्राणां परिचारकाः ६३ शूद्रा धर्मं प्रवक्ष्यन्ति ब्राह्मणाः पर्युपासकाः । श्रोतारश्च भविष्यन्ति प्रामाण्येन व्यवस्थिताः ६४ विपरीतश्च लोकोयं भविष्यत्यधरोत्तरः । एडूकान्पूजयिष्यन्ति वर्जयिष्यन्ति देवताः ६५ शूद्राः परिचरिष्यन्ति न द्विजान्युगसंक्षये । आश्रमेषु महर्षीणां ब्राह्मणावसथेषु च ६६ देवस्थानेषु चैत्येषु नागानामालयेषु च । एडूकचिह्ना पृथिवी न देवगृहभूषिता ६७ भविष्यति युगे क्षीणे तद्युगान्तस्य लक्षणम् । यदा रौद्रा धर्महीना मांसादाः पानपास्तथा ६८ भविष्यन्ति नरा नित्यं तदा संक्षेप्स्यते युगम् । पुष्पं पुष्पे यदा राजन्फले वा फलमाश्रितम् ६९ प्रजा-

---

मिळेनासा होऊन ते ह्या पृथ्वीवर भटकत फिरूं लागतील ५९. ज्यावेळीं लोक प्राणघातकी, क्रूर, भयंकर कर्म करणारे आणि प्राण्यांची हिंसाच करणारे निपजतील तेव्हां युग समाप्त होईल ६०. हे कुरुवंशजश्रेष्ठा, द्विज त्रस्त होऊन धांवाधांव करूं लागतील आणि नद्या, पर्वत अथवा गहन प्रदेश ह्यांचा आश्रय करूं लागतील ६१. हे राजा, दुष्ट राजांनीं नेहमीं करभारानें जेरीला आणिलेल्या ब्राह्मणांना चोरांपासूनही पीडा होऊं लागेल आणि त्यांना काकपक्ष्यांप्रमाणें नीच वृत्तीवर उपजीविका करण्याचा प्रसंग येईल ६२. हे भूपाला, भयंकर असा युगांतसमय प्राप्त झाला असतां द्विज भलतींच कर्में करू लागून शूद्रांचे सेवक बनतील ६३. शूद्र धर्मशास्त्र सांगूं लागतील आणि ब्राह्मण त्याच्यावर विश्वास ठेवून त्यांचें ऐकूं लागतील व त्यांचे सेवक बनतील ६४. नीच उत्तम गणले जाऊन उत्तमांची गणना नीचांत होऊं लागेल आणि अशा प्रकारें हें जगत् विपरीतच होऊन जाईल व लोक देवता वर्ज्य करून आंत हाडकें ठेवलेल्या थडग्यांचीच पूजा करूं लागतील ६५. युगक्षयसमयीं शूद्र द्विजांची शुश्रूषा करीनासे होतील आणि महर्षींचे आश्रम, ब्राह्मणांचीं वसतिस्थानें ६६, देवस्थानें, होमशाळा आणि नागालयें ह्या सर्व ठिकाणीं पृथ्वी देवालयांनीं भूषित रहाणार नसून युगांतसमय प्राप्त झाला असतां जिकडे तिकडे थडग्यांनीं युक्त होऊन जाईल ६७. सारांश, ते युगांताचें लक्षण होय. जेव्हां लोक नेहमींच क्रूर, धर्महीन, मांसभक्षक आणि मद्यपी बनून रहातील तेव्हां युगाचा अंत होईल. हे राजा, पुष्पावर पुष्प अथवा

स्यति महाराज तदा संक्षेप्स्यते युगम् । अकालवर्षी पर्जन्यो भविष्यति गते युगे ७० अक्रमेण मनुष्याणां भविष्यन्ति तदा क्रियाः । विरोधमथ यास्यन्ति वृषला ब्राह्मणैः सह ७१ मही म्लेच्छजनाकीर्णा भविष्यति ततोचिरात् । करभारभयाद्विप्रा भजिष्यन्ति दिशो दश ७२ निर्विशेषा जनपदास्तथा विष्टिकरार्दिताः । आश्रमानुपलप्स्यन्ति फलमूलोपजीविनः ७३ एवं पर्याकुले लोके मर्यादा न भविष्यति । न स्थास्यन्त्युपदेशे च शिष्या विप्रियकारिणः ७४ आचार्योपनिधिश्चैव भर्त्स्यते तदनन्तरम् । अर्थयुक्त्या प्रवात्स्यन्ति मित्रसंबन्धिबान्धवाः ७५ अभावः सर्वभूतानां युगान्ते संभविष्यति । दिशः प्रज्वलिताः सर्वा नक्षत्राण्यप्रभाणि च ७६ ज्योतींषि प्रतिकूलानि वाताः पर्याकुलास्तथा । उल्कापाताश्च बहवो महाभयनिदर्शकाः ७७ षड्भिरन्यैश्च सहितो भास्करः प्रतपिष्यति । तुमुलाश्चापि निर्ह्रादा दिग्दाहाश्चापि सर्वशः ७८ कबन्धान्तर्हितो भानुरुदयास्तमने तदा । अकालवर्षी भगवान्भविष्यति सहस्रदृक् ७९ सस्यानि च न रोक्ष्यन्ति युगान्ते पर्युपस्थिते ८० अभीक्ष्णं क्रूरवादिन्यः परुषा

फलावर फल जेव्हां ६८,६९ येऊं लागेल तेव्हां, हे महाराजा, युगाचा अंत होईल. युग संपूर्ण होऊं लागलें असतां पर्जन्य वेळेवर पडेनासा होईल ७०. मनुष्यांचे संस्कार क्रमानें होईनासे होतील आणि शूद्र ब्राह्मणांशीं विरुद्ध वागू लागतील ७१. नंतर, लवकरच पृथ्वी म्लेच्छजनानीं व्याप्त होईल आणि करभाराच्या भीतीनें ब्राह्मणही वाट फुटेल तिकडे जाऊं लागतील ७२. लोकांच्या आचारांत भेद नाहीसा होऊन ते वेठीच्या करानें जेरीला येतील आणि फलमूलांवर उपजीविका करूं लागून आश्रमांचें अवलंबन करूं लागतील ७३. ह्याप्रमाणें जगतामध्यें घोंटाळा उडून जाऊन कसलीच मर्यादा रहाणार नाहीं व शिष्यही उपदेशाची पर्वा न बाळगितां गुरूच्या मनाविरुद्ध वागूं लागतील ७४. तदनतर, आचार्यही निर्धन असल्यास निंदेस पात्र होईल आणि द्रव्याच्या योगानें मित्र, सबंधी व बांधव हे परस्परांच्या स्तुतीस पात्र होऊं लागतील ७५. युगांतसमयीं सर्व प्राण्यांचा नाश होईल, सर्व दिशा प्रज्वलित होतील आणि नक्षत्रें निस्तेज होतील ७६. अग्नि प्रतिकूल होईल, वायु क्षुब्ध होतील आणि महाभयसूचक असे पुष्कळच उल्कापात होतील ७७. इतर सहा सूर्यांसहवर्तमान सूर्य सर्व जगत् संतप्त करून टाकील, जिकडे तिकडे लोकांची हवी तितकी आरडाओरड होऊं लागेल आणि सर्व बाजूंनीं दिशांचा दाह होऊं लागेल ७८. उदयास्तसमयीं सूर्याला प्रत्यहीं ग्रहण लागेल आणि भगवान् सहस्रनयन इंद्र वेळेवर,

रुदितप्रियाः । भर्तॄणां वचने चैव न स्थास्यन्ति ततः स्त्रियः ८१ पुत्राश्च मातापितरौ हनिष्यन्ति युगक्षये । सूदयिष्यन्ति च पतीन्स्त्रियः पुत्रानपाश्रिताः ८२ अपर्वणि महाराज सूर्यं राहुरुपैष्यति । युगान्ते हुतभुक्चापि सर्वतः प्रज्वलिष्यति ८३ पानीयं भोजनं चापि याचमानास्तदाध्वगाः । न लप्स्यन्ते निवासं च निरस्ताः पथि शेरते ८४ निर्घातवायसा नागाः शकुनाः समृगद्विजाः । रूक्षा वाचो विमोक्ष्यन्ति युगान्ते पर्युपस्थिते ८५ मित्रसंबन्धिनश्चापि संत्यक्ष्यन्ति नरास्तदा । जनं परिजनं चापि युगान्ते पर्युपस्थिते ८६ अथ देशान्दिशश्चापि पत्तनानि पुराणि च । क्रमशः संश्रयिष्यन्ति युगान्ते पर्युपस्थिते ८७ हा तात हा सुतेत्येवं तदा वाचः सुदारुणाः । विक्रोशमानश्चान्योन्यं जनो गां पर्यटिष्यति ८८ ततस्तुमुलसङ्घाते वर्तमाने युगक्षये । द्विजातिपूर्वको लोकः क्रमेण प्रभविष्यति ८९ ततः कालान्तरेऽन्यस्मिन्पुनर्लोकविवृद्धये । भविष्यति पुनर्दैवमनुकूलं यदृच्छया ९० यदा सूर्यश्च चन्द्रश्च तथा तिष्यबृहस्पती । एकराशौ समे-

---

वृष्टि करीनासा होईल ७९. युगांतसमय प्राप्त झाला असतां धान्यें उगवेनाशीं होतील ८०. स्त्रिया नेहमीं क्रूर व मर्मभेदक भाषण करणाऱ्या व रोदनच प्रिय वाटणाऱ्या निपजून पतींच्या आज्ञेंत राहीनाशा होतील ८१; युगक्षय समीप आला असतां पुत्र मातापितरांचा वध करूं लागतील आणि स्त्रियाही पुत्रांचा आश्रय करून पतींचा वध करूं लागतील ८२. हे महाराजा, पर्व नसतांनाच सूर्याला ग्रहण लागेल आणि युगांतसमयीं अग्निही सर्व बाजूंनीं प्रज्वलित होईल ८३. वाटसरू अन्नपानाची याचना करूं लागतील; त्यांना उतरण्याला जागा मिळेनाशी होईल आणि जागेंतून हांकून लाविल्यामुळें त्यांना मार्गावरच पडण्याची पाळी येईल ८४. हत्तींनाही कावळे टोंचूं लागतील आणि पशुपक्ष्यांसहवर्तमान इतर पक्षीही कर्कश शब्द करूं लागतील ८५. मित्र, संबंधी आणि सेवकजन ह्यांचाही युगांतसमय प्राप्त झाला असतां लोक त्याग करितील ८६ आणि त्याचप्रमाणें युगांतसमय प्राप्त झाला असतां देश, दिशा, शहरें व नगरें ह्यांचा क्रमानें आश्रय करूं लागतील ८७. अरे बाबा, अरे पुत्रा, अशा प्रकारच्या अत्यंत दारुण शब्दांनीं एकमेकाच्या उद्देशानें आक्रोश करीत करीत लोक पृथ्वीवर भटकूं लागतील ८८ आणि नंतर जिकडे तिकडे घोंटाळा उडून युगक्षय झाल्यावर पुनरपि द्विजपूर्वक क्रमाक्रमानें लोकांचा उत्कर्ष होऊं लागेल ८९. तदनंतर, कालांतरानें पुनरपि लोकवृद्धीकरितां आपोआपच दैव पुन्हां अनुकूल होईल ९०. सूर्य, चंद्र आणि बृहस्पति हे एक राशीला येऊन जेव्हां बरोबर पुष्य नक्ष-

ष्यन्ति प्रपत्स्यति तदा कृतम् ९१ कालवर्षी च पर्जन्यो नक्षत्राणि शुभानि च। प्रदक्षिणा ग्रहाश्चापि भविष्यन्त्यनुलोमगाः ९२ क्षेमं सुभिक्ष्यमारोग्यं भविष्यति निरामयम्। कल्की विष्णुयशा नाम द्विजः कालप्रचोदितः ९३ उत्पत्स्यते महावीर्यो महाबुद्धिपराक्रमः। संभूतः संभलग्रामे ब्राह्मणावसथे शुभे ९४ मनसा तस्य सर्वाणि वाहनान्यायुधानि च। उपस्थास्यन्ति योधाश्च शस्त्राणि कवचानि च ९५ स धर्मविजयी राजा चक्रवर्ती भविष्यति। स चेमं संकुलं लोकं प्रसादमुपनेष्यति ९६ उत्थितो ब्राह्मणो दीप्तः क्षयान्तकृदुदारधीः। सङ्क्षेपको हि सर्वस्य युगस्य परिवर्तकः ९७ स सर्वत्रगतान्क्षुद्रान्ब्राह्मणैः परिवारितः। उत्सादयिष्यति तदा सर्वम्लेच्छगणान्द्विजः ९८ [७६३३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि भविष्यकथने नवत्यधिकशततमोऽध्यायः॥ १९०॥

मार्कण्डेय उवाच॥ ततश्चोरक्षयं कृत्वा द्विजेभ्यः पृथिवीमिमाम्। वाजिमेधे महायज्ञैर्विधिवत्कल्पयिष्यति १ स्थापयित्वा च मर्यादाः स्वयं भुवि हिताः शुभाः। वनं पुण्ययशःकर्मा रमणीयं प्रवेक्ष्यति २

झाला येतील तेव्हां कृतयुग होईल ९१. पर्जन्य वेळेवर पडूं लागेल, नक्षत्रें शुभ होतील आणि ग्रहही प्रदक्षणिक व उजूं जाणारे होतील ९२ आणि जिकडे तिकडे क्षेम, सुबत्ता व आरोग्य होऊन रोगांचा नायनाट होईल. कालाची प्रेरणा झाल्यामुळें विष्णुयशा नांवाचा महावीर्यवान्, महाबुद्धिमान् व महापराक्रमी ब्राह्मण संभलग्रामीं शुभ अशा ब्राह्मणकुलामध्यें कल्कीरूपानें अवतीर्ण होईल ९३, ९४ आणि त्यानें मनामध्यें आणिलें असतांच सर्व वाहनें, आयुधें, योद्धे, शस्त्रें आणि कवचें त्याच्यापाशीं येऊन रहातील ९५. तो धर्मविजयी चक्रवर्ती राजा होऊन घोंटाळा उडून गेलेल्या ह्या जगताची नीट व्यवस्था लावील ९६. सारांश, उत्पन्न झालेला तो महावीर्यवान् व देदीप्यमान् ब्राह्मण युगक्षयाचा अंत करील आणि सर्व दुष्टांचा नाश करून युग बदलणारा होईल ९७ आणि ब्राह्मणांनीं परिवेष्टित होऊन तो द्विज सर्वत्र व्यापून राहिलेल्या एकून एक नीच म्लेच्छगणांचा उच्छेद करील ९८. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं भविष्यकथनसंबधीं एकशें नव्वदावा अध्याय समाप्त झाला॥१९०॥

मार्कंडेय सांगतातः—तदनंतर, चोरांचा नाश करून तो द्विज अश्वमेधसंज्ञक महायज्ञामध्यें ही पृथ्वी ब्राह्मणांना यथाविधि अर्पण करील १ आणि वेदविहित शुभ मर्यादा

तच्छीलमनुवर्त्स्यन्ति मनुष्या लोकवासिनः । विप्रैश्चोरक्षये चैव कृते क्षेमं भविष्यति ३ कृष्णाजिनानि शक्तीश्च त्रिशूलान्यायुधानि च । स्थापयन्द्विजशार्दूलो देशेषु विजितेषु च ४ संस्तूयमानो विप्रेन्द्रैर्मानयानो द्विजोत्तमान् । कल्की चरिष्यति महीं सदा दस्युवधे रतः ५ हा मातस्तात पुत्रेति तास्ता वाचः सुदारुणाः । विक्रोशमानान्सुभृशं दस्यून्नेष्यति संक्षयम् ६ ततो धर्मविनाशो वै धर्मवृद्धिश्च भारत । भविष्यति कृते प्राप्ते क्रियावांश्च जनस्तथा ७ आरामाश्चैव चैत्याश्च तडागावसथास्तथा । पुष्करिण्यश्च विविधा देवतायतनानि च ८ यज्ञक्रियाश्च विविधा भविष्यन्ति कृते युगे । ब्राह्मणाः साधवश्चैव मुनयश्च तपस्विनः ९ आश्रमाः सहपाषण्डाः स्थिताः सत्यजनाः प्रजाः । प्ररोहन्ति सर्वबीजानि रोप्यमाणानि चैव ह १० सर्वेष्वृतुषु राजेन्द्र सर्वं सस्यं भविष्यति । नरा दानेषु निरता व्रतेषु नियमेषु च ११ जप्ययज्ञपरा विप्रा धर्मकामा मुदा युताः । पालयिष्यन्ति राजानो धर्मेणेमां वसुन्धराम् १२ व्यवहाररता वैश्या

स्थापित करून पुण्यावह व यशस्कारक कर्म करणारा तो द्विज रम्य वनामध्यें प्रवेश करील २. जगतामध्यें रहाणारे लोक त्याच्याच शीलाचें अनुकरण करितील आणि विप्रांनीं चोरांचा क्षय केला असतां सर्वत्र क्षेम होईल ३. त्रिशूल, आयुधें, कृष्णाजिनें व शक्ति (ह्मणजे अर्थात् ब्राह्मण व क्षत्रिय) ह्यांची जिंकलेल्या देशामध्यें स्थापना करणारा तो विष्णुयशा नांवाचा द्विजश्रेष्ठ ४ द्विजोत्तमांना मान देऊं लागेल आणि श्रेष्ठ श्रेष्ठ ब्राह्मण स्तुति करीत असतांना चोरांच्या वधाविषयीं नेहमीं दक्ष असलेला तो कल्की पृथ्वीवर संचार करीत राहील ५. हे माते, हे तात, हे पुत्रा, अशा प्रकारच्या अत्यंत भयंकर शब्दांनीं एकसारिखा आक्रोश करूं लागलेल्या चोरांचा तो नाश करील ६ आणि ह्याप्रमाणें कृतयुग प्राप्त झालें असतां अधर्माचा नाश व धर्माची वृद्धि होऊं लागून लोकही कर्मे करूं लागतील ७. उपवनें, यज्ञशाला, तडाग, धर्मशाला, नानाप्रकारच्या पुष्करिणी आणि देवालयें होऊं लागतील ८. कृतयुगामध्यें नानाप्रकारचीं यज्ञकर्मे होऊं लागतील आणि ब्राह्मणही साधु निपजून मुनिही तपस्वी होतील ९. आश्रमधर्मानें वागणारे लोक जे पूर्वी युगांतसमयीं पाखंड्यांबरोबर वागूं लागले होते ते व इतरही प्रजाजन सत्यानें चालणारे होतील आणि धान्यें पेरणी होऊं लागलीं असतां उगवूं लागतील १०. हे राजाधिराज, सर्व ऋतूमध्यें सर्व प्रकारचें धान्य होऊं लागेल व लोक दान, व्रतें व नियम ह्यांविषयीं तत्पर होऊन रहातील ११. धर्माचीच इच्छा धरून असलेले आनंदी विप्र जपजाप्य व यज्ञयाग ह्यांविषयीं तत्पर रहातील आणि

भविष्यन्ति कृते युगे । षट्कर्मनिरता विप्राः क्षत्रिया विक्रमे रताः १३ शुश्रूषायां रताः शूद्रास्तथा वर्णत्रयस्य च । एष धर्मः कृतयुगे त्रेतायां द्वापरे तथा १४ पश्चिमे युगकाले च यः स ते संप्रकीर्तितः । सर्वलोकस्य विदिता योगसङ्ख्या च पाण्डव १५ एतत्ते सर्वमाख्यातमतीतानागतं तथा । वायुप्रोक्तमनुस्मृत्य पुराणमृषिसंस्तुतम् १६ एवं संसारमार्गा मे बहुशश्चिरजीविना । दृष्टाश्चैवानुभूताश्च तांस्ते कथितवानहम् १७ इदं चैवापरं भूयः सह भ्रातृभिरच्युत । धर्मसंशयमोक्षार्थं निबोध वचनं मम १८ धर्मे त्वयात्मा संयोज्यो नित्यं धर्मभृतां वर । धर्मात्मा हि सुखं राजन्प्रेत्य चेह च नन्दति १९ निबोध च शुभां वाणीं यां प्रवक्ष्यामि तेनघ । न ब्राह्मणे परिभवः कर्तव्यस्ते कदाचन २० ब्राह्मणः कुपितो हन्यादपि लोकान्प्रतिज्ञया । वैशम्पायन उवाच ॥ मार्कण्डेयवचः श्रुत्वा कुरूणां प्रवरो नृपः २१ उवाच वचनं धीमान्परमं परमद्युतिः । कस्मि-

---

राजे धर्मानें ह्या पृथ्वीचें परिपालन करितील १२. कृतयुगामध्यें वैश्य व्यापाराविषयीं; ब्राह्मण(अध्ययन, अध्यापन, यजन,याजन दान व प्रतिग्रह) ह्या सहा कर्मांचेच ठिकाणीं; क्षत्रिय पराक्रमांविषयीं १३ आणि शूद्र तिन्ही वर्णांच्या शुश्रूषेविषयीं तत्पर होऊन रहातील. असो. कृत, त्रेत, द्वापर आणि शेंवटच्या कलियुगाचा काल ह्यांमध्यें होणारा हा धर्म मीं तुला कथन केला आहे व, हे पांडुपुत्रा, युगांची संख्या सर्व लोकांना विदितच आहे १४. १५. ऋषींनीं प्रशंसा केलेल्या वायुप्रोक्त पुराणाचें[1] स्मरण करून हें सर्व भूत, भविष्य मीं तुला कथन केलें आहे १६. ह्याप्रमाणें ह्या जगताच्या पुष्कळच फेऱ्या मी चिरंजीवी असल्यामुळें पाहिलेल्या आहेत, अनुभविलेल्या आहेत आणि त्याच तुला कथन केल्या आहेत १७. धर्मापासून कधींही च्युत न होणाऱ्या युधिष्ठिरा, धर्मविषयक संशयाची निवृत्ति होण्याकरितां मी करीत असलेलें हें दुसरेंही माझें भाषण तूं भ्रात्यांसहवर्तमान श्रवण कर १८. हे धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ, तूं आपलें मन नेहमीं धर्माकडेच लावीत जा. कारण, हे राजा, धर्मात्मा पुरुष इहलोकीं सुखानें नांदतो. तस्मात्, हे निष्पापा, मी करीत असलेला हा उत्कृष्ट उपदेश तूं श्रवण कर १९. ब्राह्मणाचा अपमान तूं कधींही करूं नकोस. कारण, ब्राह्मण क्रुद्ध झाला असतां प्रतिज्ञेनें त्रैलोक्याचाही नाश करील २०. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें मार्कंडेय मुनींचें भाषण श्रवण करून तो महातेजस्वी

---

१ पुराणें अगदीं अलीकडे झालीं आहेत असें ह्मणणाऱ्यानीं हा श्लोक लक्ष्यांत ठेवण्यासारिखा आहे.

न्धर्मे मया स्थेयं प्रजाः संरक्षता मुने ॥ कथं च वर्तमानो वै न च्यवेयं स्वधर्मतः २२ मार्कण्डेय उवाच ॥ दयावान्सर्वभूतेषु हितो रक्तोनसूयकः २३ सत्यवादी मृदुर्दान्तः प्रजानां रक्षणे रतः । चर धर्मं त्यजाधर्मं पितॄन्देवांश्च पूजय २४ प्रमादाद्यत्कृतं तेभूत्सम्यग्दानेन तज्जय । अलं ते मानमाश्रित्य सततं परवान्भव २५ विजित्य पृथिवीं सर्वां मोदमानः सुखी भव । एष भूतो भविष्यश्च धर्मस्ते समुदीरितः २६ न तेस्त्यविदितं किंचिदतीतानागतं भुवि । तस्मादिमं परिक्लेशं त्वं तात हृदि मा कृथाः २७ प्राज्ञास्तात न मुह्यन्ति कालेनापि प्रपीडिताः । एष कालो महाबाहो अपि सर्वदिवौकसाम् २८ मुह्यन्ति हि प्रजास्तात कालेनापि प्रचोदिताः । मा च तत्र विशङ्काभूद्यन्मयोक्तं तवानघ २९ अशङ्क्यं मद्वचो ह्येतद्धर्मलोपो भवेत्तव । जातोसि प्रथिते वंशे कुरूणां भरतर्षभ ३० कर्मणा मनसा

कुरुवंशजश्रेष्ठ बुद्धिमान् धर्मराजा त्यांना ह्मणाला २१ " हे मुने, प्रजेचें संरक्षण करितांना मीं कोणत्या धर्माचें अवलंबन करावें आणि कशा रीतीनें वागूं लागलों असतां मी स्वधर्मापासून च्युत होणार नाहीं (हें आपण मला कथन करा)" २२. मार्कंडेय ह्मणतातः—प्राणिमात्राविषयीं दयाळू, हितबुद्धि धारण करणारा, अनुरक्त, निर्मत्सर, सत्यवादी, सौम्य, जितेंद्रिय आणि प्रजापालनाविषयीं तत्पर राहून तूं धर्मानें चाल, अधर्माचा त्याग कर, देवांचें व पितरांचें पूजन कर आणि जें कांहीं प्रमादानें झालें असेल तें चांगल्या दानाच्या योगानें पुनरपि प्राप्त करून घे २३,२४. स्वतःविषयींचा अभिमान बाळगण्याची तुला आतां जरूर नाहीं. तूं नेहमीं लोकांच्या तंत्रानें वागत जा आणि सर्व पृथ्वी जिंकून आनंदानें व सुखानें रहा २५. हा भूत व भविष्य धर्म मीं तुला कथन केला आहे आणि ह्या पृथ्वीवरील कोणतेंही भूत, भविष्य तुला अज्ञात नाहीं २६. तस्मात्, बा युधिष्ठिरा, तूं आतां मनामध्यें असा हा खेद करूं नकोस. बा युधिष्ठिरा, समजस लोक जरी कालाच्या तडाक्यांत सांपडले तरी घाबरून जात नाहींत. हे महापराक्रमी युधिष्ठिरा, असा हा (बिकट) काल सर्व देवांनाही आलेला आहे आणि, बा युधिष्ठिरा, कालाची प्रेरणा झाली असतां लोकांनाही कांहीं सुचेनासें होतें २८. सारांश, हे निष्पापा युधिष्ठिरा, मीं जें तुला कथन केलें आहे ह्याविषयीं तूं कसलीही शंका मनामध्यें आणूं नकोस. ह्या माझ्या उपदेशामध्यें संशयाला जागा नाहीं आणि(असें असूनही ह्यासंबंधानें तूं जर कांहीं शंका मनामध्यें आणशील तर) तुझ्या धर्माचा लोप होईल २९. हे भरतवंशजश्रेष्ठा, ज्याअर्थी तूं कुरूंच्या प्रसिद्ध वंशामध्यें जन्माला आलेला आहेस त्याअर्थी कायावाचामनेंकरून मीं सांगितलेल्या ह्या सर्वांचा तूं स्वीकार कर ३०. युधि-

बाधा सर्वमेतत्समाचर । युधिष्ठिर उवाच ॥ यत्त्वयोक्तं द्विजश्रेष्ठ वाक्यं श्रुतिमनोहरम् ३१ तथा करिष्ये यत्नेन भवतः शासनं विभो । न मे लोभोऽस्ति विप्रेन्द्र न भयं न च मत्सरः ३२ करिष्यामि हि तत्सर्वमुक्तं यत्ते मयि प्रभो । वैशम्पायन उवाच ॥ श्रुत्वा तु वचनं तस्य मार्कण्डेयस्य धीमतः ३३ संहृष्टाः पाण्डवा राजन्सहिताः शार्ङ्गधन्वना । विप्रर्षभाश्च ते सर्वे ये तत्रासन्समागताः ३४ तथा कथां शुभां श्रुत्वा मार्कण्डेयस्य धीमतः। विस्मिताः समपद्यन्त पुराणस्य निवेदनात् ३५ [७६६८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि युधिष्ठिरानुशासन एकनवत्यधिकशततमोऽध्यायः ॥ १९१ ॥

वैशम्पायन उवाच ॥ भूय एव ब्राह्मणमहाभाग्यं वक्तुमर्हसीत्यब्रवीत्पाण्डवेयो मार्कण्डेयम् १ अथाचष्ट मार्कण्डेयोऽपूर्वमिदं श्रूयतां ब्राह्मणानां चरितम् २ अयोध्यायामिक्ष्वाकुकुलोद्वहः पार्थिवः परीक्षिन्नाम मृगयामगमत् ३ तमेकाश्वेन मृगमनुसरन्तं मृगो दूरमपाहरत् ४ अध्वनि जातश्रमः क्षुत्तृष्णाभिभूतश्चैकस्मिन्देशे नीलं गहनं वनखण्डमपश्यत् ५ तच्च विवेश ततस्तस्य वनखण्डस्य मध्येऽतीव रमणीयं सरो दृष्ट्वा साश्व एव

ष्ठिर ह्मणताः—हे द्विजश्रेष्ठ, श्रवणेंद्रियाला वेधून टाकणारे जे हे भाषण आपण केलें त्यालाच अनुसरून, हे प्रभो, मी प्रयत्नपूर्वक आपल्या आज्ञेनें वागेन ३१. हे विप्रश्रेष्ठ, लोभ, भय अथवा मत्सर मला नाहीं. ह्यास्तव, हे प्रभो, आपण जे मला सांगितलें तें सर्व मी करीन ३२. वैशंपायन सांगतातः—हे जनमेजयराजा, ह्याप्रमाणें त्या विचारी मार्कंडेय मुनीचें भाषण श्रवण केल्यावर श्रीकृष्णासहवर्तमान असलेले पांडव आणि तेथें जमलेले सर्वही विप्रश्रेष्ठ आनंदित झाले ३३, ३४ व विचारी मार्कंडेयमुनीची ती शुभ कथा श्रवण केल्यावर पुराणाचें ज्ञान झाल्यामुळें त्यांना विस्मय वाटला ३५. ह्याप्रमाणें० महाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं मार्कंडेयमुनींनीं युधिष्ठिराला केलेल्या उपदेशासंबंधी एकशें एक्याण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥१९१॥

वैशंपायन सांगतातः—पांडुपुत्र युधिष्ठिर मार्कंडेय मुनींना ह्मणाला ' आपण आणखीही ब्राह्मणांचें महाभाग्य मला कथन करावें ' १. ह्यावर मार्कंडेयमुनि ह्मणाले ' ब्राह्मणांचें हें अपूर्व चरित्र श्रवण कर २. अयोध्येमध्यें इक्ष्वाकुवंशजश्रेष्ठ असा एक परीक्षित् नांवाचा राजा होता; तो मृगयेला गेला ३ व एका घोड्यानिशीं मृगाच्या मागोमाग जातां जातां मृगानें त्याला दूर नेलें ४. तेव्हां मार्गामध्यें श्रांत होऊन तो राजा क्षुधेनें व तृषेनें व्याकुल झाला असतां एके ठिकाणीं त्याला एक लहानसें नील

व्यगाहत ६ अथाश्वस्तः स बिसमृणालमश्वायाग्रतो निक्षिप्य पुष्करिणीतीरे संविवेश । ततः शयानो मधुरं गीतमशृणोत् ७ स श्रुत्वा चिन्तयन्नेह मनुष्यगतिं पश्यामि कस्य खल्वयं गीतशब्द इति ८ अथापश्यत्कन्यां परमरूपदर्शनीयां पुष्पाण्यवचिन्वतीं गायन्तीं च । अथ सा राज्ञः समीपे पर्यक्रामत् ९ तामब्रवीद्राजा कस्यासि भद्रे का वा त्वमिति सा प्रत्युवाच कन्यास्मीति तां राजोवाचार्थी त्वयाहमिति १० अथोवाच कन्या समयेनाहं शक्या त्वया लब्धुं नान्यथेति राजा तां समयमपृच्छत् । कन्योवाच नोदकं मे दर्शयितव्यमिति ११ स राजा तां बाढमित्युक्त्वा तामुपयेमे कृतोद्वाहश्च राजा परीक्षित्क्रीडमानो मुदा परमया युक्तस्तूष्णीं संगम्य तया सहास्ते १२ ततस्तत्रैवासीने राजनि सेनान्वगच्छत् १३ सा सेनोपविष्टं राजानं परिवार्यातिष्ठत्पर्याश्वस्तश्च राजा तथैव सह शिबिकया प्रायादवघोटितया स स्वं नगरमनुप्राप्य रहसि तया सहास्ते १४

व गहन वन दृष्टीस पडलें ५. त्यांत तो शिरला; तेव्हां त्यामध्यें एक अत्यंत रमणीय सरोवर अवलोकन करून त्यांत त्यानें अश्वासहवर्तमान स्नान केलें ६. नंतर विश्रांति घेतल्यावर कमलाचे देंठ त्यानें अश्वापुढें टाकिले आणि आपण पुष्करिणीच्या तीरावर निजला. तेव्हां तेथें तो पडला असतांना त्याला मधुर गायन ऐकू आलें ७. तें श्रवण करून तो मनामध्यें विचार करू लागला "मनुष्य तर येथें आलेलें कोणी दृष्टीं पडत नाहीं; मग हा गायनाचा ध्वनि कोणाचा असावा"!! ८. ह्याप्रमाणें मनामध्यें चिंतन केल्यानंतर अत्यंत मनोहर अशी एक अविवाहित स्त्री गात गात पुष्पें गोळा करीत असलेली त्यानें अवलोकन केली. तेव्हा तीही राजाच्या समीप येऊ लागली असतां ९ "हे कल्याणि, तू कोणाची व कोण?" असें राजानें तिला विचारिल्यावर ती ह्मणाली "मी कन्या आहें." तेव्हां राजा तिला ह्मणाला "तूं मला हवी आहेस" १०. ह्यावर ती कन्या त्याला ह्मणाली "कांहीं अटीवर मी तुला मिळणें शक्य आहे; अटीवांचून मिळणें शक्य नाहीं." हे ऐकून राजानें तिला अट विचारिली असतां ती कन्या ह्मणाली "मला उदक दाखवितां उपयोगीं नाहीं" ११. ह्यावर 'ठीक आहे' असें राजानें तिला सांगून तिच्याशीं विवाह केला व विवाह केल्यानंतर तो क्रीडा करणारा परीक्षित् राजा अत्यत आनंदित झाला आणि तिच्याशीं गुपचुप समागम करून राहू लागला १२. तेव्हां राजा तेथेंच बसला असतांना सेना तेथें आली १३ आणि तेथें बसलेल्या राजाच्या भोंवतीं गराडा देऊन उभी राहिली. नंतर, श्रमपरिहार झालेला राजाही त्या स्त्रीसहवर्तमान मृदु अस्तरण घातलेल्या पालखींत

तत्राभ्याशस्थोपि कश्चिन्नापश्यदथ प्रधानामात्योभ्याशचरास्तस्य स्त्रियो-
-पृच्छत् १५ किमत्र प्रयोजनं वर्तते इत्यथाब्रुवंस्ताः स्त्रियः १६ अपूर्व-
मिव पश्याम उदकं नात्र नीयत इत्यथामात्योनुदकं वनं कारयित्वोदार-
वृक्षं बहुपुष्पफलमूलं तस्य मध्ये मुक्ताजालमयीं पार्श्वे वापीं गूढां सुधा-
सलिललिप्तां स रहस्युपगम्य राजानमब्रवीत् १७ वनमिदमुदारकं साध्वत्र
रम्यतामिति १८ स तस्य वचनात्तयैव सह देव्या तद्वनं प्राविशत्स कदा-
चित्तस्मिन्कानने रम्ये तयैव स व्यवाहरदथ क्षुत्तृष्णार्दितः श्रान्तोतिमु-
क्तकागारमपश्यत् १९ तत्प्रविश्य राजा सह प्रियया सुधाकृतां विमलां
सलिलपूर्णां वापीमपश्यत् २० दृष्ट्वैव च तां तस्याश्च तीरे सहैव तया
देव्यावातिष्ठत् २१ अथ तां देवीं स राजाब्रवीत्माध्ववतर वापीसलिल-
मिति । सा तद्वचः श्रुत्वावतीर्य वापीं न्यमज्जन्न पुनरुदमज्जत् २२

बसून चालता झाला आणि आपल्या नगरांत गेल्यावर एकांतामध्यें त्या स्त्रीसहवर्तमान बसूं लागला १४. असें चाललें असतां जवळच्याही कोणाला राजा दृष्टीं पडेनासा झाला. हें पाहून राजासमीप जाणाऱ्या स्त्रियांना मुख्य मंत्र्यानें विचारिलें १५ " येथें आतां काय करावें." हें ऐकून घेऊन त्या स्त्रिया ह्मणाल्या १६ " उदक येथें न्यावयाचें नाहीं ही एक अपूर्वच गोष्ट आह्मी पहात आहोंत. " असें स्त्रियांनीं सांगितल्या-नंतर उदकरहित असें एक उपवन मंत्र्यानें तयार करविलें. त्या उपवनांत उत्कृष्ट वृक्ष लाविले; पुष्पें, फळें व मुळें ह्यांची त्यांत समृद्धी केली आणि अमृततुल्य उदकानें परिपूर्ण व मोत्यांच्या जाळ्यानें आच्छादिलेली अशी एक दिस-ण्यांत न येणारी वापी त्या वनांत त्यानें तयार करविली. नंतर राजाची एकांतीं गांठ घेऊन तो मंत्री त्याला ह्मणाला १७ " हें वन उत्कृष्ट आहे; आपण येथें खुशाल क्रीडा करावी " १८. हें त्या मंत्र्याचें भाषण ऐकून घेतल्यावर त्याच राणीला बरो-बर घेऊन राजा त्या उपवनामध्यें प्रविष्ट झाला. एके दिवशीं त्या रमणीय उपवनामध्यें तो राजा तिच्यासहवर्तमान क्रीडा करीत असतांना क्षुधेनें व तृषेनें व्याकुल होऊन श्रांत झाला असतां कस्तुरमोगरीचा एक मंडप त्यानें अवलोकन केला १९. त्यांत त्या प्रियेसहवर्तमान प्रविष्ट झाल्यावर अमृतानेंच भरून काढिलेली कीं काय अशी एक उदकानें भरलेली निर्मल वापी त्यानें अवलोकन केली २० व ती अवलोकन करितां-क्षणीं त्या राणीला बरोबर घेऊनच तो राजा तिच्या तीरीं उभा राहिला २१ आणि त्या राणीला ह्मणाला " वापीच्या उदकामध्यें तूं खुशाल उतर. " हें राजाचें भाषण श्रवण करून ती वापीमध्यें उतरली आणि उतरतांक्षणीं बुडाली ती पुनरपि वर आली

तां स मृगयमाणो राजा नापश्यद्वापीमथ निःस्राव्य मण्डूकं श्वभ्रमुखे दृष्ट्वा क्रुद्ध आज्ञापयामास स राजा २३ सर्वत्र मण्डूकवधः क्रियतामिति यो मयार्थी स मां मृतमण्डूकोपायनमादायोपतिष्ठेदिति २४ अथ मण्डूकवधे घोरे क्रियमाणे दिक्षु सर्वासु मण्डूकान्भयमाविवेश ते भीता मण्डूकराज्ञे यथावृत्तं न्यवेदयन् २५ ततो मण्डूकराट् तापसवेषधारी राजानमभ्यगच्छदुपेत्य चैनमुवाच २६ मा राजन्क्रोधवशं गमः प्रसादं कुरु नार्हसि मण्डूकानामनपराधिनां वधं कर्तुमिति श्लोकौ चात्र भवतः २७ मा मण्डूकाञ्जिघांस त्वं कोपं संधारयाच्युत। प्रक्षीयते धनोद्रेको जनानामविजानताम् २८ प्रतिजानीहि नैतांस्त्वं प्राप्य क्रोधं विमोक्ष्यसि । अलं कृत्वा तवाधर्मं मण्डूकैः किं हतैर्हि ते २९ तमेवंवादिनमिष्टजनशोकपरीतात्मा राजाथोवाच ३० न हि क्षम्यते तन्मया हनिष्याम्येतानेतैर्दुरात्मभिः प्रिया मे भक्षिता सर्व-

---

नाहीं २२. नंतर राजा तिला शोधू लागला असतांनाही जेव्हां तिचा पत्ता लागेना तेव्हां वापीचा उपसा काढून पाहूं लागला तों एका बिळाशीं एक बेडूक त्यानें पाहिला आणि तो दृष्टीं पडतांक्षणीं क्रुद्ध होऊन २३ – सर्व ठिकाणीं बेडुकांचा वध झाला पाहिजे आणि ह्मणूनच माझ्याशीं ज्याचें काम असेल त्यानें मेलेल्या बेडुकाचा नजराणा घेऊन माझ्याकडे आलें पाहिजे – अशी राजानें आज्ञा केली २४. त्याप्रमाणें बेडुकांचा वध करण्याचें घोर काम सुरू झालें असतां चोहोंकडील सर्व बेडुकांना भय उत्पन्न झालें आणि त्या भयभीत झालेल्या सर्व बेडुकांनीं आपल्या राजाला इत्थंभूत वर्तमान कळविलें २५. तदनंतर तापसवेष धारण करून मंडूकराजा राजाकडे गेला आणि जवळ जाऊन त्याला ह्मणाला २६ "हे राजा, क्रोधाधीन होऊं नको, कृपा कर; निरपराधी मंडूकांचा वध करणें तुला योग्य नाहीं" ह्या मंडूकराजाच्या विनंतीसंबंधीं दोन श्लोक प्रसिद्ध आहेत ते येणेंप्रमाणें २७:– नीतीपासून भ्रष्ट न होणाऱ्या राजा, तूं आपला कोप आंवरून धर; बेडुकांची हिंसा करूं नको. अरे, मूढ जनांची धनसमृद्धि नाहींशी होत असते २८. ह्यास्तव, ह्या मंडूकांची गांठ पडली असतां त्यांच्यावर क्रुद्ध होणार नाहींस अशी प्रतिज्ञा कर. सारांश, आजपर्यंत चाललेला हा तुझा अधर्म आतां पुरे. मंडूकांचा वध करून तुला काय मिळणार आहे? २९. ह्याप्रमाणें भाषण करणाऱ्या त्या मंडूकराजाला प्रियपत्नीच्या शोकामुळें अंतःकरण ग्रस्त झालेला राजा ह्मणाला ३० "तें मला सहन होणार नाहीं; मी ह्यांचा वध करीन. ह्याच दुष्टांनीं माझी प्रिया खाऊन टाकिली आहे. ह्यास्तव, सर्व प्रकारांनीं मला मंडू-

थैव मे वध्या मण्डूका नार्हसि विद्वन्मामुपरोद्धुमिति ३१ स तद्वाक्यमुपलभ्य व्यथितेन्द्रियमनाः प्रोवाच प्रसीद राजन्नहमायुर्नाम मण्डूकराजो मम सा दुहिता सुशोभना नाम तस्या हि दौःशील्यमेतद्बहवस्तया राजानो विप्रलब्धाः पूर्वा इति ३२ तमब्रवीद्राजा तयाहमर्थी सा मे दीयतामिति ३३ अथैनां राज्ञे पितादादब्रवीच्चैनामेनं राजानं शुश्रूषस्वेति ३४ स एवमुक्त्वा दुहितरं क्रुद्धः शशाप यस्मात्त्वया राजानो विप्रलब्धा बहवस्तस्मादब्रह्मण्यानि तवापत्यानि भविष्यन्त्यनृतिकत्वात्तवेति ३५ स च राजा तामुपलभ्य तस्यां सुरतगुणनिबद्धहृदयो लोकत्रयैश्वर्यमिवोपलभ्य हर्षेण बाष्पकलया वाचा प्रणिपत्याभिपूज्य मण्डूकराजमब्रवीदनुगृहीतोस्मीति ३६ स च मण्डूकराजो दुहितरमनुज्ञाप्य यथागतमगच्छत् ३७ अथ कस्यचित्कालस्य तस्यां कुमारास्त्रयस्तस्य राज्ञः संबभूवुः शलो दलो बलश्चेति ततस्तेषां ज्येष्ठं शलं समये पिता राज्येभि-

---

कांचा वध कर्तव्य आहे. तस्मात्, हे विद्वन् मला अडथळा करणें तुला योग्य नाहीं " ३१. हें राजाचें भाषण श्रवण केल्यावर त्या मंडूकराजाचीं सर्व इंद्रियें अस्वस्थ झालीं आणि मनामध्यें गोंधळून जाऊन तो ह्मणाला "हे राजा, कृपा कर; मी आयुः नांवाचा मंडूकांचा राजा आहें व माझी ती सुशोभना नांवाची दुहिता होय. पुष्कळच पूर्वींच्या राजांना हिनें फसविलें आहे व हा हिचा दुष्ट स्वभाव आहे" ३२. ह्यावर तो परीक्षित् राजा त्याला ह्मणाला " तिच्याशिवाय राहण्यास मी असमर्थ आहें, ह्यास्तव तिला माझ्या स्वाधीन कर " ३३. ह्याप्रमाणें आज्ञा झाल्यावर पित्यानें तिला राजाच्या स्वाधीन केली आणि " ह्या राजाची शुश्रूषा करीत जा " असेंही त्यानें तिला सांगितलें ३४. ह्याप्रमाणें कन्येला सांगितल्यावर त्यानें क्रुद्ध होऊन तिला शाप दिला कीं, " ज्याअर्थीं तूं पुष्कळ राजांना फसविलें आहेस त्याअर्थीं तुझ्या खोटेपणामुळें ब्राह्मणद्वेष्टीं अपत्यें तुला प्राप्त होतील " ३५. ह्याप्रमाणें ती पुनरपि प्राप्त झाल्यावर राजाला त्रैलोक्याचें आधिपत्य प्राप्त झाल्याप्रमाणें आनंद झाला आणि रतिक्रीडाविषयक गुणांच्या योगानें राजाचें अंतःकरण तिचे ठिकाणीं बंधून गेलें असल्यामुळें आनंदाश्रूनीं तिचा कंठ दाटून येऊन " मजवर अनुग्रह झाला आहे " असें प्रणामपूर्वक तो त्या मंडूकराजाला ह्मणाला असतां ३६ तो मंडूकराज आपल्या कन्येला विचारपूस करून आल्या मार्गानें चालता झाला ३७. कांहीं काल लोटल्यावर त्या राजाला शल दल आणि बल असे तिचे ठिकाणीं तीन पुत्र झाले. तदनंतर शलनामक ज्येष्ठ पुत्राला योग्य कालीं राज्याभिषेक करून तो परीक्षित् राजा तपश्चर्या कर-

षिच्य तपसि धृतात्मा वनं जगाम ३८ अथ कदाचिच्छलो मृगयामनुचरन्मृगमासाद्य रथेनान्वधावत् ३९ सूतं चोवाच शीघ्रं मां वहस्वेति स तथोक्तः सूतो राजानमब्रवीत् ४० न क्रियतामनुबन्धो नैष शक्यस्त्वया मृगोयं ग्रहीतुं यद्यपि ते रथे युक्तौ वाम्यौ स्यातामिति ततोऽब्रवीद्राजा सूतमाचक्ष्व मे वाम्यौ हन्मि च त्वामिति । स एवमुक्तो राजभयभीतः सूतो वामदेवशापभीतश्च सन्नाचख्यौ राज्ञे । ततः पुनः स राजा खड्गमुद्यम्य शीघ्रं कथयस्वेति तमाह हनिष्ये त्वामिति । स तदाह राजभयभीतः सूतो वामदेवस्याश्वौ वाम्यौ मनोजवाविति ४१ अथैनमेवंब्रुवाणमब्रवीद्राजा वामदेवाश्रमं प्रयाहीति स गत्वा वामदेवाश्रमं तमृषिमब्रवीत् ४२ भगवन्मृगो मे विद्धः पलायते संभावयितुमर्हसि वाम्यौ दातुमिति तमब्रवीदृषिर्ददानि ते वाम्यौ कृतकार्येण भवता ममैव वाम्यौ निर्यात्यौ क्षिप्रमिति स च तावश्वौ प्रतिगृह्यानुज्ञाप्य ऋषिं प्रायाद्वामी-

---

ण्याविषयीं मनामध्यें निश्चय करून वनांत चालता झाला ३८. पुढें मृगया करूं लागलेला शल मृग दृष्टीं पडल्यावर रथारूढ होऊन त्याच्या मागोमाग धांवूं लागला ३९ आणि मला सत्वर ने " असें सारथ्याला ह्मणाला. तेव्हां राजानें ह्याप्रमाणें सांगितल्यावर सारथि राजाला ह्मणाला ४० " आपण आग्रह धरूं नका; आपण आपल्या रथाला वामी जरी जोडिलेत तरी सुद्धां हा मृग आपणाला सांपडणें शक्य नाहीं. " ह्यावर " वामी कोठें आहेत ते मला सांग; नाहीं तर मी तुझा वध करीन. " असें राजानें सारथ्याला सांगितलें. परंतु, ह्याप्रमाणें राजानें सांगितल्यामुळें जरी तो राजाच्या भयानें गांगरून गेला तरी वामदेव मुनीच्याही शापाला भिऊन गेल्यामुळें त्यानें राजाला सांगितलें नाहीं. तेव्हां राजानें तरवार उपसली आणि " सत्वर सांग; नाहीं तर तुला ठार मारितो " असें पुनरपि तो त्याला बोलला असतां राजभयानें गांगरून जाऊन " वामदेव मुनीचे वामीसंज्ञक दोन अश्व मनाप्रमाणें वेगवान् आहेत " असें त्यानें राजाला सांगितलें ४१. तेव्हां सारथि ह्याप्रमाणें सांगूं लागला असतां " वामदेवाश्रमाकडे चल " ह्मणून राजानें त्याला हुकूम केला आणि वामदेवाश्रमाला गेल्यावर त्या ऋषींना तो राजा ह्मणाला ४२ " भगवन्, मीं बाण मारिलेला मृग पळून जात आहे; ह्याकरितां, आपण आपले वामीसंज्ञक अश्व मला देण्याचें मनांत आणा." ह्यावर ते ऋषि त्याला ह्मणाले " मी तुला वामी देईन; परंतु, कार्य होतांक्षणीं तूं सत्वर ते मलाच परत दिले पाहिजेस. " असें त्या ऋषींनीं सांगितल्यावर त्यानें त्या अश्वांचा स्वीकार केला आणि ऋषींचा निरोप घेतल्यावर वामी जोडिलेल्या रथांत बसून

प्रयुक्तेन रथेन मृगं प्रतिगच्छंश्चाब्रवीत्सूतमश्वरत्नाविमावयोग्यौ ब्राह्मणानां नैतौ प्रतिदेयौ वामदेवायेत्युक्त्वा मृगमवाप्य स्वनगरमेत्याश्वावन्तःपुरेस्थापयत् ४३ अथर्षिश्चिन्तयामास तरुणो राजपुत्रः कल्याणं पत्रमासाद्य रमते न प्रतिनिर्यातयत्यहो कष्टमिति ४४ स मनसा विचिन्त्य मासि पूर्णे शिष्यमब्रवीत् ४५ गच्छात्रेय राजानं ब्रूहि यदि पर्याप्तं निर्यातयोपाध्यायवाम्याविति स गत्वैवं तं राजानब्रवीत्तं राजा प्रत्युवाच राज्ञामेतद्वाहनमनर्हा ब्राह्मणा रत्नानामेवंविधानां किं ब्राह्मणानामश्वैः कार्यं साधु गम्यताम् ४६ स गत्वैतदुपाध्यायायाचष्ट तच्छ्रुत्वा वचनमप्रियं वामदेवः क्रोधपरीतात्मा स्वयमेव राजानमभिगम्याश्वार्थमचोदयन्न चाददद्राजा ४७ वामदेव उवाच ॥ प्रयच्छ वाम्यौ मम पार्थिव त्वं कृतं हि ते कार्यमाभ्यामशक्यम् । मा त्वावधीद्वरुणो घोरपाशैर्ब्रह्मक्षत्रस्यान्तरे वर्तमानम् ४८ राजोवाच ॥ अनड्वाहौ सुव्रतौ साधुदान्तावेतद्विप्राणां वाहनं

चालता झाला आणि मृगाचा पाठलाग करितां करिता सारथ्याला ह्मणाला "हीं अश्वरत्नें ब्राह्मणांना योग्य नाहींत. ह्यास्तव, हीं वामदेवाला पुनरपि परत द्यावयाचीं नाहींत." असें सारथ्याला सांगून मृग हस्तगत झाल्यावर राजा आपल्या नगराला परत आला आणि त्यानें ते अश्व तसेच अंतःपुरामध्यें ठेविले ४३. इकडे त ऋषि "हा तरुण राजपुत्र चांगलें वाहन प्राप्त झाल्यामुळें चैन करीत आहे आणि अश्व परत देत नाहीं हीं मोठी पंचाईतच झाली आहे" असें चिंतन करूं लागले ४४ आणि मनामध्यें असें चिंतन करून अश्व दिल्याला एक महिना संपूर्ण झाल्यावर ते शिष्याला ह्मणाले ४५ "हे आत्रेया, राजाकडे जा आणि 'काम झालें असल्यास गुरुजींचे वामी अश्व परत कर' असें त्याला सांग." ह्या ऋषीच्या आज्ञेप्रमाणे तो राजाकडे गेला असतां राजानें त्याला उत्तर केलें कीं, "हें राजांचें वाहन आहे; अशा प्रकारच्या रत्नांचा उपभोग घेण्यास ब्राह्मण अयोग्य आहेत. ब्राह्मणांना अश्वांशीं काय कर्तव्य आहे? खुशाल चालता हो" ४६. असें राजानें सांगितल्यावर त्यानें गुरूजींकडे जाऊन त्यांना तें निवेदन केलें असतां ते अप्रिय भाषण श्रवण करून वामदेवमुनींचें मन क्रोधानें व्याप्त झालें व स्वतःच राजाकडे जाऊन त्यांनीं अश्व परत देण्याविषयीं त्याला सांगितलें; परंतु, राजानें ते अश्व त्यांना परत दिले नाहींत ४७. तेव्हां वामदेव ह्मणाले "हे राजा, ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यामध्यें फुटाफुट होण्यास उद्युक्त झालेल्या तुझा घोर पाशांनीं वरुणानें वध करूं नये (अशी इच्छा असल्यास) तूं माझे वामी मला परत दे. ह्यांच्या योगानें तुझें अशक्यही कार्य सिद्धीस गेलें आहे ४८" राजा ह्मणाला

वामदेव । ताभ्यां याहि त्वं यत्र कामो महर्षे च्छंदांसि वै त्वादृशं संव-
हन्ति ४९ वामदेव उवाच ॥ छन्दांसि वै मादृशं संवहन्ति लोकेऽमुष्मि-
न्पार्थिव यानि सन्ति । अस्मिंस्तु लोके मम यानमेतदस्मद्विधानामप-
रेषां च राजन् ५० राजोवाच ॥ चत्वारस्त्वां वा गर्दभाः संवहन्तु श्रेष्ठा-
श्वतर्यो हरयो वातरंहाः । तैस्त्वं याहि क्षत्रियस्यैष वाहो ममैव वाम्यौ न
तवैतौ हि विद्धि ५१ वामदेव उवाच ॥ घोरं व्रतं ब्राह्मणस्यैतदाहुरेत-
द्राजन्यदिहाजीवमानः ५२ अयस्मया घोररूपा महान्तश्चत्वारो वा यातु-
धानाः सुरौद्राः । मया प्रयुक्तास्त्वद्वधमीप्समाना वहन्तु त्वां शितशूला-
श्चतुर्धा ५३ राजोवाच ॥ ये त्वां विदुर्ब्राह्मणं वामदेव वाचा हन्तुं मनसा
कर्मणा वा । ते त्वां सशिष्यमिह पातयन्तु मद्वाक्यनुन्नाः शितशूलासि-

" हे वामदेवमुने, सुलक्षणी आणि फारच गरीब असे बैल ब्राह्मणांचें वाहन होत. ह्यास्तव, आपली इच्छा असेल तिकडे आपण ते बैल जोडून जावें. शिवाय, हे महर्षे, छंदेच आपणासारख्यांना वाहून नेत असतात ४९." वामदेव ह्मणतातः—स्वर्गलोकामध्यें जे छंद आहेत ते माझ्यासारख्याला वाहून नेत असतात; परंतु, इहलोकीं, हे राजा, आह्मासारख्यांचें व इतरांचेंही वाहन हेंच आहे ५०. राजा ह्मणतोः—चार गर्दभ, उत्कृष्ट खेचऱ्या अथवा वायूसारिखे वेगवान् अश्व तुला वाहून नेतील व त्यांनाच जुपून तूं जा; हें वाहन क्षत्रियाचेंच आहे. ह्यास्तव, हे वामी माझेच असून तुझे नव्हेत हें लक्ष्यांत ठेव ५१. वामदेव ह्मणतातः—हे राजा, ब्राह्मणाच्या द्रव्यावर जो उपजीविका करितो त्याचें तें कर्म पातकावह आहे असें ह्मणतात ५२. ह्यास्तव, लोहमय शरीर धारण केल्यासारिखे दृढ, रूपानेंही भयंकर, अत्यंत घोरकर्म करणारे असे चार राक्षस धार लाविलेले शूल हातांमध्यें घेऊन व तुझा वध करण्याची इच्छा धरून व तुझे चार तुकडे करून माझ्या आज्ञेनें चार दिशेस टाकून देतील ५३. राजा ह्मणतोः—हे वामदेवा, कायावाचामनेंकरून माझा वध करण्यास उद्युक्त झालेल्या तुज ब्राह्मणाला जे जाणितील ते माझ्या आज्ञेनें शूल व खड्ग हीं धार लाविलेलीं शस्त्रें

१ प्रजापति छदांना ह्मणाला ' तुह्मी माझे रथ व्हा, ह्मणजे मी तुमच्या योगानें हा मार्ग चालून जाईन. ' असें प्रजापतीनें सांगितल्यावर गायत्री, जगती, उष्णिक्, त्रिष्टुप्, अनुष्टुप्, पंक्ति व बृहती हे छंद सर्व मिळून त्याचा रथ बनले आणि ह्या छंदोरथावर आरूढ होऊन तो चालता झाला....... ह्यास्तव, जो सोमयाग करितो तो ह्या रथावर आरूढ होऊन स्वर्गाला जातो. अशा अर्थाचा मजकूर तैत्तिरीयब्राह्मणांतर्गत पहिल्या अष्टकांतील पंचम प्रपाठकाच्या बाराव्या अनुवाकांत आहे. ह्यावरून सोमयाग करणारे छंदोरथावर आरूढ होऊन स्वर्गाला जात असतात असें सिद्ध होतें.

हस्ताः ५४ वामदेव उवाच ॥ ममैतौ वाम्यौ प्रविगृह्य राजन्पुनर्ददानीति प्रपद्य मे त्वम् । प्रयच्छ शीघ्रं मम वाम्यौ त्वमश्वौ यद्यात्मानं जीवितुं ते क्षमं स्यात् ५५ राजोवाच ॥ न ब्राह्मणेभ्यो मृगया प्रसूता न त्वानुशास्म्य-द्यप्रभृति ह्यसत्यम् । तवैवाज्ञां संप्रणिधाय सर्वां तथा ब्रह्मन्पुण्यलोकं लभेयम् ५६ वामदेव उवाच ॥ नानुयोगा ब्राह्मणानां भवन्ति वाचा राज-न्मनसा कर्मणा वा । यस्त्वेवं ब्रह्म तपसान्वेति विद्वांस्तेन श्रेष्ठो भवति हि जीवमानः ५७ मार्कण्डेय उवाच ॥ एवमुक्ते वामदेवेन राजन्समुत्तस्थू राक्षसा घोररूपाः । तैः शूलहस्तैर्वध्यमानः स राजा प्रोवाचेदं वाक्यमुच्चै-स्तदानीम् ५८ इक्ष्वाकवो यदि ब्रह्मन्दलो वा विधेया मे यदि चेमे विशोऽपि । नोत्स्रक्ष्येऽहं वामदेवस्य वाम्यौ नैवंविधाः कर्मशीला भवन्ति ५९ एवंब्रुव-न्नेव स यातुधानैर्हतो जगामाशु महीं क्षितीशः । ततो विदित्वा नृपतिं निपातितमिक्ष्वाकवो वै दलमभ्यषिञ्चन् ६० राज्ये तदा तत्र गत्वा स

हातांत घेऊन शिष्यांसहवर्तमान तुझाच वध करितील ५४. वामदेव ह्मणतोः—हे राजा, "परत देईन" असें मला कबूल करून तूं हे माझे अश्व घेतले आहेस. ह्यास्तव, आपला जीव जगविणे जर तुला योग्य वाटत असेल तर तू माझे वामी अश्व सत्वर दे ५५. राजा ह्मणतोः— ब्राह्मणापासून मृगया उत्पन्न झालेली नाहीं (अर्थात् ब्राह्मण कधीं हिंसा करीत नाहीत) ह्मणून तू जरी असत्य भाषण करीत आहेस तरी तुला दंड न करितां मी आजपासून तुझी सर्व आज्ञा मान्य करीन आणि, हे ब्रह्मनिष्ठ, मी पुण्यलोक प्राप्त करून घेईन ५६. वामदेव ह्मणतातः—कायावाचामनेकरून ब्राह्मण कधीं दंडास पात्र असें कर्म करीत नाहीं. ह्यास्तव, जो समजस पुरुष ब्राह्मणाची सेवा करितो तो त्या ब्राह्मणचर्यारूप तपश्चर्येच्या योगानें चिरजीवी व श्रेष्ठ होतो (तस्मात्, तू जो अनुग्रह करणार आहेस तो व्यर्थच आहे ५७.) मार्कंडेय ह्मणतातः—हे राजा, ह्याप्रमाणें वामदेवांनीं भाषण केलें असतां भयंकर रूप धारण केलेले राक्षस उत्पन्न झाले आणि हातामध्ये शूल घेऊन राजाला मारू लागले. तेव्हा उच्च स्वरानें तो राजा ह्मणाला ५८ " हे विप्रा, इक्ष्वाकुवंशज, दल आणि हे प्रजाजनही जर माझ्या आज्ञेनें वागणारे आहेत तर तुज वामदेवाचे हे वामी अश्व मी हातचे सोडणार नाहीं. कारण, पराक्रमी पुरुष (प्रतिज्ञा केलेली शेंवटास न नेणारे) अशा प्रकारचे नसतात " ५९. ह्याप्रमाणें भाषण करीत आहे तोंच तो भूपति राक्षसाच्या हातून वध पावून सत्वर पृथ्वीवर पडला . नंतर, राजाचा वध झाल्याचें ऐकून इक्ष्वाकुवंशजांनीं दलाला राज्याभिषेक केला ६०. तेव्हां, त्या ठिकाणीं

विप्रः प्रोवाचेदं वचनं वामदेवः । दलं राजानं ब्राह्मणानां हि देयमेवं राजन्सर्वधर्मेषु दृष्टम् ६१ बिभेषि चेत्त्वमधर्मान्नरेन्द्र प्रयच्छ मे शीघ्रमेवाद्य वाम्यौ । एतच्छ्रुत्वा वामदेवस्य वाक्यं स पार्थिवः सूतमुवाच रोषात् ६२ एकं हि मे सायकं चित्ररूपं दिग्धं विषेणाहर संगृहीतम् । येन विद्धो वामदेवः शयीत संदश्यमानः श्वभिरार्तरूपः ६३ वामदेव उवाच॥ जानामि पुत्रं दशवर्षं तवाहं जातं महिष्यां श्येनजितं नरेन्द्र । तं जहि त्वं मद्वचनात्प्रणुन्नस्तूर्णं प्रियं सायकैर्घोररूपैः ६४ मार्कण्डेय उवाच ॥ एवमुक्तो वामदेवेन राजन्नन्तःपुरे राजपुत्रं जघान । स सायकस्तिग्मतेजा विसृष्टः श्रुत्वा दलस्तत्र वाक्यं बभाषे ६५ राजोवाच ॥ इक्ष्वाकवो हन्त चरामि वः प्रियं निहन्मीमं विप्रमद्य प्रमथ्य । आनीयतामपरस्तिग्मतेजाः पश्यध्वं मे वीर्यमद्य क्षितीशाः ६६ वामदेव उवाच ॥ यस्त्वमेनं सायकं घोररूपं विषेण दिग्धं मम संदधासि । न त्वेतं त्वं शरवर्यं विमोक्तुं संधातुं वा शक्यसे मानवेन्द्र ६७ राजोवाच ॥ इक्ष्वाकवः पश्यत मां गृहीतं न वै

राज्यामध्यें जाऊन ते विप्र वामदेवमुनि दलराजाला ह्मणाले " हे राजा, ब्राह्मणांचें द्रव्य परत दिलें पाहिजे असें सर्व धर्मांमध्यें दृष्टीं पडतें ६१. तस्मात्, हे राजा, तूं जर अधर्माची भीति बाळगीत असलास तर माझे वामी अश्व आजच मला सत्वर परत दे ". ह्याप्रमाणें वामदेव मुनींचें भाषण श्रवण केल्यावर तो राजा रागारागानें सारथ्याला ह्मणाला ६२ " विषलिप्त आणि अद्भुत असा एक ठेवींपैकीं बाण तूं मला आणून दे ह्मणजे त्या बाणानें वामदेव विद्ध झाला असतां दुःखाकुल होऊन पडेल आणि कुत्रीं त्याचे लचके तोडूं लागतील " ६३. वामदेव ह्मणतात:—हे राजा, तुझ्या राणीच ठिकाणीं झालेला श्येनजित् ह्मणून एक दहा वर्षांचा पुत्र तुला असल्याचें मी जाणीत आहें. तस्मात्, माझ्या आज्ञेवरून तूं आपल्या त्या प्रिय पुत्राचाच भयंकर बाणानीं सत्वर वध करशील ६४. मार्कंडेय सांगतातः—हे धर्मराजा, ह्याप्रमाणें वामदेव मुनींनीं त्या विषलिप्त बाणाला अनुलक्षून भाषण केलें असतां राजानें सोडिलेल्या त्या प्रचंड तेजस्वी बाणानें अंतःपुरामध्ये जाऊन राजपुत्राचा वध केला व तें ऐकून दलराजा ह्मणाला ६५ " हे इक्ष्वाकुवंशजहो, आज मी तुमचा मनोरथ परिपूर्ण करितों; ह्या ब्राह्मणाला जेरीस आणा, मी आज ह्याचा वध करितों. ह्यास्तव, दुसरा एक प्रचंड तेजस्वी बाण घेऊन या आणि, हे भूपालहो, आज माझें सामर्थ्य अवलोकन करा " ६६. वामदेव ह्मणतातः—हे राजा, तू जो हा विषलिप्त घोर बाण माझ्यावर सोडण्याकरितां धनुष्याला लावणार आहेस तो तुला माझ्यावर सोडितां येणा-

शक्तोम्येष शरं विमोक्तुम् । न चास्य कर्तुं नाशमभ्युत्सहामि आयुष्मान्वै जीवतु वामदेवः ६८ वामदेव उवाच ॥ संस्पृश्यैनां महिषीं सायकेन ततस्तस्मादेनसो मोक्ष्यसे त्वम् । ततस्तथा कृतवान्पार्थिवस्तु ततो मुनिं राजपुत्री बभाषे ६९ राजपुत्र्युवाच ॥ यथायुक्ता वामदेवाहमेनं दिने दिने संदिशन्ती नृशंसम् । ब्राह्मणेभ्यो मृगयती सूनृतानि तथा ब्रह्मन्पुण्यलोकं लभेयम् ७० वामदेव उवाच ॥ त्वया त्रातं राजकुलं शुभेक्षणे वरं वृणीष्वाप्रतिमं ददानि ते । प्रशाधीमं स्वजनं राजपुत्रि इक्ष्वाकुराज्यं सुमहच्चाप्यनिन्द्ये ७१ राजपुत्र्युवाच ॥ वरं वृणे भगवंस्त्वेवमेष विमुच्यतां किल्बिषादद्य भर्ता । शिवेन चाध्याहि सपुत्रबान्धवं वरो वृतो ह्येष मया द्विजाग्र्य ७२ मार्कण्डेय उवाच ॥ श्रुत्वा वचः स मुनी राजपुत्र्यास्तथास्त्विति प्राह कुरुप्रवीर । ततः स राजा मुदितो बभूव वाम्यौ चास्मै प्रददौ संप्रणम्य ७३ [७७४१] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्क-

---

नाहीं. इतकेंच नव्हे; परंतु, तो नुसता धनुष्याला लावण्यासही तूं समर्थ होणार नाहींस ६७. राजा ह्मणाला " हे इक्ष्वाकुवंशजहो , माझ्याकडे पहा; मी हा हातांत घेतलेला बाण सोडण्यास असमर्थ आहे. तस्मात्, ह्याचा नाश करण्याची आतां मला इच्छा नाहीं. हा दीर्घायु वामदेव कायम राहो ६८. वामदेव ह्मणतातः--(हे राजा,) तूं ह्या बाणानें आपल्या ह्या राणीला स्पर्श कर ह्मणजे (ब्रह्महत्या करण्याच्या निश्चयामुळें) घडलेल्या त्या पातकापासून तूं मुक्त होशील. " असें मुनींनीं सांगितल्यावर राजानें तसें केलें. तव्हां राजकन्या वामदेवमुनींशीं संभाषण करूं लागली ६९. राजकन्या ह्मणतेः—हे ब्रह्मनिष्ठ वामदेवमुने, पुण्यलोकाची प्राप्ति व्हावी एतदर्थ ब्राह्मणांची शुश्रूषा करण्याची इच्छा धरून मी ह्या दुष्ट भर्त्याची गांठ पडली कीं ह्याच्याशीं कल्याणकारक भाषणें प्रत्यहीं करणारी आहें ७०. वामदेव ह्मणतातः—हे सुलोचने, तूं ह्या राजकुलाचा उद्धार केला आहेस. ह्यास्तव, वर माग; मी तुला अप्रतिम वर देतों. हे निर्दोष राज्यकन्ये, ह्या आपल्या पतीला तूं ताब्यात ठेवून अतिप्रचंड इक्ष्वाकुराज्यावरही अंमल चालविशील ७१. राजकन्या ह्मणतेः—हे भगवन्, मी ह्याप्रमाणें वर मागत आहें कीं, " हा माझा भर्ता आज पातकापासून मुक्त व्हावा आणि पुत्र व बांधव ह्यांसहवर्तमान आपण ह्याचें कल्याण चिंतीत असावें ". हा वर, हे द्विजश्रेष्ठ मीं मागितला आहें ७२. मार्कंडेय सांगतातः—हे कुरुवंशजश्रेष्ठा धर्मराजा, हें राजकन्येचें भाषण श्रवण केल्यावर त्या मुनींनीं " तथास्तु " असें ह्मटलें. नंतर तो राजा आनंदित झाला व त्यानें प्रणामपूर्वक ते वामी अश्व वामदेव मुनींना परत दिले ७३.

ण्डेयसमास्यापर्वणि मण्डूकोपाख्याने द्विनवत्यधिकशततमोऽध्यायः॥१९२॥

वैशम्पायन उवाच ॥ मार्कण्डेयमृषयो ब्राह्मणा युधिष्ठिरश्च पर्यपृच्छन्नृषिः केन दीर्घायुरासीद्बको मार्कण्डेयस्तु तान्सर्वानुवाच १ महातपा दीर्घायुश्च बको राजर्षिर्नात्र कार्या विचारणा २ एतच्छ्रुत्वा तु कौन्तेयो-भ्रातृभिः सह भारत । मार्कण्डेयं पर्यपृच्छद्धर्मराजो युधिष्ठिरः ३ बक-दाल्भ्यौ महात्मानौ श्रूयेते चिरजीविनौ । सखायौ देवराजस्य तावृषी लोकसंमतौ ४ एतदिच्छामि भगवन्बकशक्रसमागमम् । सुखदुःखसमायुक्तं तत्त्वेन कथयस्व मे ५ मार्कण्डेय उवाच ॥ वृत्ते देवासुरे राजन्सङ्ग्रामे लोमहर्षणे । त्रयाणामपि लोकानामिन्द्रो लोकाधिपोऽभवत् ६ सम्यग्वर्षति पर्जन्ये सस्यसंपद उत्तमाः । निरामयाः सुधर्मिष्ठाः प्रजा धर्मपरायणाः ७ मुदितश्च जनः सर्वः स्वधर्मेषु व्यवस्थितः । ताः प्रजा मुदिताः सर्वा दृष्ट्वा बलनिषूदनः ८ ततस्तु मुदितो राजन्देवराजः शतक्रतुः । ऐरावतं समास्थाय ताः पश्यन्मुदिताः प्रजाः ९ आश्रमांश्च विचित्रांश्च नदीश्च विविधाः

ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं मंडूकोपाख्यानाविषयीं एकशें ब्याण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥१९२॥

वैशंपायन सांगतातः—ऋषि, ब्राह्मण व युधिष्ठिर ह्या सर्वांनीं मिळून " कशामुळें बकऋषि दीर्घायु झाले " असा प्रश्न मार्कंडेय मुनींना केला असतां मार्कंडेयमुनि त्या सर्वांना ह्मणाले १ " दीर्घायु बकराजर्षि महातपस्वीच होते ह्याविषयीं संशय घेण्याचें कारण नाहीं " २. हें ऐकून, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, भ्रात्यांसहवर्तमान कुंतीपुत्र धर्मराज युधिष्ठिर मार्कंडेयमुनींना ह्मणाला ३ " ते महात्मे, बकदाल्भ्यमुनि चिरजीवी, इंद्रमित्र आणि जगन्मान्य ह्मणून आमच्या एकण्यांत आहेत ४. तस्मात्, हे भगवन्, बक व इंद्र ह्यांचा समागम कसा झाला व त्या समागमापासून त्यांना काय सुखदुःख झालें हें श्रवण करण्याची माझी इच्छा आहे. ह्यास्तव, आपण मला तत्त्वतः कथन करा " ५. मार्कंडेय ह्मणतातः—हे राजा, शरीरावर रोमांच उठविणारें देव दैत्यांतील युद्ध समाप्त झाल्यावर इंद्र त्रैलोक्याचा अधिपति झाला ६; पर्जन्यवृष्टि चांगली होऊं लागल्यामुळें धान्यसमृद्धि उत्कृष्ट होऊन धर्मावलंबी प्रजाही अत्यंत धर्मिष्ठ व निरोगी झाल्या ७ आणि सर्व लोक आनंदित होऊन आपआपल्या धर्माचेच अवलंबन करून राहूं लागले. तेव्हां त्या सर्व प्रजा आनंदित झालेल्या अवलोकन करून बलदैत्यघातक ८ देवराज इंद्रही आनंदित झाला आणि ऐरावतावर आरूढ होऊन त्या आनंदित झालेल्या प्रजा अवलोकन करण्याकरितां ९ विचित्र आश्रम,

शुभाः । नगराणि समृद्धानि खेटाञ्जनपदांस्तथा १० प्रजापालनदक्षांश्च नरेन्द्रान्धर्मचारिणः । उदपानं प्रपावापीतडागानि सरांसि च ११ नाना- ब्रह्मसमाचारैः सेवितानि द्विजोत्तमैः । ततोवतीर्य रम्यायां पृथ्व्यां राज- ञ्छतक्रतुः १२ तत्र रम्ये शिवे देशे बहुवृक्षसमाकुले । पूर्वस्यां दिशि रम्यायां समुद्राभ्याशतो नृप १३ तत्राश्रमपदं रम्यं मृगद्विजनिषेवितम् । तत्राश्रमपदे रम्ये बकं पश्यति देवराट् १४ बकस्तु दृष्ट्वा देवेन्द्रं दृढं प्रीतमना- भवत् । पाद्यासनार्घदानेन फलमूलैरथार्जयत् १५ सुखोपविष्टो वरदस्ततस्तु बलसूदनः । ततः प्रश्नं बकं देव उवाच त्रिदशेश्वरः १६ शतं वर्षसहस्राणि मुने जातस्य तेनघ । समाख्याहि मम ब्रह्मन्किं दुःखं चिरजीविनाम् १७ बक उवाच ॥ अप्रियैः सह संवासः प्रियैश्चापि विना भवः । असद्भिः संप्रयोगश्च तद्दुःखं चिरजीविनाम् १८ पुत्रदारविनाशोत्र ज्ञातीनां सुहृदामपि । परेष्वायत्तता कृच्छ्रं किं नु दुःखतरं ततः १९ नान्यद्दुःखतरं किंचिल्लोकेषु प्रतिभाति मे । अर्थैर्विहीनः पुरुषः परैः संपरिभूयते २०

नानाप्रकारच्या शुभ नद्या, संपन्न नगरें, खेडीं, देश १०, प्रजापालनाविषयीं दक्ष व धर्माला अनुसरून वागणारे राजे, विहिरी, पाणपोई, वापी, तडाग आणि नानाप्रकाचे वेदपठण करणाऱ्या द्विजश्रेष्ठांनीं आश्रय केलेलीं सरोवरें हिंडत हिंडत गेल्यावर, हे प्रजापालका राजा, रम्य पृथ्वीवर रमणीय अशा पूर्वदिशेस समुद्राचे जवळच असलेल्या एका रमणीय, पुण्यकारक व अनेक प्रकारच्या वृक्षांनीं गजबजलेल्या प्रदेशावर पशु- पक्ष्यांनीं सेवित अशा एका मनोहर आश्रमामध्यें उतरून देवराज इंद्र पाहूं लागला असतां त्या रम्य आश्रमामध्यें बकमुनि त्याच्या दृष्टीं पडले ११,१२,१३,१४. असो. देवराज इंद्राला अवलोकन करितांक्षणीं बकमुनींच्या मनाला अतिशय आनंद झाला आणि पाद्य, आसन, अर्घ्य, फलें व मुळें ह्यांच्या योगानें त्या मुनींनीं त्याचें आदरा- तिथ्य केलें १५. तदनंतर मागितलेलें देणारा बलदैत्यघातक स्वर्गाधिपति इंद्रदेव स्वस्थ बसल्यावर बकमुनींना प्रश्न करूं लागला १६. कीं, हे निष्पाप मुने, आपणाला जन्मास येऊन शंभर हजार वर्षें झालीं. तस्मात्, हे ब्रह्मनिष्ठ, चिरजीवी लोकांना काय दुःख होत असतें हें आपण मला कथन करा " १७. बक ह्मणतातः— अप्रिय गोष्टींची प्राप्ति प्रिय गोष्टींचा वियोग आणि दुष्टांशीं प्रसंग हे चिरंजीवी लोकांना (भोगावे लागणारें) दुःख असून १८ पुत्र, स्त्री, ज्ञाति आणि सुहृद् ह्यांचा नाश व पराधीनता हीही प्राप्त होत असतात. तेव्हां ह्यापेक्षां अधिक दुःखकारक संकट तें कोणतें ? १९. पुरुष द्रव्यहीन झाला असतां त्याला शत्रु ग्रासून टाकितात ह्यापेक्षां त्रैलोक्या-

अकुलानां कुले भावं कुलीनानां कुलक्षयम् । संयोगं विप्रयोगं च पश्यन्ति चिरजीविनः २१ अपि प्रत्यक्षमेवैतत्तव देव शतक्रतो । अकुलानां समृद्धानां कथं कुलविपर्ययः २२ देवदानवगन्धर्वमनुष्योरगराक्षसाः । प्राप्नुवन्ति विपर्यासं किं नु दुःखतरं ततः २३ कुले जाताश्च क्लिश्यन्ते दौष्कुलेयवशानुगाः । आढ्यैर्दरिद्रावमताः किं नु दुःखतरं ततः २४ लोके वैधर्म्यमेतत्तु दृश्यते बहुविस्तरम् । हीनज्ञानाश्च दृश्यन्ते क्लिश्यन्ते प्राज्ञकोविदाः । बहुदुःखपरिक्लेशं मानुष्यमिह दृश्यते २५ इन्द्र उवाच ॥ पुनरेव महाभाग देवर्षिगणसेवित । समाख्याहि मम ब्रह्मन्किं सुखं चिरजीविनाम् २६ बक उवाच ॥ अष्टमे द्वादशे वापि शाकं यः पचते गृहे । कुमित्राण्यनपाश्रित्य किं वै सुखतरं ततः २७ यत्राहानि न गण्यन्ते नैनमाहुर्महाशनम् । अपि शाकम्पचानस्य सुखं वै मघवन्गृहे २८ अर्जितं स्वेन वीर्येण नाप्यपाश्रित्य कंचन । फलशाकमपि श्रेयो भोक्तुं

मध्यें मला कांहींही अधिक दुःखदायक वाटत नाहीं २०. कुलहीनांचें कुलीनत्व कुलीनांचा कुलक्षय, संयोग आणि वियोग हे प्रकार चिरंजीवी लोकांना पहावे लागत असतात २१. हे देवा इंद्रा, कुलहीन लोक समृद्ध बनून त्यांच्या कुलाची उलटापालट कशी होत असते हें तुझ्याही प्रत्यक्ष दृष्टीं पडत आहे २२. देव, दानव, गंधर्व, मनुष्य, उरग व राक्षस ह्यांना विपरीत स्थिति प्राप्त होत असते तेव्हां ह्यापेक्षां दुःखदायक तें काय आहे ? २३. कुलीन लोकांना कुलहीनाच्या अधीन होऊन राहणें भाग पडत असल्यामुळें क्लेश होत असतात आणि सधन लोक दरिद्र्यांचा अवमान करीत असतात ह्यापेक्षां अधिक दुःखदायक तें काय आहे? २४. ज्ञानहीन लोक सुखी दिसत असून ज्ञानी व चतुर लोकांना क्लेश होत असतात. हा विपरीत प्रकार जगतामध्यें फारच दृष्टीस पडतो आणि ह्या जगतामध्यें मनुष्यांना फारच दुःख व क्लेश होत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें २५. इंद्र ह्मणतोः—हे देवगणांना व ऋषिगणांना मान्य आणि महाभाग्यवान् ब्रह्मनिष्ठ मुने, चिरजीवी लोकांना काय सुख होत असतें हें आतां आपण मला कथन करा २६. बक ह्मणतातः—दुष्ट मित्रांचा आश्रय न करितां आठ दिवसांनीं अथवा बारा दिवसांनींही एक वेळ घरामध्यें भाजीपाला उकडण्याचा प्रसंग येतो ह्यापेक्षां अधिक सुखदायक असें कांहीं नाहीं २७. हे इंद्रा, आपल्या घरामध्यें नुसती भाजी उकडून ही उपजीविका करणाऱ्या (चिरजीवी) पुरुषाला सुख होत असतें. कारण, त्याला कोणी पुष्कळ खाणारा ह्मणत नाहींत आणि दिवस किती गेले ह्याची ही तो कधीं गणणा करीत नाहीं २८. कोणावरही अवलंबून न राहतां

ह्यकृपणं गृहे २९ परस्य तु गृहे भोक्तुः परिभूतस्य नित्यशः। सुमृष्टमपि न श्रेयो विकल्पोयमतः सताम् ३० श्ववत्कीलालपो यस्तु परान्नं भोक्तुमिच्छति। धिगस्तु तस्य तद्भुक्तं कृपणस्य दुरात्मनः ३१ यो दत्त्वातिथिभूतेभ्यः पितृभ्यश्च द्विजोत्तमः। शिष्टान्यन्नानि यो भुङ्क्ते किं वै सुखतरं ततः ३२ अतो मृष्टतरं नात्यत्पूतं किंचिच्छतक्रतो। दत्त्वा यस्त्वतिथिभ्यो वै भुङ्क्ते तेनैव नित्यशः ३३ यावतो ह्यन्धसः पिण्डानश्नाति सततं द्विजः। तावतां गोसहस्राणां फलं प्राप्नोति दायकः ३४ यदेनो यौवनकृतं तत्सर्वं नश्यते ध्रुवम् ३५ सदक्षिणस्य भुक्तस्य द्विजस्य तु करे गतम्। यद्वारि वारिणा सिञ्चेत्तद्ध्येनस्तरते क्षणात् ३६ एताश्चान्याश्च वै बह्वीः कथयित्वा कथाः शुभाः। बकेन सह देवेन्द्र आपृच्छ्य त्रिदिवं गतः ३७ [७७७८] इति श्रीमहाभारते० पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि ब्राह्मणमहाभाग्ये बकशक्रसंवादे त्रिनवत्यधिकशततमोध्यायः॥ १९३॥

स्वपराक्रमानें मिळविलेलें फल अथवा भाजीपाला ही संतोषानें घरामध्यें खाणें श्रेयस्कर आहे २९. नेहमीं अपमान सोसून दुसऱ्याचे घरीं जेवीत रहाणाऱ्याला चांगलें पक्वान्नही श्रेयस्कर होत नाहीं. ह्यास्तव सज्जनांचा ह्यासंबंधानें मतभेद आहे ३०. कुत्र्याप्रमाणें परान्नावर उपजीविका करण्याची जो इच्छा करितो तो रक्त प्राशन करणारा समजावा. तस्मात्, त्या दुरात्म्या कृपणाच्या त्या परान्नभोजनाला धिक्कार असो ३१. अतिथि, अन्नार्थीप्राणी आणि पितर ह्यांना अर्पण करून अवशिष्ट राहिलेलीं अन्नें जो द्विजश्रेष्ठ भक्षण करितो त्यापेक्षां अधिक श्रेष्ठ काय आहे? ३२. हे इंद्रा, अतिथींना अर्पण करून अवशिष्ट राहिलेल्याच अन्नावर उपजीविका करणें ह्यापेक्षां अधिक स्वादिष्ट व पवित्र असें दुसरें कांहीं एक नाहीं ३३. ब्राह्मण नेहमीं जितके अन्नाचे ग्रास भक्षण करितो तितक्या हजार गोप्रदानांचें फल अन्न देणाऱ्याला प्राप्त होत असतें ३४ आणि यौवनामध्यें हातून घडलेलें सर्वही पातक निःसंशय नाहींसें होतें ३५. दक्षिणेसहवर्तमान भोजन मिळालेल्या ब्राह्मणांचे हातामध्यें असलेलें जें उदक त्या उदकाचें सिंचन शरीरावर झालें असतां दात्याचें पातक तत्क्षणीं नाहींसें होतें ३६. ह्या व अशाच प्रकारच्या पुष्कळ शुभ गोष्टी बक मुनींसहवर्तमान बोलून व त्यांचा निरोप घेऊन देवराज इंद्र स्वर्गाला गेला ३७. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं बक व इंद्र ह्यांच्या संवादाविषयीं एकशें त्र्याण्णवावा अध्याय सामाप्त झाला॥ १९३॥

वैशम्पायन उवाच ॥ ततः पाण्डवाः पुनर्मार्कण्डेयमूचुः १ कथितं ब्राह्मणमहाभाग्यं राजन्यमहाभाग्यमिदानीं शुश्रूषामह इति तानुवाच मार्कण्डेयो महर्षिः श्रूयतामिति इदानीं राजन्यानां महाभाग्यमिति ॥ कुरूणामन्यतमः सुहोत्रो नाम राजा महर्षीनभिगम्य निवृत्य रथस्थमेव राजानमौशीनरं शिबिं ददर्शाभिमुखं तौ समेत्य परस्परेण यथावयः पूजां प्रयुज्य गुणसाम्येन परस्परेण तुल्यात्मानौ विदित्वान्योन्यस्य पन्थानं न ददतुस्तत्र नारदः प्रादुरासीत्किमिदं भवन्तौ परस्परस्य पन्थानमावृत्य तिष्ठत इति २ तावूचतुर्नारदं नैतद्भगवन्पूर्वकर्मकर्त्रादिभिर्विशिष्टस्य पन्था उपदिश्यते समर्थाय वा आवां च सख्यं परस्परेणोपगतौ तच्चावधानतोत्युत्कृष्टमधरोत्तरं परिभ्रष्टम् । नारदस्त्वेवमुक्तः श्लोकत्रयमपठत् ३ क्रूरः कौरव्य मृदवे मृदुः क्रूरे च कौरव । साधुश्चासाधवे साधुः साधवेनाप्नुयात्कथम् ४ कृतं शतगुणं कुर्यान्नास्ति देवेषु निर्णयः । औशीनरः

वैशंपायन सांगतातः—तदनंतर पांडव पुनरपि मार्कंडेयमुनींना ह्मणाले १ " आपण ब्राह्मणांचें महाभाग्य कथन केलें; आतां क्षत्रियांचें माहात्म्य श्रवण करण्याची आमची इच्छा आहे. " ह्याप्रमाणें ते बोलले असतां मार्कंडेय महर्षि त्यांना ह्मणाले " आतां क्षत्रियांचें माहात्म्य श्रवण करा. कुरुवंशजांपैकीं सुहोत्र नांवाचा एक राजा महर्षीकडे जाऊन परत फिरला असतां समोरून रथांत बसून येत असलेला उशीनरपुत्र शिबि राजा त्यानें अवलोकन केला. ह्याप्रमाणें एकमेकांची भेट होऊन त्यांनीं वयोमानाला अनुसरून एकमेकांची पूजा केली आणि दोघांच्याही ठिकाणीं गुणांचें साम्यच असल्यामुळें एकमेकांची बरोबरीच आहे असें जाणून कोणीच कोणाला वाट सोडीना. तेव्हां, नारदमुनि तेथें प्रकट झाले आणि " अरे, तुह्मी एकमेकांचा मार्ग आडवून उभे राहिला आहां हें काय ? " असें त्यांना विचारूं लागले असतां २ ते नारदमुनींना ह्मणाले " वाट सोडणें ही गोष्ट कधीं होणार नाहीं. कारण, पूर्वीं होऊन गेलेल्या पराक्रमी वगैरे लोकांनीं आपणापेक्षां श्रेष्ठ अथवा बलाढ्य जो असेल त्याला वाट सोडावी असें सांगितलेलें आहे आणि आह्मीं तर एकमेकांशीं अत्युत्कृष्ट सख्य जोडिलें आहे. ह्यामुळें विचार करून पाहिलें असतां आह्मां उभयतांमध्यें योग्यतेसंबंधानें कमजास्तपणा आतां मुळींच राहिलेला नाहीं ". असें त्यांनीं सांगितलें असतां नारदमुनींनीं तीन श्लोक ह्मणून दाखविले ३. हे कुरुवंशजश्रेष्ठा कुरुकुलोत्पन्ना सुहोत्रराजा, सौम्यजनाशीं क्रूर व क्रूरजनाशीं सौम्य रहाणें हें दुर्वर्तन योग्य नाहीं; परंतु, सज्जनाशीं व दुर्जनाशींही चांगुलपणानें वागणें हें सद्वर्तन मनुष्यानें कां बरें प्राप्त करून

साधुशीलो भवतो वै महीपतिः ५ जयेत्कदर्यं दानेन सत्येनानृतवादिनम्। क्षमया क्रूरकर्माणमसाधुं साधुना जयेत् ६ तदुभावेव भवन्तावुदारौ यं इदानीं भवद्भ्यामन्यतमः सोपसर्पतु एतद्वै निदर्शनमित्युक्त्वा तूष्णीं नारदो बभूव। एतच्छ्रुत्वा तु कौरव्यः शिबिं प्रदक्षिणं कृत्वा पन्थानं दत्त्वा बहु-कर्मभिः प्रशस्य प्रययौ ७ तदेतद्राज्ञो महाभाग्यमप्युक्तवान्नारदः ८ [७७८६]इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहि०मारण्यके पर्वणि मार्कण्डे-यसमास्यापर्वणि शिबिचरिते चतुर्नवत्यधिकशततमोऽध्यायः॥ १९४ ॥

मार्कण्डेय उवाच॥ इदमन्यच्छ्रूयतां ययातिर्नाहुषो राजा राज्यस्थः पौरजनावृत आसाश्चक्रे। गुर्वर्थी ब्राह्मण उपेत्याब्रवीद्भो राजन्गुर्वर्थं भिक्षेयं समयादिति राजोवाच १ ब्रवीतु भगवान्समयमिति २ ब्राह्मण उवाच॥ विद्वेषणं परमं जीवलोके कुर्यान्नरः पार्थिव याच्यमानः। तं

घेऊ नये? ४. सज्जन आपल्यावर झालेला उपकार शंभरपट मोठा करून दाखवीत असतात. तेव्हां तुह्मां उभयतांमध्यें श्रेष्ठ कोण ह्याविषयीं स्वर्गनिवासी लोकांमध्यें कांहींच निर्णय झालेला नाहीं. तथापि, उशीनरपुत्र शिबिराजा जन्मतःच सच्छील आहे (असं मला वाटतें) ५. कृपणाला दानानें जिंकावें, अनृत भाषण करणाऱ्याला सत्यानें जेरीस आणावें, क्रूरकर्मी पुरुषाला क्षमेच्या योगानें हाणून पाडावें आणि दुर्जनाला सद्वर्ततानें आपल्या अधीन करून सोडावें ६. सारांश, तुह्मी उभयतांही श्रेष्ठ आहांत. ह्यास्तव, औदार्य, सत्यवचन, क्षमा आणि सद्वर्तन ह्यांपैकीं एखाद्या गुणानें युक्त असा जो तुह्मांमध्यें असेल तो दुसऱ्याला वाट सोडील. तात्पर्य, चांगला कोण ह्याची परीक्षा येथेंच होणारी आहे. असें सांगून नारद स्वस्थ राहिले. तेव्हां हे नारद मुनींचें भाषण श्रवण केल्यावर कुरुवंशजश्रेष्ठ सुहोत्रानें शिबिराजाला प्रदक्षिणा केली आणि त्याला वाट साडून व अनेक सत्कृत्यांबद्दल त्याची प्रशंसा करून तो चालता झाला ७. असो. तें हें शिबिराजाचेंही माहात्म्य नारदमुनींनीं सांगितलें ८. ह्याप्रमाणें महामुनि-व्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं एकशें चौऱ्याण्णवावा अध्याय संपूर्ण झाला ॥ १९४ ॥

मार्कंडेय ह्मणतातः—हें दुसरें ऐका. राज्यावर असलेला नहुषपुत्र ययातिराजा एके दिवशीं नगरवासी लोकांमध्यें बसला असतांना एक ब्राह्मण गुरुदक्षिणेकरितां द्रव्य मागण्याच्या उद्देशानें त्याच्या जवळ आला आणि ह्मणाला "हे राजा, मी कांहीं अटीवर गुरुदक्षिणेची भिक्षा मागणार आहें". ह्यावर राजा ह्मणाला १ "अट आपण सांगा" २. ब्राह्मण ह्मणालाः—हे राजा, जगतामध्यें एकाद्याकडे येऊन कोणी याचना करूं

त्वां पृच्छामि कथं तु राजन्दद्याद्भवान्दयितं च मेद्य ३ राजोवाच ॥ न चानुकीर्तये दद्य दत्त्वा अयाच्यमर्थं न च संशृणोमि । प्राप्यमर्थ्यं च संश्रुत्य तं चापि दत्त्वा सुसुखी भवामि ४ ददामि ते रोहिणीनां सहस्रं प्रियो हि मे ब्राह्मणो याचमानः । न मे मनः कुप्यति याचमाने दत्तं न शोचामि कदाचिदर्थम् ५ इत्युक्त्वा ब्राह्मणाय राजा गोसहस्रं ददौ । प्राप्तवांश्च गवां सहस्रं ब्राह्मण इति ६ [७७९२] इति श्रीमहाभारते शतसहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि नाहुषचरिते पञ्चनवत्यधिकशततमोध्यायः ॥ १९५ ॥

वैशम्पायन उवाच ॥ भूय एव महाभाग्यं कथ्यतामित्यब्रवीत्पाण्डवः १ अथाचष्ट मार्कण्डेयो महाराज वृषदर्भसेदुकनामानौ राजानौ नीतिमार्गरतावस्त्रोपास्त्रकृतिनौ २ सेदुको वृषदर्भस्य बालस्यैव उपांशु व्रतमभ्यजानात्कुप्यमदेयं ब्राह्मणस्य ३ अथ तं सेदुकं ब्राह्मणः कश्चिद्वेदाध्यय-

---

लागला असतां तो त्या याचना करणाऱ्याचा फारच तिरस्कार करितो. तस्मात्, हे राजा, मला प्रिय असलेलें द्रव्य तूं कसें देणार हें मी तुला विचारीत आहें. (सारांश, तिरस्कारावांचून द्रव्य मिळालें पाहिजे अशी माझी अट आहे) ३. राजा ह्मणतो:—हे दानपात्र (विप्रा), दान दिल्यावर मी कधीं त्याची चतुष्टयी करीत बसत नाहीं व माझ्यापाशीं जें कांहीं आहे तें याचना करण्यास अयोग्य असल्याचेंही माझ्या कधीं ऐकण्यांत नाहीं. मला मिळण्यासारिखें जें कांहीं असेल तें सर्वही जरी देऊन टाकिलें तरी मला अत्यंत आनंदच होत असतो ४. मी तुला सहस्र गाई देईन; कारण, याचना करणारा ब्राह्मण मला प्रिय असतो. शिवाय, कोणी याचना करूं लागला असतां त्याच्यावर माझें मन क्रुद्ध होत नाहीं. इतकेंच नव्हे; परंतु, दिलेल्या द्रव्याबद्दल मला कधीं मागूनही वाईट वाटत नाहीं ५. असें ह्मणून राजानें ब्राह्मणाला सहस्र गाई दिल्या व ब्राह्मणालाही मिळाल्या ६. ह्याप्रमाणें महामुनि व्यासप्रणीत लक्षग्रथात्मक महाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं नहुषपुत्र ययातीच्या आचरणाविषयीं एकशें पंचाण्णवावा अध्याय समाप्त झाला॥१९५॥

वैशंपायन सांगतात:— पांडुपुत्र युधिष्ठिरानें " पुनरपि महाभाग्य कथन करा " असें ह्मटलें असतां १ मार्कंडेयमुनि ह्मणाले " हे महाराजा, वृषदर्भ आणि सेदुक ह्या नांवांचे दोन राजे अस्त्रें व उपास्त्रें ह्यांच्या प्रयोगांमध्यें निपुण असून नीतिमार्गाविषयीं तत्पर होते २ व ब्राह्मणांना सोन्यारुप्यावांचून दुसरें कांहीं नाणें द्यावयाचें नाहीं हें वृषदर्भाचें बालपणापासूनच गुप्त व्रत असल्याचें सेदुकाला ठाऊक होतें ३. एकदां वेदा-

नसंपन्न आशिषं दत्त्वा गुर्वर्थी भिक्षितवान् ४ अश्वसहस्रं मे भवान्ददा-त्विति । तं सेदुको ब्राह्मणमब्रवीत् ५ नास्ति संभवो गुर्वर्थं दातुमिति ६ स त्वं गच्छ वृषदर्भसकाशम् । राजा परमधर्मज्ञो ब्राह्मण तं भिक्षस्व स ते दास्यति तस्यैतदुपांशु व्रतमिति ७ अथ ब्राह्मणो वृषदर्भसकाशं गत्वा अश्वसहस्रमयाचत् । स राजा तं कशेनाताडयत् ८ तं ब्राह्मणोब्रवीत्किं हिंस्यनागसं मामिति ९ एवमुक्त्वा तं शपन्तं राजाह विप्र किं यो न ददाति तुभ्यमुताहोस्विद्ब्राह्मण्यमेतत् १० ब्राह्मण उवाच ॥ राजाधिराज तव समीपं सेदुकेन प्रेषितो भिक्षितुमागतः । तेनानुशिष्टेन मया त्वं भिक्षितोसि ११ राजोवाच ॥ पूर्वाह्णे ते दास्यामि यो मेद्य बलिरागमिष्यति ॥ यो हन्यते कशया कथं मोघं क्षेपणं तस्य स्यात् १२ इत्युक्त्वा ब्राह्मणाय दैवसिकामुत्पत्तिं प्रादात् । अधिकस्याश्वसहस्रस्य मूल्यमेवा-

---

ध्ययनसंपन्न असलेला एक ब्राह्मण त्या सेदुकाकडे आला आणि आशीर्वाद केल्यानंतर त्यानें गुरुदक्षिणा देण्याच्या उद्देशानें " मला हजार अश्व आपण द्यावे " ह्मणून त्याच्यापाशीं भिक्षा मागितली; परंतु, त्या ब्राह्मणाला सेदुक ह्मणाला ४,५ " गुरुदक्षिणा देण्याकरितां आपणाला अवश्य असलेलें द्रव्य माझ्या हातून मिळण्याचा सभव नाहीं ६. आपण वृषदर्भाकडे जा. तो राजा मोठा धर्मवेत्ता आहे. ह्यास्तव, हे विप्र, आपण त्याच्याजवळ मागा ह्मणजे तो आपणाला देईल. कारण, त्याचें हें गुप्त व्रतच आहे " ७. ह्याप्रमाणें सेदुकानें सांगितल्यावर वृषदर्भाजवळ ब्राह्मणानें हजार अश्व मागितले; परंतु त्या राजानें त्या ब्राह्मणाला चाबुकानें मारिलें ८. तथापि " मज निरपराध्याला कां मारीत आहेस " असें ह्मणून तो ब्राह्मण ९ शाप देण्याच्या बेतांत आला असतांना राजा त्याला ह्मणाला " हे विप्र, हें काय ? आपणाला जो मागितलेले देत नसेल त्याला असा शाप देणें कदाचित् आपणाला योग्य होईल. (मला आपण शाप देण्यास कां प्रवृत्त झालां आहां ?). अथवा (द्रव्य देण्यास तयार असलेल्यालाही शाप द्यावयाचा) हा ब्राह्मणधर्म आहे कीं काय ? " १०. ब्राह्मण ह्मणाला " हे राजाधिराज, सेदुकानें मला तुझ्याजवळ पाठविल्यामुळें मी भिक्षा मागण्याकारतां येथें आलों व त्यानेंच सांगितल्यावरून मीं तुझ्यापाशीं भिक्षा मागितली ११. राजा ह्मणतोः—आज जो मला वसूल येईल तो मी आपणाला उद्यां सकाळीं देईन. ज्याला चाबकानें मारावयाचें त्याला नुसतेंच हुसकून लावणें कसें शक्य होईल ? (त्याचें मन प्रसन्न करून घेणें अवश्यच आहे) १२. असें ह्मणून राजानें ब्राह्मणाला एका दिवसाचें उत्पन्न दिलें. इतकेंच नव्हे; परंतु, हजारापेक्षां अधिक अश्वांचेंही मूल्य त्यानें त्याला

वादिति १३ [७८०५] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि सेदुकवृषदर्भचरिते षण्णवत्यधिकशततमोऽध्यायः ॥ १९६ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ देवानां कथा संजाता महीतले गत्वा महीपतिं शिबिमौशीनरं साध्वेनं शिबिं जिज्ञास्याम इति । एवं भो इत्युक्त्वा अग्नीन्द्रावुपतिष्ठेताम् १ अग्निः कपोतरूपेण तमभ्यधावदामिषार्थमिन्द्रः श्येनरूपेण २ अथ कपोतो राज्ञो दिव्यासनासीनस्योत्सङ्गं न्यपतत् ३ अथ पुरोहितो राजानमब्रवीत् । प्राणरक्षार्थं श्येनाद्भीतो भवन्तं प्राणार्थी प्रपद्यते ४ वसु ददातु अन्तवान्पार्थिवोऽस्य निष्कृतिं कुर्याद्घोरं कपोतस्य निपातमाहुः ५ अथ कपोतो राजानमब्रवीत् । प्राणरक्षणार्थं श्येनाद्भीतो भवन्तं

आणखी दिलें १३ *. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं सेदुक आणि वृषदर्भ ह्यांच्या चरित्राविषयीं एकशें शहाण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥ १९६ ॥

मार्कंडेयमुनि सांगतातः—उशीनरपुत्र शिबिराजासंबंधानें देवांमध्यें एकदां गोष्ट निघाली असतां "ह्या शिबीची भूतलावर जाऊन चांगल्या रीतीनें परीक्षाच केली पाहिजे." असें ठरलें. तेव्हां "ठीक आहे." असें ह्मणूनच अग्नि व इंद्र ह्यांनीं तें पतकरिलें १. अग्नि कबूतराच्या रूपानें त्या राजाकडे गेला आणि इंद्र आमिषाकरितां ससाण्याच्या रूपानें गेला २. नंतर दिव्य सिंहासनावर राजा बसला असतांना त्याच्या मांडीवर येऊन कपोत पडला ३. हें पाहून पुरोहित राजाला ह्मणाला "हा प्राणार्थी कपोत ससाण्याला भिऊन प्राणरक्षणार्थ आपणांला शरण आला आहे ४. ह्यास्तव, दिशाधिपति राजानें द्रव्य देऊन ह्याची निष्कृति करावी. कारण, अंगावर कपोत पडणें हें भयंकर (ह्मणजे अनिष्टसूचक) आहे" ५. असें पुरोहितानें सांगितल्यानंतर कपोत राजाला ह्मणाला "मी प्राणार्थी आहें व ससाण्याला भिऊन प्राणरक्षणार्थ तुला शरण

---

* तात्पर्य, सोन्यारुप्यावांचून दुसरें कांहीं एक नाणें द्यावयाचें नाहीं असा वृषदर्भराजाचा नियम होता आणि ब्राह्मणानें त्याच्यापाशीं अश्व मागितले; परंतु, ब्राह्मणाच्या ह्मणण्याला मान दिला असतां आपल्या व्रताचा भंग होणार असें समजून व्रतभंग करण्यास प्रवृत्त झालेल्या ब्राह्मणाला राजानें ताडण केलें आणि त्याची कृपा संपादन करण्याकरितां त्याला मागितल्यापेक्षां अधिक द्रव्य दिलें; इतकेंच नव्हे; परंतु, हजार अश्व न देतां हजारापेक्षांही अधिक अश्वांचें मूल्यच देऊन सोन्यारुप्यावांचून दुसरें कांहीं द्यावयाचें नाहीं हा आपला नियमही त्यानें शेंवटास नेला. सारांश, पूर्वींचे राजे आपला नियम मोडण्यास प्रवृत्त झालेल्या ब्राह्मणाला ताडण करण्यासही समर्थ असत आणि मागितल्यापेक्षां अधिक द्रव्य देऊन पुनरपि ब्राह्मणाची कृपा संपादन करण्याचेंही त्यांच्या हातचें होतें. हें ह्या अध्यायाचें तात्पर्य होय.

प्राणार्थी प्रपद्ये अङ्गैरङ्गानि प्राण्यार्थी मुनिर्भूत्वा प्राणांस्त्वां प्रपद्ये ६
स्वाध्यायेन कर्शितं ब्रह्मचारिणं मां विद्धि । तपसा दमेन युक्तमाचा-
र्यस्याप्रतिकूलभाषिणम् । एवं युक्तमपापं मां विद्धि ७ गदामि वेदान्विचि-
नोमि च्छन्दः सर्वे वेदा अक्षरशो मे अधीताः । न साधुदानं श्रोत्रियस्य
प्रदानं मा प्रादाः श्येनाय न कपोतोस्मि ८ अथ श्येनो राजानमब्रवीत् ९
पर्यायेण वसतिर्वा भवेषु सर्गे जातः पूर्वमस्मात्कपोतात् । त्वमाददानोथ
कपोतमेनं मा त्वं राजन्विघ्नकर्ता भवेथाः १० राजोवाच ॥ केनदृशी जातु
परा हि दृष्टा वागुच्यमाना शकुनेन संस्कृता । यां वै कपोतो वदते यां
च श्येन उभौ विदित्वा कथमस्तु साधु ११ नास्य वर्षं वर्षति वर्षकाले
नास्य बीजं रोहति काल उत्तम् । भीतं प्रपन्नं यो हि ददाति शत्रवे न
त्राणं लभेत्त्राणमिच्छन्स काले १२ जाता ह्रस्वा प्रजा प्रमीयते सदा न

आलों आहें. सारांश, मी मुनि आहें आणि आपल्या लिंगदेहानें कपोताच्या शरीरामध्यें प्रविष्ट होऊन स्वतःचे प्राण वांचविण्याची याचना करण्याकरितां तुला शरण आलों आहें ६. वेदाध्ययन करून कृश झालेला ब्रह्मचारी मी आहें असें तूं समज. सारांश, मी तपस्वी व जितेंद्रिय असून आचार्यांशीं कधींही प्रतिकूल भाषण करणारा नाहीं. तेव्हां ह्याप्रमाणें मी योग्य व निष्पाप आहें हें तूं लक्ष्यांत ठेव ७. मी वेदपठण करीत असून छंदाचाही संग्रह करीत असतों; सर्व वेदांचें मीं अक्षरशः अध्ययन केलें आहे. तेव्हां मज श्रोत्रियाचें ससाण्याला दान करणें योग्य नव्हे. ह्याकरितां मला तूं ससाण्याच्या हवालीं करूं नको; मी कपोत नव्हें "८. नंतर ससाण्या राजाला ह्मणाला ९. "प्राण्याला नेहमीं फेरबदल होऊन जन्म प्राप्त होत असतात (ह्मणजे ह्या जन्मीं जो पिता असतो तोच पुढल्या जन्मीं पुत्र होण्याची व जी भार्या असते तीच पुढल्या जन्मीं माता होण्याची पाळी येत असते). तेव्हां ह्या सृष्टीमध्यें पूर्वी तूं ह्या कपोतापासूनच उत्पन्न झाला होतास. ह्यास्तव, पूर्वजन्मींचा पिता जो हा कपोत ह्याचें रक्षण करण्यास प्रवृत्त होऊन, हे राजा, तूं माझ्या आहाराला विघ्न करण्यास उद्युक्त होऊं नकोस" १०. राजा ह्मणाला "जी वाणी कपोत उच्चारीत आहे आणि जी श्येन पक्षी प्रकट करीत आहे तशा प्रकारची उत्कृष्ट संस्कृत वाणी पक्ष्यांच्या मुखांतून निघत असलेली कधीं कोणीं एकिली आहे ? तेव्हां ह्या उभयतांचें स्वरूप जाणून आपलें योग्य वर्तन ह्या ठिकाणीं कसें बरें होईल ? ११. भयभीत होऊन शरण आलेल्याला जो शत्रूचे स्वाधीन करितो त्याला कधीं प्रसंग प्राप्त होऊन स्वतःच्या रक्षणाचा विचार पडल्यास तें करणारा कोणी मिळत नाहीं. इतकेंच नव्हे; परंतु, पर्जन्यकाल आला

चामं पितरोस्य कुर्वते । भीतं प्रपन्नं यो हि ददाति शत्रवे नास्य देवाः प्रतिगृह्णन्ति हव्यम् १३ मोघमन्नं विन्दति चाप्रचेताः स्वर्गाल्लोकाद्भ्रश्यति शीघ्रमेव । भीतं प्रपन्नं यो हि ददाति शत्रवे सेन्द्रा देवाः प्रहरन्त्यस्य वज्रम् १४ उक्षाणं पक्त्वा सह ओदनेन अस्मात्कपोतात्प्रति ते नयन्तु । यस्मिन्देशे रमसेतीव श्येन तत्र मांसं शिबयस्ते वहन्तु १५ श्येन उवाच ॥ नोक्षाणो राजन्प्रार्थयेयं न चान्यदस्मान्मांसमधिकं कपोतात् । देवैर्दत्तः सोद्य ममैष भक्षस्तन्मे ददस्व शकुनानामभावात् १६ राजोवाच ॥ उक्षाणं वेहतमनूनं नयन्तु ते पश्यन्तु पुरुषा ममैव । भयाहितस्य द्रायं ममान्तिकात्त्वां प्रत्याम्नायन्तु त्वं ह्येनं मा हिंसीः १७ त्यजे प्राणान्नैव दद्यां कपोतं सौम्यो ह्ययं किं न जानासि श्येन । यथा क्लेशं मा कुरुष्वेह सौम्य नाहं कपोतमर्पयिष्ये कथंचित् १८ यथा मां वै साधुवादैः प्रसन्नाः प्रशंसेयुः शिबयः कर्मणा तु । यथा श्येन प्रियमेव कुर्यां प्रशाधि

असतां त्याच्या प्रदेशामध्यें जलवृष्टि होत नाहीं व योग्यवेळीं जमीनीत पेरलेलें धान्यही उगवत नाहीं १२. भयभीत होऊन रक्षणाकरितां आश्रयाला आलेल्याला जो त्याच्या शत्रूचे हवालीं करितो त्याचें हव्य देव स्वीकारीत नाहीत, पितर त्याचें वास्तव्य होण्याविषयीं इच्छा करीत नाहींत आणि त्याला झालेली सततिही बालपणींच मृत्युमुखीं पडते १३. भयभीत होऊन शरण आलेल्याला जो त्याच्या शत्रूला देऊन टाकिता त्याच्यावर इंद्रासहवर्तमान देव वज्रप्रहार करितात; तो तत्क्षणींच स्वर्गलोकाला मुकतो आणि त्या अनुदार पुरुषानें भक्षण केलेलें अन्नही व्यर्थ होतें १४. तस्मात्, ह्या कपोताचे ऐवजीं वृषभाचें मांस व ओदन शिजवून शिबी तुला देतील आणि, हे श्येनपक्ष्या, ज्या प्रदेशामध्यें तुझें मन अतिशय रमत असेल त्याच प्रदेशामध्यें शिबी तुझें मांस नेऊन पोंचवितील १५. श्येन ह्मणतोः—हे राजा, वृषभमांसाची मला जरूर नाहीं आणि ह्या कपोतापेक्षां दुसरें अधिक मांस जरी मला मिळत असलें तरी सुद्धां तें नको आहे. देवानीं आज दिलेला हा कपोतच माझें भक्ष्य आहे. तेव्हां पक्ष्याचा नाश करून तें माझें भक्ष्य तूं मला दे १६. राजा ह्मणतोः— सर्वांगसंपूर्ण बैल अथवा एकादी वंध्या गायही माझे सेवक विचार करून भयभीत झालेल्या ह्या कपोताचेबद्दल द्रव्य ह्मणून माझ्यापासून नेऊन तुला देतील; तूं ह्याची हिंसा करूं नको १७. हे श्येना, मी प्राण देईन; परंतु, कपोताला देणार नाहीं. हा निरुपद्रवी आहे. हे तूं जाणीत नाहींस काय ? हे श्येना, तूं आतां येथें उगीच ह्याप्रमाणें मला क्लेश देऊं नको; कांहीं झालें तरी कपोताला मी तुझे स्वाधीन करणार नाहीं १८ शिबी माझ्या कर्मानें प्रसन्न होऊन चांगल्या शब्दांनीं माझी स्तुति करतील आणि, हे

मां यद्वदेस्तत्करोमि १९ श्येन उवाच ॥ ऊरोर्दक्षिणादुत्कृत्य स्वपिशितं तावद्राजन्यावन्मांसं कपोतेन समम् । तथा तस्मात्साधु त्रातः कपोतः प्रशंसेयुश्च शिबयः कृतं च प्रियं स्यान्ममेति २० अथ स दक्षिणादूरोरुत्कृत्य स्वमांसपेशीं तुलयाधारयत् । गुरुतर एव कपोत आसीत् २१ पुनरन्यमुच्चकर्त गुरुतर एव कपोतः । एवं सर्वं समधिकृत्य शरीरं तुलायामारोपयामास तत्तथापि गुरुतर एव कपोत आसीत् २२ अथ राजा स्वयमेव तुलामारुरोह । न च व्यलीकमासीद्राज्ञ एतद्वृत्तान्तं दृष्ट्वा त्रात इत्युक्त्वा प्रालीयत श्येनः अथ राजा अब्रवीत् २३ कपोतं विदुः शिबयस्त्वां कपोत पृच्छामि ते शकुने को नु श्येनः । नानीश्वर ईदृशं जातु कुर्यादेतं प्रश्नं भगवन्मे विचक्ष्व २४ कपोत उवाच ॥ वैश्वानरोऽहं ज्वलनो धूमकेतुरथैव श्येनो वज्रहस्तः शचीपतिः । साधु ज्ञातुं त्वामृषभं सौरथेय नौ जिज्ञासया त्वत्सकाशं प्रपन्नौ २५ यामेतां पेशीं मम निष्क्रयाय प्रादाद्भवानसिनोत्कृत्य राजन् । एतद्वो लक्ष्म शिवं करोमि हिरण्यवर्णं

श्येना, तुझाही मनोरथ माझे हातून सिद्धीस जाईल अशा प्रकारची तूं मला आज्ञा कर. असं जें तूं सांगशील तें मी करीन १९. श्येन ह्मणतोः—हे राजा, तर मग उजव्या मांडींतून स्वतःचें मांस कपोताच्या भारंभार होईपर्यंत काढून मला दे; ह्मणजे कपोताचें उत्तमप्रकारें रक्षण होईल, शिबी तुझी प्रशंसा करितील आणि माझाही मनोरथ तूं सिद्धीस नेल्यासारिखें होईल २०. असे श्येनानें सांगितल्यानतर शिबिराजानें आपल्या उजव्या मांडीतून मांसाचा गोळा काढून तागडीत टाकिला तरी कपोत जडच भरला २१. तेव्हां दुसरी मांडी फोडून त्यांतील मांस तागडींत टाकिलें. तरी सुद्धां कपोत जडच भरला. ह्याप्रमाणें सर्व शरीरांतील मांस तोडून काढून तागडींत टाकिलें असतांही जेव्हां कपोत जड भरूं लागला २२ तेव्हां राजा स्वतःच तागडींत बसला आणि त्याच्या मनांत यत्किंचितूही किल्बिष आलें नाहीं. तेव्हां राजाचें हें वर्तन पाहिल्याबरोबर " कपोताचें तूं रक्षण केलेंस." असें ह्मणून श्येनानें दडी मारिली. तेव्हां राजा ह्मणाला " तूं कोण हें शिबी जाणतील; परंतु, हे कपोता, तो श्येन कोण हें मी तुला विचारीत आहें. कारण, ईश्वरावांचून दुसऱ्याचे हातून अशा प्रकारचें कृत्य कधींही होणार नाहीं. ह्यास्तव, हे भगवन्, ह्या माझ्या प्रश्नाचें आपण उत्तर द्या " २३,२४. कपोत ह्मणाला " धूम्रकेतु व वैश्वानर असा मी अग्नि असून श्येन हा वज्रपाणि शचीपति इंद्र होय. हे सुरथापुत्रा, तुज श्रेष्ठाची चांगल्या रीतीनें परीक्षा करण्याकरितां आपल्या इच्छेनें आह्मी तुझेसमीप आलों होतों २५. हे राजा, माझ्या

रुचिरं पुण्यगन्धम् २६ एतासां प्रजानां पालयिता यशस्वी सुरर्षीणामथ संमतो भृशम् । एतस्मात्पार्श्वात्पुरुषो जनिष्यति कपोतरोमेति च तस्य नाम २७ कपोतरोमाणं शिबिनौद्भिदं पुत्रं प्राप्स्यसि नृप वृषसंहननं यशोदीप्यमानं द्रष्टासि शूरमृषभं मौरथानाम् २८ [७८३३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिकयामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि शिबिचरिते सप्तनवत्यधिकशततमोध्यायः ॥ १९७ ॥

वैशम्पायन उवाच ॥ भूय एव महाभाग्यं कथ्यतामित्यब्रवीत्पाण्डवो मार्कण्डेयम् । अथाचष्ट मार्कण्डेयः । अष्टकस्य वैश्वामित्रेरश्वमेधे सर्वे राजानः प्रागच्छन् १ भ्रातरश्चास्य प्रतर्दनो वसुमनाः शिबिरौशीनर इति स च समाप्तयज्ञो भ्रातृभिः सह रथेन प्रायात्ते च नारदमागच्छन्तमभिवाद्यारोहतु भवान्रथमित्यब्रुवन् २ तांस्तथेत्युक्त्वा रथमारुरोह । अथ तेषामेकः सुरर्षिं नारदमब्रवीत् । प्रसाद्य भगवन्तं किंचिदिच्छेयं

मोबदल्याकरितां तरवारीनें कापून तूं जो हा मांसाचा गोळा दिलास तें हें मी सुवर्णवर्ण, मनोहर आणि उत्कृष्ट सुवासानें युक्त असें कल्याणकारक तुझ्या राजांचें एक चिह्नच करून ठेवितों २६. ह्या प्रजाजनांचें तूं परिपालन करशील, तूं यशस्वी होशील, देवर्षींना अत्यंत संमत होशील, तुझ्या ह्या मांस काढिलेल्या शरीराच्या बाजूपासून एक पुत्र उत्पन्न होईल आणि कपोतरोमा असें त्याचें नांव प्रसिद्ध होईल २७. हे राजा, औद्भिद (ह्मणजे शरीर भेदून उत्पन्न झालेला) पुत्र कपोतरोमा शिथिल शरीरापासून तुला प्राप्त होईल आणि तो वृषभासारिखा बळकट, कांतीनें देदिप्यमान, शूर आणि सुरथेच्या वंशजांमध्यें श्रेष्ठ असल्याचें तूं अवलोकन करशील २८. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं शिबिराजाच्या चरित्राविषयीं एकशें सत्त्याण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥ १९७ ॥

वैशंपायन सांगतातः—" आणखी महाभाग्य कथन करावें. " ह्मणून पांडुपुत्र युधिष्ठिरानें मार्कंडेय मुनींची प्रार्थना केली असतां मार्कंडेयमुनि ह्मणाले " विश्वामित्रपुत्र अष्टकाच्या अश्वमेधयागामध्यें सर्व राजे आले होते १. प्रतर्दन, वसुमना आणि औशीनर शिबि हे तिघे त्याचे भ्राते होते. तो अष्टक अश्वमेधयाग संपूर्ण झाल्यावर भ्रात्यांसहवर्तमान रथावर आरूढ होऊन गेला. तों जातां जातां नारदमुनि येत आहेत असें त्यांना आढळून आलें. तेव्हां त्यांना अभिवंदन करून " आपण रथावर आरूढ व्हावें. " अशी त्यांनीं विनंति केली असतां २ " ठीक आहे " असें ह्मणून नारदमुनि रथावर आरूढ झाले. नंतर त्यांच्यापैकीं एक नारदमुनींचें मन प्रस-

प्रष्टुमिति ३ पृच्छेत्यब्रवीदृषिः। सोऽब्रवीदायुष्मन्तः सर्वगुणप्रमुदिताः। अथायुष्मन्तं स्वर्गस्थानं चतुर्भिर्यातव्यं स्यात्कोऽवतरेत्। अयमष्टकोऽवतरेदित्यब्रवीदृषिः ४ किं कारणमित्यपृच्छत्। अथाचष्टाष्टकस्य गृहे मया उषितं स मां रथेनानुप्रावहदथापश्यमनेकानि गोसहस्राणि वर्णशो विविक्तानि तमहमपृच्छं कस्येमा गाव इति सोऽब्रवीत्। मया निसृष्टा इत्येतास्तेनैव स्वयं श्लाघति कथितेन। एषोऽवतरेदथत्रिभिर्यातव्यं सांप्रतं कोऽवतरेत् ५ प्रतर्दन इत्यब्रवीदृषिः। तत्र किं कारणम्। प्रतर्दनस्यापि गृहे मयोषितं स मां रथेनानुप्रावहत् ६ अथैनं ब्राह्मणोऽभिक्षताश्वं मे ददतु भवान्निवृत्तो दास्यामीत्यब्रवीद्ब्राह्मणं त्वरितमेव दीयतामित्यब्रवीद्ब्राह्मणस्त्वरितमेव स ब्राह्मणस्यैव मुक्त्वा दक्षिणं पार्श्वमददत् ७ अथान्योऽप्यश्वार्थी

वून " भगवानाना मला कांहीं विचारण्याची इच्छा आहे " असें त्याना ह्मणाला ३. तेव्हां " विचार. " ह्मणून त्या नारदऋषींनींही त्याला सांगितलें असतां तो ह्मणाला " आह्मी चिरजीवी असून सर्वगुणसंपन्न आहों. तेव्हा, चिरकाल भोग्य अशा स्वर्गस्थानाप्रत चौघेही जाऊं; परंतु, चौघांपैकीं स्वर्गापासून भूमीवर प्रथम कोण उतरेल (हें आपण सांगावें.) " ह्यावर नारदऋषि ह्मणाले " हा अष्टक उतरेल. " ४. नंतर " असें होण्याचें काय कारण ? " ह्मणून त्यानें विचारिलें असतां नारद ह्मणाले " अष्टकाच्या घरीं मी राहिलों होतों व तो मला रथांत बसवून घेऊन गेला. तेव्हां जातां जातां वर्णानें भिन्न भिन्न असलेल्या अनेक हजार गाई अवलोकन केल्यावर ' ह्या गाई कोणाच्या ? ' ह्मणून मीं त्याला विचारिलें असतां ' ह्या मीं दिलेल्या आहेत ' असें त्यानें सांगितलें. तेव्हां त्या त्याच्या सांगण्यावरून हा स्वतःच आपली प्रशंसा करीत असल्याचें उघड होत आहे. ह्यास्तव, हाच प्रथम स्वर्गापासून च्युत होईल ". ह्यावर " तर मग सांप्रत त्या अष्टकाला सोडून देऊन तिघांचेंच जर स्वर्गाला जाणें झालें तर तिघांपैकीं प्रथम कोण खालीं येईल ? " असा त्यांनीं प्रश्न केला असतां ५ " प्रतर्दन " ह्मणून नारद ऋषींनीं त्याला उत्तर दिलें आणि " असें होण्याचें काय कारण ? " ह्मणून त्यांनीं विचारिलें असतां नारदऋषि ह्मणाले " प्रतर्दनाच्याही घरीं मी राहिलों होतों व तोही मला रथांत बसवून फिरावयाला नेत असे ६. एकदां आह्मीं रथांत बसून जात असताना ' मला एक अश्व द्या ' ह्मणून एका ब्राह्मणानें येऊन ह्याच्यापाशीं भिक्षा मागितली. तेव्हां ' परत आल्यावर देईन. असें ह्यानें ब्राह्मणाला सांगितलें; परंतु, ब्राह्मण ह्मणाला ' मला सत्वरच दे. ' तेव्हां तो ह्मणाला ' तर मग सत्वरच देतों '. ह्याप्रमाणें ब्राह्मणाला सांगून त्यानें उजव्या अंगच्या

ब्राह्मण आगच्छत् । तथैव चैनमुक्त्वा वामपार्ष्णिमभ्यददथ प्रायात्पुनरपि चान्योप्यश्वार्थी ब्राह्मण आगच्छत्त्वरितोथ तस्मै अपनह्य वामं धुर्यमददत् ८ अथ प्रायात्पुनरन्य आगच्छदश्वार्थी ब्राह्मणस्तमब्रवीदतियातो दास्यामि त्वरितमेव मे दीयतामित्यब्रवीद्ब्राह्मणस्तस्मै दत्त्वाश्वं रथधुरं गृह्णता व्याहृतं ब्राह्मणानां सांप्रतं नास्ति किंचिदिति ९ य एष ददाति चासूयति च तेन व्याहृतेन तथावतरेत् । अथ द्वाभ्यां यातव्यमिति कोवतेरत् १० वसुमना अवतरेदित्यब्रवीदृषिः ११ किं कारणमित्यपृच्छद्यथाचष्ट नारदः । अहं परिभ्रमन्वसुमनसो गृहमुपस्थितः १२ स्वस्तिवाचनमासीत्पुष्परथस्य प्रयोजनेन तमहमन्वगच्छं स्वस्ति वाचितेषु ब्राह्मणेषु रथो ब्राह्मणानां दर्शितः १३ तमहं रथं प्राशंसमथ राजा-

---

बाजूचा* अश्व सोडून त्याला दिला ७. नंतर दुसराही एक ब्राह्मण अश्वाकरितां आला; तेव्हां त्याच्याशींही असेंच बोलणें झाल्यावर त्याला ह्यानें डाव्या अंगाच्या बाजूचा अश्व सोडून दिला आणि हा पुढें चालता झाला. तों आणखीही एक ब्राह्मण अश्वाकरितां आला आणि त्यानेंही त्वरा लाविली. तेव्हां डाव्या बाजूचा धुरीचा अश्व सोडून त्यानें त्याला दिला ८ आणि नंतर हा पुढें चालता झाला. तों इतक्यांत पुनरपि दुसरा एक ब्राह्मण अश्वाकरितां आला; तेव्हां तो ह्मणाला 'परत आल्यावर देईन.' परंतु, 'सत्वरच दिला पाहिजे.' असें ब्राह्मण ह्मणाला. तेव्हां त्या ब्राह्मणाला तो उरलेलाही अश्व देऊन टाकून ह्यानें स्वतःच रथाचें जूं घेतलें आणि ब्राह्मणांना युक्तायुक्त विचार मुळींच नाहीं' असें तो ह्मणाला ९. तेव्हां ज्याअर्थी ह्यानें ब्राह्मणांना देऊन सवरून त्यांच्याशीं मत्सरबुद्धि धारण केली त्याअर्थी त्या मत्सरयुक्त भाषणामुळें हा स्वर्गापासून खालीं यईल." ह्याप्रमाणें नारदांनीं सांगितलें असतां "तर मग दोघेच जर स्वर्गाला गेले तर त्यांपैकीं प्रथम कोण खालीं येईल?" ह्मणून त्यानें प्रश्न केला असतां १० "वसुमना खालीं येईल." ह्मणून नारदऋषींनींही त्याला सांगितलें ११. आणि 'असें होण्याचें काय कारण?' ह्मणून त्यानें प्रश्न केला असतां नारदमुनि त्याला ह्मणाले "मी एकदां हिंडतां हिंडतां वसुमनाच्या घरीं गेलों होतों १२. तेव्हां त्यानें तयार केलेल्या पुष्परथाला कोठेंही अडथळा होऊ नये एतदर्थ तेथें पुण्याहवाचन चाललें होतें; तों इतक्यांत मीही हा पुण्याहवाचनाला बसला असतांना

---

* चार घोड्यांच्या रथाला एकापुढें एक अशा दोन घोड्यांच्या रांका जोडण्याची पद्धति पूर्वीची नसून दांडीच्या प्रत्येक बाजूला एका शेजारीं एक जोडण्याची पद्धति होती आणि अर्थात सद्ध्याचे चौकड्यांचे ... काही थांमल्या दंद दंद होत्या असें ह्यावरून दिसतें.

ब्रवीद्भगवता रथः प्रशस्तः । एष भगवतो भगवतो रथ इति १४
अथ कदाचित्पुनरप्यहमुपस्थितः पुनरेव च रथप्रयोजनमासीत् । सम्य-
गयमेष भगवत इत्येवं राजाब्रवीदिति पुनरेव च तृतीयं स्वस्तिवाचनं सम-
भावयमथ राजा ब्राह्मणानां दर्शयन्मामभिप्रेक्ष्याब्रवीत् । अथो भगवता
पुण्यरथस्य स्वस्तिवाचनानि सुष्ठु संभावितानि एतेन द्रोहवचनेनावत-
रेत् १५ अथैकेन यातव्यं स्यात्कोवतरेत्पुनर्नारद आह । शिबिर्यायाद-
हमवतरेयं अत्र किं कारणमित्यब्रवीत् । असावहं शिबिना समो नास्ति
यतो ब्राह्मणः कश्चिदेनमब्रवीत् १६ शिबे अन्नार्थ्यस्मीति तमब्रवी-
च्छिबिः किं क्रियतामाज्ञापयतु भवानीति १७ अथैनं ब्राह्मणोब्रवीद्य एष
ते पुत्रो बृहद्गर्भो नाम एष प्रमातव्य इति तमेनं संस्कुर्वन्नं चोपपादय
ततोहं प्रतीक्ष्य इति । ततः पुत्रं प्रमाथ्य संस्कृत्य विधिना साधयित्वा

तेथें गेलों आणि ब्राह्मणद्वारा पुण्याहवाचन झाल्यावर ह्यानें तो रथ ब्राह्मणाला दर्शविला १३. तेव्हां (तो रथ आपल्याला मिळावा ह्या उद्देशानें) मीं त्या रथाची प्रशंसा केली; परंतु, (माझा उद्देश जाणूनही) राजा ह्मणाला ' भगवानांनीं रथाची प्रशंसा केली आहे. तेव्हां हा रथ भगवानांचाच आहे, भगवानांचाच आहे. ' (असें बोलून त्यानें रथ मला न देता आपलेपाशींच ठेविला) १४. नंतर पुनरपि मी एकदां ह्याच्या घरीं गेलों असता पुनरपिही रथाकरितांच स्वस्तिवाचन चाललें होतें. तेव्हां ' फार उत्तम आहे. तो हा रथ भगवानांचाच आहे. ' असें राजा ह्मणाला. नंतर पुनरपि तिसरें स्वस्तिवाचन मीं पाहिलें. तेव्हां हा राजा रथ दर्शवीत असतांना माझ्याकडे पाहून ह्मणाला ' भगवानांमुळें पुण्यरथाचीं स्वस्तिवाचनें चांगलीं झालीं '. तस्मात्, (रथ मिळावा अशी माझी इच्छा जाणीत असूनही तो न देतां ज्याअर्थी ह्यानें मत्सरबुद्धीनें जें माझें व्यर्थ स्तवन केलें आहे त्यामुळें हा खालीं येईल " १५. नंतर (अवशिष्ट राहिलेल्या दोहोंपैकीं) एकच स्वर्गामध्यें जावयाचा असेल तर खालीं कोण येईल ? " असें त्यानें पुनरपि विचारिलें असतां नारद ह्मणाले " शिबि जाईल आणि मी खालीं उतरेन. " ह्यावर " असें होण्याचें काय कारण ? " ह्मणून त्यानें विचारिलें असतां नारद ह्मणाले " हा मी शिबीची बरोबरी करणारा नाहीं. कारण, कोणी एक ब्राह्मण त्याच्याकडे आला आणि ह्मणाला १६ ' हे शिबे, मी अन्नार्थी आहें. ' असें ब्राह्मणानें सांगितल्यावर ' आपल्याकरितां काय तयार करावें त्याची आपण आज्ञा करा. ' असें शिबि त्याला ह्मणाल्यावर १७ ब्राह्मण ह्याला ह्मणाला ' हा जो तुझा बृहद्गर्भनामक पुत्र आहे ह्याचा वध केला पाहिजे. त्या ह्या

पात्र्यामर्पयित्वा शिरसा प्रतिगृह्य ब्राह्मणममृगयत् १८ अथास्य मृगयमाणस्य कश्चिदाचष्ट एष ते ब्राह्मणो नगरं प्रविश्य दहति ते गृहं कोशागारमायुधागारं स्त्र्यगारमश्वशालां हस्तिशालां च क्रुद्ध इति १९ अथ शिबिस्तथैवाविकृतमुखवर्णो नगरं प्रविश्य ब्राह्मणं तमब्रवीत्सिद्धं भगवन्नन्नमिति ब्राह्मणो किंचिन्नाजहार विस्मयादधोमुखश्चासीत् २० ततः प्रासादयद्ब्राह्मणं भगवन्भुज्यतामिति । मुहूर्तादुद्वीक्ष्य शिबिमब्रवीत् २१ त्वमेवैतदशानेति तत्राह तथेति शिबिस्तथैवाविमना महित्वा कपालमभ्युद्धार्य भोक्तुमैच्छत् २२ अथास्य ब्राह्मणो हस्तमगृह्णात् । अब्रवीच्चैनं जितक्रोधोसि न ते किंचित्परित्याज्यं ब्राह्मणार्थे ब्राह्मणोपि तं महाभागं समाजयत् २३ स ह्युद्वीक्षमाणः पुत्रमपश्यदग्रे तिष्ठन्तं देवकुमारमिव पुण्यगन्धान्वितमलंकृतं सर्वं च तमर्थं विधाय ब्राह्मणोन्तरधीयत २४ तस्य राजर्षेर्विधाता तेनैव वेषेण परीक्षार्थमागत इति । तस्मिन्नन्तर्हिते-

---

पुत्राला शिजवून अन्न तयार ठेव आणि नंतर माझी प्रतीक्षा करीत रहा.' असें ब्राह्मणानें सांगून पुत्राचा वध केल्यावर त्याचें मांस रीतीप्रमाणें शिजवून राजानें तें एका भांड्यात घातलें आणि डोक्यावर घेऊन तो ब्राह्मणाला शोधूं लागला १८. तो शोधितां शोधितां ह्याच्याकडे कोणी मनुष्य आला आणि 'हा तुझा ब्राह्मण क्रुद्ध होऊन नगरांत प्रविष्ट झाला आहे आणि तुझा जामदारखाना, आयुधगृह, अंतःपुर, अश्वशाला आणि गजशाला ह्यांना आग लावीत आहे.' असें ह्याला सांगूं लागला १९. तथापि, मुद्रा यत्किंचितूही पालटू न देतां नगरांत जाऊन 'हे भगवन्, अन्न तयार आहे.' असें त्या ब्राह्मणाला ह्मणाला असतां ब्राह्मण कांहीं एक बोलला नाहीं. इतकेंच नव्हे; परंतु, विस्मयामुळें तो खालीं पाहूं लागला २०. नंतर 'हे भगवन्, आपण भोजन करा.' असें ह्मणून हा त्या ब्राह्मणाचें मन वळवूं लागला असतां दोन घटकांनीं शिबीच्या तोंडाकडे पाहून ब्राह्मण ह्मणाला २१ 'तूंच हें भक्षण कर'. तेव्हां 'ठीक आहे.' असें ह्मणून व तसाच खेदरहित राहून शिबीनें त्या ब्राह्मणाच्या आज्ञेला मान दिला आणि मस्तकाची कवटी काढून भोजन करण्यास उद्युक्त झाला २२. इतक्यांत त्याचा हात धरून ब्राह्मण त्याला ह्मणाला 'तूं क्रोध जिंकिला आहेस. ब्राह्मणांकरितां तूं कांहींही करावयाचें सोडीत नाहींस. असें ह्मणून ब्राह्मणनेंही त्या महाभाग्यवान् शिबीची प्रशंसा केली २३. तदनंतर तो शिबि वर पाहूं लागला असतां सुगंधानें युक्त व भूषित आणि देवकुमाराप्रमाणें

मात्या राजानमूचुः । किं प्रेप्सुना भवतेदमेवं जानता कृतमिति २५
शिबिरुवाच ॥ नैवाहमेतद्यशसे ददानि न चार्थहेतोर्न च भोगतृष्णया ।
पापैरनासेवित एष मार्ग इत्येवमेतत्सकलं करोमि २६ सद्भिः सदाध्या-
सितं तु प्रशस्तं तस्मात्प्रशस्तं श्रयते मतिर्मे । एतन्महाभाग्यवरं शिबेस्तु
तस्मादहं वेद यथावदेतत् २७ [७८६०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां
संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि राज-
न्यमहाभाग्ये शिबिचरितेऽष्टनवत्यधिकशततमोऽध्यायः ॥ १९८ ॥

वैशम्पायन उवाच ॥ मार्कण्डेयः पाण्डवाः पर्यपृच्छन्नस्ति कश्चिद्भ-
वतश्चिरजाततर इति १ स तानुवाचास्ति । खलु राजर्षिरिन्द्रद्युम्नो नाम
क्षीणपुण्यस्त्रिदिवात्प्रच्युतः कीर्तिर्मे व्युच्छिन्नेति स मामुपातिष्ठदथ प्रत्य-
भिजानाति मां भवानिति २ तमहमब्रुवं कार्यचेष्टाकुलत्वान्न वयं वासा-
यनिका ग्रामैकरात्रवासिनो न प्रत्यभिजानीमो ध्यात्मनोर्थानामनुष्ठानं न

कांतिमान् असा आपला पुत्र पुढेच उभा असलेला त्यानें अवलोकन केला व ह्याप्रमाणें तो सर्व प्रकार घडवून आणिल्यावर ब्राह्मणही गुप्त झाला २४. त्या राजर्षीची परीक्षा करण्याकरितां ब्रह्मदेवच त्या वेषानें आलेला होता. तो गुप्त झाल्यावर अमात्य राजाला ह्मणाले 'आपण समजून उमजून असें कृत्य केलें हें काय प्राप्त होण्याच्या इच्छेनें केलें?' २५. शिबि ह्मणाला ' हें — जें ब्राह्मण मागील ते मी देत असतों — तें मला द्रव्यप्राप्ति व्हावी ह्या हेतूनें अथवा पुढें मला उपभोग घेण्यास सांपडावा ह्या इच्छेनें मी देत नाहीं. —दुष्ट लोकांनीं न स्वीकारिलेला हा मार्ग आहे—इतकेंच लक्ष्यांत आणून मीं हें सर्व करीत असतों २६. सज्जन जें प्रशस्त असेल त्याचेंच अवलंबन करीत असतात; ह्यामुळें माझी ही मति जें कृत्य प्रशस्त असेल त्याचेंच अवलंबन करीत असते, तस्मात् शिबीचा हा अत्यंत श्रेष्ठपणा आहे आणि मी हा श्रेष्ठपणा इत्थंभूत जाणीत आहे " २७. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गतवनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वां-पैकीं राजांच्या मोठेपणाविषयीं एकशें अठ्याण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥ १९८ ॥

वैशंपायन सांगतात:—" आपणांपेक्षां पुष्कळ दिवस पूर्वीं जन्मास आलेला असा कोणी आहे काय ? " ह्मणून पांडवांनीं व ऋषींनीं मार्कंडेयमुनींना प्रश्न केला असतां १ ते ह्मणाले " अरे, हो ! इंद्रद्युम्ननामक राजर्षि पुण्य क्षीण झाल्यामुळें स्वर्गापासून च्युत झाला आणि ' माझी कीर्ति उच्छिन्न झाली. ' असें ह्मणत ह्मणत माझ्यापाशीं आला व 'आपण मला ओळखितां काय ? ' ह्मणून मला विचारूं लागला २. तेव्हां मीं त्याला ह्मटलें 'पुण्यसंपादनार्थ जपादिकर्मे करण्यांत गढून गेल्यामुळें आह्मी एक घर धरून राहणारे

शरीरोपतापेनात्मनः समारभामोर्थानामनुष्ठानम् ३ अस्ति खलु हिमवति प्रावारकर्णो नामोलूकः प्रतिवसति । स मत्तश्चिरजातो भवन्तं यदि जानीयादितः प्रकृष्टे चाध्वनि हिमवांस्तत्रासौ प्रतिवसतीति ४ ततः स मामश्वो भूत्वा तत्रावहद्यत्र बभूवोलूकः । अथैनं स राजा प्रपच्छ प्रतिजानाति मां भवानिति ५ स मुहूर्तमिव ध्यात्वाब्रवीदेनं नाभिजानामि भवन्तमिति स एवमुक्त इन्द्रद्युम्नः पुनस्तमुलूकमब्रवीद्राजर्षिः ६ अथास्ति कश्चिद्भवतः सकाशाच्चिरजात इति स एवमुक्तोऽब्रवीदस्ति खल्विन्द्रद्युम्नं नाम सरस्तस्मिन्नाडीजङ्घो नाम बकः प्रतिवसति सोस्मत्तश्चिरजाततरस्तं पृच्छेति तत इन्द्रद्युम्नो मां चोलूकमादाय तत्सरोगच्छद्यत्रासौ नाडीजङ्घो नाम बको बभूव ७ सोस्माभिः पृष्टो भवानिममिन्द्रद्युम्नं राजानमभिजानातीति स एवं मुहूर्तं ध्यात्वाब्रवीन्नाभिजानाम्यहमिन्द्रद्युम्नं

नाहीं. (तीर्थाटन करितां करितां मार्गानें लागणाऱ्या) ग्रामामध्यें आह्मी एक रात्र वास्तव्य करीत असतों; ह्यामुळें आमच्या हातून पूर्वी काय काय गोष्टी घडल्या ह्याचेंही आह्मांला स्मरण रहात नाहीं आणि तपश्चर्येच्या योगानें शरीराला ताप देऊन आमच्या हातून पुढें कोणत्या गोष्टी होणाऱ्या आहेत हेंही जाणण्याच्या भरीस आह्मी पडत नाहीं ३. परंतु, हिमालयपर्वतावर प्रावारकर्ण नांवाचा एक उलूकपक्षी वास्तव्य करीत असतो. तो माझ्याहून पुष्कळ दिवस पूर्वीचा आहे. तेव्हां तो आपल्याला ओळखीत असेल तर कोण जाणे? येथून हिमालयपर्वत बराच दूर आहे व त्या ठिकाणीं तो उलूकपक्षी वास्तव्य करीत आहे ' ४. असें मीं सांगितल्यानंतर तो अश्व झाला आणि जिकडे तो उलूकपक्षी होता तिकडे मला घेऊन गेला. नंतर ' मला आपण ओळखितां काय ? ' ह्मणून त्या राजानें त्याला प्रश्न केला असतां ५ तो क्षणभर ध्यानस्थ बसला आणि ' मला आपली ओळख पटत नाहीं. ' असें त्याला ह्मणाला. ह्याप्रमाणें इंद्रद्युम्नाला उलूकानें सांगितलें असतां पुनरपि त्या राजर्षीनें त्या उलूकाला विचारिलें ६ ' आपणांपेक्षां आधींचा कोणी आहे काय ? ' इंद्रद्युम्नानें असा प्रश्न केला असतां उलूक त्याला ह्मणाला ' अरे, हो ! इंद्रद्युम्ननामक एक सरोवर आहे; त्या सरोवरावर नाडीजंघ नांवाचा बकपक्षी वास्तव्य करीत आहे आणि तो माझ्यापेक्षां बराच पूर्वीचा आहे. तेव्हां त्याला विचार. ' असें उलूकानें सांगितल्यानंतर इंद्रद्युम्न मला व उलूकाला घेऊन जिकडे तो नाडीजंघनामक बक होता त्या सरोवरावर गेला ७. नंतर ' आपण ह्या इंद्रद्युम्नराजाला ओळखितां काय ? ' असा आह्मीं त्याला प्रश्न केला

राजानमिति । ततः सोस्माभिः पृष्टः कश्चिद्भवतोन्यश्चिरजाततरोस्तीति स नोब्रवीदस्ति खल्वस्मिन्नेव सरस्यकूपारो नाम कच्छपः प्रतिवसति । स मत्तश्चिरजाततरः स यदि कथंचिदभिजानीयादिमं राजानं तमकूपारं पृच्छध्वमिति ८ ततः स बकस्तमकूपारं कच्छपं विज्ञापयामास । अस्माकमभिप्रेतं भवन्तं किंचिदर्थमभिप्रष्टुं साध्वागम्यतां तावदिति तच्छ्रुत्वा कच्छपस्तस्मात्सरस उत्थायाभ्यगच्छद्यत्र तिष्ठामो वयं तस्य सरसस्तीरे आगतं चैनं वयमपृच्छाम भवानिन्द्रद्युम्नं राजानमभिजानातीति ९ स मुहूर्तं ध्यात्वा बाष्पसंपूर्णनयन उद्विग्नहृदयो वेपमानो विसंज्ञकल्पः प्राञ्जलिरब्रवीत्किमहमेनं न प्रत्यभिज्ञास्यामीह ह्यनेन सहस्रकृत्वश्चितिषु यूपा आहिताः १० सरश्चेदमस्य दक्षिणाभिर्दत्ताभिर्गोभिरतिक्रममाणाभिः कृतम् । अत्र चाहं प्रतिवसामीति ११ अथैतत्सकलं कच्छपेनोदाहृतं श्रुत्वा तदनन्तरं देवलोकाद्देवरथः प्रादुरासीद्वाचश्चाश्रूयन्तेन्द्रद्युम्नं प्रति प्रस्तुतस्ते स्वर्गो यथोचितं स्थानं प्रतिपद्यस्व कीर्तिमानस्य-

---

असतां तोही ह्याप्रमाणें क्षणभर विचार करून ह्मणाला 'मला इंद्रद्युम्नराजा माहीत नाहीं' तदनंतर 'अपणांपेक्षां दुसरा कोणी वृद्ध आहे काय ?' असा आह्मीं त्याला प्रश्न केला असतां तो आह्मांला ह्मणाला 'होय, आहे. ह्याच सरोवरामध्यें अकूपारनामक कच्छ रहात आहे. तो माझ्यापेक्षां आधींचा आहे. तो ह्या राजाला ओळखीत असेल तर त्या अकूपाराला विचारा.' ८. तदनंतर 'आह्मांला कांहीं गोष्ट आपणांस विचारावयाची आहे. तरी आपण खुशाल इकडे यावें.' अशी त्या बकानें त्या अकूपारकच्छपाची प्रार्थना केल्यावर ती श्रवण करून कच्छ त्या सरोवरांतून निघून जेथें आह्मी उभे होतों तेथें त्या सरोवराचे तीरीं आला व तो आल्यावर 'आपण इंद्रद्युम्नराजाला जाणीत आहां काय ?' ह्मणून आह्मीं त्याला विचारिलें ९. तेव्हां तो क्षणभर ध्यानस्थ बसला असतां त्याचे नेत्र अश्रूंनीं भरून आले, मन उद्विग्न झालें, शरीराला कंप सुटला आणि जवळ जवळ मूर्छित होऊन हात जोडून ह्मणाला 'काय? मी कां ह्याला ओळखणार नाहीं ? अहो, ह्यानें ह्या ठिकाणीं हजारों वेळां अग्निचयनाकरितां यज्ञस्तंभ स्थापिले आहेत १० आणि दक्षिणा या नात्यानें दिलेल्या गांईचा ह्या ठिकाणीं अतिशय संचार झाल्यामुळें हें सरोवर आलें आहे आणि मी ह्या सरोवरामध्यें वास्तव्य करीत आहें. ११. 'हें सर्व कच्छापानें सांगितलेलें ऐकिल्यानंतर देवलोकापासून एक देवरथ प्रकट झाला आणि इंद्रद्युम्नासंबंधानें 'स्वर्ग तुला उचित आहे. ह्यास्तव, तूं यथायोग्य स्थानीं जा; तूं कीर्तिमान् आहेस. ह्याकरितां दुसरें कांहींही मनांत न

च्यग्रो याहीति १२ भवन्ति चात्र श्लोकाः ॥ दिवं स्पृशति भूमिं च शब्दः पुण्यस्य कर्मणः । यावत्स शब्दो भवति तावत्पुरुष उच्यते १३ अकीर्तिः कीर्त्यते लोके यस्य भूतस्य कस्यचित् । स पतत्यधमाँल्लोकान्यावच्छब्दः प्रकीर्त्यते १४ तस्मात्कल्याणवृत्तः स्यादनन्ताय नरः सदा । विहाय चित्तं पापिष्ठं धर्ममेव समाश्रयेत् १५ इत्येतच्छ्रुत्वा स राजाब्रवीत्तिष्ठ तावद्यावदिमौ वृद्धौ यथास्थानं प्रतिपादयामीति १६ स मां प्रावारकर्णं चोलूकं यथोचितं स्थानं प्रतिपाद्य तेनैव यानेन संस्थितो यथोचितं स्थानं प्रतिपेदे तन्मयानुभूतं चिरजीविनेदृशमिति पाण्डवानुवाच मार्कण्डेयः १७ पाण्डवाश्चोचुः साधु शोभनं भवता कृतं राजानमिन्द्रद्युम्नं स्वर्गलोकाच्च्युतं स्वे स्थाने प्रतिपादयतेत्यथैनानब्रवीदसौ ननु देवकीपुत्रेणापि कृष्णेन नरके मज्जमानो राजर्षिर्नृगस्तस्मात्कृच्छ्रात्पुनः समुद्धृत्य स्वर्गं प्रापित इति १८ [७८७८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयस-

---

आणिता स्वर्गास चालता हो.' असे शब्द कानावर आले १२. ह्यासबधानें कांहीं श्लोक प्रसिद्ध आहेत ते येणेप्रमाणें:—पुण्यकर्माची कीर्ति स्वर्गावर व पृथ्वीवर होत असत आणि जोपर्यंत ती कायम रहात तोपर्यंत पुरुष स्वर्गवासी असतो असे ह्मणतात १३ जगतामध्य ज्या कोणा प्राण्याची अपकीर्ति लोक सांगत असतात तो प्राणी ती अपकीर्ति लोकाच्या तोंडी असेपर्यंत नरकात पडतो १४. तस्मात्, अनंत सुख प्राप्त होण्याकरिता पुरुषानें नेहमी आपलें वर्तन चांगले राखावें आणि पापबुद्धीचा त्याग करून धर्माचच अवलंबन करावे १५. असो. हें श्रवण केल्यावर 'मी हे दोन वृक्ष जागच्याजागी नेऊन पोंचवीपर्यंत तू जरा उभा रहा.' असे तो राजा ह्मणाला १६. नंतर मला व प्रावारकर्ण उलूकाला यथायोग्य ठिकाणी नेऊन पोंचविल्यावर तो राजा त्याच रथावर आरूढ झाला असता त्याला यथायोग्य स्थान प्राप्त झाले व हे अशा प्रकारचे वृत्त मी चिरजीवी पुरुषानें प्रत्यक्ष पाहिलें." असें मार्कंडेय मुनींनी पांडवांना सांगितलें असतां १७ पांडव त्यांना ह्मणाले " उत्तम ! स्वर्गलोकापासून च्युत झालेल्या इंद्रद्युम्नराजाला आपण स्वस्थानीं परत पोंचविलेंत हें कृत्य आपण चांगलेच केलें." अशी पांडवांनी प्रशंसा केल्यावर मार्कंडेयमुनि त्यांना ह्मणाले " देवकीनंदन कृष्णानेंही ह्या नरकांत बुडू लागलेल्या नृगराजर्षीला त्या संकटांतून सोडवून पुनरपि स्वर्गास पाठविलें आहे (तेव्हां माझी प्रशंसा करण्याचें तुह्माला कारण नाहीं) १८. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमद्भारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्या-

मास्यापर्वणीन्द्रद्युम्नोपाख्यान ऊनशताधिकशततमोऽध्यायः ॥ १९९ ॥

वैशम्पायन उवाच ॥ श्रुत्वा स राजा राजर्षेरिन्द्रद्युम्नस्य तत्तदा। मार्कण्डेयान्महाभागात्स्वर्गस्य प्रतिपादनम्। युधिष्ठिरो महाराज पुनः प्रपच्छ तं मुनिम् १ कीदृशीषु ह्यवस्थासु दत्त्वा दानं महामुने। इन्द्रलोकं त्वनुभवेत्पुरुषस्तद्ब्रवीहि मे २ गार्हस्थ्येऽप्यथवा बाल्ये यौवने स्थाविरेऽपि वा। यथा फलं समश्नाति तथा त्वं कथयस्व मे ३ मार्कण्डेय उवाच ॥ वृथा जन्मानि चत्वारि वृथा दानानि षोडश। वृथा जन्म ह्यपुत्रस्य ये च धर्मबहिष्कृताः ४ परपाकेषु येऽश्नन्ति आत्मार्थं च पचन्तु यः। पर्यश्नन्ति वृथा यत्र तदसत्यं प्रकीर्त्यते ५ आरूढपतिते दत्तमन्यायोपहृतं च यत्। व्यर्थं तु पतिते दानं ब्राह्मणे तस्करे तथा ६ गुरौ चानृतिके पापे कृतघ्ने ग्रामयाजके। वेदविक्रयिणे दत्तं तथा वृषलयाजके ७ ब्रह्मबन्धुषु यद्दत्तं यद्दत्तं वृषलीपतौ। स्त्रीजनेषु च यद्दत्तं व्यालग्राहे यथैव च ८ परिचारकेषु

पर्वापैकीं इंद्रद्युम्नोपाख्यानाविषयीं एकशें नव्याण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥१९९॥

वैशंपायन सांगतातः—हे जनमेजय महाराजा, महाभाग्यवान् मार्कंडेयमुनींपासून राजर्षि इंद्रद्युम्नाला स्वर्गप्राप्ति झाल्याचें श्रवण करून युधिष्ठिरराजा त्या मुनींना पुनरपि विचारूं लागला कीं १ " हे महामुने, कशा अवस्था प्राप्त झाल्या असतां दान दिल्यानें पुरुषाला इंद्रलोकाचा अनुभव घेतां येतो हें आपण मला कथन करा २. सारांश, गृहस्थाश्रमामध्यें किंवा बाल्यावस्थेंत, तरुणावस्थेंत अथवा वृद्धावस्थेंत दान दिलें असतां काय फल प्राप्त होतें हें आपण मला कथन करा " ३. मार्कंडेय ह्मणतातः—चार जन्म व सोळा दानें निरर्थक आहेत. निपुत्रिक, धर्मबाह्य ४, परान्नभक्षक अथवा केवल आपल्या पोटाकरितांच अन्न तयार करणारे आणि बाल, वृद्ध, अतिथि इत्यादिकांचे पूर्वींच भोजन करणारे ह्यांचे जन्म व्यर्थ आहेत आणि त्याचप्रमाणें ज्या जन्मामध्यें गोब्राह्मणादिकांचें रक्षण वगैरेचा प्रसंग असल्याशिवाय असत्य भाषण घडतें तहीं व्यर्थच होत ५. (ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ आणि संन्यास ह्यांपैकीं यावज्जीव पुढल्या पुढल्या आश्रमाचा स्वीकार केला असतांही त्या आश्रमाचा त्याग करून पूर्वीच्या आश्रमाप्रमाणें वागूं लागणाऱ्या) आरूढपतित ब्राह्मणाला दिलेलें, अन्यायानें मिळविलेल्याचें, त्याचप्रमाणें पतिताला अर्पण केलेलें, चौर्यकर्म करणाऱ्या ब्राह्मणाला दिलेलें ६, गुरु, अनृतप्रिय, पापी, कृतघ्न, ग्रामोपाध्याय, वेदविक्रयी, शूद्राचा उपाध्याय ७, वर्णाश्रमविहित कर्में न करितां रहाणारे नुसते जातब्राह्मण, रजस्वला कन्येचें पाणिग्रहण करणारा, स्त्रिया आणि गारुडी वगैरे ह्यांना दिलेलें ८ व त्याचप्रमाणें

यद्दत्तं वृथा दानानि षोडश । तमोवृतस्तु यो दद्याद्भयात्क्रोधात्तथैव च ९ भुङ्क्ते च दानं तत्सर्वं गर्भस्थस्तु नरः सदा । ददद्दानं द्विजातिभ्यो वृद्धभावेन मानवः १० तस्मात्सर्वास्ववस्थासु सर्वदानानि पार्थिव । दातव्यानि द्विजातिभ्यः स्वर्गमार्गजिगीषया ११ युधिष्ठिर उवाच ॥ चातुर्वर्ण्यस्य सर्वस्य वर्तमानाः प्रतिग्रहे । केन विप्रा विशेषेण तारयन्ति तरन्ति च १२ मार्कण्डेय उवाच ॥ जपैर्मन्त्रैश्च होमैश्च स्वाध्यायाध्ययनेन च । नावं वेदमयीं कृत्वा तारयन्ति तरन्ति च १३ ब्राह्मणांस्तोषयेद्यस्तु तुष्यन्ते तस्य देवताः । वचनाच्चापि विप्राणां स्वर्गलोकमवाप्नुयात् १४ पितृदैवतपूजाभिर्ब्राह्मणाभ्यर्चनेन च । अनन्तं पुण्यलोकं तु गन्तासि त्वं न संशयः १५ श्लेष्मादिभिर्व्याप्ततनुर्म्रियमाणो विचेतनः । ब्राह्मणा एव संपूज्याः पुण्यं स्वर्गमभीप्सता १६ श्राद्धकाले तु यत्नेन भोक्तव्या ह्यजुगुप्सिताः । दुर्वर्णः कुनखी कुष्ठी मायावी कुण्डगो-

---

सेवकांना दिलेलें हीं सोळा प्रकारचीं दानें व्यर्थ होत ९. मोहित होऊन आणि त्याचप्रमाणें भीतीनें अथवा क्रोधानें जो वरील प्रकारचें दान देतो तो त्या दानाचें फल सर्व गर्भावस्थेंतच घेतो. (पुढें उपयोगीं पडण्याइतकें त्याचें फल शिलक रहातच नाहीं;) परंतु, ह्या दानांशिवाय दुसरें दान जो सत्पात्र ब्राह्मणांना देतो तो त्याच्या फलाचा उपभोग वृद्धावस्थेंतही घेतच असतो १०. तस्मात्, हे राजा, स्वर्गमार्ग प्राप्त करून घेण्याची इच्छा असल्यास कोणत्याही अवस्थेमध्यें कोणतेंही दान ब्राह्मणाला द्यावें ११. युधिष्ठिर प्रश्न करतो:—ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ह्या सर्व चारी वर्णांपासून प्रतिग्रह घेणारे ब्राह्मण कोणत्या विशेष कर्मानें पापापासून दुसऱ्याला तारितात व आपण स्वतः तरतात ? १२. मार्कंडेय सांगतात:—जप, मंत्र, होम आणि वेदाध्ययन ह्यांच्या योगानें अर्थात् वेदमयी नौका बनवून ते दुसऱ्यांना तारितात व स्वतः तरतात १३. ब्राह्मणांना जो संतुष्ट करितो त्याच्यावर देवताही संतुष्ट होतात आणि असें झालें असतां ब्राह्मणांच्या आशीर्वादानेंही त्याला स्वर्गप्राप्ति होते १४. पितर, देव आणि ब्राह्मण ह्यांच्या पूजनानें तुला अक्षय्य पुण्यलोक प्राप्त होईल ह्यांत संशय नाहीं १५. कफादिकांनीं सर्व शरीर व्याप्त होऊन कांहीं सुचेनासें झालें आहे आणि अगदीं मरणाचा समय आलेला आहे अशी अवस्था झाली असतांनाही पवित्र जो स्वर्गलोक त्याच्या प्राप्तीची इच्छा असल्यास ब्राह्मणांचेंच पूजन करावें १६. श्राद्धसमयीं यत्नानें अनिंदित ब्राह्मणांनाच भोजन द्यावें. बीभत्स वर्णानें युक्त, कुनखी, कुष्ठी, मायावी, (भर्ता जिवंत असतांना जारापासून झालेला) कुंड, (भर्ता निवर्त-

लकौ १७ वर्जनीयाः प्रयत्नेन काण्डपृष्ठाश्च देहिनः । जुगुप्सितं हि यच्छ्राद्धं दहत्यग्निरिवेन्धनम् १८ ये ये श्राद्धे न युज्यन्ते मूकान्धबधिरादयः । तेपि सर्वे नियोक्तव्या मिश्रिता वेदपारगैः १९ प्रतिग्रहश्च वै देयः शृणु यस्य युधिष्ठिर । प्रदातारं तथात्मानं यस्तारयति शक्तिमान् २० तस्मिन्देयं द्विजे दानं सर्वागमविजानता । प्रदातारं तथात्मानं तारयेद्यः स शक्तिमान् २१ न तथा हविषो होमैर्न पुष्पैर्नानुलेपनैः । अग्नयः पार्थ तुष्यन्ति यथा ह्यतिथिभोजने २२ तस्मात्त्वं सर्वयत्नेन यतस्वातिथिभोजने । पादोदकं पादघृतं दीपमन्नं प्रतिश्रयम् २३ प्रयच्छन्ति तु ये राजन्नोपसर्पन्ति ते यमम् । देवमाल्यापनयनं द्विजोच्छिष्टावमार्जनम् २४ आकल्पपरिचर्या च गात्रसंवाहनानि च । अत्रैकैकं नृपश्रेष्ठ गोदानाद्यतिरिच्यते २५ कपिलायाः प्रदानात्तु मुच्यते नात्र संशयः । तस्मादलंकृतां दद्यात्कपिलां तु द्विजातये २६ श्रोत्रियाय दरिद्राय गृहस्थायाग्नि-

---

ल्यावर झालेला) गोलक १७ आणि पाठीवर भाता टाकून वागणारे अथवा क्षात्रधर्मानें चालणारे हे प्रयत्नपूर्वक श्राद्धाला वर्ज्य केले पाहिजेत. कारण, अग्नि ज्याप्रमाणें इंधनाला दग्ध करितो त्याप्रमाणें सदोष श्राद्ध कर्त्याला दग्ध करून टाकितें १८. मुके, आंधळे, बहिरे वगैरे जे जे ह्याखेरीज दुसरे ब्राह्मण श्राद्धाला योग्य मानिलेले नाहींत तेही सर्व (प्रसंग आल्यास) श्राद्धाला सांगावे; परंतु, त्यांत कांहीं तरी वेदपारगत ब्राह्मण असावेत १९ हे युधिष्ठिरा, दान कोणाला द्यावें हें श्रवण कर. दात्याला व स्वतःला तारण्याचें ज्याचे अंगीं सामर्थ्य असेल २० त्या द्विजाला सर्व श्रुतिस्मृतिप्रभृति आगम जाणणाऱ्यानें दान द्यावें. कारण, दात्याला आणि स्वतःला जो तारितो तो सामर्थ्यवान् होय २१. हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, अतिथिभोजनाच्या योगानें जसे अग्नि संतुष्ट होतात तसे हविर्द्रव्याचे होम, पुष्पें व अनुलेपनें ह्यांनीं संतुष्ट होत नाहींत २२ तस्मात्, तूं हवा तो योग्य उपाय योजून अतिथिभोजनाविषयीं यत्न कर. पादप्रक्षालनार्थ उदक, पायांना लावण्याकरितां तूप, दीप, अन्न आणि बिऱ्हाडाला जागा २३ जे अतिथीला देतात ते, हे राजा, यमाकडे जात नाहींत. देवांचा निर्माल्य दूर नेणें, द्विजांचीं उष्टीं काढणें २४, त्यांची यथाशक्ति सेवा करणें आणि त्यांचे हातपाय चेपणें ह्यापैकीं एकेकही, हे नृपश्रेष्ठा, गोदानापेक्षां श्रेष्ठ आहे २५. (एकरंगी) कपिला गाईचें दान केलें असतां पुरुष मुक्त होतो ह्यांत संशय नाहीं. तस्मात्, ब्राह्मणाला अलंकार घातलेली कपिला द्यावी २६ व ती वेदाध्ययनसंपन्न, दरिद्री, गृहस्थाश्रमी, अग्निहोत्री, स्त्रीपुत्रादिकांच्या पोषणाचा भार ज्याचे

होत्रिणे । पुत्रदाराभिभूताय तथा ह्यनुपकारिणे २७ एवंविधेषु दातव्या न समृद्धेषु भारत । को गुणो भरतश्रेष्ठ समृद्धेष्वभिवर्जितम् २८ एकस्यैका प्रदातव्या न बहूनां कदाचन । सा गौर्विक्रयमापन्ना हन्यात्त्रिपुरुषं कुलम् २९ न तारयति दातारं ब्राह्मणं नैव नैव तु । सुवर्णस्य विशुद्धस्य सुवर्णं यः प्रयच्छति ३० सुवर्णानां शतं तेन दत्तं भवति शाश्वतम् । अनड्वाहं तु यो दद्याद्बलवन्तं धुरन्धरम् ३१ स निस्तरति दुर्गाणि स्वर्गलोकं च गच्छति । वसुन्धरां तु यो दद्याद्द्विजाय विदुषात्मने ३२ दातारं ह्यनुगच्छन्ति सर्वे कामाभिवाञ्छिताः । पृच्छन्ति चात्र दातारं वदन्ति पुरुषा भुवि ३३ अध्वनि क्षीणगात्राश्च पांसुपादावगुण्ठिताः । तेषामेव श्रमार्तानां यो ह्यन्नं कथयेद्बुधः ३४ अन्नदातृसमः सोपि कीर्त्यते नात्र संशयः । तस्मात्त्वं सर्वदानानि हित्वान्नं संप्रयच्छ ह ३५ न हीदृशं पुण्यफलं विचित्रमिह विद्यते । यथाशक्ति च यो दद्यादन्नं विप्रेषु संस्कृतम् ३६ स तेन कर्मणाप्नोति प्रजापतिसलोकताम् । अन्नमेव विशिष्टं हि

अंगावर पडलेला आहे आणि ज्याच्या उपकाराची आपल्याला इच्छा नाही अशा ब्राह्मणाला द्यावी २७. सारांश, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, अशा प्रकारच्या ब्राह्मणाना कपिला द्यावी; धनसंपन्नाना देऊ नये. कारण, हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, धनधान्यांची समृद्धि ज्यांचे घरीं आहे त्यांना दिलेल्या दानाचा उपयोग काय ? २८. एक गाय एकालाच द्यावी, तीच तीच फिरून अनेकांना देऊ नये. कारण, पुष्कळाना दिलेली एकच गाय वारंवार विकली जात असल्यामुळे ती दात्याच्या कुलांतील तीन पुरुषांना अधोगतीस नेते २९ आणि ती ब्राह्मणाला तर नाहींच नाहीं; परतु, दात्यालाही तारीत नाहीं. शुद्ध ब्राह्मणाला जो एक तोळा सुवर्ण देतो ३० त्याला शभर तोळे सुवर्ण दिल्याचें अक्षय्य फल प्राप्त होतें. धुरी ओढणारा बलाढ्य बैल जो देतो ३१ तो सकटातून तरून स्वर्गलोकीं जातो. विद्वान् ब्राह्मणाला पृथ्वी दान दिली असतां ३२ दात्याचे सर्व इष्ट मनोरथ परिपूर्ण होतात. इतकेंच नव्हे; परतु, पृथ्वीमध्ये लोक त्या दात्याची विचारपूस करून प्रशंसा करू लागतात ३३. मार्गाने चालतां चालतां थकून गेलेले व मार्गावरील धुळीनें पाय भरून गेलेले असे जे असतील त्या श्रांत पुरुषांना जो समजस पुरुष अमुक अमुक ठिकाणीं अन्न आहे असें सांगतो ३४ त्याचीही अन्नदात्याप्रमाणें कीर्ति होते ह्यांत संशय नाहीं. तस्मात्, तूं इतर सर्व दानांची पर्वा न करितां अन्नदान कर ३५. कारण, अन्नदानासारिखें विचित्र पुण्यफल दुसऱ्या कोणत्याही दानाचें नाहीं. विप्रांना जो उत्तम रीतीनें तयार केलेलें अन्न देतो ३६ त्याला त्या कर्माच्या योगानें

तस्मात्परतरं न च ३७ अन्नं प्रजापतिश्चोक्तः स च संवत्सरो मतः। संवत्सरस्तु यज्ञोसौ सर्वं यज्ञे प्रतिष्ठितम् ३८ तस्मात्सर्वाणि भूतानि स्थावराणि चराणि च। तस्मादन्नं विशिष्टं हि सर्वेभ्य इति विश्रुतम् ३९ येषां तटाकानि महोदकानि वाप्यश्च कूपाश्च प्रतिश्रयाश्च। अन्नस्य दानं मधुरा च वाणी यमस्य ते निर्वचना भवन्ति ४० धान्यं श्रमेणार्जितवित्तसंचितं विप्रे सुशीले च प्रयच्छते यः। वसुंधरा तस्य भवेत्सुतुष्टा धारां वसूनां प्रतिमुञ्चतीव ४१ अन्नदाः प्रथमं यान्ति सत्यवाक्तदनन्तरम् । अयाचितप्रदाता च समं यान्ति त्रयो जनाः ४२ वैशम्पायन उवाच ॥ कौतूहलसमुत्पन्नः पर्यपृच्छद्युधिष्ठिरः । मार्कण्डेयं महात्मानं पुनरेव महानुजः ४३ यमलोकस्य चाध्वानमन्तरं मानुषस्य च । कीदृशं किं प्रमाणं वा कथं वा तन्महामुने ४४ तरन्ति पुरुषाश्चैव येनोपायेन शंस मे ४५ मार्कण्डेय उवाच ॥ सर्वगुह्यतमं प्रश्नं पवित्रमृषिसंस्तुतम् । कथयिष्यामि ते राजन्धर्मं धर्मभृतां वर ४६ षडशीति सहस्राणि योजनानां नराधिप । यम-

---

ब्रह्मलोकाची प्राप्ति होते. अन्न हेच सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे. त्यापेक्षा दुसरें कांहीं एक श्रेष्ठ नाहीं ३७. अन्नालाच प्रजाधिपति ह्मणजे विराट् असें ह्मटलेलें आहे व तो संवत्सर आहे आणि जो संवत्सर आहे तोच हा यज्ञ आहे आणि सर्व कांहीं यज्ञाच्याच आधारावर आहे ३८. कारण, सर्व स्थावर व जंगम प्राणी यज्ञापासूनच उत्पन्न होणार आहेत. तस्मात्, सर्वांपेक्षां अन्न श्रेष्ठ असें ह्मटलेलें आहे ३९. उदकपरिपूर्ण तटाक, वापी, कूप, धर्मशाळा जे वाटसरूकरितां बांधितात आणि त्याचप्रमाणें जे अन्नदान व मधुर भाषण करितात त्यांचें नांवही यम कधीं काढीत नाहीं ४०. श्रमानें मिळवून ठेविलेलें द्रव्य आणि धान्य जो सुशील ब्राह्मणाला देतो त्याच्यावर पृथ्वी संतुष्ट होते आणि जसा कांहीं द्रव्याचा पाऊसच पाडूं लागते ४१ अन्नदान करणारा प्रथम जातो आणि नंतर सत्य भाषण करणारा व मागितल्यावांचून दान देणारा हे जातात आणि हे तिघेही एकाच ठिकाणीं जातात ४२ वैशंपायन सांगतातः—ह्यानंतर उत्सुकता प्राप्त झाल्यामुळें भ्रात्यांसहवर्तमान असलेला युधिष्ठिर पुनरपि महात्म्या मार्कंडेयमुनींना ह्मणाला ४३ "हे महामुने, यमलोकाचा मार्ग कसा आहे आणि मनुष्यलोक व यमलोक ह्यामध्यें अंतर किती आहे हें आपण मला कथन करा ४४ आणि तो यमलोक कोणत्या उपायानें पुरुषांना चुकवितां येतो हेंही आपण मला सांगा ४५." मार्कंडेय सांगतातः— अत्यंत गुह्य, पवित्र आणि ऋषींना मान्य असा हा धर्मविषयक प्रश्न, हे धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ राजा, मी तुला कथन करितों ४६. हे राजा, शहां-

लोकस्य चाध्वानमन्तरं मानुषस्य च ४७ आकाशं तदपानीयं घोरं कान्तारदर्शनम् । न तत्र वृक्षच्छाया वा पानीयं केतनानि च ४८ विश्रमेद्यत्र वै श्रान्तः पुरुषोऽध्वनि कर्शितः । नीयते यमदूतैस्तु यमस्याज्ञाकरैर्बलात् ४९ नराः स्त्रियस्तथैवान्ये पृथिव्यां जीवसंज्ञिताः । ब्राह्मणेभ्यः प्रदानानि नानारूपाणि पार्थिव ५० हयादिना प्रकृष्टानि तेऽध्वानं यान्ति वै नराः । सन्निवार्यातपं यान्ति च्छत्रेणैव हि च्छत्रदाः ५१ तृप्ताश्चैवान्नदातारो ह्यतृप्ताश्चाप्यनन्नदाः । वस्त्रिणो वस्त्रदा यान्ति अवस्त्रा यान्त्यवस्त्रदाः ५२ हिरण्यदाः सुखं यान्ति पुरुषास्त्वभ्यलंकृताः । भूमिदास्तु सुखं यान्ति सर्वैः कामैः सुतर्पिताः ५३ यान्ति चैवापरिक्लिष्टा नराः सस्यप्रदायकाः । नराः सुखतरं यान्ति विमानेषु गृहप्रदाः ५४ पानीयदा ह्यतृषिताः प्रहृष्टमनसो नराः । पन्थानं द्योतयन्तश्च यान्ति दीपप्रदाः सुखम् ५५ गोप्रदास्तु सुखं यान्ति निर्मुक्ताः सर्वपातकैः ।

यशी हजार योजनें (ह्मणजे तीन लक्ष, चव्वेचाळिस हजार कोस) यमलोक आणि मनुष्यलोक ह्यांतील मार्गाचें अंतर आहे; ४७ तो मार्ग ह्मणजे उदकशून्य, घोर आणि ओसाड असा एक प्रदेश नुसत्या आकाशानें व्याप्त आहे. मार्गानें जातां जातां कृश व श्रांत झालेल्या पुरुषाला कांहीं वेळ विश्रांति घेतां येईल अशी वृक्षाची छाया, उदक अथवा घरें ह्यापैकीं तेथें कांहीं एक नाहीं. अशा मार्गावरून यमाची आज्ञा परिपालन करणारे यमदूत बलात्कारानें पुरुषांना, स्त्रियांना आणि त्याचप्रमाणें पृथ्वींतील इतरही जीवांना घेऊन जात असतात. हे राजा, नानाप्रकारचीं दानें ज्यांनीं ब्राह्मणाला दिलीं असतील ते पुरुष अश्वावर वगैरे आरूढ होऊन मार्गाचें आक्रमण करितात व ज्यांनीं छत्रदान केलें असेल ते छत्रानें सूर्याच्या तापाचें निवारण करून जात असतात ४८,४९, ५०, ५१. अन्नदान करणारे तृप्त होऊन जात असतात, अन्नदान न करणारे क्षुधित होऊन जात असतात; वस्त्रदान देणारे वस्त्रें परिधान करून जातात व वस्त्रदान न देणाऱ्यांना वस्त्रहीनच जाणें भाग पडतें ५२. सुवर्णदान देणारे पुरुष भूषित होऊन सुखानें परलोकीं जातात आणि भूमिदान देणारेही सर्व मनोरथ परिपूर्ण होऊन सुखानें चालते होतात ५३. धान्यदान देणारे पुरुष कांहीं एक क्लेश न होतां मार्गाचें आक्रमण करितात आणि गृहदान देणारे लोक विमानांत बसून फारच सुखानें मार्ग क्रमितात ५४. उदक देणारे तृषाक्रांत न होतां मन आनंदित राहून मार्गाला लागतात आणि दीपदान देणारे मार्ग प्रकाशित करीत करीत अनायासें निघून जातात ५५. गोप्रदान करणारे लोक सर्व पातकांपासून मुक्त होऊन सुखानें परलोकाचें अवलंबन करितात

विमानैर्हंससंयुक्तैर्यान्ति मासोपवासिनः ५६ तथा बर्हिप्रयुक्तैश्च षष्ठरात्रोपवासिनः । त्रिरात्रं क्षपते यस्तु एकभक्तेन पाण्डव ५७ अन्तरा चैव नाश्नाति तस्य लोका ह्यनामयाः । पानीयस्य गुणा दिव्याः प्रेतलोकसुखावहाः ५८ तत्र पुष्पोदका नाम नदी तेषां विधीयते । शीतलं सलिलं तत्र पिबन्ति ह्यमृतोपमम् ५९ ये च दुष्कृतकर्माणः पूयं तेषां विधीयते । एवं नदी महाराज सर्वकामप्रदा हि सा ६० तस्मात्त्वमपि राजेन्द्र पूजयैनान्यथाविधि । अध्वनि क्षीणगात्रश्च पथि पांसुसमन्वितः ६१ पृच्छते ह्यन्नदातारं गृहमायाति चाशया । तं पूजयाथ यत्नेन सोतिथिर्ब्राह्मणश्च सः ६२ तं यान्तमनुगच्छन्ति देवाः सर्वे सवासवाः । तस्मिन्संपूजिते प्रीता निराशा यान्त्यपूजिते ६३ तस्मात्त्वमपि राजेन्द्र पूजयैनं यथाविधि । एतत्ते शतशः प्रोक्तं किं भूयः श्रोतुमिच्छसि ६४ युधिष्ठिर उवाच । पुनः

आणि महिना महिना उपवास करणारे पुरुष हंस जोडिलेल्या विमानांत बसून चालते होतात ५६; त्याचप्रमाणें सहा सहा रात्री उपवास करणार लोक मयूरसयुक्त विमानात बसून जातात. हे पांडुपुत्रा, एका भोजनावर जो तीन रात्री काढिता ५७ आणि जो मध्यतरीं काही एक खात नाही त्याला अक्षय्य लोक प्राप्त होतात. जलदानाचे दिव्य गुण परलोकीं पुरुषाला सुखावह होतात ५८. कारण, अशा लोकाच्याकरिता पुष्पादकानामक नदी तयार ठेविलेली असते आणि त्या नदीचे तीरीं ते अमृततुल्य शीतल उदकाचे सेवन करितात ५९ त्याचप्रमाणे जे दुष्कर्मी असतात त्याच्याकरिता पू तयार ठेविलेला असतो ह्याप्रमाणे, हे महाराजा, ती नदी, नणाऱ्या दूतांच्या सर्व कामना परिपूर्ण करणारी आहे ६०. तस्मात्, ह्या दान देणाऱ्याना तूही यथाविधि मान दे. मार्गामध्ये गात्रे क्षीण होऊन शरीर धुळीने भरलेला असा वाटसरू ६१ अन्नदात्याचा शोध करीत असतो आणि मोठ्या आशेने त्याच्या घरी येतो. तेव्हां त्या वाटसरूची तू मोठ्या यत्नाने मानमान्यता राखीत जा. कारण, तो अतिथि असून पूजनयोग्य ब्राह्मणही तो आहे ६२. त्या वाटसरूबरोबर इंद्रासहवर्तमान सर्व देव जात असतात आणि त्याचें पूजन झालें असतां ते संतुष्ट होत असून त्याचें पूजन न झाल्यास ते निराश होऊन चालते होत असतात ६३. तस्मात्, हे राजेंद्रा, तूही अशा मार्गस्थाचें यथाविधि पूजन कर. असो. हें मी तुला शेकडो प्रकारें फोड करून सांगितलें आहे; आतां आणखी काय ऐकण्याची तुझी इच्छा आहे ? ६४. युधिष्ठिर

पुनरहं श्रोतुं कथां धर्मसमाश्रयाम् । पुण्यामिच्छामि धर्मज्ञ कथ्य-
मानां त्वया विभो ६५ मार्कण्डेय उवाच ॥ धर्मान्तरं प्रति कथां कथ्य-
मानां मया नृप । सर्वपापहरां नित्यं शृणुष्वावहितो मम ६६ कपिलायां
तु दत्तायां यत्फलं ज्येष्ठपुष्करे । तत्फलं भरतश्रेष्ठ विप्राणां पादधा-
वने ६७ द्विजपादोदकक्लिन्ना यावत्तिष्ठति मेदिनी । तावत्पुष्करपर्णेन
पिबन्ति पितरो जलम् ६८ स्वागतेनाग्नयस्तृप्ता आसनेन शतक्रतुः ।
पितरः पादशौचेन अन्नाद्येन प्रजापतिः ६९ यावद्वत्सस्य वै पादौ शिर-
श्चैव प्रदृश्यते । तस्मिन्काले प्रदातव्या प्रयतेनान्तरात्मना ७० अन्तरिक्ष-
गतो वत्सो यावद्योन्यां प्रदृश्यते । तावद्गौः पृथिवी ज्ञेया यावद्गर्भं न
मुञ्चन्ति ७१ यावन्ति तस्या रोमाणि वत्सस्य च युधिष्ठिर । तावद्युग-
सहस्राणि स्वर्गलोके महीयते ७२ सुवर्णनासां यः कृत्वा सखुरां कृष्ण-
धेनुकाम् । तिलैः प्रच्छादितां दद्यात्सर्वरत्नैरलंकृताम् ७३ प्रतिग्रहं गृहीत्वा
यः पुनर्ददति साधवे । फलानां फलमश्नाति तदा दत्त्वा च भारत ७४
ससमुद्रगुहा तेन सशैलवनकानना । चतुरन्ता भवेद्दत्ता पृथिवी नात्र

ह्मणतोः— हे धर्मज्ञ प्रभो, आपल्या मुखांतून धर्मविषयक पवित्र कथा श्रवण करण्याची मला फिरून फिरून इच्छा होत आहे ६५. मार्कंडेय ह्मणतातः—हे राजा, नेहमी सर्व पाप नाहींसें करणारी अशी एक धर्मविषयक कथा मी तुला कथन करीत आहे, ती तूं अवधान देऊन श्रवण कर ६६ हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, ज्येष्ठ पुष्करतीर्थावर कपिलेचें दान केलें असतां जें फल प्राप्त होतें तें फल विप्रांच्या पादप्रक्षालनानें प्राप्त होतें ६७. द्विजांच्या पादोदकानें भूमि जोपर्यंत भिजलेली राहते तोंपर्यंत पितर कमलपत्रानें जलपान करीत असतात ६८. अतिथीचें स्वागत केलें असतां अग्नि तृप्त होतात, त्याला आसन दिलें असतां इंद्र संतुष्ट होतो, त्याचे पाय धुण्यानें पितरांचें संतर्पण होतें आणि त्याला अन्न घातल्यानें विराट्पुरुषाची तृप्ति होते ६९. वासराचे दोन पाय व मस्तक बाहेर दिसत आहे अशा वेळीं शुद्ध मनानें गाय (ब्राह्मणाला) द्यावी ७०. कारण, योनीमध्यें जोंपर्यंत गर्भ अंतराळीं दिसत असतो ह्मणजे जोपर्यंत गर्भ पुरता बाहेर पडला नाहीं तोंपर्यंत गाय ही पृथ्वी आहे ७१. तेव्हां, हे युधिष्ठिरा, त्या गाईच्या आणि त्या वासराच्या अंगावर जितके केंस असतील तितकीं हजार युगें होईपर्यंत दाता स्वर्गलोकीं मानमान्यतेनें रहातो ७२. सुवर्णमय नासिका व रौप्य आणि खूर ह्यांसहवर्तमान जो सर्व रत्नांनीं भूषित केलेली आणि तिळांनीं आच्छादित केलेली कृष्णवर्ण धेनु ब्राह्मणाला देतो त्याला व, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, त्या धेनूचा ७३ प्रतिग्रह घेऊन जो पुनरपि ती धेनु सत्पात्र ब्राह्मणाला देतो त्याला सर्व फलांतील उत्तम फल प्राप्त

संशयः ७५ अन्तर्जानुशयो यस्तु भुङ्क्ते सक्तभाजनः । यो द्विजः शब्द-
रहितं स क्षमस्तारणाय वै ७६ अपानपा न गदितास्तथान्ये ये द्विजातयः ।
जपन्ति संहितां सम्यक्ते नित्यं तारणक्षमाः ७७ हव्यं कव्यं च यत्किं-
चित्सर्वं तच्छ्रोत्रियोऽर्हति । दत्तं हि श्रोत्रिये साधौ ज्वलितेऽग्नौ यथा
हुतम् ७८ मन्युप्रहरणा विप्रा न विप्राः शस्त्रयोधिनः । निहन्युर्मन्युना
विप्रा वज्रपाणिरिवासुरान् ७९ धर्माश्रितेयं तु कथा कथितेयं तवानघ ।
यां श्रुत्वा मुनयः प्रीता नैमिषारण्यवासिनः ८० वीतशोकभयक्रोधा
विपाप्मानस्तथैव च । श्रुत्वेमां तु कथां राजन्नभवन्तीह मानवाः ८१
युधिष्ठिर उवाच ॥ किं तच्छौचं भवेयेन विप्रः शुद्धः सदा भवेत् ।
तदिच्छामि महाप्राज्ञ श्रोतुं धर्मभृतां वर ८२ मार्कण्डेय उवाच॥ वाक्-
शौचं कर्मशौचं च यच्च शौचं जलात्मकम् । त्रिभिः शौचैरुपेतो यः स
स्वर्गी नात्र संशयः ८३ सायं प्रातश्च संध्यां यो ब्राह्मणोऽभ्युपसेवते ।

होतें ७४. सारांश, समुद्र, गुहा, पर्वत, वनें, अरण्यें ह्यांसहवर्तमान चारी समुद्रांनीं मर्यादित झालेली पृथ्वी दिल्याचें फल त्याला प्राप्त होतें ह्यांत संशय नाहीं ७५. डावा हात भोजनपात्राला लावून ठेवून व गुढघ्यांतून दोन्ही हात घेऊन जो ब्राह्मण उकीडव्यानें कांहीं एक न बोलतां भोजन करितो तो तारण्यास समर्थ होतो ७६. मद्यपानरहित आणि कसल्याही दोषासंबंधानें बोभाटा नसलेले असे जे ब्राह्मण उत्तमप्रकारें वेदाध्ययन करीत असतात ते तारण्यास नेहमींच समर्थ असतात ७७. (देवांच्या उद्देशानें अर्पण केलेलें) हव्य आणि (पितरांच्या उद्देशानें दिलें जाणारें) कव्य जें कांहीं असेल त्या सर्वास वेदाध्ययन करणारा ब्राह्मण पात्र आहे. कारण, वेदाध्ययन करणाऱ्या सज्जन ब्राह्मणाला दिलेलें दान प्रज्वलित अग्नीमध्यें केलेल्या हवनाप्रमाणें (पुण्यकारक) होतें ७८. विप्र शस्त्रानें युद्ध करणारे नसून क्रोध हेंच त्यांचें युद्धसाधन आहे व वज्राच्या योगानें ज्याप्रमाणें इंद्र दैत्यांचा वध करितो त्याप्रमाणें विप्र क्रोधाच्या योगानें (प्रतिपक्षाचा) वध करितात ७९. हे निष्पापा युधिष्ठिरा, जी कथा ऐकून नैमिषारण्यामध्यें वास्तव्य करणारे मुनि संतुष्ट झाले ती ही धर्माला अनुसरून असलेली कथा मीं तुला कथन केली आहे ८०. हे राजा, शोक, भय, क्रोध आणि पाप ह्यांनीं रहित असलेल्या पुरुषांनीं ही कथा श्रवण केली असतां त्यांना ह्या पृथ्वीवर पुनरपि जन्मास येण्याची पाळी येत नाहीं ८१. युधिष्ठिर प्रश्न करितो:—हे धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ महाज्ञानवान् मुने, ज्याच्या योगानें विप्र नेहमीं शुद्ध रहातो तें शौच काय आहे हें श्रवण करण्याची माझी इच्छा आहे ८२. मार्कंडेय सांगतातः—वाक्शौच, कर्मशौच आणि जलशौच ह्या तीन शौचांनीं (ह्मणजे शुद्धपणांनीं) जो

प्रजपन्पावनीं देवीं गायत्रीं वेदमातरम् ८४ स तया पावितो देव्या ब्राह्मणो नष्टकिल्बिषः । न सीदेत्प्रतिगृह्णानो महीमपि ससागराम् ८५ ये चास्य दारुणाः केचिद्ग्रहाः सूर्यादयो दिवि । ते चास्य सौम्या जायन्ते शिवाः शिवतराः सदा ८६ सर्वे नानुगतं चैनं दारुणाः पिशिताशनाः । घोररूपा महाकाया धर्षयन्ति द्विजोत्तमम् ८७ नाध्यापनाद्याजनाद्वा अन्यस्माद्वा प्रतिग्रहात् । दोषो भवति विप्राणां ज्वलिताग्निसमा द्विजाः ८८ दुर्वेदा वा सुवेदा वा प्राकृताः संस्कृतास्तथा । ब्राह्मणा नावमन्तव्या भस्मच्छन्ना इवाग्नयः ८९ यथा श्मशाने दीप्तौजाः पावको नैव दुष्यति । एवं विद्वानविद्वान्वा ब्राह्मणो दैवतं महत् ९० प्राकारैश्च पुरद्वारैः प्रासादैश्च पृथग्विधैः । नगराणि न शोभन्ते हीनानि ब्राह्मणोत्तमैः ९१ वेदाढ्या वृत्तसंपन्ना ज्ञानवन्तस्तपस्विनः । यत्र तिष्ठन्ति वै विप्रास्तन्नाम नगरं नृप ९२ व्रजेवाप्यथवारण्ये यत्र सन्ति बहुश्रुताः । तत्तन्नगरमित्याहुः पार्थ

पुरुष युक्त असतो तो स्वर्गास जातो ह्यांत संशय नाहीं ८३. वेदमाता जी पावन करणारी गायत्री देवी ती जपण्याकरितां जो ब्राह्मण सकाळ संध्याकाळ संध्योपासना करीत असतो ८४ तो त्या गायत्रीदेवीच्या योगानें पवित्र होऊन त्याचें पाप नाहींसें होत असतें. इतकेंच नव्हे; परंतु, समुद्रासहवर्तमान सर्व पृथ्वीचें दान घेतल्यानेंही तो पापलिप्त होत नाहीं ८५. शिवाय, ह्याला जे कांहीं स्वर्गांतील सूर्यादि ग्रह अनिष्ट असतात तेही त्याला सौम्य व कल्याण कारक होऊन उत्कृष्ट प्रकारचें फल देतात ८६. आणि त्याचप्रमाणें सावित्रीजपानें युक्त असलेल्या ह्या द्विजश्रेष्ठाला शरीरानें धिप्पाड व रूपानें भयंकर असलेले क्रूर राक्षसही पछाडण्यास समर्थ होत नाहींत ८७. (असें जे असतात त्या) विप्रांना अध्यापनापासून, याजनापासून अथवा दुसऱ्या कसल्या प्रतिग्रहापासून दोष लागत नाहीं. ते ब्राह्मण प्रज्वलित अग्नीसारखे (निर्दोष) रहातात ८८. उत्तम रीतीनें वेदाध्ययन करणारे असले किंवा नसले आणि त्याचप्रमाणें तपश्चर्येनें संस्कृत असले किंवा नसले तरी ब्राह्मणांचा कधीं अवमान करूं नये. कारण, ते भस्मामध्यें आच्छादित होऊन राहिलेल्या अग्नीप्रमाणें आहेत ८९. ज्याप्रमाणें श्मशानामध्यें उज्ज्वल तेजानें युक्त असलेला अग्नि दूषित न होतां दैवतच असतो त्याचप्रमाणें ब्राह्मण विद्वान् असो किंवा अविद्वान् असो तो मोठें दैवतच आहे ९०. नगरांतून जर उत्तम ब्राह्मण नसतील तर नुसत्या कोटांनीं, वेशींनीं आणि नानाप्रकारच्या इमारतींनीं नगरांना कधीं शोभा येणार नाहीं ९१. हे राजा, वेदाध्ययन, सदाचरण, ज्ञान आणि तप ह्यांनीं युक्त असलेले विप्र जेथें वास्तव्य करीत असतात तें खरें नगर होय ९२. हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, गोठा असो अथवा अरण्य असो, ज्या ज्या

तीर्थं च तद्भवेत् ९३ रक्षितारं च राजानं ब्राह्मणं च तपस्विनम् ।
अभिगम्याभिपूज्याथ सद्यः पापात्प्रमुच्यते ९४ पुण्यतीर्थाभिषेकं च
पवित्राणां च कीर्तनम् । सद्भिः संभाषणं चैव प्रशस्तं कीर्त्यते बुधैः ९५
साधुसंगमपूतेन वाक्सुभाषितवारिणा । पवित्रीकृतमात्मानं सन्तो
मन्यन्ति नित्यशः ९६ त्रिदण्डधारणं मौनं जटाभारोथ मुण्डनम् ।
वल्कलाजिनसंवष्टं व्रतचर्याभिषेचनम् ९७ अग्निहोत्रं वने वासः शरी-
रपरिशोषणं । सर्वाण्येतानि मिथ्या स्युर्यदि भावो न निर्मलः ९८ न
दुष्करमनाशित्वं सुकरं ह्यशनं विना । विशुद्धिं चक्षुरादीनां षण्णामि-
न्द्रियगामिनाम् ९९ विकारि तेषां राजेन्द्र सुदुष्करतरं मनः १००
ये पापानि न कुर्वन्ति मनोवाक्कर्मबुद्धिभिः । ते तपन्ति महात्मानो न
शरीरस्य शोषणम् १ न ज्ञातिभ्यो दया यस्य शुक्लदेहोविकल्मषः ।
हिंसा सा तपसस्तस्य नानाशित्वं तपः स्मृतम् २ तिष्ठन्गृहे चैव
मुनिर्नित्यं शुचिरलंकृतः । यावज्जीवं दयावांश्च सर्वपापैः प्रमुच्यते ३

ठिकाणीं बहुश्रुत ब्राह्मण वास्तव्य करीत असतात तें तें नगर असें ह्मणतात आणि तेंच स्थल तीर्थ होतें ९३. रक्षण करणाऱ्या राजाकडे आणि तपस्वी ब्राह्म-णाकडे जाऊन पूजन केलें असतां पुरुष पातकांपासून तत्काल मुक्त होतो ९४. पवित्र तीर्थाचें स्नान, पवित्र अशा त्रिसुपर्णादि मंत्रांचें पठण आणि सज्जनांशीं संभाषण ह्याला प्राज्ञ जन प्रशस्त समजत असतात ९५. साधुसमागमानें पवित्र झालेलें जें उत्कृष्ट भाषणरूप जल त्याच्या योगानें आत्मा पवित्र झाल्याचें सज्जन नेहमीं मानीत असतात ९६. त्रिदंडण, मौन, जटाभार मुंडण, वल्कलें अथवा कृष्णाजिनें ह्यांचें परिधान, व्रताचरण, स्नान ९७, अग्निहोत्र वनामध्यें वास्तव्य आणि(तपश्चर्येनें) शरीरशोषण हीं सर्व अंतःकरण शुद्ध नसेल तर, व्यर्थ आहेत ९८. चक्षुरिंद्रिय, श्रवणेंद्रिय, स्पर्शेंद्रिय, रसनेंद्रिय, घ्राणेंद्रिय आणि मन हीं सहा इंद्रियें शुद्ध झाल्यावांचून विषयोपभोगापासून अलिप्त रहाणें शक्य नाहीं. कारण, विषयोपभोगाचा त्याग हीं गोष्ट कठिण आहे. विषयोपभोगाला मात्र ह्या सहांच्या शुद्धीची मुळींच गरज नाहीं; केंव्हांही सुलभच आहे ९९. हे राजाधिराज, त्या सहा इंद्रियांमध्यें मन हें जास्त विकारी असून त्याचा जय अत्यंत कठिण आहे १००. कायावाचामनेंकरून जे पाप करीत नाहींत ते महात्मे तपश्चर्या करीत असतात, शरीरशोषण हें तप नव्हे १. कुटुंबांतील माणसांकरितां जो काळजी करीत नाहीं आणि शुक्लवृत्तीवर जो उपजीविका करितो तो पापरहित होत नाहीं. कुटुंबांतील माणसांवर दया न करितां शुक्लवृत्तीनें रहाणें ही त्या तपाची हिंसा होय. नुसत्या भोजन त्यागाला तप ह्मणत नाहींत २. गृहामध्यें राहूनच जो मनन-

न हि पापानि कर्माणि शुद्ध्यन्त्यनशनादिभिः । सीदन्त्यनशनादेव मांस-
शोणितलेपनः ४ अज्ञातं कर्म कृत्वा च क्लेशो नास्य प्रहीयते । नाग्नि-
र्दहति कर्माणि भावशून्यस्य देहिनः ५ पुण्यादेव प्रव्रजन्ति शुद्ध्यन्त्यन-
शनानि च । न मूलफलभक्षित्वान्न मौनान्नानिलाशनात् ६ शिरसो
मुण्डनाद्वापि न स्थानकुटिकामनात् । न जटाधारणाद्वापि न तु स्थण्डि-
लशय्यया ७ नित्यं ह्यनशनाद्वापि नाग्निशुश्रूषणादपि । न चोदकप्र-
वेशेन न च क्ष्माशयनादपि ८ ज्ञानेन कर्मणा वापि जरामरणमेव च ।
व्याधयश्च प्रहीयन्ते प्राप्यते चोत्तमं पदम् ९ बीजानि ह्यग्निदग्धानि न
रोहन्ति पुनर्यथा । ज्ञानदग्धैस्तथा क्लेशैर्नात्मा संयुज्यते पुनः १०
आत्मना विप्रहीणानि काष्ठकुड्योपमानि च । विनश्यन्ति न संदेहः फेनानीव
महार्णवे ११ आत्मानं विन्दते येन सर्वभूतगुहाशयम् । श्लोकेन यदि
वार्धेन क्षीणं तस्य प्रयोजनम् १२ द्व्यक्षरादभिसंधाय केश्चिच्छ्लोकपदा-

---

शील पुरुष नेहमीं तिन्ही प्रकारें शुद्ध राहून गायत्रीजपानें संस्कृत असतो आणि आजन्म कुटुंबांतील माणसांवर दया करीत असतो तो सर्व पातकांपासून मुक्त होतो ३. उपोषण वगैरेंनीं पापकर्मांची शुद्धि होत नाहीं. रक्तमांसांनीं लिंपिलेल्या देहाचा मात्र उपोषणानें नाश होत असतो ४. शास्त्राज्ञेचा विचार न करितां स्वबुद्धीनें कर्म केल्यानें क्लेश मात्र होत असतात; त्याच्या योगानें पापनाश होत नाहीं आणि शास्त्रविहित कर्में जरी केलीं तरी श्रद्धारहित पुरुषाचीं पापें अग्नि दग्ध करीत नाहीं ५. शास्त्रविहित कर्मानुष्ठानरूप पुण्याच्याच योगानें पुरुषांची अंतःकरणशुद्धि होऊन त्यांना (मुक्तीची योग्यता आणणारें) वैराग्य प्राप्त होत असतें; उपोषणें, फलमूलभक्षण, मौन, वायुभक्षण ६, मस्तकमुंडण, घराचा त्याग करून पर्णकुटिकेंत वास्तव्य, जटाधारण, स्थंडिलशयन ७, सर्वदां निराहार, अग्निशुश्रूषा, जलप्रवेश आणि भूमीवर शयन ह्यांच्या योगानें मुक्तीची योग्यता अथवा अंतःकरणशुद्धि कधींही प्राप्त होणार नाहीं ८. ज्ञानाच्याच योगानें (प्रत्यक्ष) अथवा कर्माच्याच योगानें (परंपरेनें) जरा, मरण व व्याधि ह्यांचा नाश होऊन उत्तम पद प्राप्त होतें ९. अग्नीमध्यें भाजून निघालेलीं बीजें ज्याप्रमाणें पुनरपि उगवत नाहीत त्याप्रमाणें कर्में ज्ञानानें दग्ध झालीं असतां त्यांच्या योगानें पुनरपि आत्म्याला जन्मप्राप्ति होत नाहीं १०. महासागरामध्यें ज्याप्रमाणें फेंस नाहींसा होतो त्याप्रमाणें आत्मरहित असलेलीं काष्ठ, भिंत वगैरे-सारखीं दृश्य शरीरें नाहींशीं होतात ११. श्लोकानें अथवा अर्ध्या श्लोकानें ज्या पुरुषाला सर्व प्राण्यांच्या अंतःकरणामध्यें वास्तव्य करणाऱ्या आत्म्याची प्राप्ति होते त्याला मात्र इहलोकीं जन्मास येण्याचें कारण उरलें नाहीं असें समजावें १२. तत्त्वे

ङ्क्तैः । शतैरन्यैः सहस्रैश्च प्रत्ययो मोक्षलक्षणम् १३ नायं लोकोस्ति न परो न सुखं संशयात्मनः । ऊचुर्ज्ञानविदो वृद्धाः प्रत्ययो मोक्षलक्षणम् १४ विदितार्थस्तु वेदानां परिवेद प्रयोजनम् । उद्विजेत्स तु वेदेभ्यो दावाग्नेरिव मानवः १५ शुष्कं तर्कं परित्यज्य आश्रयस्व श्रुतिं स्मृतिम् । एकाक्षराभिसंबद्धं तत्त्वं हेतुभिरिच्छसि । बुद्धिर्न तस्य सिद्ध्येत साधनस्य विपर्ययात् १६ वेदपूर्वं वेदितव्यं प्रयत्नात्तद्वै वेदस्तस्य वेदः शरीरम् । वेदस्तत्त्वं तत्समासोपलब्धौ क्लीबस्त्वात्मा तत्स वेद्यस्य वेद्यम् १७ वेदोक्तमायुर्देवानामाशिषश्चैव कर्मणाम् । फलत्यनुयुगं लोके प्रभावश्च शरीरिणाम् १८ इन्द्रियाणां प्रमादेन तदेतत्परिवर्जयेत् । तस्मादनशनं दिव्यं निरुद्धेन्द्रि-

---

ह्या द्विरक्षर उपदेशवाक्यानें जीवपरमात्म्यांचें ऐक्य जाणिल्यावर सत्यं ज्ञानमनंत ब्रह्म इत्यादि प्रकारच्या मंत्रपदांनीं चिह्नित असलेली ब्रह्मविदाप्नोति परं इत्यादि ब्रह्मवाक्यें ज्यामध्यें आहेत अशा शेकडों अथवा हजारों उपनिषदाच्या योगानें मी ब्रह्म आहें असा मोक्षरूप प्रत्यय येत असतो १३. (साधनचतुष्टयसंपन्न झाल्यावर गुरूपदेश झाला असतां ब्रह्मसाक्षात्कार होतो आणि ब्रह्मसाक्षात्कार झाला असतां पुरुष संसारापासून मुक्त होतो.) ह्याविषयीं जो संशय धरितो तो इहलोकाला आणि परलोकालाही अंचवतो आणि त्याला कसलेंच खरें सुख प्राप्त होत नाहीं. मी ब्रह्म आहें अशी दृढ भावनाच (वर सांगितलेल्या प्रकारानें) उत्पन्न झाली असतां ती मुक्तीला कारणीभूत होते असे ज्ञानवान् वृद्धांचें ह्मणणें आहे १४. आत्मज्ञान झालेल्या पुरुषाला वेदांचे प्रयोजन पूर्णपणें समजलेल असते. तेव्हां दावाग्नीपासून ज्याप्रमाणें मनुष्य भीतीनें दूर होतो त्याप्रमाणें आत्मज्ञान झालेल्या पुरुषानें वेदोक्त कर्मांपासून अलग रहावें १५. अद्वितीय आणि व्यापक असा जो आत्मा तद्विषयक श्रुतिस्मृतिप्रतिपादित तत्त्व उपायांनीं जाणण्याची जर तुझी इच्छा असेल तर शुष्क तर्काचा त्याग करून श्रुतीचें व स्मृतीचें अवलंबन कर. ज्याच्यापाशीं साधनांचा अभाव आहे त्याला तत्त्वज्ञान प्राप्त होणार नाहीं. वेदाध्ययनपूर्वक आत्मज्ञान प्रयत्नानें करून घेतलें पाहिजे. कारण, वेद आणि आत्मा हीं एकच असून वेद हेंच आत्म्याचें शरीर आहे; वेदाचाही लय ज्याचे ठिकाणीं होतो त्या आत्म्याची प्राप्ति होण्याचा मुख्य उपाय वेद हाच आहे आणि स्वयंप्रकाश जो आत्मा तो शुद्ध मनानेंच विदित होणारा आहे १७. देवांचें आयुष्य, कर्मांचीं फलें आणि प्राण्यांचें प्रभाव हें सर्व वेदांत सांगितल्याप्रमाणें जगतामध्यें प्रत्येक युगांत दृष्टोत्पत्तीस येत असतें १८. असो. इंद्रियांची शुद्धि झाल्याशिवाय ज्याअर्थीं मुक्ति प्राप्त होत नाहीं त्याअर्थीं प्रथम इंद्रियांच्या शुद्धीनें अशनाचा ह्मणजे विषयोपभोगाचा त्याग करावा. कारण, खरें खरें जें अनशन तें इंद्रिय

यगोचरम् १९ तपसा स्वर्गगमनं भोगो दानेन जायते । ज्ञानेन मोक्षो
विज्ञेयस्तीर्थस्नानादघक्षयः १२० वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्तस्तु राजेन्द्र
प्रत्युवाच महायशाः । भगवञ्छ्रोतुमिच्छामि प्रधानविधिमुत्तमम् २१
मार्कण्डेय उवाच ॥ यत्त्वमिच्छसि राजेन्द्र दानधर्मं युधिष्ठिर । इष्टं चेदं
सदा मह्यं राजन्गौरवतस्तथा २२ शृणु दानरहस्यानि श्रुतिस्मृत्युदितानि
च २३ च्छायायां करिणः श्राद्धं तत्कर्णपरिवीजिते । दशकल्पायुतानीह
न क्षीयेत युधिष्ठिर २४ जीवनाय समाक्लिन्नं वसु दत्त्वा महीयते ।
वैश्यं तु वासयेद्यस्तु सर्वयज्ञैः स इष्टवान् २५ प्रतिस्रोतश्चित्रवाहाः
पर्जन्योऽन्नानुसंचरन् । महाधुरि यथा नावा महापापैः प्रमुच्यते २६
विप्लवे विप्रदत्तानि दधिमस्त्वक्षयाणि च । पर्वसु द्विगुणं दानमृतौ दशगुणं

निग्रहानेच प्राप्त होत असते १९. सारांश, स्वधर्माचरणरूप तपानें स्वर्गप्राप्ति, दानाच्या योगानें भोगप्राप्ति, ज्ञानाच्या योगानें मुक्ति आणि तीर्थस्नानाच्या योगानें पाप-निवृत्ति होत असते, २०. वैशंपायन सांगतात:—हे राजाधिराज जनमेजया, ह्याप्रमाणें मार्कंडेयमुनींनी धर्मराजाला सांगितलें असता तो महाकीर्तिमान् राजा त्यांना ह्मणाला "हे भगवन्, दानाचें उत्कृष्ट मुख्य विधान श्रवण करण्याची माझी इच्छा आहे" २१. मार्कंडेय सांगतात:—हे राजाधिराज युधिष्ठिरा, हे भूपते, तू ज्या दानधर्माची इच्छा करीत आहेस तें हे दान महाफलदायक असल्यामुळे मला सर्वदां इष्ट आहे २२. ह्याक-रितां श्रुतिस्मृतीत सांगितलेलीं दानफलें तू श्रवण कर २३. हे युधिष्ठिरा, गजाच्या *छायेमध्ये त्याच्या कानांचा वारा येत आहे अशा प्रदेशावर श्राद्ध केलें असतां एक लक्ष कल्प होईपर्यंत त्याचें फल नाहींसें होत नाहीं २४. जीवनार्थ रसप्रचुर अन्न दिल्यानें स्वर्गा-मध्यें मानमान्यता होते आणि गृहदान देऊन त्यामध्यें जो ब्राह्मणाचें वास्तव्य करवितो त्याला सर्व याग केल्याचें फल प्राप्त होतें २५. नियमित दिशा सोडून ज्या ठिकाणीं प्रवाह उलट दिशेस कांहीं मर्यादित स्थलापर्यंत वहात असतो त्या ठिकाणीं उत्कृष्ट अश्वदान दिलें असतां व अन्नाकरितां संचार करणाऱ्या अतिथिरूप इंद्राला अन्नदा-नानें तृप्त केलें असतां प्रचंड प्रवाहांत सांपडलेला पुरुष ज्याप्रमाणें नावेच्या योगानें त्यांतून मुक्त होतो त्याप्रमाणें ह्या अश्वदानादिकांच्या योगानें पुरुष सर्व पातकांपासून मुक्त होतो २६. ग्रहणसमयीं ब्राह्मणांना दिलेलीं दानें आणि विशेषतः दह्याची साय

* गुरुवार आणि अमावास्या असा योग आला असतां अश्वत्थाच्या छायेला गजच्छाया असें ह्मणत असतात. ह्या अश्वत्थाच्या छायेमध्यें त्याच्या कर्णाचा ह्मणजे पल्लवाचा वारा येत असलेला जो प्रदेश त्यावर श्राद्ध केलें असतां इ. असा अर्थ नीलकंठांनीं ह्या श्लोकाचा केला आहे.

भवेत् २७ अयने विषुवे चैव षडशीतिमुखेषु च । चन्द्रसूर्योपरागे च दत्तमक्षयमुच्यते २८ ऋतुषु दशगुणं वदन्ति दत्तं शतगुणमृत्वयनादिषु ध्रुवम् । भवति सहस्रगुणं दिनस्य राहोर्विषुवति चाक्षयमश्नुते फलम् २९ नाभूमिदो भूमिमश्नाति राजन्नायानदो यानमारुह्य याति । यान्यान्कामान्ब्राह्मणेभ्यो ददाति तांस्तान्कामाञ्जायमानः स भुङ्क्ते १३० अग्नेरपत्यं प्रथमं सुवर्णं भूर्वैष्णवी सूर्यसुताश्च गावः । लोकास्त्रयस्तेन भवन्ति दत्ता यः काञ्चनं गाश्च महीं च दद्यात् ३१ परं हि दानान्न बभूव शाश्वतं भव्यं त्रिलोके भवतं कुतः पुनः । तस्मात्प्रधानं परमं हि दानं वदन्ति लोकेषु विशिष्टबुद्धयः १३२ [८०१०] इति श्रीमहाभारते० मारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि दानमाहात्म्ये द्विशततमोध्यायः ॥ २०० ॥

हीं अक्षय फल देणारीं होतात. पर्वदिवशीं दिलेल्या दानाचें दुप्पट फल प्राप्त होत असून ऋतूच्या आरंभदिवशीं दान दिलें असतां तें दशगुणित होतें २७ आणि त्याप्रमाणें अयनसंक्रांत (कर्क व मकर), विषुवसंक्रमण (मेष व तूळ) आणि षडशीतिमुखे (ह्मणजे मिथुन, कन्या व मीन ह्या संक्रांति) ह्यांना ज्या दिवशीं आरंभ होतो दिवशीं आणि चंद्रसूर्यग्रहणकालीं दिलेल्या दानाचें फल कधींही संपत नाहीं २८. सारांश, ऋतूचे आरंभीं दिलेल्या दानाचें दसपट, अयनादिकांचे आरंभीं दिलेल्याचें शंभरपट, ग्रहणदिवशीं दिलेल्याचें हजारपट आणि विषुवदिवशीं दिलेल्याचें अक्षय्य फल पुरुषाला प्राप्त होतें २९. हे राजा, भूमिदान केल्यावांचून भूमि मिळत नाहीं व यान दिल्यावाचून यानामध्यें आरूढ होऊन जातां येत नाहीं. सारांश, ज्या ज्या भोग्य वस्तु ह्या जन्मीं पुरुष ब्राह्मणाला देतो त्या त्या वस्तूंचा तो पुनरपि जन्मास आल्यावर त्याला उपभोग घडतो १३०. सुवर्ण हें अग्नीचें उत्कृष्ट अपत्य आहे, पृथ्वी ही विष्णूची पत्नी आहे आणि गाई सूर्याच्या कन्या आहेत. तेव्हां सुवर्ण, गाई आणि पृथ्वी जो देतो त्याला त्रैलोक्य दान दिल्याचें फल प्राप्त होतें ३१. पारलौकिक सुखाचें अक्षय्य साधन दानाशिवाय त्रैलोक्यांत दुसरें कोणतेंही नाहीं; मग इहलोकीं अभ्युदयप्राप्तीचें साधन दुसरें असण्याची तर गोष्ट कशाला पाहिजे ? तस्मात्, विशेष ज्ञानवान् लोक दान हेंच त्रैलोक्यांतील उत्कृष्ट मुख्य साधन असें ह्मणत असतात १३२. ह्याप्रमाणें० महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं दानमाहात्म्याविषयीं दोनशेंवा अध्याय समाप्त झाला ॥ २०० ॥

वैशम्पायन उवाच ॥ श्रुत्वा तु राजा राजर्षेरिन्द्रद्युम्नस्य तत्तथा । मार्कण्डेयान्महाभागात्स्वर्गस्य प्रतिपादनम् १ युधिष्ठिरो महाराज पप्रच्छ भरतर्षभ । मार्कण्डेयं तपोवृद्धं दीर्घायुषमकल्मषम् २ विदितास्तव धर्मज्ञ देवदानवराक्षसाः । राजवंशाश्च विविधा ऋषिवंशाश्च शाश्वताः ३ न तेऽस्त्यविदितं किंचिदस्मिँल्लोके द्विजोत्तम । कथां वेत्सि मुने दिव्यां मनुष्योरगरक्षसाम् ४ देवगन्धर्वयक्षाणां किंनराप्सरसां तथा । इदमिच्छाम्यहं श्रोतुं तत्त्वेन द्विजसत्तम ५ कुवलाश्व इति ख्यात इक्ष्वाकुरपराजितः । कथं नामविपर्यासाद्धुन्धुमारत्वमागतः ६ एतदिच्छामि तत्त्वेन ज्ञातुं भार्गवसत्तम । विपर्यस्तं यथा नाम कुवलाश्वस्य धीमतः ७ वैशम्पायन उवाच ॥ युधिष्ठिरेणैवमुक्तो मार्कण्डेयो महामुनिः । धौन्धुमारमुपाख्यानं कथयामास भारत ८ मार्कण्डेय उवाच ॥ हन्त ते कथयिष्यामि शृणु राजन्युधिष्ठिर । धर्मिष्ठमिदमाख्यानं धुन्धुमारस्य तच्छृणु ९ यथा स राजा इक्ष्वाकुः कुवलाश्वो महीपतिः । धुन्धुमारत्वमगमत्तच्छृणुष्व महीपते १० महर्षिर्विश्रुतस्तात उत्तङ्क इति भारत । मरुधन्वसु रम्येषु

वैशंपायन सांगतातः—महाभाग्यवान् मार्कंडेयमुनींपासून राजर्षि इंद्रद्युम्नाचें त्याप्रमाणें तें स्वर्गगमन श्रवण केल्यावर राजा १ युधिष्ठिर, हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजयमहाराजा, तपोवृद्ध, चिरजीवी आणि निष्पाप अशा मार्कंडेयमुनींना ह्मणाला २ " हे धर्मवेत्त्या, देव, दानव, राक्षस आणि सतत कायम रहाणारे नानाप्रकारचे राजवंश व ऋषिवंश आपणाला विदित आहेत ३. हे द्विजश्रेष्ठ, ह्या जगतामध्यें आपणाला अविदित अशी कोणतीही गोष्ट नाहीं. हे मुने, आपण मनुष्य, उरग व राक्षस ह्यांचा उत्कृष्ट वृत्तांत जाणीत असून ४ देव, गंधर्व, यक्ष, किन्नर आणि अप्सरा ह्यांचेंही खरें खरें वृत्त आपणाला माहीत आहे. हे द्विजश्रेष्ठ, सांप्रत हें खरें खरें श्रवण करण्याची माझी इच्छा आहे ५ कुवलाश्व ह्मणून प्रसिद्ध असलेला एक अजिंक्य इक्ष्वाकु नांवाचा राजा होता. त्याच्या नांवाचा विपर्यास होऊन धुंधुमार ह्या नांवानें तो प्रसिद्ध कसा झाला ? ६ हें, हे भृगुवंशजश्रेष्ठ, तत्त्वतः जाणण्याची माझी इच्छा आहे. ह्यास्तव, विचारी कुवलाश्वाचें नांव कसें बदललें (हें आपण मला कथन करा)" ७. वैशंपायन सांगतातः—हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, युधिष्ठिरानें ह्याप्रमाणें विनंति केल्यावर मार्कंडेय महामुनींनीं धुंधुमाराचें आख्यान कथन केलें ८. मार्कंडेय सांगतातः—हे राजा युधिष्ठिरा, ऐक; मी तुला कथन करितो. धुंधुमाराचें तें हें धार्मिक आख्यान तूं श्रवण कर ९. हे भूपते, कुवलाश्व ह्मणून प्रसिद्ध असलेला भूपति इक्ष्वाकुराजा धुंधु-

आश्रमस्तस्य कौरव ११ उत्तङ्कस्तु महाराज तपोतप्यत्सुदुश्चरम् ।
आरिराधयिषुर्विष्णुं बहून्वर्षगणान्विभुः १२ तस्य प्रीतः स भगवान्सा-
क्षाद्दर्शनमेयिवान् । दृष्ट्वैव चर्षिः प्रह्वस्तं तुष्टाव विविधैः स्तवैः १३ उत्तङ्क
उवाच ॥ त्वया देव प्रजाः सर्वाः ससुरासुरमानवाः । स्थावराणि च
भूतानि जङ्गमानि तथैव च १४ ब्रह्म वेदाश्च वेद्यं च त्वया सृष्टं महाद्युते ।
शिरस्ते गगनं देव नेत्रे शशिदिवाकरौ १५ निःश्वासः पवनश्चापि
तेजोऽग्निश्च तवाच्युत । बाहवस्ते दिशः सर्वाः कुक्षिश्चापि महार्णवः १६
ऊरू ते पर्वता देव खं जङ्घे मधुसूदन । पादौ ते पृथिवी देवी रोमाण्यो-
षधयस्तथा १७ इन्द्रसोमाग्निवरुणा देवासुरमहोरगाः । प्रह्वास्त्वामुप-
तिष्ठन्ति स्तुवन्तो विविधैः स्तवैः १८ त्वया व्याप्तानि सर्वाणि भूतानि
भुवनेश्वर । योगिनः सुमहावीर्याः स्तुवन्ति त्वां महर्षयः १९ त्वयि तुष्टे
जगत्स्वास्थ्यं त्वयि क्रुद्धे महद्भयम् । भयानामपनेतासि त्वमेकः पुरुषो-

---

मार कसा झाला ते तू श्रवण कर १०. बा भरतवंशजश्रेष्ठा कुरुकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, उत्तंक ह्मणून एक प्रख्यात महर्षि होते; त्याचा रमणीय मरुधन्वदेशामध्ये आश्रम आहे ११. हे महाराजा, विष्णूना प्रसन्न करून घेण्याकरिता पुष्कळ वर्षसमुदाय लोटेपर्यंत समर्थ उत्तंकाने अत्यंत दुष्कर तपश्चर्या केली १२ त्याच्यावर संतुष्ट होऊन भगवानांनी त्याला प्रत्यक्ष दर्शन दिलें; तेव्हा दर्शन होताक्षणी उत्तंकऋषींनी नम्र होऊन नानाप्रकारच्या स्तुतींनी त्यांचे स्तवन केले १३ उत्तंक ह्मणतात:— हे देवा, देव, दैत्य, मानव ह्यासहवर्तमान सर्व प्रजा ह्मणजे स्थावरजंगमात्मक प्राणी आपणच उत्पन्न केले आहेत १४. हे महातेजस्वि, ब्राह्मण, वेद आणि व्यवहार हे आपणच निर्माण केले आहेत. हे देव, आकाश आपलें मस्तक असून चंद्रसूर्य आपले नेत्र आहेत १५ आणि त्याचप्रमाणे वायु तझा निःश्वास असून अग्नि तझे तेज आहे सर्व दिशा तुझे बाहू असून महासागर हे तुझे उदर आहे १६. हे देवा, पर्वत ह्या तुझ्या मांड्या असून, हे मधुसूदना, अंतरिक्ष ह्या तुझ्या पोटऱ्या आहेत आणि त्याचप्रमाणे पृथ्वी देवी तुझे पाय असून ओषधि तुझे केस आहेत १७. इंद्र, सोम, अग्नि व वरुण हे देव आणि इतरही देव, दैत्य व महोरग नानाप्रकारच्या स्तवानी स्तवन करीत करीत नम्र होऊन तुझी सेवा करीत असतात १८. हे जगदीश्वरा, सर्व प्राण्याना तूं व्याप्त केलें आहेस आणि अत्यंत महासामर्थ्यवान् योगी व महर्षि तुझें स्तवन करीत आहेत १९. कारण, तूं संतुष्ट झाल्याने जगताला स्वास्थ्य प्राप्त होत असून तू क्रुद्ध झाल्यानें मोठें भय प्राप्त होत असतें. हे पुरुषोत्तमा, देव आणि मनुष्यें ह्यांचें भय हरण

त्तम २० देवानां मानुषाणां च सर्वभूतसुखावहः । त्रिभिर्विक्रमणैर्देव त्रयो लोकास्त्वया हृताः २१ असुराणां समृद्धानां विनाशश्च त्वया कृतः । तव विक्रमणैर्देवा निर्वाणमगमन्परम् २२ पराभूताश्च दैत्येन्द्रास्त्वयि क्रुद्धे महाद्युते । त्वं हि कर्ता विकर्ता च भूतानामिह सर्वशः २३ आराधयित्वा त्वां देवाः सुखमेधन्ति सर्वशः । एवं स्तुतो हृषीकेश उत्तङ्केन महात्मना २४ उत्तङ्कमब्रवीद्विष्णुः प्रीतस्तेहं वरं वृणु । उत्तङ्क उवाच ॥ पर्याप्तो मे वरो ह्येष यदहं दृष्टवान्हरिम् २५ पुरुषं शाश्वतं दिव्यं स्रष्टारं जगतः प्रभुम् । विष्णुरुवाच ॥ प्रीतस्तेहमलौल्येन भक्त्या तव च सत्तम २६ अवश्यं हि त्वया ब्रह्मन्मत्तो ग्राह्यो वरो द्विज । एवं संछन्द्यमानस्तु वरेण हरिणा तदा २७ उत्तङ्कः प्राञ्जलिर्वव्रे वरं भरतसत्तम । यदि मे भगवन्प्रीतः पुण्डरीकनिभेक्षण २८ धर्मे सत्ये दमे चैव बुद्धिर्भवतु मे सदा । अभ्यासश्च भवेद्भक्त्या त्वयि नित्यं ममेश्वर २९ भगवानुवाच ॥ सर्वमेतद्धि भविता मत्प्रसादात्तव द्विज । प्रतिभास्यति योगश्च येन युक्तो दिवौकसाम् ३० त्रयाणामपि लोकानां मह-

---

करणारा एक तूच असून प्राणिमात्रांना सुखावह असा तूच आहेस. हे देवा, तीन पाउलें टाकून तूं तिन्हीं लोक व्याप्त करून टाकिलेस २०, २१ समृद्ध दैत्यांचा नाश तूं केलास आणि तुझ्याच पराक्रमामुळें देवांना परम सौख्य प्राप्त झालें २२. हे महातेजस्वी विष्णो, तूं क्रुद्ध झाल्यामुळें दैत्यराजांचा पराभव झाला. सारांश, ह्या त्रैलोक्यामध्यें सर्व प्रकारें भूतांचा उत्पादक व संहारक तूच आहेस २३ आणि तुझेंच आराधन करून देवांना सर्व प्रकारें सुख होत असतें. ह्याप्रमाणें महात्म्या उत्तंकानें हृषीकेशाची स्तुति केली असतां २४ विष्णु त्याला ह्मणाले "मी तुजवर प्रसन्न झालों आहें, वर माग." उत्तंक ह्मणतो:—शाश्वत, दिव्य आणि जगदुत्पादक अशा पुरुषोत्तम प्रभु श्रीहरीचें दर्शन झालें हाच वर मला पुरे आहे. विष्णु ह्मणतात:—हे सज्जनश्रेष्ठा, तुझ्या निर्लोभपणामुळें आणि तुझ्या भक्तीमुळें मी तुजवर प्रसन्न झालों आहें २५,२६. ह्यास्तव, हे द्विज, हे ब्रह्मनिष्ठ, माझ्यापासून तुला वर अवश्य घेतला पाहिजे. ह्याप्रमाणें श्रीहरी 'वर माग.' ह्मणून सांगू लागले असतां २७, हे भरतवंशजश्रेष्ठा, उत्तंक वर मागण्याच्या उद्देशानें हात जोडून ह्मणाला "हे भगवन्, हे कमलनयन, आपण जर मजवर प्रसन्न असाल तर २८ धर्म, सत्य आणि इंद्रियदमन ह्यांकडे सर्वदां माझ्या बुद्धीचा कल असो आणि, हे ईश्वरा, तुमचे ठिकाणीं माझी एकसारखी भक्ति नेहमीं असो" २९. भगवान् ह्मणतात:—हे द्विजा, माझ्या प्रसादामुळें हें सर्व कांहीं सिद्धीस

त्कार्यं करिष्यसि । उत्सादनार्थं लोकानां धुन्धुर्नाम महासुरः ३१ तपस्यति तपो घोरं शृणु यस्तं हनिष्यति । राजा हि वीर्यवांस्तात इक्ष्वाकुरपराजितः ३२ बृहदश्व इति ख्यातो भविष्यति महीपतिः । तस्य पुत्रः शुचिर्दान्तः कुवलाश्व इति श्रुतः ३३ स योगबलमास्थाय मामकं पार्थिवोत्तमः । शासनात्तव विप्रर्षे धुन्धुमारो भविष्यति ३४ एवमुक्त्वा तु तं विप्रं विष्णुरन्तरधीयत ३५ [८०४५] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि धुन्धुमारोपाख्यान एकाधिकद्विशततमोध्यायः ॥ २०१ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ इक्ष्वाकौ संस्थिते राजञ्छशादः पृथिवीमिमाम् । प्राप्तः परमधर्मात्मा सोयोध्यायां नृपोभवत् १ शशादस्य तु दायादः ककुत्स्थो नाम वीर्यवान् । अनेनाश्वापि काकुत्स्थः पृथुश्चानेनसः सुतः २ विष्वगश्वः पृथोः पुत्रस्तस्माद्द्रिश्च जज्ञिवान् । अद्रेश्च युवनाश्वस्तु श्रावस्तस्यात्मजोभवत् ३ तस्य श्रावस्तको ज्ञेयः श्रावस्ती येन निर्मिता । श्रावस्तकस्य दायादो बृहदश्वो महाबलः ४ बृहदश्वस्य दायादः कुव-

---

जाईल व तुला योगप्राप्ति होईल आणि ती झाली असतां देवांचेंच नव्हे ३०, परंतु, त्रैलोक्याचेंच एक मोठें कार्य तूं करिशील. लोकांच्या नाशाकरितां धुंधुनामक महादैत्य ३१ घोर तपश्चर्या करील. आतां त्याचा वध कोण करील तें श्रवण कर. बा उत्तंका, इक्ष्वाकु नांवाचा एका वीर्यवान् अजिंक्य पृथ्वीपति राजा बृहदश्व म्हणून प्रसिद्ध होईल व कुवलाश्व म्हणून प्रसिद्ध असलेल्या त्याला एक जितेंद्रिय व आचरणानें शुद्ध असा एक पुत्र होईल ३२,३३ आणि माझ्या योगबलाचें अवलंबन करून तो नृपश्रेष्ठ, हे ब्रह्मर्षे, तुझ्या आज्ञेवरून धुंधुमार (म्हणजे धुंधुनामक दैत्याचा वध करणारा) होईल ३४. ह्याप्रमाणें त्या ब्राह्मणाला सांगून विष्णु अंतर्धान पावले ३५. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं धुंधुमारोपाख्यानाविषयीं दोनशें पहिला अध्याय समाप्त झाला ॥ २०१ ॥

मार्कंडेय सांगतातः—हे राजा, इक्ष्वाकु निवर्तल्यावर ह्या पृथ्वीवर अत्यंत धर्मात्मा शशाद प्राप्त झाला व तो अयोध्येमध्यें राजा झाला १. शशादाला ककुत्स्थ नांवाचा एक वीर्यवान् पुत्र होता. अनेनस् हा ककुत्स्थाचा पुत्र होय व पृथु हा अनेनसाचा पुत्र होय २. विष्वगश्व हा पृथूचा पुत्र असून त्याच्यापासून अद्रि उत्पन्न झाला. अद्रीपासून युवनाश्व झाला आणि त्या युवनाश्वालाही श्राव म्हणून पुत्र झाला ३. त्या श्रावाला श्रावस्तक म्हणून पुत्र झाला व त्यानेंच श्रावस्ती नगरी निर्माण केली. महाबलाढ्य बृहदश्व म्हणून श्रावस्तकाचा पुत्र होता ४ व कुवलाश्व म्हणून बृहदश्वाचा

लाश्व इति स्मृतः । कुवलाश्वस्य पुत्राणां सहस्राण्येकविंशतिः ५ सर्वे विद्यासु निष्णाता बलवन्तो दुरासदाः । कुवलाश्वश्च पितृतो गुणैरभ्यधिकोऽभवत् ६ समये तं पिता राज्ये बृहदश्वोऽभ्यषेचयत् । कुवलाश्वं महाराज शूरमुत्तमधार्मिकम् ७ पुत्रसंक्रामितश्रीस्तु बृहदश्वो महीपतिः । जगाम तपसे धीमांस्तपोवनममित्रहा ८ मार्कण्डेय उवाच ॥ अथ शुश्राव राजर्षिं तमुत्तङ्को नराधिप । वनं संप्रस्थितं राजन्बृहदश्वं द्विजोत्तमः ९ तमुत्तङ्को महातेजाः सर्वास्त्रविदुषां वरम् । न्यवारयदमेयात्मा समासाद्य नरोत्तमम् १० उत्तङ्क उवाच ॥ भवता रक्षणं कार्यं तत्तावत्कर्तुमर्हसि । निरुद्विग्ना वयं राजंस्त्वत्प्रसादाद्भवेम हि ११ त्वया हि पृथिवी राजन्रक्ष्यमाणा महात्मना । भविष्यति निरुद्विग्ना नारण्यं गन्तुमर्हसि १२ पालने हि महान्धर्मः प्रजानामिह दृश्यते । न तथा दृश्यतेऽरण्ये माभूत्ते बुद्धिरीदृशी १३ ईदृशो न हि राजेन्द्र धर्मः क्वचन दृश्यते । प्रजानां पालने यो वै पुरा राजर्षिभिः कृतः १४ रक्षितव्याः प्रजा राज्ञा तास्त्वं रक्षितुमर्हसि । निरुद्विग्नस्तपश्चर्तुं न हि शक्नोमि पार्थिव १५ ममाश्रमसमीपे वै

पुत्र होता. कुवलाश्वाला एकवीस हजार पुत्र होते ५. ते सारे सर्व विद्यांमध्ये प्रवीण असून बलाढ्य व अजिंक्य होते. कुवलाश्व हा गुणांनी पित्यापेक्षाही अधिक होता ६. तेव्हा योग्यसमयीं त्या उत्तम, धार्मिक व शूर कुवलाश्वाला पित्या बृहदश्वानें, हे महाराजा, राज्यावर अभिषेक केला ७ आणि ह्याप्रमाणे राज्यवैभव पुत्राचे स्वाधीन करून शत्रुघ्न व विचारी बृहदश्वभूपति तपश्चर्या करण्याकरिता तपोवनामध्यें चालता झाला ८. मार्कंडेय सांगतात:— हे प्रजाधिपते युधिष्ठिरराजा, बृहदश्वराजर्षि वनात निघाल्याचें द्विजश्रेष्ठ उत्तकाच्या कानावर आलें ९. तेव्हा उदार मनानें युक्त असलेला महातेजस्वी उत्तक सर्व अस्त्रवेत्त्यांमध्ये श्रेष्ठ असलेल्या त्या पुरुषश्रेष्ठ राजाचें निवारण करून ह्मणाला १० " हे राजा, तुझें कर्तव्य जें प्रजारक्षण तें तूं कर. तुझ्या प्रसादामळें आह्मी निर्भय राहू ११. हे राजा, तू महात्मा रक्षण करणारा असलास ह्मणजे ही पृथ्वी निर्भय राहील; ह्याकरिता तूं अरण्यात जाऊं नको १२. प्रजापालनामध्यें जे मोठें पुण्य इहलोकी दृष्टोत्पत्तीस येत असतें ते अरण्यामध्यें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं ; ह्यास्तव, तुझा असा विचार न होवो १३. हे राजाधिराज, पूर्वी राजर्षींनीं प्रजापालनामध्ये जें कांहीं पुण्य संपादन केलें आहे तशा प्रकारचें पुण्य कोठेंही संपादन होत असलेलें दृष्टी पडत नाही १४. हे राजा, राजानें प्रजेचें रक्षण केलें पाहिजे. ह्यास्तव, तूं प्रजेचें रक्षण कर. कारण, तूं जर रक्षण कर-

समेषु मरुधन्वसु । समुद्रो वालुकापूर्ण उज्जालक इति स्मृतः १६ बहु-
योजनविस्तीर्णो बहुयोजनमायतः । तत्र रौद्रो दानवेन्द्रो महावीर्यपरा-
क्रमः १७ मधुकैटभयोः पुत्रो धुन्धुर्नाम सुदारुणः । अन्तर्भूमिगतो राज-
न्वसत्यमितविक्रमः १८ तं निहत्य महाराज वनं त्वं गन्तुमर्हसि । शेते लोक-
विनाशाय तप आस्थाय दारुणम् १९ त्रिदशानां विनाशाय लोकानां चापि
पार्थिव । अवध्यो दैवतानां हि दैत्यानामथ रक्षसाम् २० नागानामथ यक्षाणां
गन्धर्वाणां च सर्वशः । अवाप्य स वरं राजन्सर्वलोकपितामहात् २१ तं
विनाशय भद्रं ते मा ते बुद्धिरतोऽन्यथा । प्राप्स्यसे महतीं कीर्तिं शाश्वती-
मव्ययां ध्रुवाम् २२ क्रूरस्य तस्य स्वपतो वालुकान्तर्हितस्य च । संव-
त्सरस्य पर्यन्ते निःश्वासः संप्रवर्तते २३ यदा तदा भूश्चलति सशैलवन-
कानना । तस्य निःश्वासवातेन रज उद्धूयते महत् २४ आदित्यपथमा-
श्रित्य सप्ताहं भूमिकम्पनम् । सविस्फुलिङ्गं सज्वालं धूममिश्रं सुदारु-

---

णारा नसशील तर निर्भय राहून माझ्या हातून तपश्चर्या होणें शक्य नाहीं १५. मरुधन्व नांवाच्या सपाट प्रदेशात माझ्या आश्रमाजवळ वाळूनें भरलेला एक उज्जालक ह्मणून समुद्र आहे १६. त्याची लांबी-रुंदी पुष्कळ योजनें असून त्या ठिकाणीं एक मोठा वीर्यवान् व पराक्रमी असा भयंकर दानवांचा राजा आहे १७. तो अत्यंत भयंकर दानवराज मधुकैटभांचा पुत्र असून धुंधु हें त्याचें नांव आहे आणि, हे राजा, भूमीच्या अंतर्भागामध्यें तो अपरिमितपराक्रमी धुंधु वास्तव्य करीत आहे १८. तस्मात्, हे महाराजा, त्याचा वध केल्यावर तू वनामध्यें जा. कारण, तो लोकनाशाकरितां उग्र तपश्चर्येचें अवलंबन करून राहिला आहे १९. हे राजा, देवांच्या आणि इतर लोकांच्याही नाशाकरितां तो तपश्चर्या करून राहिला आहे व सर्व लोकांचा आदिपुरुष जो ब्रह्मदेव त्याच्यापासून वर प्राप्त करून घेतल्यामुळें, हे राजा, देव, दैत्य, राक्षस, नाग, यक्ष आणि गंधर्व ह्यांना सर्व प्रकारें तो अवध्य झालेला आहे २०,२१. ह्यास्तव, त्याचा वध कर ह्मणजे तुझें कल्याण होईल; हें कार्य झाल्याशिवाय दुसरा विचार तुझ्या मनामध्यें येणें योग्य नाहीं. हें कार्य केल्यानें कधींही नाश न पावणारी अशी मोठी अचल व सार्वकालिक कीर्ति तूं संपादन करशील २२. वाळूमध्यें पडून राहिलेल्या त्या क्रूर राक्षसाचा वर्षाचे शेवटीं एकदां श्वास सुटत असतो २३ आणि जेव्हां तो श्वासोच्छ्वास करितो तेव्हां त्याच्या निःश्वासवायूनें पर्वत, वनें आणि अरण्यें ह्यांसहवर्तमान ही पृथ्वी कंपित होत असून अंतरिक्षामध्यें प्रचंड धूळ उद्भवत असते आणि ठिणग्या, ज्वाळा व धूम ह्यांनीं युक्त

णम् २५ तेन राजन्न शक्नोमि तस्मिन्स्थातुं स्व आश्रमे । तं विनाशय राजेन्द्र लोकानां हितकाम्यया २६ लोकाः स्वस्था भविष्यन्ति तस्मिन्विनिहतेसुरे । त्वं हि तस्य विनाशाय पर्याप्त इति मे मतिः २७ तेजसा तव तेजश्च विष्णुराप्याययिष्यति । विष्णुना च वरो दत्तः पूर्वं मम महीपते २८ यस्तं महासुरं रौद्रं वधिष्यति महीपतिः । तेजस्तं वैष्णवमिति प्रवेक्ष्यति दुरासदम् २९ तत्तेजस्त्वं समाधाय राजेन्द्र भुवि दुःसहम् । तं निषूदय राजेन्द्र दैत्यं रौद्रपराक्रमम् ३० न हि धुन्धुर्महातेजास्तेजसाल्पेन शक्यते । निर्दग्धुं पृथिवीपाल स हि वर्षशतैरपि ३१ [८०७६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि धुन्धुमारोपाख्याने द्व्यधिकशततमोऽध्यायः ॥ २०२ ॥

मार्कण्डेय उवाच । स एवमुक्तो राजर्षिरुत्तङ्केनापराजितः । उत्तङ्कं कौरवश्रेष्ठ कृताञ्जलिरथाब्रवीत् १ न तेऽभिगमनं ब्रह्मन्मोघमेतद्भविष्यति । पुत्रो ममायं भगवन्कुवलाश्व इति स्मृतः २ धृतिमान्क्षिप्रकारी

असलेला तो अतिभयंकर भूकंप एकसारखा सात दिवस सुरू असतो २४,२५. ह्यामुळें, हे राजा, त्या आपल्या आश्रमामध्यें रहाण्यास मी समर्थ होत नाहीं. ह्यास्तव, हे राजाधिराज, लोकांचें हित करण्याच्या इच्छेनें तूं त्याचा वध कर २६. त्या असुराचा वध झाला असतां लोक स्वस्थ होतील. तूं त्याचा वध करण्यास समर्थ आहेस असें मला वाटतें २७. हे भूपते, तुझ्या तेजामध्यें विष्णु आपल्या तेजाची भर घालील; कारण " त्या भयंकर महादैत्याचा जो राजा वध करील त्याचे ठिकाणीं अजिंक्य वैष्णवतेज प्रविष्ट होईल. " ह्मणून विष्णूनें पूर्वीं मला वर दिलेला आहे २८,२९. तस्मात्, हे राजेंद्रा, भूतलावर कोणालाही सहन न होणाऱ्या वैष्णवतेजाचें तूं अवलंबन कर आणि, हे राजाधिराज, भयंकर पराक्रम करणाऱ्या त्या दैत्याचा तूं वध कर ३०. हे भूपाला, अल्प तेजाच्या योगानें त्या महातेजस्वी धुंधूचा शेंकडों वर्षींतही वध होणें शक्य नाहीं ३१. " ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वापैकीं धुंधुमाराच्या उपाख्यानाविषयीं दोनशें दुसरा अध्याय समाप्त झाला ॥ २०२ ॥

मार्कंडेय ह्मणतातः—हे कुरुवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, ह्याप्रमाणें उत्तंकानें सांगितलें असतां तो पराजय न पावलेला राजर्षि हात जोडून उत्तंकाला ह्मणाला १ " हे ब्रह्मनिष्ठ, आपलें हें आगमन व्यर्थ होणार नाहीं. हे भगवन्, हा माझा पुत्र कुवलाश्व

च वीर्येणाप्रतिमो भुवि । प्रियं च ते सर्वमेतत्करिष्यति न संशयः ३
पुत्रैः परिवृतः सर्वैः शूरैः परिघबाहुभिः । विसर्जयस्व मां ब्रह्मन्न्यस्तश-
स्त्रोस्मि साम्प्रतम् ४ तथास्त्विति च तेनोक्तो मुनिनामिततेजसा । स
तमादिश्य तनयमुत्तङ्काय महात्मने ५ क्रियतामिति राजर्षिर्जगाम
वनमुत्तमम् । युधिष्ठिर उवाच ॥ क एष भगवन्दैत्यो महावीर्यस्तपो-
धन ६ कस्य पुत्रोथ नप्ता वा एतदिच्छामि वेदितुम् । एवं महाबलो
दैत्यो न श्रुतो मे तपोधन ७ एतदिच्छामि भगवन्याथातथ्येन वेदितुम् ।
सर्वमेव महाप्राज्ञ विस्तरेण तपोधन ८ मार्कण्डेय उवाच ॥ शृणु राजन्निदं सर्वं
यथावृत्तं नराधिप । कथ्यमानं महाप्राज्ञ विस्तरेण यथायथम् ९ एकार्णवे तदा
लोके नष्टे स्थावरजङ्गमे । प्रनष्टेषु च भूतेषु सर्वेषु भरतर्षभ १० प्रभवं
लोककर्तारं विष्णुं शाश्वतमव्ययम् । मयाहुर्मुनयः सिद्धाः सर्वलोकम-
हेश्वरम् ११ सुष्वाप भगवान्विष्णुरप्सु योगत एव सः । नागस्य भोगे
महति शेषस्यामिततेजसः १२ लोककर्ता महाभाग भगवानच्युतो हरिः ।

ह्मणून प्रसिद्ध आहे २. तो धैर्यवान् व हातीं घेतलेलें काम सत्वर पार पाडणारा असून वीर्यानें तर ह्या भूतलावर तो अप्रतिमच आहे. तो हा आपला सर्व मनोरथ निःसंशय परिपूर्ण करील ३. शूर आणि अडसरासारख्या दीर्घ बाहूंनीं युक्त अशा सर्व पुत्रांचें त्याला साहाय्य आहे. ह्यास्तव, हे ब्रह्मनिष्ठ, मला आपण सोडा. मीं सांप्रत शस्त्राचा त्याग केलेला आहे " ४. ह्यावर 'ठीक आहे.' ह्मणून त्या अपरिमित तेजस्वी उत्तंकमुनींनीं त्याला सांगितलें असतां त्या बृहदश्वानें त्या आपल्या पुत्राला महात्म्या उत्तंकमुनींचे स्वाधीन केलें ५ आणि " ह्यांच्या सांगण्याप्रमाणें वाग. " असें सांगून तो राजर्षि उत्कृष्ट वनामध्यें चालता झाला. युधिष्ठिर प्रश्न करितोः— हे भगवन्, हे तपोधन, कोण हा महावीर्यवान् दैत्य ? ६. हा कोणाचा पुत्र अथवा कोणाचा नातू ? हें श्रवण करण्याची माझी इच्छा आहे. कारण, हे तपोधन, ह्याप्र-माणें महाबलाढ्य दैत्य माझ्या कधीं ऐकण्यांत आलेला नाहीं ७. तस्मात्, हे भगवन्, हे महाप्राज्ञ तपोधन, हें अगदीं जसें असेल तसें सर्व सविस्तर जाणण्याची माझी इच्छा आहे ८. मार्कंडेय ह्मणाले " हे राजाधिराज, हे महाप्राज्ञ, तें सर्व जसें घडलें तसें सविस्तर मी सांगतों; तूं ऐक ९. " हे भरतवंशजश्रेष्ठा, चोहोंकडे समुद्र होऊन हें स्थावरजंगमात्मक जगत् नाहींसें झालें असतां आणि सर्व प्राणीही नाश पावले असतां १० ज्याला सिद्ध व मुनि सर्व लोकाधिपति, जगत्स्रष्टा, सर्वव्यापी, सनातन, विनाशशून्य आणि जगत्कारण ह्मणतात ११ तो भगवान् विष्णु उदकामध्यें योगाचें अवलंबन करून अपरिमित

नागभोगेन महता परिरभ्य महीमिमाम् १३ स्वपतस्तस्य देवस्य पद्मं
सूर्यसमप्रभम् । नाभ्यां विनिःसृतं दिव्यं तत्रोत्पन्नः पितामहः १४ साक्षा-
ल्लोकगुरुर्ब्रह्मा पद्मे सूर्यसमप्रभः । चतुर्वेदश्चतुर्मूर्तिस्तथैव च चतुर्मुखः १५
स्वप्रभावाद्दुराधर्षो महाबलपराक्रमः । कस्यचित्त्वथ कालस्य दानवौ
वीर्यवत्तमौ १६ मधुश्च कैटभश्चैव दृष्टवन्तौ हरिं प्रभुम् । शयानं शयने
दिव्ये नागभोगे महाद्युतिम् १७ बहुयोजनविस्तीर्णे बहुयोजनमायते ।
किरीटकौस्तुभधरं पीतकौशेयवाससम् १८ दीप्यमानं श्रिया राजंस्ते-
जसा वपुषा तथा । सहस्रसूर्यप्रतिममद्भुतोपमदर्शनम् १९ विस्मयः
सुमहानासीन्मधुकैटभयोस्तथा । दृष्ट्वा पितामहं चापि पद्मे पद्मनिभे-
क्षणम् २० वित्रासयेतामथ तौ ब्रह्माणममितौजसम् । वित्रस्यमानो
बहुशो ब्रह्मा ताभ्यां महायशाः २१ अकम्पयत्पद्मनालं ततोबु-

तेजस्वी शेषसंज्ञक नागाच्या प्रचंड वेटोळ्यावर शयन करीत होता १२. सारांश, हे महाभाग्यवान् युधिष्ठिरा, जगत्स्रष्टा व षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवान् श्रीहरी अच्युत ह्या पृथ्वीला आलिंगन देऊन नागाच्या प्रचंड वेटोळ्यावर शयन करीत होता १३. तो देव शयन करीत असताना सूर्यासारिखें तेजस्वी असें एक दिव्य कमल त्याच्या नाभीपासून निघालें व त्या कमलामध्यें ब्रह्मदेव उत्पन्न झाला १४. सूर्यासारिख्या तेजस्वी कमलामध्ये उत्पन्न झालेला तो प्रत्यक्ष जगद्गुरु ब्रह्मदेवही सूर्यासारिखा तेजस्वी आहे आणि तो चार वेद, चार मूर्ति व चार मुखें ह्यांनी युक्त आहे १५ तो ब्रह्मदेव स्वसामर्थ्यानें अजिंक्य आहे आणि तो महाबलाढ्य व महापराक्रमी आहे. ब्रह्मदेव उत्पन्न होऊन कांहीं काल लोटल्या-वर अत्यंत सामर्थ्यवान् अशा मधु व कैटभ ह्या दानवांना प्रभु श्रीहरीचें दर्शन झालें. सर्पशरीररूप दिव्य शय्येवर महातेजस्वी विष्णु शयन करीत होते १६,१७. ती शय्या पुष्कळ योजनें रुंद असून लांबही पुष्कळ योजनें होती. अशा त्या शय्येवर किरीट व कौस्तुभ धारण करून पीतवर्ण रेशमी वस्त्र परिधान केलेले विष्णु शयन करीत होते १८. हे राजा, लक्ष्मी, तेज आणि स्वरूप यांच्या योगानें ते देदीप्यमान असून हजारों सूर्यांप्रमाणें ते तेजस्वी दिसत होते आणि त्यांची मुद्रा कांहीं अद्भुतच दिसत होती १९. त्यांना व कमलामध्यें असलेल्या कमलनयन ब्रह्मदेवालाही अवलोकन करून मधुकैटभांना फारच आश्चर्य वाटलें २० आणि अपरिमित तेजानें युक्त अस-लेल्या ब्रह्मदेवाला त्यांनीं त्रास दिला. ह्याप्रमाणें महाकीर्तिमान् ब्रह्मदेवाला त्यांच्या-पासून वारंवार त्रास होऊं लागला असतां २१ त्यानें कमलाचा देंठ हालविला. तेव्हां

ष्यत केशवः । अथापश्यत गोविन्दो दानवौ वीर्यवत्तरौ २२
दृष्ट्वा तावब्रवीद्देवः स्वागतं वां महाबलौ । ददामि वां वरं श्रेष्ठं प्रीतिर्हि
मम जायते २३ तौ प्रहस्य हृषीकेशं महादर्पौ महाबलौ । प्रत्यब्रूतां
महाराज सहितौ मधुसूदनम् २४ आवां वरय देव त्वं वरदौ स्वः
सुरोत्तम । दातारौ स्वो वरं तुभ्यं तद्ब्रवीह्यविचारयन् २५ भगवानुवाच ॥
प्रतिगृह्णे वरं वीरावीप्सितश्च वरो मम । युवां हि वीर्यसंपन्नौ न
वामस्ति समः पुमान् २६ वध्यत्वमुपगच्छेतां मम सत्यपराक्रमौ । एत-
दिच्छाम्यहं कामं प्राप्तं लोकहिताय वै २७ मधुकैटभावूचतुः ॥ अनृतं
नोक्तपूर्वं नौ स्वैरेष्वपि कुतोऽन्यथा । सत्ये धर्मे च निरतौ विद्ध्यावां
पुरुषोत्तम २८ बले रूपे च शौर्ये च शमे न च समोऽस्ति नौ । धर्मे
तपसि दाने च शीलसत्त्वदमेषु च २९ उपप्लवो महानस्मानुपावर्तत
केशव । उक्तं प्रतिकुरुष्व त्वं कालो हि दुरतिक्रमः ३० आवामिच्छा-
वहे देव कृतमेकं त्वया विभो ३१ अनावृतेऽस्मिन्नाकाशे वधं सुरवरोत्तम ।

केशव जागे झाले आणि ते महासामर्थ्यवान् दानव त्यांनीं अवलोकन केले २२. इत-केंच नव्हे; परतु, अवलोकन केल्यावर देव त्यांना ह्मणाले:—हे महाबलाढ्य मधुकैटभहो, तुमचें स्वागत असो. मी तुह्माला श्रेष्ठ वर देतों; मी संतुष्ट झालों आहें २३. ह्यावर ते अतिगर्विष्ठ महाबलाढ्य मधुकैटभ हृषीकेशाला हंसले आणि, हे महाराजा, त्या मधुसूदनाला एकदम ह्मणाले २४ " हे देवा, हे सुरश्रेष्ठा, तूंच आमच्यापाशीं वर माग; आह्मी वर देणारे आहोंत. आह्मी तुला वर देण्यास उद्युक्त झालो आहोंत; तर कांहीं एक विचार न करितां तू वर माग " २५. भगवान् ह्मणतात:—मी वर मागून घेतों; मलाही एक वर अभिमत आहे. तुह्मी वीर्यवान् आहात व तुमची बरोबरी करणारा पुरुष कोणीही नाहीं २६. तेव्हां अमोघ पराक्रम करणाऱ्या तुमचा माझ्या हातून वध व्हावा हा वर लोकहिताकरितां प्राप्त होण्याची माझी इच्छा आहे २७. मधुकैटभ ह्मणतात:— ' आह्मीं थट्टेत देखील पूर्वीं कधीं असत्य भाषण केलेलें नाहीं; मग बाकीच्या वेळेची तर गोष्ट कशाला पाहिजे ? हे पुरुषोत्तमा, सत्य आणि धर्म ह्यांविषयीं आह्मी तत्पर आहोंत असें तूं समज २८. बल, रूप, शौर्य, शम, धर्म, तप, दान, शील, सत्त्व आणि दम ह्यांमध्यें आमची बरोबरी करणारा कोणीही नाहीं २९. तेव्हां, हे केशवा, आह्मावर ही एक मोठी धाड येऊन कोसळली आहे ; परतु, कालाचें उल्लंघन करणें अशक्य आहे; ह्यास्तव, आमचें वचन गेल्याप्रमाणें तूं आपला मनोरथ सिद्धीस ने ३०. हे देवा, हे प्रभो, तूं एक गोष्ट मात्र आमच्यासंबंधानें

पुत्रत्वमधिगच्छाव तव चापि सुलोचन ३२ वर एष वृतो देव तद्विद्धि सुरसत्तम। अनृतं मा भवेद्देव यद्धि नौ संश्रुतं तदा ३३ भगवानुवाच ॥ बाढमेवं करिष्यामि सर्वमेतद्भविष्यति । स विचिन्त्याथ गोविन्दो नापश्यद्यदनावृतम् ३४ अवकाशं पृथिव्यां वा दिवि वा मधुसूदनः।स्वकावनावृतावूरू दृष्ट्वा देववरस्तदा ३५ मधुकैटभयो राजञ्छिरसि मधुसूदनः ॥ चक्रेण शितधारेण न्यकृन्तत महायशाः ३६ [८११२] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि मार्कण्डेयसमास्यापर्वणि धुन्धुमारोपाख्याने त्र्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २०३ ॥

मार्कण्डेय उवाच॥धुन्धुर्नाम महाराज तयोः पुत्रो महाद्युतिः।स तपोऽतप्यत महन्महावीर्यपराक्रमः १ अतिष्ठदेकपादेन कृशो धमनिसंततः । तस्मै ब्रह्मा ददौ प्रीतो वरं वव्रे स च प्रभुम् २ देवदानवयक्षाणां सर्पगन्धर्वरक्षसाम् । अवध्योऽहं भवेयं वै वर एष वृतो मया ३ एवं भवतु गच्छेति

करावीस अशी आमची इच्छा आहे ३१ हे पुरुषश्रेष्ठा देवाधिदेवा, हें आकाश जेथें शून्य असेल तेथें वध व्हावा आणि, हे सुलोचना, तुझें पुत्रत्व आह्मास प्राप्त व्हावें ३२. हे सुरश्रेष्ठा देवा, हा वर आह्माला इष्ट आहे असें तू समज. हे देवा, तू आमच्यापाशीं प्रतिज्ञा केलीस ती असत्य होऊं नये ३३.' भगवान् ह्मणतातः—होय, मी ह्याप्रमाणें करीन आणि हें सर्व सिद्धीस जाईल. ह्याप्रमाणे असुरांना सांगितल्यावर भगवान् विचार करूं लागले असतां पृथ्वीमध्यें अथवा अंतरिक्षामध्यें शून्य असा प्रदेश त्यांच्या कोठेंही आढळण्यांत येईना. तेव्हां आपल्या मांड्या मोकळ्या आहेत असें आढळून आल्यावर ३४, ३५, हे राजा, महाकीर्तिमान् भगवानांनीं तीक्ष्ण धारेनें युक्त असलेल्या चक्राच्या योगानें त्या उभयतांची मस्तकें तोडून टाकिलीं ३६. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील मार्कंडेयसमास्यापर्वांपैकीं धुंधुमारोपाख्यानाविषयीं दोनशें तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ २०३ ॥

मार्कंडेय सांगतातः—हे महाराजा, त्या मधुकैटभांचा धुंधु ह्मणून एक महातेजस्वी पुत्र होता. तो महाबलाढ्य व प्रचंडपराक्रमी असून त्यानें मोठी तपश्चर्या केली १. एका पायावर उभें राहून तपश्चर्या केल्यामुळें तो अगदीं कृश होऊन त्याच्या शरीरावरील सर्व शिरा दिसूं लागल्या. तेव्हां ब्रह्मदेवानें प्रसन्न होऊन त्याला वरप्रदान देण्याचें कबूल केलें व त्यानेंही त्या प्रभूपाशीं वर मागितला २. "देव, दानव, यक्ष, सर्प, गंधर्व आणि राक्षस ह्यांच्या हातून माझा वध होऊं नये. हा वर मला इष्ट आहे." असें तो ह्मणाला असतां ३ "असें होईल." ह्मणून ब्रह्मदेवांनींही त्याला

तमुवाच पितामहः । स एवमुक्तस्तत्पादौ मूर्ध्ना स्पृश्य जगाम ह ४ स तु धुन्धुर्वरं लब्ध्वा महावीर्यपराक्रमः । अनुस्मरन्पितृवधं द्रुतं विष्णुमुपागमत् ५ स तु देवान्सगन्धर्वाञ्जित्वा धुन्धुरमर्षणः । बबाध सर्वानसकृद्विष्णुं देवांश्च वै भृशम् ६ समुद्रे वालुकापूर्णे उज्जालक इति स्मृते । आगम्य च स दुष्टात्मा तं देशं भरतर्षभ ७ बाधति स्म परं शक्त्या तमुत्तङ्काश्रमं विभो । अन्तर्भूमिगतस्तत्र वालुकान्तर्हितस्तथा ८ मधुकैटभयोः पुत्रो धुन्धुर्भीमपराक्रमः । शेते लोकविनाशाय तपोबलमुपाश्रितः ९ उत्तङ्कस्याश्रमाभ्याशं निःश्वसन्पावकार्चिषः । एतस्मिन्नेव काले तु राजा सबलवाहनः १० उत्तङ्कविप्रसहितः कुवलाश्वो महीपतिः । पुत्रैः सह महीपालः प्रययौ भरतर्षभ ११ सहस्रैरेकविंशत्या पुत्राणामरिमर्दनः । कुवलाश्वो नरपतिरन्वितो बलशालिनाम् १२ तमाविशत्ततो विष्णुर्भगवांस्तेजसा प्रभुः । उत्तङ्कस्य नियोगेन लोकानां हितकाम्यया १३ तस्मिन्प्रयाते दुर्धर्षे दिवि शब्दो महानभूत् । एष श्रीमानवध्योऽद्य धुन्धुमारो

सांगितलें. ह्याप्रमाणें ब्रह्मदेवांनीं सांगितल्यावर धुंधु त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून चालता झाला ४. नंतर तो महासामर्थ्यवान् व महापराक्रमी धुंधु वर प्राप्त होतांक्षणीं पित्याच्या वधाची आठवण होऊन लगेंच विष्णूकडे गेला ५. इतकेंच नव्हे; परंतु, तो क्रोधी धुंधु गंधर्वांसहवर्तमान देवांना जिंकून सर्व देवांना व विष्णूंना वारंवार अत्यंत पीडा देऊं लागला ६. वाळूनें भरलेल्या आणि उज्जालक ह्मणून प्रसिद्ध असलेल्या समुद्रामध्यें त्या प्रदेशावर येऊन, हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, तो दुष्टात्मा धुंधु ७ आपल्या सामर्थ्यानें त्या उत्तंकमुनींच्या आश्रमाला अत्यंत पीडा देत असे आणि, हे प्रभो, वाळूमध्यें दडून भूमीच्या अंतर्भागांत रहात असे ८. सारांश, तपःसामर्थ्यानें युक्त असलेला तो मधुकैटभांचा पुत्र भयंकरपराक्रमी धुंधु श्वासोच्छ्वास करितांना नासिकेंतून अग्नीच्या ज्वाला व्यक्त करीत करीत उत्तंकमुनींच्या आश्रमासमीप पडला होता. तों ह्याच वेळीं भूपति व भूपाल कुवलाश्वराजा सैन्य व वाहनें बरोबर घेऊन उत्तंकब्राह्मण आणि पुत्र ह्यांसहवर्तमान, हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, तिकडे गेला ९,१०,११. एकवीस हजार बलाढ्य पुत्र त्या शत्रुनाशक कुवलाश्वराजाच्या बरोबर होते १२ आणि उत्तंकानें सांगितल्यावरून लोकांचें कल्याण व्हावें ह्या इच्छेनें भगवान् विष्णु आपल्या तेजानें त्या कुवलाश्वराजाचे ठिकाणीं प्रविष्ट झाले होते १३. असा तो अजिंक्य कुवलाश्वराजा त्या उत्तंकमुनींच्या आश्रमासमीप गेला असतां ' हाच श्रीमान् राजा आज स्वतः अवध्य राहून धुंधूचा वध करील.' अशी

भविष्यति १४ दिव्यैश्च पुष्पैस्तं देवाः समन्तात्पर्यवारयन्। देवदुन्दुभय-
श्चापि नेदुः स्वयमनीरिताः १५ शीतश्च वायुः प्रववौ प्रयाणे तस्य
धीमतः। विपांसुलां महीं कुर्वन्ववर्ष च सुरेश्वरः १६ अन्तरिक्षे विमा-
नानि देवतानां युधिष्ठिर। तत्रैव समदृश्यन्त धुन्धुर्यत्र महासुरः १७
कुवलाश्वस्य धुन्धोश्च युद्धं कौतूहलान्विताः। देवगन्धर्वसहिताः समवै-
क्षन्महर्षयः १८ नारायणेन कौरव्य तेजसाप्यायितस्तदा। स गतो नृपतिः
क्षिप्रं पुत्रैस्तैः सर्वतोदिशम् १९ अर्णवं खानयामास कुवलाश्वो महीपतिः।
कुवलाश्वस्य पुत्रैश्च तस्मिन्वै वालुकार्णवे २० सप्तभिर्दिवसैः खात्वा
दृष्टो धुन्धुर्महाबलः। आसीद्घोरं वपुस्तस्य वालुकान्तर्हितं महत् २१
दीप्यमानं यथासूर्यस्तेजसा भरतर्षभ। ततो धुन्धुर्महाराज दिशमावृत्य
पश्चिमाम् २२ सुप्तोभूद्राजशार्दूल कालानलसमद्युतिः। कुवलाश्वस्य
पुत्रैस्तु सर्वतः परिवारितः २३ अभिद्रुतः शरैस्तीक्ष्णैर्गदाभिर्मुसलैरपि।
पट्टिशैः परिघैः प्रासैः खड्गैश्च विमलैः शितैः २४ स वध्यमानः संक्रुद्धः

स्वर्गामध्ये मोठी आकाशवाणी झाली १४. तेव्हां देवांनी दिव्य पुष्पांच्या योगानें सर्व बाजूंनी त्याला आच्छादित करून टाकिलें आणि कोणीं वाजविल्याशिवाय आपोआपच देवदुंदुभी वाजूं लागल्या १५ त्या विचारी कुवलाश्वराजा निघाला असतां शीतवायु वाहूं लागला, पृथ्वी धूलिरहित करण्याकरितां इंद्रानें वृष्टि केली १६ आणि ज्या ठिकाणीं महादैत्य धुंधु होता त्या ठिकाणीं अंतरिक्षामध्यें, हे युधिष्ठिरा, देवतांचीं विमानें दृष्टीं पडूं लागलीं १७ व महर्षीही देव आणि गंधर्व ह्यांसहवर्तमान कुवलाश्व आणि धुंधु ह्यांचें युद्ध उत्सुकतेनें पहाण्यास तयार झाले १८ हे कुरुकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, नारायणानें आपल्या तेजाच्या योगानें ज्याचें सामर्थ्य वृद्धिंगत केलेलें आहे असा तो भूपति कुवलाश्व त्या पुत्रांसहवर्तमान चोहोंकडे हिंडूं लागला १९ आणि वाळूनें भरलेला समुद्र त्या कुवलाश्वभूपतीनें खणून काढिला. त्या वाळुकासमुद्रामध्यें कुवलाश्वाच्या पुत्रांनीं सात दिवसपर्यंत एकसारिखें खणण्याचें काम केल्यावर तो महाबलाढ्य धुंधु दृष्टीं पडला. हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, वाळूमध्यें आच्छादित असलेलें त्याचें तें भयंकर व प्रचंड शरीर तेजाच्या योगानें सूर्यासारिखें देदीप्यमान होतें. असो. हे महाराजा, हे नृपश्रेष्ठा, पश्चिम दिशा व्याप्त करून तो धुंधु शयन करीत होता; प्रलयकालच्या अग्नीप्रमाणें त्याची कांति होती व कुवलाश्वाच्या पुत्रांनीं त्याला सर्व बाजूंनी घेरून टाकिलें होतें २०, २१, २२, २३. नंतर त्याच्या अंगावर चाल करून जाऊन तीक्ष्ण बाण, गदा, मुसळें, पट्टे, परिघ, प्रास आणि निर्मळ व